# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०६/ २०१७** **दिनांक १५.०६.२०१७**

**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची विशेष सभा गुरुवार दिनांक १५.०६.२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली आहे. असे इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ १२९०/ २०१७, दिनांक ०८ जून,२०१७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. सदरहू सभा गुरुवार दिनांक १५.०६.२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

| | |
|---|---|
| ०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष | ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| ०३. मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य | ०४. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य |
| ०५. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्या | ०६. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या |

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर- सदस्य, मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग- सदस्य व मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे- सदस्य यांनी दूध्वनीद्वारे कळविले होते.

मा.डॉ.मनीषा कायंदे, सदस्या यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.१५.०६.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. बैठकीस मी हजर रहाणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने, त्याचा खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीत उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर- सदस्य यांनी फॅक्सव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.१५.०६.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी.

मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर- सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.१५.०६.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी, असे कळविले होते.

याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **मा.व्यवस्थापन समिती सभा दि.७.८.२०१६, १६.०८.२०१६, ३१.०८.२०१६, १९.०९.२०१६, ०९.१०.२०१६, ३०.११.२०१६, २२.१२.२०१६, २५.०२.२०१७, २७.०३.२०१७ व २८.०४.२०१७ रोजीचे सभेतील निर्णयांवर संबधीत विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा सद्यस्थिती अहवाल.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे सभांमधील निर्णय पुढील कार्यवाहीसाठी संबधीत विभागांना वेळोवेळी देण्यात आलेले आहेत, व सदर निर्णयांवर विभागांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा संबधीत विभागाचे प्रशासकिय अधिकारी तसेच उपकार्यकारी अधिकारी व मा.कार्यकारी अधिकारी यांचे मार्फत घेतला जात आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेमध्ये विभागांनी केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती सदरहु कार्यवाही पुर्ण होईपर्यत सभेसमोर सादर करणेत यावी, असा निर्णय संमत झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०८/२०१६ ते दि.२२/१२/२०१६ या कालावधीमध्ये झालेल्या सभेमधील निर्णयांवरील कार्यवाहीचा अहवाल दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेमध्ये अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला आहे. त्यावर सविस्तर चर्चा होऊन व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांवरील

कार्यवाहीच्या सद्यस्थितीचे अवलोकन करणेत आले, व इतर निर्णय वगळता फक्त कार्यवाही चालू असलेल्या निर्णयांची सद्यस्थिती यापुढे सादर करणेत यावी, असे ठरले.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०८/२०१६ ते दि.२२/१२/२०१६ या कालावधीमध्ये झालेल्या सभेमधील निर्णयांवरील कार्यवाहीचा सद्यस्थिती अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| मा.व्य.समिती सभा दिनांक | एकुण निर्णय | दि.२५/२/२०१७ रोजीचे सभेतील कार्यवाहीची सद्यस्थिती. | | दि.३१/५/२०१७ अखेरची कार्यवाहीची सद्यस्थिती. | |
|---|---|---|---|---|---|
| | | कार्यवाही पुर्ण | कार्यवाही चालू | कार्यवाही पुर्ण | कार्यवाही चालू |
| ०७/०८/२०१६ | ६४ | ३४ | २६ | ४३ | १७ |
| १६/०८/२०१६ | ७२ | ३८ | ३१ | ५५ | १४ |
| ३१/०८/२०१६ | ९४ | ४३ | ४६ | ६९ | २० |
| १९/०९/२०१६ | ७७ | ३० | ४५ | ५७ | १८ |
| ०९/१०/२०१६ | १३३ | ५८ | ६७ | १०५ | २० |
| ३०/११/२०१६ | २२१ | ९० | १२० | १५३ | ५८ |
| २२/१२/२०१६ | ७६ | ३० | ४४ | ५३ | २१ |

त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ ते दि.२८/०४/२०१७ या कालावधीमध्ये झालेल्या सभांमधील निर्णयांवर संबधीत विभागांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ. नं. | मा.व्य.समिती सभा दिनांक | एकुण निर्णय | नोंद घेणे | विषय रद्द | अमान्य | स्थगित | कार्यवाही पुर्ण | कार्यवाही चालू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २५/०२/२०१७ | २९७ (उपसमिती निर्णयांसह) | २ | ९ | -- | ४ | १८० | १०२ |
| २ | ०९/०३/२०१७ | ५२ | -- | -- | १ | -- | २७ | २४ |
| ३ | २७/०३/२०१७ | ९० (उपसमिती निर्णयांसह) | -- | -- | ०२ | -- | ५० | ३८ |
| ४ | २८/०४/२०१७ | ११० (उपसमिती निर्णयांसह) | -- | ०१ | ०१ | -- | ४९ | ५९ |

सदरचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.४५८** **आजचे सभेत मा.व्यवस्थापन समिती सभा दि.७.८.२०१६ ते २८.०४.२०१७ रोजीचे सभेतील निर्णयांवर संबधीत विभागांनी केलेल्या कार्यवाहीच्या सद्यस्थिती अहवालावर चर्चा करणेसाठी सर्व विभागांचे विभागप्रमुख/ अधिक्षक उपस्थित होते. सभेने त्यांचेबरोबर निर्णयांवर कार्यवाही पुर्ण का झाली नाही, याबाबत चर्चा केली व लवकरात लवकर निर्णयांवर कार्यवाही करणेबाबत सुचना दिल्या.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांवरील कार्यवाहीच्या सद्य:स्थितीचे अवलोकन करणेत येऊन, यापुढे फक्त कार्यवाही चालू असलेल्या निर्णयांची सद्य:स्थिती यापुढे सादर करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग)

---

**विषय नं.०२** **दिनांक २३.०५.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४५९** दिनांक २३.०५.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.३५९-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.१८२ मधिल संस्थान मालकीचे जागेत Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) स्वरुपाचे प्रत्येकी १० TPD क्षमतेचे दोन घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेत यावेत. सदर प्रकल्पाकरीता लॅण्डफीलची आवश्यकता नसल्याने लॅण्डफीलची व्यवस्था करण्यात येऊ नये. लॅण्डफील व्यतिरिक्त इतर सिव्हील कामे व युनिटस् उभारणीसाठी येणारा भांडवली खर्च तसेच दैनंदिन देखभालीसाठी प्रथम वर्षाकरीता अपेक्षित असलेला आवर्ती खर्च मिळून येणाऱ्या एकूण रु.४.५ कोटी मात्रचे खर्चास व सदर कामासाठी विहीत पध्दतीने ई- निविदा मागविणेस मान्यता देणेत आली.

सदर प्रकल्पाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याचा समावेश ई- निविदेत करण्यात यावा व शिर्डी नगरपंचायत यांचेबरोबरील करारनाम्यामध्ये, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सदर प्रकल्पास अनुदान प्राप्त करुन घेणेची कार्यवाही करावी व अनुदान प्राप्त झालेनंतर सदरहू अनुदान संस्थानकडे वर्ग करावे, या बाबीचा समावेश करणेत यावा. तसेच प्रस्तावात नमूद केलेनुसार सुक्या कचऱ्यातील प्लास्टीक श्रेडींग करणेकरीता शेड उभारणीकामी व मौजे शिंगवे येथिल नियोजित घनकचरा प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायत यांना निधी उपलब्ध करुन देणेबाबतचे प्रस्ताव रद्द करण्यात येत असून, तसे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविणेत यावे, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचेसाठी Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) स्वरुपाचा प्रत्येकी १० TPD क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली. याकामी संस्थानचे गट नं.१८२ मधील जागेमध्ये प्रथमत: संस्थानसाठी Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) स्वरुपाचा १० TPD क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेत यावे व हा प्रकल्प यशस्वी झाल्यास शिर्डी नगपंचायतीचे मालकीच्या जागेमध्ये, त्यांचेसाठी संस्थानमार्फत १० TPD क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेत यावे. सदर प्रकल्पाकरीता लॅण्डफीलची आवश्यकता नसल्याने लॅण्डफीलची व्यवस्था करण्यात येऊ नये. लॅण्डफील व्यतिरिक्त इतर सिव्हील कामे व युनिटस् उभारणीसाठी येणारा भांडवली खर्च तसेच दैनंदिन देखभालीसाठी प्रथम वर्षाकरीता अपेक्षित असलेला आवर्ती खर्च मिळून येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत आली.**

**सदर प्रकल्पाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याचा समावेश ई- निविदेत करण्यात यावा व शिर्डी नगरपंचायत यांचेसाठी सदरहू प्रकल्प उभारणी करतेवेळी त्यांचेबरोबरील करारनाम्यामध्ये, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सदर प्रकल्पास अनुदान प्राप्त करुन घेणेची कार्यवाही करावी व अनुदान प्राप्त झालेनंतर सदरहू अनुदान संस्थानकडे वर्ग करावे, या बाबीचा समावेश करणेत यावा. तसेच दि.२८.११.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५६ अन्वये सुक्या कचऱ्यातील प्लास्टीक श्रेडींग करणेकरीता शेड उभारणीकामी व दि.२०.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९९२ अन्वये मौजे शिंगवे येथिल नियोजित घनकचरा प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायत यांना निधी उपलब्ध करुन देणेचे प्रस्ताव रद्द करण्यात येत असून, याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना अवगत करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**(२) निर्णय क्र.४२०-**

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईलिला व श्री साईसेवा द्वैमासिकांसाठी संपादक मंडळ नेमणेबाबतची कार्यवाही चालू असल्यामुळे प्रस्तावित पदांपैकी कार्यकारी संपादक हे पद न भरता फक्त प्रसिध्दी अधिकारी हे पद प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे एकत्रित मासिक वेतनानुसार ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने भरणेत यावे. तसेच कुशल, अनुभवी प्रसिध्दी अधिकारी मिळणेसाठी या पदाच्या पात्रतेमधील वयाची अट शिथील करणेत यावी व उमेदवार पदवीधारक असावा आणि मराठी, हिंदी, इंग्रजी टायपींग असावी, या अटीचा समावेश करणेत यावा. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईलिला व श्री साईसेवा द्वैमासिकांसाठी संपादक मंडळ नेमणेबाबतची कार्यवाही चालू असल्यामुळे प्रस्तावित पदांपैकी कार्यकारी संपादक हे**

**पद न भरता फक्त प्रसिध्दी अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी रु. २५,०००/- मात्र मासिक मानधनावर भरणेत यावे. तसेच कुशल, अनुभवी प्रसिध्दी अधिकारी मिळणेसाठी या पदाच्या पात्रतेमधील वयाची अट शिथील करणेत यावी. याकामी प्रस्तावीत केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करणेत यावी व विहीत मुदतीत अर्ज मागविणेत येऊन, पात्र अर्जदारांच्या मुलाखती घेणेकामी मा.कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, संबंधीत प्रशासकीय अधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांची समिती गठीत करणेत आली. तसेच या मुलाखतींच्या वेळी ॲडमोहन जयकर, समिती सदस्य व जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांनाही आमंत्रित करणेत यावे. या समितीने सदरहू उमेदवारांच्या थेट मुलीखती (Walk-in-Interview) घ्याव्यात व पात्र उमेदवारांची निवड करुन नियुक्ती आदेश द्यावेत.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**(३) निर्णय क्र.४२५-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर करावयाच्या विविध विकासकामांसाठी तात्पुरते स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने ०६ कनिष्ठ अभियंत्यांची प्रत्येकी रु२०,०००/- मात्र एकत्रित मानधनावर नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. मात्र या अभियंत्यांनाकमीत-कमी ०५ वर्षाचा अनुभव असावा, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर करावयाच्या विविध विकासकामांसाठी तात्पुरते स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने ०६ कनिष्ठ अभियंत्यांची प्रत्येकी रु.२०,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधनावर नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. याकामी प्रस्तावीत केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करणेत यावी व विहीत मुदतीत अर्ज मागविणेत यावेत. या अर्जांमधील पात्र अर्जदारांच्या मुलाखती घेणेकामी मा.कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता (शताब्दी कक्ष) व उपकार्यकारी अधिकारी यांची समिती गठीत करणेत आली. तसेच या मुलाखतींसाठी इच्छुत असणाऱ्या स्थानिक समिती सदस्यांना बोलविणेत यावे. या समितीने सदरहू उमेदवारांच्या थेट मुलीखती (Walk-in-Interview) घ्याव्यात व पात्र उमेदवारांची निवड करुन नियुक्ती आदेश द्यावेत, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**(४) निर्णय क्र.४२६-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या जीवनावर टी. व्हि. मालिका तयार करणेसाठी भरपुर साईभक्त निर्माते, दिग्दर्शक उत्सुक आहेत, त्यांना संस्थानचे संकेस्थळावर व वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे आवाहन करणेत यावे. या मालिकांना साईबाबा संस्थानचे नाव देणेस परवानगी देण्यात यावी व तसा संबंधीतांबरोबर करारनामा करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या जीवनावर टी. व्हि. मालिका तयार करणेसाठी भरपुर साईभक्त निर्माते, दिग्दर्शक उत्सुक आहेत, त्यांना संस्थानचे संकेस्थळावर व वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे आवाहन करणेत यावे. या मालिकांना साईबाबा संस्थानचे नाव देणेस परवानगी देण्यात यावी व तसा संबंधीतांबरोबर करारनामा करणेत यावा या करारनाम्यामध्ये सदरहू मालिका मुळ साईचरित्रावर आधारीत असाव्यात, त्यामध्ये साईभक्तांच्या भावना दुखवेल अथवा चुकीचा संदेश जाईल असे भाग नसावेत, अशा अटींचा समावेश करणेत यावा. तसेच या मालिकांची मुळ स्क्रीप्ट प्रकाशने विभागामार्फत तज्ञांकडून तपासून घेण्यातयावी. त्याचबरोबर श्री साईबाबांच्या जीवनावर टी. व्हि. मालिका तयार करणेसाठी उत्सुक असलेल्यांना त्यांचेकडील सादरीकरण करणेसाठी सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**(५) निर्णय क्र.४३०-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांसाठी BOT तत्वावर हॉलोग्राफीक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साई महिमा या शिर्षकावर आधारीत कार्यक्रम दाखविणेकामी Immersity Info Tech Pvt.Ltd., Mumbai यांना साईआश्रम भक्तनिवास येथील Amphitheater ची जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली. परंतु Amphitheater व तेथील मोकळया जागेचा याकामासाठी वापर करता येईल का याची त्यांना विचारणा करण्यात यावी व तदनंतर याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची परवानगी घेण्यात यावी व शासन मान्यता मिळाल्यानंतर Immersity Info Tech Pvt. Ltd., Mumbai यांचेबरोबर रितसर करारनामा करणेत यावा, असे ठरले.

तसेच याठिकाणी साईभक्तांकडून आकारावयाचे शुल्क अत्यल्प ठेवण्यात यावे, जेणेकरुन जास्ती-जास्त साईभक्त या कार्यक्रमाचा लाभ घेऊ शकतील, अशा सुचना केल्या. (कार्यवाही- ध्वनिक्षेपण व टेलीफोन विभाग)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांसाठी हॉलोग्राफीक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साई महिमा या शिर्षकावर आधारीत कार्यक्रम दाखविणेकामीच्या प्रकल्पाचा सर्व खर्च Immersity Info Tech Pvt.Ltd., Mumbai हे करणार असल्यामुळे त्यांना साईआश्रम भक्तनिवास येथील Amphitheater ची जागा BO तत्वावर सार्वनिक बांधकाम विभागाचे निर्धारित दरानुसार उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली. सदरहू प्रकल्प सुरु करणेपुर्वी आवश्यकतेनुसार विविध शासकीय विभागांच्या परवानग्या Immersity Info Tech Pvt.Ltd., Mumbai यांनी घ्याव्यात. यासह Immersity Info Tech Pvt.Ltd., Mumbai यांचेबरोबर १० वर्षासाठीचा रितसर करारनामा करणेत यावा. परंतु त्यापुर्वी याकामी प्रथमत: विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची परवानगी घेण्यात येऊन, पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच याठिकाणी साईभक्तांकडून आकारावयाचे शुल्क अत्यल्प ठेवण्यात यावे, जेणेकरुन जास्तीत-जास्त साईभक्त या कार्यक्रमाचा लाभ घेऊ शकतील, अशा सुचना केल्या.**

(कार्यवाही- ध्वनिक्षेपण व टेलीफोन विभाग)

---

**(६) निर्णय क्र.४३५-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी श्री.अभिजीत देविदास शिंदे, श्रीरामपूर यांना साईप्रसादालय इमारतीत जागा दिलेली आहे. परंतु त्यांनी आजपर्यंत सदरहू प्रदर्शन सुरु केलेले नाही. याकरीता त्यांचा दि.२८.०४.२०१७ रोजीचा मागणी अर्ज निकाली काढणेत यावा. तसेच त्यांना दिलेल्या एकूण ७२०० चौ.फुट जागेचे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे निश्चित करुन घेऊन, त्याप्रमाणे भाडे आकारणेत यावे, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी श्री.अभिजीत देविदास शिंदे, श्रीरामपूर यांना साईप्रसादालय इमारतीत जागा दिलेली आहे. परंतु त्यांनी आजपर्यंत सदरहू प्रदर्शन सुरु केलेले नाही याकरीता त्यांचा दि.२८.०४.२०१७ रोजीचा मागणी अर्ज निकाली काढणेत यावा. तसेच त्यांना दिलेल्या जागेस, शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे निश्चित करणेत येऊन, त्यांना जागा वापरास दिलेपासुन सदरहू भाडेआकारणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**(७) निर्णय क्र.४४७-**

आजचे सभेत गेट नं.४ चे समोरच्या सर्व्हे नं.१ मधील दुकानदारांनी सभेसमोर येऊन, दि.०५.०४.२०१६ रोजी, मा.ना.मुख्यमंत्री श्री.देवेन्द्रजी फडणवीस साहेब, मा.श्री.अनिलजी कवडे साहेब (जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य, त्रिदस्य समिती), श्री.कुंदनकुमार सोनवणे, (उपविभागीय अधिकारी, शिर्डी तथा कार्यकारी अधिकारी) व दुकानदार प्रतिनिधी यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी होणेबाबतचे निवेदन समिती सभेस दिले.

या निवेदनावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०५.०४.२०१६ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांचे दालनात झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने व निवेदनामधील मुद्दयांच्या अनुषंगाने या दुकानदारांचे पुनर्वसन करणेसाठी, या दुकानदारांनी मागणी केलेल्या जागेची पहाणी करुन, महसुल विभागासोबत चर्चा करावी. तसेच याबाबतच्या सर्व कायदेशीर बाजु व मा.सर्वोच्च न्यायालयाचा आदेश याचा सर्वांगीन अभ्यास करुन पुढील कार्यवाही करावी, असे मा.कार्यकारी अधिकारी यांनी मत प्रदर्शित केले.

परंतु सर्व्हे नं.१ मधील दुकानदार अतिक्रमीत झालेले असून त्यांचे पुनर्वसन करणेसाठी या दुकानदारांना त्यांनी मागणी केलेली जागा देण्यात यावी व दुकानदारांनी सर्व्हे नं.१ मधील अतिक्रमण हटवावे असे समिती सदस्यांनी मत मांडले, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच दुकानांसाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या सदरहु दुकानदारांनी प्राप्त करुन घ्याव्यात, असे त्यांना कळविणेत यावे. याचबरोबर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दुकानदारांना नुकसान भरपाई देणेकामी मा.उच्च न्यायालयामध्ये जमा केलेली संस्थानची रक्कम परत घेणेसाठी कायदेशीर कार्यवाही सुरु करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

आजचे सभेत गेट नं.४ चे समोरच्या सर्व्हे नं.१ मधील दुकानदारांनी सभेसमोर येऊन, दि.०५.०४.२०१६ रोजी, मा.ना.मुख्यमंत्री श्री.देवेन्द्रजी फडणवीस साहेब, मा.श्री.अनिलजी कवडे साहेब (जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य, त्रिदस्य समिती), श्री.कुंदनकुमार सोनवणे, (उपविभागीय अधिकारी, शिर्डी तथा कार्यकारी अधिकारी) व दुकानदार प्रतिनिधी यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी होणेबाबतचे निवेदन समिती सभेस दिले.

या निवेदनावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०५.०४.२०१६ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांचे दालनात झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने व निवेदनामधील मुद्दयांच्या अनुषंगाने या दुकानदारांचे पुनर्वसन करणेसाठी, या दुकानदारांनी मागणी केलेल्या जागेची पहाणी करुन, महसुल विभागासोबत चर्चा करावी. तसेच याबाबतच्या सर्व कायदेशीर बाजु व मा.सर्वोच्च न्यायालयाचा आदेश याचा सर्वांगीन अभ्यास करुन पुढील कार्यवाही करावी, असे मा.कार्यकारी अधिकारी यांनी मत प्रदर्शित केले.

परंतु सर्व्हे नं.१ मधील दुकानदार अतिक्रमीत झालेले असून त्यांचे पुनर्वसन करणेसाठी या दुकानदारांना त्यांनी मागणी केलेली जागा देण्यात यावी व दुकानदारांनी सर्व्हे नं.१ मधील अतिक्रमण हटवावे असे समिती सदस्यांनी मत मांडले, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच दुकानांसाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या सदरहु दुकानदारांनी प्राप्त करुन घ्याव्यात, असे त्यांना कळविणेत यावे. याचबरोबर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दुकानदारांना नुकसान भरपाई देणेकामी मा.उच्च न्यायालयामध्ये जमा केलेली संस्थानची रक्कम परत घेणेसाठी कायदेशीर कार्यवाही सुरु करणेत यावी. **परंतु त्यापुर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी. असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०३** **साईभक्तांना बाटलीबंद शुध्द पाणी उपलब्ध करुन देणेसाठी संस्थानमार्फत बॉटल पॅकींग प्रकल्प उभारणी करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद** : कलम २(१४)(घ) – भक्तांचे सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे

**प्रस्तावना**: श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे जागतीक किर्तीचे देवस्थान असून, देश विदेशातून हजारो साईभक्त दररोज श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येत असतात. शिर्डीत येणा-या साईभक्तांना निवास, प्रसाद भोजन, वाहन सेवा, श्रींचे सहज सुलभ दर्शन इत्यादी अत्यावश्यक पायाभूत सुविधा संस्थानकडून उपलब्ध करुन देण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून साईभक्तांना पिण्यासाठी शुध्द पाण्याचा पुरवठा होणेकरीता संस्थानचे श्री साई प्रसादालय, निवासस्थाने, रुग्णालये, मंदिर परिसर इत्यादी ठिकाणी योग्य त्या क्षमतेचे आर.ओ. प्लांट कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. या प्लांटव्दारे साईभक्तांना शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. तसेच संस्थानमार्फत दरवर्षी सुमारे १ लिटर क्षमतेच्या २० लाख नग व ५०० मि. लिटर क्षमतेच्या ५ लाख नग शुध्द पिण्याचे पाण्याच्या बॉटलस् खरेदी करण्यात येऊन, त्यांची माफक दराने विक्री करुन, साईभक्तांना पुरविणेत येत आहेत.

दिनांक ०७/०४/२०१७ रोजी संस्थानचे पाणी पुरवठा विभागाकडून मेकॅनिकल विभागास प्राप्त झालेल्या कार्यालयीन मंजूर टिपणीनुसार बॉटल पॅकीग प्रकल्प उभारणी करणेसाठीचा प्रस्ताव मेकॅनिकल विभागामार्फत सादर करणेबाबत आदेशित करण्यात आले आहे.

**मागणी**: श्री साईभक्तांचे सेवेसाठी व त्यांना पिण्यासाठी माफक दरात बाटलीबंद शुध्द पाण्याचा पुरवठा करणेकामी संस्थानला स्वत:चा तासी ५,००० लिटर क्षमतेचा बॉटलींग पॅकीग प्लांटची आवश्यकता आहे आणि या क्षमतेच्या प्लांटची उभारणी करावयाची झाल्यास खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :

(१) तासी ५,००० लिटर क्षमतेचा आर.ओ. प्लॅन्टची उभारणी करणेसाठी सुमारे ४,५०० स्क्वेअर फुट एवढया आकाराची जागा आवश्यक आहे संस्थानचे कनकुरी साठवण तलावाचे शेजारील मोकळया जागेत बांधकाम विभागामार्फत ४,५०० स्क्वेअर फुट आकाराचे शेड उभारणी करुन त्या ठिकाणी प्लॅन्टची उभारणी करता येईल.

(२) आवश्यक मशीनरी खरेदी कराव्या लागतील.

(३) पाणी तपासणीसाठी केमीकल व मायक्रो लॅबची उभारणी करावी लागेल.

(४) कायदेशीर पुर्तता – प्रकल्प सुरु करतेवेळी BIS लायसन्स घेणे आवश्यक आहे.

(५) विदयुत पुरवठा – आवश्यकतेनुसार

(६) पाणी पुरवठा – आवश्यकतेनुसार

(७) आवश्यक कर्मचारी – प्रती तास ५,००० लिटर क्षमतेचा आर.ओ. प्लांट कार्यान्वित करतांना खालीलप्रमाणे कर्मचा-यांची आवश्यकता भासणार आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **कर्मचारी संख्या** |
|---|---|---|
| १ | Lab<br>B.Sc. Chemistry – 1<br>B.Sc. Microbiologist – 1 | २ |
| २ | R.O. Plant Operating & Maintenance करीता | २ |
| ३ | Blow Moulding Machine Operating करीता | २ |
| ४ | Auto Bottle Making Machine | १ |
| ५ | Bottle Filling, Cupping & Sealing Machine Operating | २ |
| ६ | Bottle Packing Shrink, Wrapping Machine | २ |
| ७ | Other (Helper, Reliever) | ६ |
| | **एकूण :** | **१७** |

(८) उत्पादित मालासाठी Bottle Design, Logo & Brand Name निश्चित करावे लागेल.

**प्रकल्प उभारणीकामी येणारा अपेक्षित अदांजे खर्च**

अ) **<u>शेडची उभारणी करणे</u>–** तासी ५००० लिटर क्षमतेचा बॉटल पॅकींग प्रकल्प उभारणीकामी सुमोर ४५०० स्क्वेअर फुट आकाराचे चारही बाजूने भिंत असलेले लोखंडी पत्र्याचे शेड उभारणी करावी लागणार असून, याकामी रुपये ३१,५०,०००/- मात्रचा खर्च अपेक्षित असल्याचे बांधकाम विभागाने दिनांक २४/०४/२०१७ रोजीचे ई-मेलव्दारे कळविले आहे.

ब) **<u>मशीनरी खरेदी करणे</u>-** प्रकल्प उभारणी करणेकरीता मशीनरी खरेदी करावी लागणार असून त्याकरीता अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे :

| **System** | **Sr. No.** | **Description** | **Price in Rs. (Lac)** |
|---|---|---|---|
| 1 | | **Water Purification System** | |
| | 1.1 | Mineral Water Plant Xcel | 11.98 |
| | 1.2 | MWP Tank – 2,000 Ltrs. | 00.70 |
| | 1.3 | Ozone System | 00.85 |
| | 1.4 | Ozone Tank – 2,000 Ltrs. | 00.70 |
| | 1.5 | SS Piping (Ozone to Filling Section) Apx. | 00.75 |
| | | **Total (System 1) :** | **14.98** |
| 2 | | **Quality Control Lab** | |
| | 2.1 | Micro & Chem Lab As per Bureau of Indian Standard Name – Lab | 03.75 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | Equipment Chemicals, Glassware, Media, General Item (BIS License Fees Exclusive Extra at Actual) | |
| **Total (System 2) :** | | | **03.75** |
| 3 | **Washing, Filling & Packing Machineries** | | |
| | 3.1 | Auto Bottle Mfg. Blow Moulding Machine (3 Cavity) | 24.98 |
| | 3.2 | Batch Coding Machine | 02.51 |
| | 3.3 | Fully Auto Bottle Rinsing, Filling, Caping & Sealing Machine | 20.51 |
| | 3.4 | Bulk Packing Shrink Wrapping Machine | 7.98 |
| **Total (System 3) :** | | | **55.98** |
| 4 | **Value Added Technology** | | |
| | 4.1 | Ozone Booster | 00.98 |
| | 4.2 | Added Minerals Technology | 00.95 |
| **Total (System 4) :** | | | **01.93** |
| **Total (System 1 to System 4) :** | | | **76.64** |
| **एकूण रुपये (ब) :** | | | **76,64,000/-** |

खरेदी करणे याकामी (अ+ब नुसार) एकूण अंदाजित रुपये १,०८,१४,०००/- (एक कोटी, आठ लाख, चौदा हजार) मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदर प्लांटची टृंकी स्वरुपात उभारणी करणेकरीता महाराष्ट्र शासनाचे www\\mahatenders.gov.in या वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविता येतील, प्लांट उभारणीकामी येणा-या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय:** संस्थानचे स्वत:चा बॉटल पॅकींग प्लॅन्ट उभारणी केलेस साईभक्तांना माफक दरात शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देता येईल. तसेच संस्थानचा आर्थिक फायदा होईल. सदर प्लांट सुरु करतेवेळी शेड उभारण्याची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत व मशीनरी खरेदीची कार्यवाही मेकॅनिकल विभागामार्फत करण्यात येईल. प्लांन्ट चालू झालेनंतर, सदर प्लांट पाणीपुरवठा विभागाचे नियंत्रणाखाली चालविता येईल व देखभाल दुरुस्तीची कामे मेकॅनिकल विभागामार्फत करता येतील.

तरी

(१) श्री साईभक्तांना बाटलीबंद शुध्द पाणी उपलब्ध करुन देणेसाठी संस्थानमार्फत बॉटल पॅकींग प्रकल्प उभारणी करणेकामी येणा-या अपेक्षित खर्चास,

(२) प्लॅन्टची उभारणी करणेकरीता जागा निश्चिती होणेस,

(३) Brand Name, Logo निश्चित करणेस,

(४) या कामाकरीता महाराष्ट्र शासनाचे www\\mahaterders.gov.in व संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस,

(५) प्राप्त झालेल्या ई-निविदा मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेस

उपरोक्तप्रमाणे अ.नं. १,२,३,४ व ५ चे कार्यवाहीस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला दरवर्षी बाटलीबंद पिण्याचे पाणी खरेदी करणेसाठी किती खर्च येतो व संस्थानमार्फत बाटलीबंद पाण्याचा प्रकल्प उभारणीस किती खर्च येईल, त्याचबरोबर संस्थानला बाटलीबंद पाण्याची विक्री करता येईल का, याचा उल्लेख उपरोक्त प्रस्तावामध्ये दिसून येत नाही, सबब सदरहू प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवणेत यावा. तसेच साईभक्तांना सध्या विक्री करणेत येत असलेले बाटलीबंद पाणी खरेदी मुल्यामध्येच उपलब्ध करुन देण्यात यावे. त्याचबरोबर विविध कंपन्यांना आवाहन करणेत येऊन, त्यांचे पिण्याच्या पाण्याचे वेंडींग मशिन्स रॉयल्टी बेसीसवर संस्थान परिसरामध्ये बसविणेस परवानगी देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख/ पाणी पुरवठा विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.०४** **संस्थानचे वतीने गोशाळा सुरु करणेकरीता गोशाळेत गो सेवा म्हणून गाय पालन करणे.**

**प्रस्ताव-** दि.30/11/2016 रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं. 16 व निर्णय क्रं. 859 अन्वये, संस्थानच्या वतीने गोशाळा सुरु करणेस व त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. तसेच संस्थानच्या गोशाळेमध्ये गावरान गायांचा समावेश करण्यात यावा असे ठरले.

त्यानुसार बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा विभागास पत्रव्यवहार करुन त्यांचेमार्फत गोशाळा सुरु करणेकामी होणाऱ्या एकुण खर्चाचा अहवाल मागविण्यात आलेला होता. बगीचा, बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा विभागाचा असा एकुण रु.2,28,66,306/- (दोन कोटी अठ्ठाविस लाख सहासष्ट हजार तिनशे सहा) मात्र खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणेकामी मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

दि.25/02/2017 रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.22 अन्वये, संस्थानच्या वतीने भारतीय वंशाच्या गायांची गोशाळा तयार करण्यात यावी. या गायांचा मुक्त गोठा करणेत यावा. या गोठ्याच्या भोवती भक्तांना प्रदक्षिणा करता येईल व गो सेवा करता येईल अशी व्यवस्था करावी. तसेच संस्थान मालकिच्या शक्य त्या जमिनींमध्ये गायींच्या चाऱ्याची व्यवस्था करावी. तसेच आवश्यकतेनुसार चारा विकत घेणेसाठी प्रस्ताव सादर करावा. या गायींच्या तपासणीसाठी सरकारी डॉक्टर्सची नियुक्ती करावी व गायींपासुन गो अर्काचे उत्पन्न घेण्यात यावे. असे समितीचे मत झाले. यासाठी गोशाळेची माहिती असलेले समिती सदस्य मा.श्री प्रताप भोसले यांना संस्थानच्या वतीने गोशाळा तयार करणेकामीचे अधिकार प्रदान करणेत आले.

समिती सदस्य मा.श्री प्रताप भोसले व कृषी सहाय्यक बगीचा विभाग यांनी परिसरातील गोशाळांचा आभ्यास करुन सविस्तर अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा असे ठरले.

त्यानुसार गोशाळेचे माहिती असलेले समिती सदस्य मा.श्री प्रताप भोसले यांचेशी दि.27/03/2017 रोजी सकाळी 11.00 वा. मा.श्री प्रताप भोसले- विश्वस्त यांचेशी गोशाळा सुरु करणेसंदर्भात व्ही.आय.पी. अथिती गृहात चर्चा केली. त्यावेळी त्यांनी संस्थानच्या गोशाळेत गीर, गावरान गाय ऐवजी रेडसिंध्दी व कॉंक्रेज गायांचे पालन करणेकामी सुचविलेले आहे.

संस्थान अधिनियम ठराव/ या नुसार छाननी, शासन, निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- सदरचा विषय हा धोरणात्मक व आर्थीक स्वरुपाचा आहे.

मागणी- संस्थानच्या वतीने गोशाळा सुरु करणेसाठी गोशाळेचा उद्देश हा दुध उत्पन्न घेणे आहे किंवा गो सेवा म्हणुन गाय पालन करणे आहे हे आगोदर ठरवावे लागेल. जळगाव येथील के.सी.बाफना यांच्या गोशाळेची पाहणी केली असता त्या ठिकाणी गो सेवा म्हणुन गायींचे संगोपन केले जाते.

विभागाचा अभिप्राय - जळगाव येथील गोशाळेच्या धर्तीवर आपल्या संस्थानमध्ये गो सेवा म्हणुन काही गायी पाळुन त्यांचे संगोपन करावे असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६१** **संस्थानचे वतीने गोशाळा सुरु करणेसाठी समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांनी संकलित केलेली वैदिक मुल्यांवरील पारंपारीक गोपालनबाबतची माहिती सभेस दाखवली सभेने या माहितीचे अवलोकन करुन, त्यास मान्यता दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, गो सेवा म्हणुन गाय पालन करणे हा संस्थानच्या वतीने देशी गाईंची गोशाळा सुरु करणेचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये ज्या साईभक्तांची इच्छा असेल, अशा साईभक्तांना गाईंना चारा टाकता येईल, गाय-वासरांची पुजा करता येईल, गाईंना प्रदक्षिणा मारता येईल, अशी व्यवस्था करावी. गोशाळेमधील दुध संस्थानसाठी वापरावे व गाईंच्या मल-मुत्रांपासुन गो अर्क तयार करणेत यावा. याकरीता कार्यकारी अधिकारी यांनी १०० गाईंच्या क्षमतेची गोशाळा व त्यानुशंगाने आवश्यक असलेल्या बाबींची पुर्तता करावी भविष्यात याचा विस्तार करणेबाबत निर्णय घेता येईल व यासाठी नवीन जमिन खरेदी न करता, संस्थान जमीनींचा वापर करणेत यावा.**

**तसेच याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. याचबरोबर अशीही चर्चा झाली की, सदरहू गोशाळेस देणग्या मिळणेसाठी, याबाबतची सर्व माहिती संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५** **तज्ञांचे अहवालानुसार म्युझियम हॉलबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन अद्ययावत करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ चे कलम २१(१)(क)विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग या तरतूदीचे अंतर्गत मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन. तसेच २१(१)(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे ,अशा तरतुदी नमुद आहेत.

**<u>प्रस्तावना:-</u>** मा.श्री.एस.मुखर्जी साहेब, संचालक व श्री.ओमकार कडू,CSMVS (छत्रपती शिवाजी महाराज वास्तू संग्रहालय), मुंबई या वस्तू संग्रहालयाचे तज्ञ व्यक्तींना शिर्डी येथील मंदिर परिसरामध्ये असलेले श्रीसाईबाबांचे वस्तु संग्रहालयाची (म्युझियम हॉल), समाधी मंदिर, समाधी मंदिर शोरुम, श्रीद्वारकामाई, चावडी, इ. पाहणी करणे व इतर अनुषंगीक दुरुस्त्यांबाबत मार्गदर्शनाकरीता बोलविण्यात आले होते.

**<u>प्रस्ताव:-</u>** सोमवार, दि.२७.०२.२०१७ रोजी मा.एस.मुखर्जी साहेब यांनी श्रींचे वस्तू संग्रहालय, समाधी मंदिर, शोरुम, श्रीद्वारकामाई, श्रीचावडी, इ. ठिकाणी ठिकाणी पाहणी केली असून त्याबाबत ई-मेलद्वारे अहवाल पाठविलेला आहे. सदर अहवालामध्ये त्यांनी म्युझियम हॉलचेबाबतीत काही महत्वाच्या व धोरणात्मक असे सूचना केल्या आहेत. त्यामध्ये खालीलप्रमाणे सुचना आहेत-

1. Looking at the religious importance of Baba's belongings, photographs and oil paintings, I request the authorities to consider reorganization of the Museum display from the scientific exhibition and conservation point of view. – कार्यवाही बांधकाम विभाग व मंदिर विभाग.
2. I also request the authorities to appoint at least two Museum trained technical staff and a full-time Curator for the Museum.- कार्यवाही सामान्य प्रशासन, बांधकाम विभाग व मंदिर विभाग.
3. I also strongly recommend setting up a small Conservation Lab for the treatment of different materials and the reserve collection in the Museum.- कार्यवाही सामान्य प्रशासन, बांधकाम विभाग मंदिर विभाग.
4. All textiles, photographs, wood and metal objects are deteriorating due to high humidity and bad display.-कार्यवाही मेकॅनिकल विभाग व विद्युत विभाग.
5. All original objects associated with the Sansthan need to be photographed and documented immediately (if possible digitization).-कार्यवाही सी.सी.टि.व्ही. विभाग.
6. Please take necessary action based on the Condition Assessment Report prepared by Mr. Omkar Kadu.-

<u>ओमकार कडु यांचा अहवाल-</u>

- It is recommended to do Structural Audit of the building, Electrical Audit and Fire & Safety Audit.- कार्यवाही- बांधकाम, विद्युत व फायर अॅण्ड सेफ्टी विभाग.
- Electric wiring should be concealed.-कार्यवाही- विद्युत विभाग.
- Fire extinguisher placed in the first room at the entry point of the museum is easily accessible but in mid way of visitor's path. It should be placed little aside.- कार्यवाही-फायर अॅण्ड सेफ्टी विभाग.
- Temperature (Temp.) and Relative Humidity (RH) inside the cases are within desirable range.- कार्यवाही- मेकॅनिकल विभाग व विद्युत विभाग.
- At the time of inspection it is observed that whole museum is under air cooling system but the system was functioning only for the first floor. कार्यवाही-मेकॅनिकल व विद्युत विभाग.
- A/C drafts directed downwards in museum as well as in the temple need not be extended down. The vents can be made in the main duct itself. This will improve aesthetics of the interior. As cool air is heavier than warm air it always travels in downwards direction. कार्यवाही-मेकॅनिकल व विद्युत विभाग.
- Present LED, CFL and fluorescent tube lights should be replaced by dimmable LED lights which do not produce Infra Red and Ultraviolet Rays, do not generate heat and are with good Colour Rendering Index. Mega-man company can be. कार्यवाही-विद्युत विभाग.

- Light intensity measured inside the cases ranges from 665 lux to 133 lux. This is very harmful to the objects such as textiles, paper, photographs, oil paintings and can cause colour alteration and fading. कार्यवाही- विद्युत विभाग.
- The light intensity for textiles, paper and photographs should not be above 50 lux. कार्यवाही- विद्युत विभाग.
- The light intensity for oil paintings should not be above 150 lux. कार्यवाही- विद्युत विभाग.
- Light can be controlled with dimmable LED lights.कार्यवाही- विद्युत विभाग.
- CFL lights hung inside the Gabhara and temple can be very dangerous in case of accident as inner layer of CFL lights poisonous. They must be replaced with LEDs.कार्यवाही- विद्युत विभाग.
- Cases need to be repaired structurally. The gaps between the doors leads to lot of dust accumulation on the displayed objects. These gaps needs to be filled with appropriate material.कार्यवाही- बांधकाम विभाग.
- Mounting system of textile object need to be upgraded with proper material and padding system. कार्यवाही- बांधकाम विभाग.
- All objects should be registered and accession number to be given if not. कार्यवाही- बांधकाम व मंदिर विभाग.
- Digitization of all original photographs is absolutely required. कार्यवाही- सी.सी.टि.व्ही.सेल विभाग.
- Several layers of paints found on the resting wooden bar at Dwarkamai. The practice of application of paint layer on this bar every year should be stopped. कार्यवाही- बांधकाम विभाग.
- Many objects deteriorating and need conservation treatment. But this is long process and can be done gradually. कार्यवाही- बांधकाम व मंदिर विभाग.
- The paduka (shoes) and bed covered in plastic, need to be uncovered. कार्यवाही- मंदिर विभाग.
- Few textiles are kept inside wooden case under the photograph of Baba. Need to create proper storage area for these textiles with appropriate method. For example Jama (coats) can be kept with minimum fold. Saris can be kept in roll condition.कार्यवाही बांधकाम व मंदिर विभाग.
- The displayed reproductions of the photographs are discoloured badly. They need to be reprinted and displayed. कार्यवाही- सी.सी.टि.व्ही. सेल विभाग.
- Dust and carbon soot accumulation on palanquin and chariots. The soot from the chimney above 'Dhuni' in Dwarka Mai is coming inside from the upper windows. Windows can be closed.कार्यवाही- बांधकाम विभाग.
- Information labels need to be redesigned and reprinted. कार्यवाही- बांधकाम व मंदिर विभाग.
- Colour scheme need to be change now. कार्यवाही- बांधकाम विभाग.
- Records found with the Gramophone are of Gauharjan, Talim Hussain, Burt Sheperd, etc. Gauharjan was the 1st Indian singer to have her voice recorded on disc. Baba was listening Indian and western classical music and this aspect of his personality should be reflected through the display. कार्यवाही- बांधकाम व मंदिर विभाग.
- CSMVS curators and display & design team may be engaged for their suggestions. कार्यवाही- बांधकाम  मंदिर विभाग.

- The care taker and guards of the museum mentioned that visitors frequently jump and crossed the barricade at the ground floor to touch the objects displayed uncased (palanquin, chariots, chair, ect). The height of this barricade needs to be increased by few inches for security concern.कार्यवाही- बांधकाम व मेकॅनिकल विभाग.
- Hoarding and Ac fans are hindering the aesthetics of the exterior building. Hording can be removed and put up at another place. If possible Air handling Units on the terrace need to be installed at the back of the building. कार्यवाही- बांधकाम व मेकॅनिकल विभाग.

7. Safety and security audit to be carried out immediately- कार्यवाही फायर ॲण्ड सेफ्टी, संरक्षण विभाग व सी.सी.टिव्ही.
8. Electrical audit to be carried out by an expert.-कार्यवाही विद्युत विभाग.
9. Instead of air-conditioning, you need to install climate control system in the Museum.- कार्यवाही मेकॅनिकल विभाग.
10. The showcases need to be modified or replaced with Glasbau Hahn showcases (special glass cases).-कार्यवाही बांधकाम विभाग
11. The showcases need to be modified or replaced with Glasbau Hahn showcases (special glass cases).-कार्यवाही बांधकाम विभाग

**विभागाचा अभिप्राय:-** श्रींचे वस्तु संग्रहालयाला तयार होऊन १०वर्षाहुन अधिक काळ झालेला आहे. त्यावेळी मा.पद्मश्री सदाशिवराव गोरक्षकर साहेब, पुरातत्व तज्ञ यांचे मार्गदर्शनाखाली हे म्युझियम तयार करण्यात आलेले होते. आता श्रींचे शताब्दी वर्षाच्या पार्श्वभुमीवर श्रीसाईबाबांनी हाताळलेल्या वस्तुंचे म्युझियमचे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन संरक्षण व संवर्धन करणे ही अत्यंत महत्वाची व तातडीची बाब आहे.

तरी मा.एस.मुखर्जी, संचालक CSMVS (छत्रपती शिवाजी महाराज वास्तू संग्रहालय, मुंबई) यांनी दि.२७.०२.२०१७ रोजी पाहणी करुन दिलेल्या व त्यांचे सहाय्यक श्री.ओमकार कडू यांनी दिलेल्या अहवालानुसार तातडीने कार्यवाही करणे अत्यंत महत्वाचे असल्याने याबाबत धोरणात्मक निर्णय होणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत निर्णय होणेस विनंती. तसेच प्रस्तावात सूचित केल्याप्रमाणे संबंधीत विभागाकडून कार्यवाही होणेस मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे म्युझियम हॉलमध्ये ठेवण्यात आलेल्या, साईबाबांनी वापरलेल्या/ हाताळलेल्या वस्तू अनमोल असून त्यांचे व्यवस्थीत संगोपन करावयला हवे, असे समितीचे मत झाले. सबब प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, तज्ञांचे अहवालानुसार म्युझियम हॉल अद्ययावत करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या., पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील शेती महामंडळाची जमीन संस्थानला कायम स्वरुपी खरेदीने मिळणेचा सुधारित प्रस्ताव.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतुदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबवविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

**प्रस्ताव -** महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत,पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील शेती महामंडळाची जमीन संस्थानला कायमस्वरुपी खरेदीने मिळणेबाबत सुधारीत प्रस्ताव अमान्यतेबाबतचे पत्र अवलोकनार्थ सादर करणे..

**प्रस्तावना–** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील मौजे निमगाव-को-हाळे येथील ४०.७३ हे.व शिर्डी येथील ११.६२ हे.असे एकूण क्षेत्र ५२.३५ हेक्टर इतके श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी साठी कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील जा.नं. एसएसएसटी/ मालमत्ता/ ५७७/ २०१७ दि.०२/०५/२०१७ अन्वये ई-मेलद्वारे तसेच इकडील जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/ ७०३/२०१७ दि.०९/०५/२०१७ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांचेकडे सादर करणेत आलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास अनुसरुन मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांनी त्यांचेकडील उपरोक्त संदर्भ अ.नं.२ जा.क्रं.शे.व्य./ श्री.सा.सं.वि.शि./ ज.मा./ लक्ष्मी/ १७-१८/ १५६ दि.०३/०५/२०१७ अन्वये "महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणा कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ यातील कलम २८-१ अ पोटकलम १ अन्वये महामंडळास भोगवटा मुल्याने देण्यात आलेली आहे. तसेच कलम ३-अ अन्वये जमीन माजी खंडकरी शेतक-यांना वाटपाचे काम चालू आहे तथापि वरील जमीनीपैकी मौजे निमगाव-को-हाळे व सावळविहीर येथील जमीनीबाबत काही माजी खंडक-यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका क्रं.५८८६/२०१४ दाखल करुन दि.०५/०८/२०१४ रोजी जमीन वाटपास अंतरिम स्थगिती आदेश मिळवला आहे. सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद येथून स्थगिती आदेशाबाबत अंतिम निर्णय लागल्याशिवाय मौजे निमगाव-को-हाळे व शिर्डी येथील जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना खरेदीने उपलब्ध करुन देण्याबाबत पुढील कार्यवाही करता येत नाही." असे कळविले असून त्यात नाशिक सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ च्या बाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी शेती महामंडळाची लक्ष्मीवाडी मळा,मौजे निमगाव-को-हाळे येथील जमीन तहसिलदार,राहाता यांचे आदेश क्रं.कावि/ जमीन/५०२/२०१५ दि.१८/०६/२०१५ अन्वये प्रती एकर प्रती दिन रु.१,०००/- (अक्षरी रु.एक हजार मात्र) या दराने जमीन तात्पुरत्या स्वरुपात अधिग्रहण करण्यात आली होती. त्याप्रमाणे ३५ एकर ३७ गुंठे जमीनीचे शेती महामंडळास दि.०४/०७/२०१५ ते दि.३०/०९/२०१५ या कालावधीसाठी श्री साईबाबा संस्थानने वापरमुल्य रु.३१,४७,९३०/- महामंडळास दिलेले आहे. याच धर्तीवर अधिग्रहण आदेश आल्यास आपणास वरील शेती महामंडळाची जमीन मा.उच्च न्यायालयाकडील अंतिम निर्णय होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात वापरण्यासाठी देण्याबाबत संचालक मंडळाच्या मान्यतेने निर्णय घेण्यात येईल, असेबाबत कळविलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील संस्थानने कायमस्वरुपी खरेदीने मागणी केलेली जमीन उक्त दाव्यातील निर्णय होईपावेतो संस्थानला कायम खरेदी मिळणार नसलेचे मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांचेकडील उपरोक्त पत्र अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.४६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, समाधी शताब्दी महोत्सवाचे नियोजनासाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील किती जमीनीची आवश्यकता आहे, याची माहिती घ्यावी. कुंभमेळयाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य शेती महामंडाळाची जमीन कमीत कमी दराने आवश्यक दिवसांसाठीच भाडेतत्वावर/ अधिग्रहीत करणेत यावी. तसेच समाधी शताब्दी महोत्सवामध्ये साईभक्ताना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी प्रथमत: संस्थान मालकीच्या जमीनीचा वापर करणेत यावा.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.०७** **कर्मचारी निवासस्थाने वाटप व बदलून देणेची सुधारीत नियमावली.**

**प्रस्ताव-** संस्थानमधील कायम कर्मचा-यांच्या निवासासाठी वर्गवारीनुसार एकूण ३४० निवासस्थाने बांधण्यात आलेली असून सदरची निवासस्थाने कर्मचा-यांना सेवाजेष्ठतेनुसार वाटप करण्यात येतात. सदरची निवासस्थाने वाटपाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६-०८/१०/२००० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३६९ अन्वये नियमावली तयार करणेत आलेली असून त्यास जवळ-जवळ १७ वर्षे पूर्ण झालेले आहेत. सध्या कर्मचा-यांना निवासस्थाने उपलब्ध करुन देणेसाठी मा. कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षेखाली निवासस्थान वाटप समिती स्थापन करणेत आलेली असून सदरचे समिती मार्फत कर्मचा-यांना निवासस्थाने उपलब्ध व बदलून देण्यात येतात. सन २००० साली तयार केलेली नियमावली मध्ये काळानुरुप सध्याचे परिस्थितीनुसार काही बदल करणे आवश्यक आहे. याबाबत मा. निवासस्थान वाटप समितीचे दि.०२/०२/२०१७ रोजीचे सभेमध्ये चर्चा होऊन निवासस्थान वाटपाची नियमावली तयार करणेबाबत निर्णय समंत झालेला आहे. त्यास अनुसरुन यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६-०८/१०/२००० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३६९ अन्वये मान्यता देण्यात आलेली निवासस्थान वाटप नियमावली अधिक्रमित करुन खालील प्रमाणे नविन नियमावलीस मान्यता असावी.

१. संस्थानकडे कर्मचा-यांचे निवासासाठी सध्या उपलब्ध असलेली निवासस्थाने यापुढे सर्वसाधारणपणे खालील वर्गवारी मधील कर्मचा-यांचे निवासासाठी उपलब्ध करुन देण्यात यावीत.

| अं.क्र | इमारतीचे नाव | एकूण निवास संख्या | निवासस्थानाचा प्रकार | उपलब्ध करुन देण्याचे निकष |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईसहवास०१, ०२, ०३, ०४ | 24 | 02 BHK | प्राधान्याने वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी किंवा ज्यांचे ग्रेडवेतन रु. ५४०० किंवा त्यापेक्षा अधिक आहे. |
| ०२ | साईस्मरण०१, ०२, ०३ | 18 | 02 BHK | प्राधान्याने वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी किंवा ज्यांचे ग्रेडवेतन रु. ५४०० किंवा त्यापेक्षा अधिक आहे. |
| ०३ | साईचिंतन ०१,०२,०३,०४ | 48 | 01 BHK | वर्ग ०२ कर्मचारी किंवा ज्याचे ग्रेडवेतन रु.४३०० व त्यापेक्षा अधिक मात्र रु.५४०० पेक्षा कमी आहे. |
| ०४ | साईध्यान ०१, ०२ | 88 | 02 Room Kitchen | वर्ग ०३ कर्मचारी ज्यांचे ग्रेडवेतन रु.१९०० व त्याहून अधिक मात्र रु. ४३०० पेक्षा कमी आहे. |
| ०५ | साईनगर | 30 | 01 Room Kitchen | वर्ग ०४ कर्मचारी किंवा ज्याचे ग्रेडवेतन रु.१९०० पेक्षा कमी आहे. |
| ०६ | समर्पण | 36 | 01 Room Kitchen | वर्ग ०४ कर्मचारी किंवा ज्याचे ग्रेडवेतन रु.१९०० पेक्षा कमी आहे. |
| ०६ | निमगाव को-हाळे A,B,C,D,E,F,G,H | 96 | 01 BHK | वर्ग ०४ कर्मचारी किंवा ज्याचे ग्रेडवेतन रु.१९०० पेक्षा कमी आहे. |
| | **एकूण** | **340** | | |

२. यापुढे संस्थानकडे रिक्त असलेली निवासस्थाने मागणीअर्ज प्राप्त दिनांकाचे जेष्ठतेनुसार उपलब्ध करुन देणेत यावे.

३. ग्रेडवेतनानुसार अनुज्ञेय असलेली निवासस्थाने बदलून देतेवेळी कर्मचा-यांच्या आपसातील जेष्ठतेसाठी प्रथम नेमणूक तारखेचा विचार करणेत यावा.

४. निमगाव को-हाळे येथील निवासस्थाने वर्ग ०२, वर्ग०३ व वर्ग ०४ संवर्गातील कर्मचा-यांना इमारतीनुसार उपलब्ध करुन देणेत येतात. सध्या वर्ग ०३ संवर्गातील कर्मचारी निवासस्थान मिळणेसाठी प्रतिक्षेत नाहीत व रुग्णालयाकडील पॅरामेडीकल स्टाफ निमगाव को-हाळे येथील निवासस्थाने रुग्णालयापासून दुर असल्याचे कारणास्तव स्विकारत नसल्यामुळे यापुढे निमगाव को-हाळे येथील निवासस्थाने शक्यतो वर्ग ०४ संवर्गातील कर्मचा-यांना उपलब्ध करुन देणेत यावे.

५. निवासस्थानाचे वाटप करतांना शिरडी गावांत अथवा शिरडी पासून १५ किलोमीटरचे अंतरात ज्यांचे नावे/ कुटुंबाच्या नावे घर आहे, जे कर्मचारी भाडोत्री जागेत रहात नसतील अशा कर्मचा-यांना निवासस्थान उपलबध करुन देण्यात येणार नाही. निवासस्थानाची मागणी करतांना शिरडी अथवा १५ किलोमिटरचे परिसरात संबधीत कर्मचा-यांच्या नावावर घर नसल्याचा कबुली जवाब अथवा प्रतिज्ञापत्र (Affidavit) लिहून घेणेत यावे.

६. एकाच कुटूंबातील सेवेत असणारे (उदा.पती/ पत्नी, वडील/ मुलगा इ.) दोन व्यक्तीपैकी सेवाजेष्ठतेनुसार एकाच कर्मचा-यास निवासस्थान उपलब्ध करुन देणेत येईल. महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील दि.१६ जुलै, २०१४ रोजीचे परिपत्रकानुसार अशा कुटूंबातील ज्या कर्मचा-यांच्या नावे संस्थान निवासस्थान आहे तो सेवानिवृत्त अथवा मयत झालेनंतर कुटूंबातील दुस-या सदस्याने सदरचे संस्थान निवासस्थान मिळणेसाठी विहीत अर्ज सादर केल्यास त्यास अनुज्ञेय निवासस्थान प्राधान्याने उपलब्ध करुन देणेत येईल. तथापी, त्याकरीता संस्थान सेवेत असलेला कुटूंबातील सदस्य, संबंधित संस्थान कर्मचा-यांच्या सेवानिवृत्ती/मृत्यूच्या दिनांकापूर्वीपासून सदर संस्थान कर्मचा-यासोबत त्याच्या संस्थान निवासस्थानात वास्तव्य करीत असला पाहिजे.

७. निवासस्थानाचे वाटप करणेपूर्वी संबधीत कर्मचा-यांच्या नावे शिर्डी नगरपंचायत हद्दीत घर नसल्याचा शिरडी नगरपंचायत कडील दाखला घेण्यात यावा.

८. निवासस्थानाचे वाटप करतांना वरिष्ठ अधिकारी व खातेप्रमुख यांचा प्राधान्याने विचार करणेत यावा. मात्र त्यासाठी अं.क्र ०५ मधील निकष लागूच राहातील.

९. कर्मचा-यांस निवासस्थान उपलब्ध करुन दिलेनंतर कालांतराने संबधीत कर्मचा-यांने शिर्डी व शिर्डी परिसरात स्वःताचे घर बांधल्यास त्याने संस्थानचे निवासस्थान रिक्त करुन देणे बंधनकारक राहील. तसे

लेखी बंधपत्र (अंडरटेकिंग) संबधीत कर्मचा-यांने अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान यांचेकडे सादर केलेनंतरच त्यास संस्थान निवासस्थानाचा ताबा देण्यात यावा.

१०. कर्मचा-यांना नियमानुसार निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात येतील. तथापी, कोणत्याही कर्मचा-यांला हक्क म्हणून निवासस्थान मिळणेची मागणी अथवा दावा करता येणार नाही.

११. कर्मचा-यास निवासासाठी उपलब्ध करुन दिलेले निवासस्थान परवानाधारक (लायसेन्सी) म्हणून केवळ सेवेत असे पर्यंत वापरासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. कोणत्याही प्रसंगी संस्थानला हा परवाना (लायसेन्स) रद्द करुन निवासस्थानाचा ताबा घेण्याचा अधिकार राहील.

१२. कर्मचा-यांला एकदा निवासस्थान उपलब्ध करुन दिलेनंतर ते वारंवार बदलून देण्यात येणार नाही. तसेच निवासस्थान बदलून मिळणेकामी अर्जात नमूद केलेली पार्श्वभूमीची यथायोग्य पडताळणी केलेनंतरच संबधीत कर्मचा-यास निवासस्थान बदलून देणेत यावे.

१३. कर्मचा-यांने सेवेचा राजीनामा दिल्यास अथवा विहीत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यास तसेच कोणत्याही कारणास्तव कर्मचा-याला कायम स्वरुपी बडतर्फ केल्यास संस्थान निवासस्थान रिक्त करुन देणे कर्मचा-यावर बंधनकारक राहील.

१४. निवासस्थानाच्या वापराबद्दल संस्थान ठरवील त्याप्रमाणे परवाना शुल्क (फि),विहीत सेवाआकार आणि वीज वापराचे प्रत्यक्षात येणारे बील इ. रक्कम कर्मचा-यांचे दरमहा वेतनातून कपात करणेत येईल. काही कारणास्तव एखाद्या महिन्यात ही रक्कम कर्मचा-यांचे वेतनातून कपात करणे शिल्लक राहिल्यास सदर रक्कम त्यापुढील महिन्याच्या वेतनातून कपात करुन घेण्याचा अधिकार संस्थानला राहील.

१५. कर्मचा-यांने संस्थान निवासस्थानाचे नुकसान अथवा खराबी होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच इमारतीत अगर परिसरात पाळीव प्राणी ( कुत्रे, मांजर, मेंढया, कोंबडया, शेळया, गाई, म्हशी इ.) व पक्षी पाळता येणार नाहीत.

१६. संस्थान निवासस्थानाचा उपयोग व्यापारी प्रयोजनासाठी करता येणार नाही. "व्यापारी प्रयोजन" म्हणजे काय ? हे ठरविण्याचा व त्यासंबधीचा अंतीम अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे.

१७. संस्थानचे सोयीनुसार व गरजेनुसार कर्मचा-यास निवासासाठी दिलेल्या निवासस्थानाची अदलाबदल संस्थान व्यवस्थापन कधीही करु शकेल. ज्यावेळी संस्थान प्रशासन निवासस्थानाची अदलाबदल करणेबाबत संबधीत कर्मचा-याला आदेश देईल त्यावेळी त्याने विनातक्रार व स्वखर्चाने निवासस्थान बदलणे बंधनकारक राहील.

१८. जरी कर्मचा-याला निवासस्थान वापराचा परवाना दिलेला असला व अशा वापरापोटी कर्मचा-यांच्या वेतनातून दरमहा रक्कम जमा होत असली तरी त्यामुळे कर्मचा-याचा संस्थान निवासस्थानावर कोणत्याही त-हेचा हक्क (Right) अथवा कोणत्याही त-हेचा हितसंबध (Interest) प्रस्थापीत होणार नाही, म्हणजेच भाडेकरु म्हणून कोणत्याही प्रकारचा हक्क त्या कर्मचा-याला प्राप्त होणार नाही.

१९. कर्मचा-यास निवासासाठी देण्यात आलेले निवासस्थान/ जागा त्या कर्मचा-यास अन्य कोणासही वापरण्यासाठी देता येणार नाही. निवासस्थानाचा/ जागेचा वापर तो कर्मचारी अथवा त्यांचे कुटूंबीयाखेरीज दुसरे कोणासही करता येणार नाही. तसे निर्दशनास आल्यास निवासस्थान रिक्त करुन घेणेचा अधिकार संस्थानकडे राहील.

२०. संस्थान कर्मचा-याचे निवासासाठी दिलेल्या जागेच्या वापराचा परवाना कर्मचा-यास कोणासही हस्तांतरित करता येणार नाही, अथवा कर्मचा-याचे पश्चात त्याच्या वाली / वारसांना या परवान्याबद्दल कोणाताही हक्क वा हितसंबंध प्राप्त होणार नाही.

२१. कर्मचा-यांने अथवा कुटूंबातील इतर सदस्यांकडून इमारतीमधील शेजा-यांशी अगर परिसरात भांडण तटा अगर इतरांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही याची काळजी घेणे संबधीत कर्मचा-यावर बंधनकारक राहील. अशा कारणास्तव चौकशीअंती दोषी ठरल्यास त्या कर्मचा-याचा परवाना (लायसेन्स) रद्द करुन व त्याला दिलेले निवासस्थान रिक्त करुन घेणेचा अधिकार संस्थानला राहील.

२२. कर्मचारी संस्थान सेवेतून मुक्त झाल्यास अथवा त्यास संस्थान सेवेतून काढून टाकल्यास अगर कोणत्याही कारणाने त्याची सेवा संपुष्टात आल्यास, संस्थान निवासस्थानाचा ताबा सोडल्या शिवाय त्या कर्मचा-यास संस्थानकडून मिळावयाची कोणतीही रक्कम (भविष्य निर्वाह निधीची रक्कम वगळता) संस्थानकडून अदा करणेत येणार नाही.

२३. निवासस्थानाचे वापराबद्दल संस्थानने घालून दिलेल्या कोणत्याही नियमांचा भंग केल्यास संबधीत कर्मचा-याचा संस्थान निवासस्थान वापरा संबधीचा परवाना (लायसेन्स) कोणत्याही क्षणी रद्द करण्याचा अधिकार संस्थानला राहील व याप्रकारे परवाना रद्द केल्यानंतर निवासस्थानाचे कोणत्याही प्रकारे नुकसान झाल्यास संस्थान ठरवील तेवढी नुकसान भरपाई संबंधीत कर्मचा-याकडून वसूल करण्यात येईल व ती देणे त्याचेवर बंधनकारक राहील.

२४. संस्थान निवासस्थानाच्या वापराबाबत संस्थानने कर्मचा-यास दिलेला परवाना रद्द केल्यास अगर कोणत्याही कारणाने त्याची सेवा संपुष्टात आल्यास त्याने हे निवासस्थान त्याचेकडे राहणेस तो ज्या तारखेपासून अपात्र होईल त्या तारखेपासून विहीत सेवाआकार आणि बाजार भावानुसार संस्थान ठरवील तेवढी शुल्क रक्कम, अशी एकूण देय रक्कम संबधीत कर्मचा-याचे देय्यका मधून वसूल करणेचा अधिकार संस्थानला राहील.

२५. महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दि.१५ जून, २०१५ रोजीचे शासन निर्णयानुसार सेवानिवृत्तीनंतर कर्मचा-यास जास्तीत-जास्त ०६ महिने कालावधीसाठी संस्थान निवासस्थानामध्ये राहणेस मुदतवाढ देणेत येईल. सदरची मुदतवाढ निवासस्थानचे अतिरिक्त वापरापोटी प्रथम ०३ महिने नियमित दराने व त्यापुढील कालावधीचे शासन निर्णयामध्ये नमूद अनुज्ञप्ती शुल्क दराने अथवा संस्थान निश्चित करेल त्या चालू बाजारभाव दराने भाडे वसुलीचे अटीवर देणेत येईल. या कालावधीनंतरही संबधीत कर्मचा-यांने निवासस्थान रिक्त न केल्यास त्याचेवर तात्काळ कायदेशीर कारवाई करणेत यावी.

२६. एखादा कर्मचारी डयुटीमध्ये काम करतांना अपघातग्रस्त झालेमुळे तातडीने संस्थान निवासस्थान मिळणेची मागणी करत असल्यास त्याचे दुखापतीचे गांभीर्य लक्षात घेऊन संबधीत कर्मचा-यास तातडीने निवासस्थान उपलब्ध करुन देणे अथवा न देणेचा अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना राहील.

तरी उपरोक्त प्रस्तावीत केलेप्रमाणे संस्थान कर्मचारी निवासस्थान वाटपाची व बदलून देणेची सुधारीत नियमावलीस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कर्मचारी निवासस्थाने वाटप व बदलून देण्याच्या सुधारीत नियमावलीचे अवलोकन करणेत येऊन, सदरहू नियमावलीस मान्यता देण्यात आली. तसेच या नियमावलीची अंमलबजावणी तात्काळ करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०८** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील तरतुदींमध्ये आवश्यक ते बदल करणे.**

**प्रस्ताव-** **अ)** शासनाने दि.१४ मार्च, २०१७ चे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदींमध्ये कालानुरूप झालेले बदल विचारात घेऊन अन्य काही दुरूस्त्या/सुधारणा करणे आवश्यक आहे अथवा कसे याबाबत सर्वांगिण आढावा घेऊन व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने संस्थान अधिनियमात सुधारणा करण्याबाबतचा एकत्रित प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले आहे.

त्यास अनुसरून, सन २००४ साली संमत झालेला अधिनियम व कालानुरूप झालेले बदल तसेच सन २०१७-२०१८ मध्ये श्री साईबाबांचे समाधीला १०० वर्षे पूर्ण होत असून करावयाची विकासकामे या सर्व बाबींचा विचार करता संस्थानचे अधिनियम, २००४ मधील तरतुदींमध्ये आवश्यकते बदल करणेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.२५४ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदींमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यकत्या बदलांचे अवलोकन करणेत आले. त्यामध्ये विश्वस्त नेमणूकीसाठी विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२४ जानेवारी, २०१३ रोजीचे अधिसुचनेमधील कलम ४ (२) मध्ये अधिकतम वयोमर्यादा ७० वर्षापेक्षा अधिक असता कामा नये, अशी तरतुद आहे. सदर वयाची अट शिथील करणेबाबतचा समावेश उपरोक्त बदलांमध्ये करणेत यावा.

तसेच प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या New section to be added in Shri Saibaba Sansthan Trust Act.2004 मधील मुद्दा क्र.२ Power of Chief Executive Officer to request the Committee to reconsider the resolution in certain cases वगळणेत यावा व मुद्दाक्र.३ मध्ये मान्यवरांना भेटवस्तु

देण्याचे अधिकार अध्यक्ष व कार्यकारी अधिकारी यांचेबरोबरच सर्व विश्वस्तांनाही राहतील, असा बदल करणेत येऊन, सदरहू प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी मा.प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत यावा", असे ठरले.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदींमध्ये आवश्यकत्या दुरूस्त्या/ सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ६५२२/२०१७ दि.२९ मार्च, २०१७ अन्वये शासनास सादर करणेत आलेला आहे.

**ब)** आता उपाध्यक्ष, मा.श्री.चंद्रशेखर कदम व विश्वस्त, सर्वश्री भाऊसाहेब वाकचौरे, प्रताप भोसले, बिपीनदादा कोल्हे व सचिन तांबे यांनी दि२८/०४/२०१७ रोजी मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना लेखी निवेदन देऊन व्यवस्थापन समिती दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयक्र.२५४ (पान नं.१०६ ते १११) कायम करणेबाबतचा प्रस्ताव परिपूर्ण चर्चा व वाचन न झाल्याने स्थगित ठेवण्यात यावा, अशी विनंती केली.

तसेच मा.व्यवस्थापन समिती दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७८ मध्ये यापुर्वीचे व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ मधील निर्णय क्र.२५४ मध्ये खालीलप्रमाणे बदल करणेत आला.

या विषयावरील चर्चेच्या वेळी, समिती सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील तरतुदींमध्ये बदल करणेबाबतचा प्रस्तावावर सखोल चर्चा करुन, धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षीत आहे. परंतु सदरहू विषय आयत्या वेळेच्या विषयांमध्ये चेर्चेसाठी आल्यामुळे त्याचा अभ्यास करता आला नाही. याकरीता हा विषय पुन्हा चर्चेला घेण्यात यावा व त्यास सभेने मान्यता दिली. याकरीता सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवणेत येऊन, व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

यापुर्वी मा.व्यवस्थापन समिती दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२५४ मधील निर्णयास अनुसरून जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/६५२२/२०१७ दि.२९ मार्च, २०१७ अन्वये शासनास सादर केलेला प्रस्ताव सोबत **परिशिष्ट "अ"** जोडला आहे**,** त्यावर निर्णय होणेस विनंती.

**परिशिष्ट "अ"**

**Proposed Amendments in Shri Saibaba Sansthan Trust Act.2004**

| Sr. No. | Section No. | Current Provision | Proposed Amendments | Need for Amendments |
|---|---|---|---|---|
| 01 | 2 (c)(e) | "Executive Officer" Means the Executive Officer of the Committee | "Commissioner cum Chief Executive Officer" means the Commissioner cum Chief Executive Officer of the Committee. Also word Executive Officer to be replaced by the word Commissioner cum Chief Executive Officer in all sections of the Act and its regulations. | सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०८/०३/२०१७ रोजीच्या अ.शा.प.क्र./एईओ/१११७/५/२०१७ व विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण/२०१४/प्र.क्र.३२/२०१६ दि.२८/२/२०१७ अन्वये भारतीय प्रशासन सेवेतील वरीष्ठ श्रेणीतील अधिका-याची कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. |
| 02 | 11 (2) | The quoram for the meeting of the committee shall be eight | The quoram for the meeting of the committee shall be eight but if the quoram is not fulfilled, the meeting will be adjourned for 30 minutes. After which meeting shall then be proceeded with the permission of Chairman. | राज्य शासनाकडील अधिसूचना दि.२८ जुलै, २०१६ नुसार व्यवस्थापन समितीच्या १२ सदस्यांची नेमणूक करणेत आली आहे. तथापी, त्यापैकी ३ सदस्य आजपर्यंत बैठकीला उपस्थित राहीलेले नाहीत. त्यामुळे उर्वरीत ९ सदस्यांमधून ८ चा कोरम पूर्ण करणे ब-याच वेळा शक्य होत नाही. |
| 03 | 13 (2) | The Executive Officer may be selected from amongst the officers not | The Chief Executive Officer may be selected from amongst one who is holding or has held a | विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण/२०१४/ प्र.क्र.३२/ का.१६ दि.२८/०२/२०१७ अन्वये व |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | below the rank of Deputy Collector | post of a District Collector in any other service in the state. The Government shall appoint such other subordinate officers to Chief Executive Officer from State Services on deputation with such designations and assign them such functions as the Government my deem necessary for the purpose of this Act. Provided that all such officers shall be devotee of Shree Saibaba and shall make such declaration in the prescribed format. | मा.सर्वोच्च न्यायालयाकडील **SPL Apeeal (c) No.(s) -19856/2014** मा.सर्वोच्च न्यायालयाच्या वरील निर्णयानुसार |
| 04 | Section 14 (2) | Shall have powers, subject to the control of the Committee (a) to take disciplinary action against any other officer or employee of the committee.<br>(b) to call for tenders for works or supplies and accept such tenders when the amount or value thereof does not exceed twenty-five thousand rupees. | Though there may be any provision in service rules Chief Executive Officer shall have powers.<br>(a) to transfer any officer or employee as and when needed, to take disciplinary action against any other officer or employee of the committee or to suspend any officer or employee of the committee.<br>(b) Though there may be any provisions in the Act., The Chief Executive Officer shall have powers to give administrative sanctions, call tenders for engineering works or supplies and for acceptance of such tenders, acceptance of agreement, issue work order for engineering works the amount of works or value therefore does not exceed Ten Lakh Rupees and for other departmental works does not exceed Five Lakh Rupees.<br>(f) The Chief Executive Officer may delegate any of the powers confirmed on or functions entrusted to or duties imposed on him by or under this chapter to Deputy Executive Officer and Administrative Officer appointed under section 13 (2) or to such other officer of Shri | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा वाढलेला कार्यभार व भारतीय प्रशासन सेवेतील नियुक्त अधिकारी यांचा विचार करता कायद्यात याप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे.<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत श्री साईबाबा समाधी मंदिर, साईनाथ रुग्णालय, साईबाबा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, श्री साईप्रसादालय, भक्तनिवास असे विविध उपक्रम राबविले जातात. तेथे भक्तांच्या, रुग्णांच्या सुविधांच्या अनुषंगाने काही निर्णय तातडीने घेणे आवश्यक ठरते तसेच सन २०१७-२०१८ या वर्षात श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. या सर्व बाबींचा विचार करता सध्या असलेली रु.२५,०००/- खर्चाची मर्यादा ही अगदीच कमी आहे.<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा वाढलेला व्याप व कामकाज पहाता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील काही अधिकार प्रशासकीय सोईच्या दृष्टीने उप कार्यकारी अधिकारी किंवा प्रशासकीय अधिकारी यांना प्रदान करणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देणे आवश्यक आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | Saibaba Sansthan Trust, Shirdi as the Chief Executive Officer may deem fit subject to such restrictions and control as the Government may, by special or general order, lay down and also subject to such limitations and conditions, if any as may be specified in the order of delegation. | |
| 05 | 15 (1) | The Executive Offier of the Committee shall be appointed on such terms and conditions of service as may be determined by the State Government, from time to time. | The officers appointed by State Government under section 13 (2) shall be appointed on such terms and conditions of service as may be determinable by the State Government from time to time. | प्रतिनियुक्तीने राज्य शासन नियुक्ती करणा-या सर्व अधिका-यांसाठी लागु असणे आवश्यक आहे. |
| 06 | 18 (1) | About Advisory Council Instead of<br>v) the divisional Controller of the Maharashtra State Transport Corporation, Ahmednagar Division.<br>vi) the Executive Engineer, Irrigation Department, having jurisdiction over the Shirdi Nagar Panchayat<br>vii) the Executive Engineer, Operation and Maintenance Division, Sangamner of the Maharashtara State Electrictiy Board. | Following members to be added in Advisory Council<br>(v) One officer from Indian Revenue Services or Indian accounts & audit services.<br>(vi) One officer from IT Department or IT Consultant.<br>(vii) One Deputy Secretory from Law and Judiciary.<br>(x) Joint Director town planning.<br>(xi) One Architect or person holding such qualification in State Services. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे वाढलेले कामकाज, आर्थिक बाबी, माहिती तंत्रज्ञान कामकाज, विधि संबंधीत कामकाज यामुळे या क्षेत्रातील व्यक्ती सल्लागार परिषदेत असणे आवश्यक आहे. |
| 07 | 27 | The State Government may, depute any officer not below the rank of Deputy Secretary to inspect any movable or immovable property, records, corves pondence, plans, accounts and other documents velatimg to the sansthan trust, and the committee and its officers and employees shall be bound to afford all facilities to such officer for such inspection. | Instead of Deputy Secretary any officer not below the rank of Secretary. | उप सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी ही पदे आता समकक्ष आहेत, त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कामाची तपासणी त्यांचेपेक्षा वरीष्ठ अधिका-यांनी करणे आवश्यक आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 08 | 28 (1) | 28 (1) | 28 (1) (i) Chief Executive Officer shall have to send all proceedings of meetings of Shri Saibaba Sansthan Management Committee to Secretary Law and Judiciary (New Sub-section to be added) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज राज्य शासनाच्या कायद्यान्वये व विधि व न्याय विभागाचे अंतर्गत चालते. त्यामुळे व्यवस्थापन समितीचे बैठकींचे इतिवृत्त विधि व न्याय विभागास पाठविणे आवश्यक आहे. |
| 09 | 29 (1) | The Committee shall cause to be prepared the annual report including the Auditor's report for each financial year ending on 31st March showing therein the financial status and the details of income and expenditure of the Trust and the report of the Scrutiny Committee together with a detailed list of donee institutions (with full address), to whom financial assistance was granted by the Trust with information relating to the object and the amount of such financial assistance, and submit a copy of the report to the State Government and the Charity Commissioner not later than the 30 June of that year. | The Committee shall cause to be prepared the annual report including the Auditor's report for each financial year ending on 31st March showing therein the financial status and the details of income and expenditure of the Trust and the report of the Scrutiny Committee together with a detailed list of donee institutions (with full address), to whom financial assistance was granted by the Trust with information relating to the object and the amount of such financial assistance, and submit a copy of the report to the State Government and the Charity Commissioner not later than the 30 September of that year. | वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी लेखापरिक्षकांना पुरेसा कालावधी मिळणेसाठी ३० जून ऐवजी ३० सप्टेंबर असा बदल होणे आवश्यक आहे. |
| 10 | 34 (3) | Where the Committee is dissolved or suspended under subsection (1) the state government shall appoint a person as an Administrator from amongst the person in the active service of the state government or from the persons who have retired from such service (such person not being below the rank of a collector) and who is a devotee of Shri Saibaba. | Where the Committee is dissolved or suspended under subsection (1) the state government shall appoint a person as an Administrator from amongst the person in the active service of the state government or from the persons who have retired from such service (such person not being below the rank of a Divisional Commissioner) and who is a devotee of Shri Saibaba. | राज्य शासनाच्या आदेशान्वये कार्यकारी अधिकारी म्हणून भारतीय प्रशासन सेवेतील अधिका-याची नियुक्ती झालेली आहे. समिती बरखास्त अथवा निलंबीत असताना प्रशासक म्हणून नियुक्त करावयाचा अधिकारी हा कार्यकारी अधिकारी यांचेपेक्षा सेवाज्येष्ठ असणे आवश्यक आहे. |

**New Sections to be added in Shri Saibaba Sansthan Trust Act.2004**

**1) Powers to Chief Executive Officer in Emergency Situation:-**

The Chief Executive Officer may, in case of emergency direct execution of any work not exceeding amount one lakh or the going of any act, which is not provided for in the budget for the year and the immediate execution or the going of which is in his opinion necessary for the preservation of the properties of the Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi or for the service or safety of the pilgrims resorting to the Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi and may also direct that the expenses not exceeding amount one lakh of executing such work or doing the act shall be paid, from the funds of Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. The Chief Executive Officer shall fortwith report to the Committee the action taken under this section and the resons thereof.

**2) The Chairman or trustee of the Committee and the Chief Executive Officer may, however:-**

(a) Sanction gifts of

(1) Laddus and other Prasad

(2) Shawls,

(3) Books and publications of the Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

(4) Idols of Shri Saibaba

(b) Food and accommodation for any dignatory provided that the expenditure involved in any

item in any single case does not exceed Rs.5,000/-

(c) Free Darshan and Aarti to any degenatory.

**3) Proposed Amendments in Shri Saibaba Sansthan Trust Act.2004 section 25(3) rules as per notification dt.24 January. 2013:-**

Rules No.4 (2) the person to be appointed as a member of the Committee shall on the date of nomination be at least 25 years old and not more than 70 years old.

**Required amendment:-** The upper age limit of the person to be appointed as a member of the Committee should be waived.

**निर्णय क्र.४६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदींमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक त्या बदलांचे अवलोकन करणेत आले. त्यामधील कलम १४ (२) मधील (a), (b) वगळणेत यावा व कलम १८ (१) कायम ठेवणेत येऊन, बदल करणेसाठी सुचविणेत आलेल्या अधिकाऱ्यांचाही सल्लागार परिषदेमध्ये समावेश करणेत यावा व त्यासह सदरहू प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०९** **जनहित याचिका क्र.२५/ २०१२ मधील चौकशी अधिकारी श्री.पी.एस. परांजपे साहेब यांनी केलेल्या चौकशीचे अहवालाबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** सदरचा विषय मा. त्रिसदस्य समितीचे दि. १४/०६/२०१६, रोजीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आला होता, त्यावर **निर्णय क्र.३३७अन्वये** सविस्तर चर्चा होऊन, जनहित याचीका क्र.२५/ २०१२ मधील चौकशी अधिकारी श्री.पी.एस. परांजपेसाहेब यांनी अहवाल सादर केलेला आहे सदरचा विषय मा.उच्चन्यायालयासमोर प्रलंबीत आहे व मा.उच्चन्यायालयाचे त्याबाबत कोणतेही निर्देश नाहीत. तेव्हा हा अहवाल मा.उच्चन्यायालयाने स्वीकारला किंवा कसे याबाबत संबंधीत संस्थानचे वकिलाचा स्पष्ट अहवाल मागविणेत यावा, असे ठरले.

**प्रास्तवीक-** मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, यांचेकोर्टात श्री.संजय भा. काळे, यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचेविरुध्द दाखल केलेल्या, जनहित याचिका क्रमांक २५/२०१२, मध्ये, मा. उच्च न्यायालयाने, दि.१०/१२/२०१४, रोजी दिलेल्या आदेशाने चौकशी अधिकारी श्री.पी.एस. परांजपे, साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची नेमणुक केली होती.

श्री.अॅड. पी.एस. परांजपे, चौकशी अधिकारी, यांनी चौकशीचे कामकाजासाठी, दि.२४/०१/२०१५, दि.१४/०२/२०१५, दि.०८/०३/२०१५, दि.१२/०४/२०१५, दि.१३/०५/२०१५, दि.१४/०५/२०१५, दि.१४/०६/२०१५ दि.१२/०७/२०१५, दि.०२/०८/२०१५ रोजी शिर्डी येथे उपस्थीत राहून वेळोवेळी पिटीशनर व रिस्पॉन्डंट यांचे शपथपत्र घेवून दि.०२/०८/२०१५, रोजी तोंडी ऑर्ग्यूमेंट करणेस सांगीतले त्याप्रमाणे काही रिस्पॉन्डंट यांचे प्रतिनिधींनी तोंडी ऑर्ग्यूमेंट केले आहे. सदरचे चौकशीचे कामकाज पुर्ण करुन केलेल्या चौकशीचा अहवाल, दि.१८/०२/२०१६, रोजी, मा. उच्च न्यायालयात दाखल केला असून त्याची प्रत संस्थानला दिली आहे. पी.आय.एल. २५/२०१२ मध्ये संजय काळे यांनी उपस्थीत केलेले मुद्दे व त्यावर चौकशी अधिकारी यांनी दिलेला अहवाल खालील तक्त्यात थोडक्यात नमुद केला आहे.

| अ.क्र. | तक्रारदाराचा मुद्दा | चौकशी अहवालाचा मराठी अनुवाद. |
|---|---|---|
| ए. | संस्थानचे लाडू काऊंटर मंदीर परिसराचे बाहेर काढून एम्प्लॉईज सोसायटीचे पेढे विक्री करणेकामी जागा करुन दिली. | प्रस्तुत प्रकरणी तक्रारदारांचे असे म्हणणे आहे की, काही अंतस्थ हेतुने जाणून बुजून काही कामे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को. सोसायटीकडे आऊटसोर्स करण्यात आली, मंदिर परिसरात ६ स्टॉल्स सोसायटीला लिजवर देण्यात आली सदर स्टॉल्स मधून सोसायटीने भक्तांना पेढयांची विक्री केली, तक्रार दारांचे असे स्पष्ट म्हणणे की, दररोज १५०० किलो इतक्या वजनाची विक्री करण्यात आली, प्रति किलो रु.४०/- इतक्या नफ्याने सोसायटीला दररोज रु.६०,०००/- इतका नफा झालेला आहे. सदर नफा संस्थानला मिळाला असता परंतू कोणतेही सबळ कारण नसतांना सोसायटीकडे वळविण्यात ता आला.<br>तसेच चप्पल स्टॅन्ड व मोबाईल स्टॅन्ड मधून सोसायटीला रुपये एक ते दिड लाख नफा झालेला आहे.चौकशी कामी सादर करण्यात आलेल्याकागदपत्रांवरुन सोसायटीची घटना पहाता, सोसायटीस फक्त जिल्हा सहकारी बँके कडून कर्ज घेवून ते कर्मचारी सभासदास कर्ज उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे.<br>माझे असे स्पष्ट मत आहे की, सदर कामे सोसायटीला आऊटसोर्स करण्योच कोणतेही कारण नाही.<br>सोसायटीकडून संस्थानला वार्षीक रुपये ३,४१,५२०/- इतके अत्यल्प भाडे मिळते. तर सोसायटीला दरमहा साधारण ६० लाख रुपये इतके उत्पन्न मिळूशकते ते संस्थान तिजोरीत जमा झाले असते, म्हणून माझे असे मत आहे की, सदर कामे सोसायटीला आऊट सोर्स करण्याचे कोणतेही कारण नाही.<br>मला असे सांगण्यात आले आहे की, संस्थानकडे फार मोठ्या प्रमाणात कर्मचारी आहेत, आणखी ५० कर्मचारी वाढून सदरच्या सोयी सुवीधा संस्थान मार्फत साईभक्तांना उपलब्ध करुन देणे संस्थानला शक्य आहे, याबाबत प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा. सदरचे काम आऊटसोर्सींग व्दारे केले यामध्ये विश्वस्तांचा फौजदारी स्वरुपाचा गुन्हा आहे असे मला वाटत नाही.<br>**विद्यमान मा. जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर व प्रशासनाने सदरचे व्यवसाय आऊटसोर्सींगने चालविण्यास देणेबाबत गांभीर्याने विचार करावा.** |
| बी. | तत्कालीन विश्वसतांचे विरुध्द बेकादेशीर वाहनाचे बीले घेतल्याने क्रिमीनल केसेस दाखल केलेल्या आहे. | सदर विश्वस्तांचे विरुध्द मा.कोर्टात प्रकरण चालू असून ते न्याय प्रविष्ठ आहे. त्यामुळे सदर प्रकरणी चौकशी अधिकारी यांनी काहीही निर्णय दिलेला नाही. जर अर्जदाराला माजी विश्वस्तांचे विरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करावयाचा असल्यास त्यास मोकळीक आहे. |
| सी. | विश्वस्तांनी त्यांचे पाहुण्यांसाठी संस्थानच्या निवासस्थानांचा गैरवापर केलेला आहे. | विश्वस्तांनी त्यांचे पाहुण्यांसाठी संस्थानचे निवासस्थानांचा वापर केला त्यात फौजदारी स्वरुपाचा गुन्हा असल्याचे दिसून येत नाही.<br>**व्हि.व्ही.आय.पी. गेस्ट हाऊस येथे काम करणा-या कर्मचा-यांनी रुम वापरांस देतेवेळी रुमचा सेवा आकार घेणे आवश्यक होते, हा सदर कर्मचा-यांचा निश्कळजीपना आहे, सदर कर्मचा-यांची फारतर प्रशासनामार्फत अंतर्गत चौकशी करता येईल.** |

| | | |
|---|---|---|
| डी. | श्री राधाकृष्ण विखे पा. त्यावेळी विधी व न्याय विभागाचे मंत्री होते. त्यांनी संवत्सर येथे पालखी थांबा बाबत त्यांचे पदाचा दुरुपयोग केला. | संवत्सर येथील पालखी थांबा बांधणेबाबत तत्कालीन विश्वस्त व विधी व न्याय विभागाचे मंत्री श्री राधाकृष्ण विखे पा. यांनी संस्थानचे तत्कालीन विश्वस्तांवर आपला प्रभाव टाकून संवत्सर गांवामध्ये संस्थान मार्फत मोठ्या प्रमाणात रक्कम खर्च करुन, आवश्यकता नसतानाही पालखी थांब्याचे बांधकाम केले आहे. तथापी याबाबत काही प्रमाणात पक्षपात झालेला असू शकतो परंतू निश्चीतपणे फौजदारी स्वरुपाचा गुन्हा घडलेला नाही, तरी सुध्दा तक्रारदारास स्वतंत्र पणे संबंधीत ट्रस्टींचे विरुध्द योग्य त्या न्यायालयात दाद मागता येईल. तसेच संस्थानने शिर्डी येथे पायी येणा-या भक्तांसाठी मुंबई, हैद्राबाद, आमदाबाद इ. ठिकाणाहून येणा-या भक्तांसाठी पालखी थांबे बांधलेले आहेत. त्या पर्श्वभूमीवर निव्वळ संवत्सर येथे भक्तनिवास बांधले म्हणून फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करता येऊ शकनार नाही. तसेच संस्थान प्रशासनास विनंती करण्यात येते की, मोठ्या प्रमाणावर संस्थानची रक्कम खर्च झाली असल्यामुळे सदर पालखी थांबा संस्थानने स्वतः चालवावा, ग्रामपंचायतीस चालविण्यास देण्यात येऊ नये. **(टिप - संवत्सर येथे संस्थानने कोणत्याही प्रकारचा पालखी थांबा बांधण्यात आला नाही.)** |
| ई. | संस्थानने जिल्हा परिषद शाळेसाठी बेकायदेशीर पणे बेंचेसचे वाटप केले. | सन २००५ सालात रक्कम रुपये ३४,७०,१०,३००/- रक्कमेचे अहमदनगर जिल्हयातील एकुण २,९३४ शाळेंसाठी, एकुण विद्यार्थी ३,३०,४८५ विद्यार्यांना एकुण १,६५,२४३ बेंचेस पुरविणेकामी खरेदी करणेचा निर्णय झाला होता. शासनाने सदर बेंचेस खरेदीसाठी रक्कम रुपये २४,७०,१०,३००/- दिलेले आहेत सदर बेंचेस खरेदीसाठी संस्थानने १० कोटी रुपये संस्थान अधिनियम २००४ अन्वये कलम २१ (२)(१) अन्वये,शासनांची मान्यता घेऊन दिलेले आहे. त्यावेळी जिल्हा परिषद अहमदनगर च्या अध्यक्षा सौ शालीनीताई होत्या.<br>परंतु प्रस्तुत प्रकरणी शासनाची मान्यता घेणेची कार्यवाही अनियमित स्वरुपाने केलेली आहे. बेकायदेशीर स्वरुपाची नाही, सदर कृत्य हे आय पी सी अंतर्गत कोणत्याही कलम अंतर्गत फौजदारी स्वरूपाचा गुन्हा नाही.<br>सदर बेंचेस वाटप करतांना जिल्हा परिषद अहमदनगर च्या अध्यक्षा सौ शालीनीताई यांनी वशिलेबाजीने त्यांच्या तालुक्यातील त्यांच्या मतदारसंघामध्ये येणा-या शाळेंना बेंचवाटपास प्राधान्य दिले,असे नमुद केले. परंतु शासनाने त्याप्रमाणे बेंचेस वाटप केलेले नाही. त्यामुळे सदर कृत्यासाठी विश्वस्तांना दोषी धरता येणार नाही.<br>संस्थानचे अधिनियम २००४ मधील कलम २२ नुसार वेलफेअर फंड खर्च करणेकामी शासनाची मान्यता घेतलेली आहे. त्यामुळे सदरचे कृत्य हे फौजदारी स्वरुपाचे असल्याचे दिसून येत नाही. यावर अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार प्रकरणी सरकारी व खाजगी केस कायदा कलम ११६(३) सी.आर.पी.सी. नुसार मा.ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट यांचेकडे खाजगी फौजदारी केस दाखल करु शकतो. मा.ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट चौकशी करुन प्रथमदर्शनी सदरचे कृत्य हे गुन्हेगारी स्वरुपाचे आहे की नाही हे ठरवतील. |
| एफ. | संस्थानने विमान विकास कंपनीला विमानतळ बांधकाम करणेकामी दि. ०५/०७/२०११ व दि. २७/०७/२०११ रोजी रु. ३५ कोटी रुपये घटना बाह्य व अनाधिकृत पणे दिलेले आहे. | सदर प्रकरणी संस्थान अधिनियम २००४ मधील कलम २२ नुसार शासनाची मान्यता घेतलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी विश्वस्तांनी केलेला ठराव मंजूर केला याला फौजदारी कृत्य केले असे म्हणता येणार नाही. |
| जी. | बेकायदेशीररित्या काही सरकारी अधिकारी व कर्मचारी संस्थानचे जागेत राहण्यासाठी निवासस्थाने दिली. | अर्जदारांनी असा आरोप केला की, असिस्टंट सुपर्टिंन्डट ऑफ पोलीस श्री श्रीकांत जावळे, तहसिलदार, श्री राहुल मुंडके, शिर्डी नगरपंचायतचे मुख्याधिकारी,श्री शिवाजी खोसे, यांना संस्थानने रहाणेसाठी निवासस्थान दिले आहे.<br>तसेच काही संस्थानचे क्वार्टर्स कॉन्स्टेबल श्री रमेश बोरुडे, बाळासाहेब मधुकर यादव, पुंजाराम ढवळे, यांना रहाणेसाठी दिले, परंतु त्यांचे समवेत सदर कवार्टर्स त्यांना वापरास दिले त्याबाबत करारनामा योग्य कालावधीत केलेला नाही. तुयांचेकडुन संस्थानने रेंट मुदतीत वसुल केले नाही.<br>सदरचे आरोपा बाबत विश्वस्तांना दोषी ठरवता येणार नाही. रेंट मुदतीत वसुल करण्याची जबाबदारी संस्थानचे अधिकारी यांची आहे.सदर कर्मचा-यांना क्वार्टर्स संस्थानने वापरांसाठी देणेचे कारण म्हणजे सदर कर्मचारी संस्थानचा कामासाठी मदतीचे आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | | सदर कर्मचा-यांना संस्थानचे वापरांसाठी दिलेल्या क्वार्टर्सचे रेंट सदर कर्मचा-यांच्या पगारातुन संस्थानकडे मुदतीत जमा होत होते.सदर प्रकरणी विश्वस्तांना जबाबदार धरता येणार नाही.<br>**सदर निवासस्थानांचे नियमीतपणे भाडेवसुल करण्याचे काम संस्थानचे कार्यालयाचे आहे. तसेच रुम वापरांस देणे व रेंट आकारणेबाबत संस्थान प्रशासनाने त्याकामी नियमावली तयार करणे आवश्यक आहे.** |
| एच. | साईटेक प्रोजेक्ट कॉग्नीझंट कंपनी चेन्नई यांना दिलेला आहे, त्याचे ॲग्रीमेंट पोस्ट फॅक्टो केले आहे, जानेवारी २०११ पासून जुन २०११ पावेतो काम पुर्ण होणे आवश्यक होते, परंतू ६ जुन २०११ मध्ये पहिले पेमेंट रिलीज झाले आहे व संस्थानला आर्थीक नुकसान केलेले आहे. | सदर प्रकरणी श्री रमणी यांचे मुळे कॉग्नीझंट कंपनीला काम दिल्यामुळे व त्यांनी काम विहीत मुदतीत पुर्ण न केल्यामुळे करारातील अटींचे उलंघन झाले आहे. त्यामुळे संस्थानला नुकसान सहन करावे लागले, करारातील अटी शर्ती नुसार सदर कंपनी वेळेत काम पुर्ण करत नसेल तर संस्थानला सदर कंपनी विरुध्द योग्य त्या न्याय कक्षेत दाद मागता येते.<br>परंतू विश्वस्तांना सदर प्रकरणी दोषी धरता येणार नाही.**सदर कंपनीने करारातील अटी नुसार काम करण्यास विलंब केला असल्यास सदर कंपनी विरुध्द योग्य त्या कोर्टाकडे नुकसान भरपाई मागण्याची मुभा आहे.** |
| आय. | शिर्डी नगरपंचायतीने बी.ओ.टी तत्वावर साई कॉम्प्लेक्स आणी राधाकृष्ण विखे पा. व्यापारी संकुल बांधण्यास परवानगी दिली सदर इमारतीच्या बांधकामामध्ये व कंम्प्लीशन सर्टफिकेट देण्यामध्ये काही नियमांचे उल्लंघन झाले आहे. | याबाबत शिर्डी नगरपंचायत, संबंधीत बिल्डर विरुध्द योग्य ती कारवाई करु शकते आणी याबाबत विश्वस्तांना जबाबदार धरता येऊ शकत नाही. तक्रार दारांची अशी तक्रार आहे की, संस्थानने नगरपरिषद (कोपरगांव) यांना पालखी रोडच्या कामासाठी १,१२,४९,४१०/- इतकी आर्थीक मदत केलेली असूनही काम पुर्ण करण्यात आलेले नाही. तरी ही त्याबाबत विश्वस्तां विरुध्द फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्याचे कारण होऊ शकत नाही.<br>अपुर्ण कामासाठी नगरपरिषद जबाबदार असून, त्यास विश्वस्त जबाबदार नाहीत.<br>**त्याबाबत शिर्डी संस्थानने, नगरपरिषदेला कामाच्या दिरंगाईबाबत नाराजी दर्शविण्याचे कळवावे.** |
| जे. | विश्वस्तांनी त्यांचे मतदारांना हॉस्पीटल सुविधेच्या बीलामध्ये बेकायदेशीर सवलती दिलेल्या आहे. | तक्रार दाराची अशी तक्रार आहे की, काही विश्वस्तांनी राजकीय हेतूने रुग्णांचे हॉस्पटल बीलात काही सवलती दिल्या.<br>तथापी, रुग्णांच्या बीलात देण्यात आलेल्या सवलती या राजकीय हेतूने किंवा वशीलेबाजीने दिल्या हे ठरविणे अत्यंत अवघड आहे. हे सत्य आहे की, भक्तांच्या देणगीतून संस्थानने सुपर स्पेशालीटी रुग्णालय उभारले असून, सदर हॉस्पीटल व्दारे परिसरातील रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविण्याचे मोलाचे कार्य करण्यता येत आहे. प्रत्येक रुग्णाच्या आकडेवारी शिवाय बीलातील सवलती राजकीय हेतूने, वशीलेबाजीने किंवा मानवता वादी दृष्टीकोणातून दिल्याचे अनुमान काढणे अत्यंत कठीण आहे. आस पासच्या परिसरातील लाभार्थींची संख्या फार मोठी आहे. परंतू असे म्हणता येत नाही की, काही रुग्णांना काही सवलती दिल्या म्हणजे विश्वस्तांना त्यांची आर्थीक परिस्थीती माहित असू शकते असे नाही. त्यामुळे विश्वस्तांनी कोणतेही गुन्हेगारी स्वरुपाचे कृत्य केलेले नाही. माझे असे मत आहे की, काही रुग्णांना सवलती दिल्या म्हणून, विश्वस्तांविरुध्द फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्याचे सबळ कारण ठरु शकते.<br>**प्रशासनाने रुग्णांच्या बीलात सवलती देण्याबाबतची नियमावली तयार करणे.** |
| के. | संस्थानचे सन २००५-२००६ ते सन २००८ -२००९ चे ऑडीट रिपोर्ट मध्ये, ऑडीटर्सने काही पात्रता / अहर्तता नमुद केल्या आहेत.<br>"व्यवस्थापन समिती सदस्यांचे इतर फर्म/कंपन्या मध्ये काही हितसंबंध आहेत किंवा कसे याबाबत माहिती मिळविण्यासाठी संस्थानकडे कोणतीही व्यवस्था नाही की, | याबाबत संबंधीत ऑडीटरने, विश्वस्तांनी कोणत्याही गुन्हेगारी स्वरुपाचे कृत्य केले असल्याचे नमुद केलेले नाही, तसेच सन २००८-२००९ नंतरच्या ऑडीट रिपोर्टस मध्ये सदर पात्रता / अहर्तता नमुद केलेल्या नाहीत. आणी म्हणून कोणत्याही विश्वस्तांच्या विरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्याचा प्रश्नच नाही. |

| | | |
|---|---|---|
| | ज्यामुळे ऑडीटर्सना विश्वस्तांचे सदस्यांचे हितसंबंधा बाबत काही भाष्य कारता येईल संस्थान अधिनियम २००४ च्या सेक्शन ९ (१)(डी)(ई) व सुधारीत शासन निर्णय जर सदस्यांचे असे हितसंबंध असतील तर ते व्यवस्थापन समिती सदस्य होण्यासाठी अपात्र ठरु शकतात" | |
| एल. | तक्रार दाराने संस्थान व जिल्हा परिषद यांचेत झालेल्या जागेच्या आदलाबदली मध्ये संस्थानचे नुकसान झालेले आहे अशी तक्रार आहे. | सदर अदलाबदली मध्ये बाजारभाव ग्राह्य न धरता परस्परांची सोयीला प्राधान्य असते, जर विकास आराखड्याला काही बाधा पोहचत असेल तर सदर अदलाबदलीतील काही अनियमीतता असेल तर, ती अनियमीतता आहे, त्यामुळे सदर जागेची अदलाबदल बेकायदेशीर नाही. |
| एम. | संस्थानने येसगांव येथे अनाधिकृत पणे साईभक्तांसाठी पालखी थांब्याचे बांधकाम केले. | सदर प्रकरणी येसगांव ग्रामपंचायतीने भक्तनिवास बांधकामासाठी १० गुंठे जागा संस्थानला देणार असल्याचा ठराव केला होता. तथापी सदरची जागा संस्थानचे नावावर वर्ग / नोंद झालेली नसतांनाही घाई घाईने टेंडर काढून वाघ बिल्डर्स् यांना सदरचे कामाचा ठेका देण्यात आला, सदर कामी रु. ४१,८९,५९०/-इतका खर्च झालेला आहे. ज्या जागेत भक्तनिवास बांधण्यात आले आहे. ती जागा अद्यापही संस्थानकडे हस्तांतरी झालेली नसुन ग्रामपंचायत येसगांव यांचे नावावर आहे त्यामुळे संस्थानचे तत्कालीन प्रशासक संस्थानचे हित जपण्यात अयशस्वी ठरले आहेत.<br>तथापी सर्वबाबी विचारात घेता सदर प्रकरणात विश्वस्तांकडून कोणत्याही प्रकारची अफरातफर केलेली आहे असे म्हणता येत नाही, सदर प्रकरणी वशीलेबाजी झालेली असू शकते कारण भक्तनिवासाचे बांधकाम हे मंगल कार्यालयाच्या अगदी शेजारी करण्यता आलेले आहे, त्यामुळे सदर भक्तनिवासाचा वापर मंगल कार्यालयातील व-हाडीमंडळींच्या निवासासाठी केला जाऊ शकतो. तसेच सदर भक्तनिवासाचे व्यवस्थापन संस्थान मार्फत केले जाणार आहे की, सदर भक्तनिवासाच्या चाव्या अद्यापही ग्रामपंचायत यांच्याच ताब्यात आहेत हेही स्पष्ट होत नाही.<br>**सदर विषयी, विविध विभागांनी सदर बांधकाम नियमीत करण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न करुनही काही अनियमीततेची अद्यापही पुर्तता करणेबाकी आहे. त्यामुळे संस्थान प्रशासकास विनंती की, संस्थानचे हित जपण्यासाठी सर्वबाबींची पुर्तता करुन घेणे.**<br>**संस्थान प्रशासनास सर्वबाबींची सहा महिन्यांचे कालावधीत पुर्तताकरुन घेण्यास विनंती आहे. आणी भक्तनिवासाच्या जागेचे संस्थानचे नावावर हस्तांतरण करुन घ्यावे आणी यापुढे शक्य झाल्यास सदर भक्तनिवासाची व्यवस्थापन संस्थान कर्मचा-या मार्फत करण्यात यावी.**<br>माझे असे स्पष्ट मत आहे की, यामध्ये संस्थानच्या अधिका-यांकडून काही तृटी व निष्काळजीपणा झालेला असला तरीही, कोणाही विरुध्द गुन्हेगारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करता येवू शकणार नाही किंवा संस्थान अधिका-यांच्या असहाय्यतेमुळे ही झालेले असू शकते.<br>मी अधिच नमुद केल्यानुसार सदर बाब काही विश्वस्तांच्या वशीलेबाजी मुळे झालेले असू शकते परंतू निश्चीतपणे गुन्हेगारी स्वरुपाचे कृत्य ठरु शकत नाही. |

उपरोक्त प्रमाणे मुद्यांचे संदर्भात चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवाला संदर्भात थोडक्यात माहिती सादर आहे. तसेच संबंधीत सर्व विश्वस्तांना सदर अहवालाच्या प्रती टपालाने पाठविणेबाबत व मा. कोर्टात सादर केलेल्या अहवालाची प्रत दि. १४/०६/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत आली होती.

**मागणी-** मा. त्रिसदस्य समितीचे दि.१४/०६/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३३७ अनुसरुन जा.क्र.एसएसएस वशी-विधी/२९१०/२०१६, दि.८/९/२०१६, रोजीचे पत्राने ॲड.,श्रीआर.एन.धोर्डे, यांना स्पष्ट लेखी अहवाल संस्थानला कळविणेस विनंती केली होती, त्यानंतर, दि.८/११/२०१६, रोजी त्यांचेशी समक्ष चर्चा केली, त्यांनी असे सांगीतले की, मी कोणत्याही प्रकरचे लेखी अहवाल/ मार्गदर्शन करणार नाही, जनहित याचीका क्र.२५/२०१२, मा.उच्च न्यायालयाने डिस्पोज केले आहे, त्यामध्ये अर्जदाराने फक्त चौकशी होणेबाबत, मा. कोर्टास विनंती केली होती, त्यानुसार, चौकशी झालेली असून त्याचा अहवाल, ॲड.,श्री परांजपे, चौकशी अधिकारी, यांनी, मा.उच्च न्यायालयात सादर केला आहे, सदरचा अहवाल, मा. उच्च न्यायालयाने स्विकारणे/ न स्विकारणे हा प्रश्नच उद्भवत नाही, असे तोंडी सांगीतले आहे, लेखी अहवाल दिलेला नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे माहिती व निर्णयार्थ, तसेच, संबंधीत विभागांस सदर अहवालाच्या प्रती चौकशी अधिकारी, यांनी सुचविलेल्या कार्यवाहीसाठी पाठविणेचे मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.४६६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, जनहित याचिका क्र.२५/ २०१२ मधील चौकशी अधिकारी श्री.पी.एस. परांजपे साहेब यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली. तसेच या अहवालामधील एम मध्ये नमुद केलेप्रमाणे येसगाव येथे संस्थानमार्फत बांधणेत आलेले भक्तनिवास तातडीने संस्थानचे नावावर करणेची कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.१०** **शैक्षणिक संकुलासाठी संगणके व संगणकीय साहित्य तसेच प्रोजेक्टर खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-**

**1)** दि.०९.१०.२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतीलनिर्णय क्र.७००.

**2)** दि.२५.०२.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतीलनिर्णय क्र.०२.

**प्रास्ताविक :-** मा.व्यवस्थापन समितीचेदि.०९.१०.२०१६ रोजीचे सभेतीलनिर्णय क्र.७०० नुसार श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेसाठीचे संगणक हे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत खरेदी करावेत, असे निर्देशीत केलेले आहे. तसेच मा.व्यवस्थापन समितीचेदि.२५.०२.२०१७ रोजीचे सभेतीलनिर्णय क्र. ०२ नुसार संस्थानची सर्व विभागांची संगणक मागणी एकत्रित करुन माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत एकत्रितपणे खरेदीचा प्रस्ताव सादर करावा, असे निर्देशित केलेले आहे.

उपरोक्त निर्देशान्वये, सर्व शैक्षणिक संकुलामध्ये सध्या कार्यान्वीत असलेले संगणके व संबंधीत विभागाच्यामागणीचा तपशिल एकत्रित करणेत आलेला आहे. तथापि, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा संगणक मागणीचा प्रस्ताव स्वतंत्ररित्या यापुर्वीच त्यांचे विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयासाठी ठेवणेत आलेला आहे. इतर शैक्षणिक संकुलाकडे सध्या असलेले संगणकेपुढील तक्त्याध्ये दर्शविलेप्रमाणे आहेत.

**सध्या उपलब्ध असलेली संगणक संख्या**

| Sr. No. | Name of Dept | No of Students | No of Computers | Year of Purchase | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 01 | ShriSaibaba Junior Collage | 640 | 20 (P4 Model) | 2002 | **Not Usable** |
| | | | 25 (Dual Core) | 2013 | **In Use** |
| 02 | ShriSaibaba English Medium School | 1600 | 30 (Dual Core) | 2013 | **In Use** |
| 03 | Shri Saibaba Kanya Vidya Mandir | 721 | 24 (P4 Model) | 2002 | **Not Usable** |

**मागणी करणेत आलेली संगणके, लॅपटॉप, युपीएस, प्रोजेक्टर, लेझरजेट प्रिंटर व नेटवर्क स्विच (२४ पोर्ट) संख्या**

| Sr. No | Computer Details | Name of Dept | Dept Demand | Total | Rate | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | All in one (AIO) Desktop with Intel Core i3 Processor On | ShriSaibaba Junior Collage | 25 | 60 | 38,590/- | 23,15,400/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | board integrated Graphics, 10/100 LAN, 4 GB DDR3, Hard disk 500 GB, 20" Monitor, Wireless Keyboard And mouse, Wi-Fi/ Media Card reader, Web Cam. Windows 10 SL 64 Bit, 01 Years onsite next business day Warranty (BRAND HP /Dell/Lenovo) | ShriSaibaba English Medium School | 15 | | | |
| | | ShriSaibabaKanya VidyaMandir | 20 | | | |
| 02 | Laptop with Intel Core i3 Processor 2 GB Graphics, 10/100 LAN, 4 GB DDR3, Hard disk 500 GB, 15.6" Monitor, Wireless Keyboard And mouse, Wi-Fi/ Media Card reader, Web Cam. Windows 10 SL 64 Bit, 01 Years onsite next business day Warranty (BRAND HP /Dell/Lenovo) | ShriSaibaba Junior Collage | 04 | 07 | 36,210/- | 2,53,490/- |
| | | ShriSaibaba English Medium School | 02 | | | |
| | | ShriSaibabaKanya VidyaMandir | 01 | | | |
| 03 | 10 KVA UPS With 45 Minutes Backup Make APC Input 1 Phase, Output 1 Phase MS Battery Rack With Model : SRC 10 KUXI | ShriSaibaba English Medium School | 01 | 01 | 2,25,000/- | 2,25,000/- |
| 04 | Projector | ShriSaibaba Junior Collage | 01 | 02 | 45,900/- | 91,800/- |
| | | Information Technology Dept | 01 | | | |
| 05 | MFP-Laser Jet printer | ShriSaibaba English Medium School | 01 | 02 | 13,900/- | 27,800/- |
| | | ShriSaibabaKanya VidyaMandir | 01 | | | |
| 06 | Network Switch 24 Port | ShriSaibabaKanya VidyaMandir | 01 | 01 | 15,000/- | 15,000/- |
| | | | | | **Total** | **29,28,490/-** |

उपरोक्त तक्त्यामधील तपशिलाप्रमाणे संगणके, संगणकीय साहित्य व प्रोजेक्टर यांचे दर विविध पुरवठा धारकांकडून ईमेलद्वारे मागविणेत आलेले होते. त्यानुसार विविध पुरवठाधारक यांचेकडुन प्राप्त झालेले सदर साहित्याचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

**1) Computer**

| Sr.No | Name of Dealer | Lenovo | HP | Dell | Average Cost |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Direct IT Solution | 44,200/- | - | - | 45,400/- |
| 02 | Smart Price | 42,261/- | - | 44,499/- | |
| 03 | Sainath Computers | | 39,500/- | | **(15 % Less38,590/-)** |
| 04 | R.D.Data System, Nashik | | 56,550/- | | |

**2)Laptop**

| Sr.No | Name of Dealer | Lenovo | HP | Average Cost |
|---|---|---|---|---|
| 01 | Direct IT Solution | 42,600/- | | 42,600/- |
| 02 | My Smart Price | -- | 42,668/- | **(15 % Less 36,210/-)** |

**3) Projector**

| Sr.No | Name of Dealer | Epson(EBU32) | Panasonic (PTLB382) | Sony (VPLDX240) | BenQ(MX704) | Average Cost |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Vedant Enterprises | 57,000/- | 58,000/- | -- | -- | 54,000/- **(15 % Less 45,900/-)** |
| 02 | Technosales | -- | -- | 43,000/- | 58,000/- | |

उपरोक्त तक्त्यानुसार शैक्षणिक संकुलासाठी आवश्यक असलेले संगणके, संगणकीय साहित्य व प्रोजेक्टर खरेदीकामी अंदाजे एकूण रक्कम रुपये २९,२८,४९०/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये, संस्थानचे सर्व शैक्षणिक संकुलांसाठी आवश्यक असणारे व प्रास्ताविकेत नमुद केलेले संगणकीय साहित्य खरेदी करणेकरीता संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रूपये २९,२८,४९०/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणतीस लाख अठ्ठावीस हजार चारशे नव्वद) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी :-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये, संस्थानचे सर्व शैक्षणिक संकुलांसाठी आवश्यक असणारे व प्रास्ताविकेत नमुद केलेले संगणकीय साहित्य खरेदी करणेकरीता संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रूपये २९,२८,४९०/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणतीस लाख अठ्ठावीस हजार चारशे नव्वद) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये, संस्थानचे सर्व शैक्षणिक संकुलांसाठी आवश्यक असणारे व प्रास्ताविकेत नमुद केलेले संगणकीय साहित्य खरेदी करणेकरीता संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रूपये २९,२८,४९०/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणतीस लाख अठ्ठावीस हजार चारशे नव्वद) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.४६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नामांकित कंपनीचे संगणके व संगणकीय साहित्य तसेच प्रोजेक्टर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२९,२८,४९०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्राज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.११** **श्री साईनाथ हॉस्पीटलकडील लिफ्ट क्र.१ व २ चे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियमामधील तरतूद २०१४:** (१) कलम १४ (२) घ – भक्तांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (२) कलम २१(१) (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

**प्रस्तावना:-** श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये रुग्णांचे सोयीकरीता तळमाळ्यावरील मजल्यावर ये-जा करणेकरीता मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांचेकडून २० प्रवासी क्षमतेच्या दोन हायड्रोलीक लिफ्ट बसविण्यात आलेल्या आहेत. त्या नेहमी सुस्थितीत चालू राहणेसाठी त्यांचे नियमित सर्व्हीसिंग करावे लागते. दिनांक २०/०५/२००७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ३८६ अन्वये दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागाकडील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, ए.सी. वायुवीजन यंत्रणा वगैरे वार्षिक मेन्टेनन्स अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट हे त्या-त्या कंपनीला अथवा संबंधीत मशीनरींच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला देण्यात यावे, असे ठरले.

**मागणी:-** श्री साईनाथ हॉस्पीटलमधील लिफ्ट सतत कार्यान्वित असल्यामुळे, त्यातील यंत्रणेमध्ये प्रसंगी बिघाड निर्माण होऊ शकतो. अशा वेळेस सर्व्हीसींग करुन खराब झालेले स्पेअर्स बदलून लिफ्ट लगेच चालू करुन द्यावी लागते. लिफ्ट दुरुस्तीकरीता लागणारे स्पेअर्स संस्थानकडे उपलब्ध नसतात. लिफ्ट दुरुस्तीचे

कामासाठी अडचण होऊ नये म्हणून मागील वर्षी दिनांक ०१/०५/२०१५ ते दिनांक ३०/०४/२०१६ कालावधीकरीता प्रत्येकी सर्व करांसहीत एका लिफ्टकरीता रुपये ८९,८८८/- या दरानुसार दोन लिफ्टकरीता एकूण रुपये १,७९,७७६/- नुसार उत्पादक कंपनी मे. पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देण्यात आलेले होते, यापुढील कालावधीकरीता मे. पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांनी दिनांक ०१/०६/२०१७ ते ३१/०५/२०१८ कालावधीसाठीचे त्यांचे दिनांक ०९/०५/२०१७ रोजीचे पत्रान्वये लिफ्ट क्र. १ & २ करीता खालील तपशीलानुसार वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) चे दर कळविलेले आहे :

| अ.नं. | ठिकाण | लिफ्ट संख्या | सर्व करांसहीत दर रुपये |
|---|---|---|---|
| १. | श्री साईनाथ हॉस्पीटल लिफ्ट नं. १ | १ | ८५,०००/- |
| २. | श्री साईनाथ हॉस्पीटल लिफ्ट नं २ | १ | ८५,०००/- |
| | | **एकूण दर रुपये :** | **१,७०,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ हॉस्पीटल येथील २ लिफ्टचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) करीता खर्च रुपये १,७०,०००/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च इकडील विभागाकडील वार्षिक अंदाजपत्रक २०१७-२०१८ मध्ये तरतूद केलेल्या 'मशीनरी दुरुस्ती व देखभाल खर्च' या शिर्षाखाली मंजूर रुपये ३०,००,०००/- मात्रचे रकमेतून करता येईल. याकामी येणा-या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. या वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) कॉन्ट्रक्टमध्ये खालील बाबींचा समावेश आहे :

**Part : I- Scope of the contract**

(1) Trained person employed by the company under expert guidance of its technical staff will carried out maintenance work includes regular inspection & per month service of the lift.
(2) Examining, checked and cleaning of machine, break assembly, motor, pedestal.
(3) Examining and lubricating the of all moving parts & making minor adjustments so as to keep the lifts & its installation in a safe & good working condition.
(4) Machine overhauling & alignment.
(5) Guide rail alignment & oiling, greecing, speed governor alignment.
(6) Checking & reconnection of machine room & shaft wiring.
(7) Alignment of door locks, car gate locks & limit switch.
(8) Checking of controllers, tightening of loose connections.
(9) Main rope tensioning, safety blocks alignment.
(10) Returning cam overhauling & adjustment.

**Part : II - Below mentioned parts are covered under this contract :**

(1) **Cabin – 7** sagment display card PCB switch, emergency light, any type of display acrylic, any type of led, cabin shoe, car gate lock contract, car door shoe, door bearing, any type of belt, door, any type rubber packing, any type of magnet, any type of rubber roller, any type of spring, tube light, fan etc.
(2) **Control panel** – Control panel fuses, any type of led, diode bridge card dynamic break / resistance, any type of switches, relays 24v etc.
(3) **In side & Outside of Hoist Way** – Battery for hooter, cwt. Shoe liner, all landing gate shoe, lock contact, any type of nut-bolt, screw. Rope thimble, rope spring, e-packing, fire switch and type of limit switch, read switch, pit switch, any type of magnet, any type of rubber roller, any type of read, landing display PCB, landing display led, landing seven segment display card, machine gear oil etc.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय** : रुग्णालयातील लिफ्ट अत्यावश्यक सेवा असल्याने, त्या सुस्थितीत कार्यरत असणे गरजेचे आहे. तसेच बॉम्बे लिफ्ट रुल्स १९५८ मधील अ.नं. ४० नुसार अधिकृत लायसन्स धारकाकडूनच लिफ्ट मेंन्टेनंन्स करणे बंधनकारक आहे. तरी श्री साईनाथ हॉस्पीटलकडील दोन्ही लिफ्टचे दिनांक ०१/०६/२०१७ ते ३१/०५/२०१८ या कालावधीकरीता लिफ्टची उत्पादक कंपनी पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक

यांना रिस्क प्रोटेक्टीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणेस व याकामी येणा-या रुपये १,७०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख, सत्तर हजार) मात्रचे खर्चास मान्यतेकरीता प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानमधील सर्व लिफ्टचे एकत्रित वार्षिक कॉम्प्रेहेन्सिव्ह कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देण्यात यावे. हे कॉन्ट्रॅक्ट उत्पादक कंपनीसच न देता, त्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवणेत यावी. तसेच वार्षिक कॉम्प्रेहेन्सिव्ह कॉन्ट्रॅक्टचा खर्च जास्तीत-जास्त लिफ्टच्या खरेदी किमतीच्या ५% पर्यंत असावी.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२** **आर्थिक वर्ष २०१७-२०१८ करीता करसल्लागार यांना मुदतवाढ देणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुदः१७(२)** (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत असुन, त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व इतर कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. आर्थिक व्यवहारां संबंधीत केंद्र व राज्य शासनाकडून विविध आयकर, सेवाकर, व्हॅट कर, जीएसटी, इ. विषयक कायदे पारित होतात. या कायद्यातील नव-नविन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असतो. संस्थानचे आर्थिक व्यवहार संख्येने व रक्कमेने मोठे आहेत. लागु असलेल्या करप्रणालीनुसार व वेळावेळी नव्याने पारित करण्यात आलेल्या करप्रणालीस अनुसुरन आर्थिक व्यवहार अचुकपणे होण्याच्या दृष्टीने व वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने आणि आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्याच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही होऊन अंतर्गत नियंत्रण सक्षम राहणेकामी, तज्ञ कर सल्लागारांची नेमणुक करण्यात येते यापैकी काही सल्लागार खुप वर्षांपासुन विनामोबदला समाधानकारक सेवा देत असल्याने त्यांची सेवा घेण्यास व काही कर सल्लागार वार्षिक फीवर नियुक्ती करण्यात आले होते. त्यांना दोन वर्ष कालावधीकरीता मा.व्य.स.निर्णय क्र.५६२/ दि.२८.०१.२०१५ अन्वये मुदतवाढ देण्यात आली होती. ही मुदत दि.३१.०७.२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने त्यांना पुढे दोन वर्ष कालावधी करीता मुदतवाढ देणे आवश्यक आहे. लेखापरिक्षकांप्रमाणे कर सल्लागार बदलणे व्यवहारर्य वाटत नाही. पुर्वी पासुन कर प्रणाली संदर्भात निश्चित करण्यात आलेले धोरण व त्याप्रमाणे वेळोवेळी करप्रणालीमध्ये झालेल्या बदलांस अनुसरुन प्रत्यक्ष काम केले जाते त्याचा वार्षिक अहवाल प्रकाशित केला जात नसतो त्यामुळे यापुर्वीपासुन विनामोबदला काम करणा -या करसल्लागारांना या पुढेही काम पाहण्यास व वार्षिक फीवर नियुक्त असलेल्या कर सल्लागारांस पुढे दोन वर्ष कालावधी करीता मुदतवाढ देणे व्यवहार्य वाटते.

मागील वर्षी आयकर कामकाज शिर्डी कार्यालय व मुंबई कार्यालय येथील दोन्ही कामे एकाच कर सल्लागाराने करावे असे नमुद केले होते. तथापी मे.एस.जी.अंदाणी ॲन्ड कं. सीए अहमदनगर येथील असल्याने व संस्थानचा रजिस्टर्ड ॲड्रेस मुंबई कार्यालयाचा असल्याने व इतर महत्वाची आयकर कार्यालये मुंबई येथे असल्याने वेळोवेळी कर निर्धारण, स्क्रुटिनी, रिफंड वार्षिक कर विवरण भरण, ट्रेसेस इ.कामकाज करण्याकरिता या करसल्लांगारांना वेळोवेळी मुंबई येथे जाणे कामाचा पाठपुरावा करणे सोईचे होत नाही. व जाणे-येणे करीता संस्थान वाहन इतर खर्च वाढतो यामुळे पुर्वीपासून हे काम पाहणारे श्री. राहुल केळकर ॲन्ड कं. सीए , मुंबई यांनी पाहणे सोईचे होईल. कामे वेळेत होऊन, त्यामध्ये सुसुत्रता येईल. खालीलप्रमाणे करविषयक तज्ञ कर सल्लागार काम पाहत आहेत.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | पूर्वीचे मानधन/ फी / देय फी | (ICAI) संस्थेच्या निर्देशाप्रमाणे देय फी | प्रस्तावीत फी व कामाचा अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.एस.जी.अंदाणी ॲन्ड कं. (चार्टर्ड अकौंटंटस्) अहमदनगर कर सल्लागार **कामाचे स्वरुप-** मासिक कर कपात, TDS विवरणपत्रे, TRACES, कर कपात दाखला इ. दरमहाचे करविषयक संपुर्ण कामकाज करणे) | २,००,०००/- + सेवाकर | **४,२५,०००/- +** सेवाकर प्रति वर्ष *(रु.१५०० * १प्रतिनिधी * २८५ दिवस)* | १.रु.२,००,०००+ सेवाकर प्रति वर्ष<br>२. गत ७ वर्षापासुन संस्थानचे कर विषयक कामकाज पाहत आहेत.<br>३.त्यांचे कामकाज समाधानकारक आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | श्री.राहूल केळकर असो. मुंबई(चार्टर्ड अकौंटंटस्)<br>**कामाचे स्वरुप-**वार्षिक आयकर विवरणपत्र, आयकर कर निर्धारण व छाननी इ. मुंबई येथील सर्व करविषयक कामकाज. | ७०,०००/- + सेवाकर | **१,१७,०००/- + सेवाकर & Above**<br>*(रु.३००० *१ सनदी लेखापाल * ३९ दिवस)* | १.रु.७०,०००/- + सेवाकर प्रति वर्ष<br>२. गत ५ वर्ष संस्थानचे आयकराचे कामकाज पाहत आहे.<br>३. त्यांचे कामकाज समाधानकारक आहे. |
| ३. | मे.श्रेणिक गांधी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौंटंट, पुणे<br>**कामाचे स्वरुप-**सेवाकर सल्लागार | विनामोबदला | | १. मानधन स्विकारत नाही<br>२. गत २ वर्ष संस्थानचे सेवाकराचे कामकाज पाहत आहे.<br>३.त्यांचे कामकाज अत्यंत समाधानकारकआहे. |
| ४. | १. श्री.ए.एल.कुलकर्णी, कोपरगांव<br>२. शशिकांत कुलकर्णी , नाशिक<br>**कामाचे स्वरुप-** विक्रीकर, व्हॅट, लक्झरीअस टॅक्स, नव्याने लागु होणारा जी.एस.टी. इ | विनामोबदला | - | १. मानधन स्विकारत नाही<br>२. गत २ वर्ष संस्थानचे व्हॅट, विक्रीकर, लक्झरीअस टॅक्स<br>३. त्यांचे कामकाज अत्यंत समाधानकारक आहे. |

तरी उपरोक्त प्रमाणे विनामोबदला करसल्लागार म्हणुन पुर्वीपासुन काम पाहणारे कर सल्लागारांची पुढे सेवा कायम घेण्यास व आयकर विषयक शिर्डी येथील काम पाहणेकरीता मे.एस.जी.अंदाणी ॲन्ड कं. सीए अहमदनगर व मुंबई येथील कामकाज पाहणेकरीता श्री. राहुल केळकर ॲन्ड कं. सीए , मुंबई यांना पुर्वीच्याच अटी शर्तीवर पुढे दोन वर्ष मुदतवाढ आदेश देण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे कामकाजासाठी व आपत्ती व्यवस्थापन करण्यासाठी राज्य शासन सेवेतील प्रतिनियुक्तीद्वारे येणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी टेबल, खुर्च्या व कपाटे खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम १(ख) रूढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, व पूजा समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम १(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णयः-**

**१)** मा. व्यवस्थान समितीचे दि.२७/१२/२०१५ रोजीचे सभेतील निणर्य क्र.६५५ अनवये "..*श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त शिर्डीत होणा-या गर्दीचे अनुषंगाने कामकाजाचा समन्वय राखणे तसेच उपलब्ध केलेल्या सोयी सुविधांचे योग्य नियोजन व आपत्ती व्यस्थापन करणेसाठी जिल्हाधिकारी स्तरावर ०२ वर्ष कालावधीसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे शताब्दी कक्षाची स्थापना व त्यासाठी रू.१० कोटी मात्र इतक्या निधीची तरतूद करणेकामी मा. प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा..*" असे ठरले.

**२)** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२५६ अन्वये "*श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त दि.०१ एप्रिल, २०१७ ते दि.३१ मार्च, २०१९ या कालावधीकरीता प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे राज्य शासनाचे अधिकारी प्रतिनियुक्तीने संस्थानवर घेण्यास मान्यता देण्यात आली असून*" याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे ठरेलेले आहे.

३) श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कृती आराखडा समिती बैठकीतील निर्णय मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या श्री साईबाबा समाधी शताब्दी कृती आराखडा समितीची द्वितीय बैठक दि.३१/०३/२०१७ रोजी विधानभवन, मुंबई येथे पार पडली. सदरहू बैठकीचे इतिवृत्तातील अ.क्र.०१ अन्वये "*शताब्दी कलावधीकरीता संस्थानमार्फत करावयाच्या विकास कामांसाठी श्री साईबाबा संस्थानने सादर केलेल्या प्रस्तावानुसार स्वंतत्र कक्ष तयार करण्यात यावा. सदर*

*कक्षामध्ये अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागयांचा समावेश असावा. संस्थानमार्फत मोठया प्रमाणावर बांधकामे हाती घेण्यात येत असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाची एक स्वतंत्र तुकडी त्याकरीता उपलब्ध करून देण्यात यावी* " असे मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निर्देश आहेत.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांचे समाधीस सन-२०१८ मध्ये शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी अखेर) "श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष" साजरे करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीत शिर्डी येथे भेट देणा-या सर्व भाविकांचे दर्शन सुखकर व्हावे तसेच आपत्कालीन व्यवस्थापनासह कायदा व सुव्यवस्था राखण, गर्दीचे अनुषंगाने कामकाजाचा समन्वय ठेवणे तसेच उपलब्ध केलेल्या सोयी सुविधांचे योग्य नियोजन करणेसाठी शिर्डी येथे शताब्दी कक्षाकरीता उपजिल्हाधिकारी दर्जाचे-०२, पोलीस उपअधिक्षक दर्जाचे-०१, कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग-०१, उपअभियंता, सा.बां. विभाग-०१, जिल्हा वैद्यकीय अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक-०१ असे एकूण ०६ अधिकारी शासनामार्फत प्रतिनियुक्तीवर मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेली आहे. तसेच या नव्याने प्रस्तावित पदांचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे इकडील विभागाचे जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम-शताब्दी/३०/२०१७ दि.०३/०४/२०१७ रोजी सादर करण्यात आलेला आहे.

याबाबत दि.३१/०३/२०१७ रोजी विधानभवन,मुंबई येथे मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या कृती आराखडा समितीचे बैठकीत वर नमूद केलेप्रमाणे निर्णय झालेला आहे. सदर प्रस्तावानुसार शताब्दी कलावधीत कामकाजासाठी शासनाकडून प्रतिनियुक्तीवर उपलब्ध होणा-या अधिका-यांसाठी कार्यालयीन बैठक व्यवस्था करणेसाठी टेबल, खुर्च्या व कपाटे याप्रमाणे फर्निचर खरेदी करणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव-** शताब्दी महोत्सवाचे कामकाजासाठी व आपत्ती व्यवस्थापन करण्यासाठी शासनकडून प्रतिनियुक्तीद्वारे येणा-या अधिका-यांसाठी कार्यालयीन बैठक व्यवस्थेकरीता खालील तपशिलाप्रमाणे खुर्ची, टेबल व कपाटे आवश्यक आहे. सदरहू साहित्य खरेदी करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No. | Description | Qty. | Unit | Rate | Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 01. | Revolving Chair (high back) | 06 | NOS | 20,000/- | 1,20,000/- |
| 02. | Executive Table size 5.5'x3' | 06 | NOS | 35,000/- | 2,10,000/- |
| 03. | Steel Cupboard | 06 | NOS | 23,000/- | 1,38,000/- |
| 04. | Waiting Chair | 18 | NOS | 3,000/- | 54,000/- |
| **Total Amount Rs. :-** | | | | | **5,22,000/-** |

तरी वरीलप्रमाणे फर्निचर खरेदीसाठी येणा-या रू.५,२२,०००/- इतक्या अंदाजे खर्चास व सदरहू फर्निचर खरेदीसाठी नाशिक व अहमदनगर येथील वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे ई-निविदा मागवून खरेदीबाबत पुढील कार्यवाही संस्थानचे खरेदी विभागामार्फत करणेसाठी मान्यता मिळणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, राज्य शासन सेवेतील प्रतिनियुक्तीद्वारे येणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे टेबल, खुर्च्या व कपाटे खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू ई-निविदा प्रक्रिया राबवून दर निश्चित करावेत व राज्य शासन सेवेतील अधिकारी संस्थान सेवेत हजर झाल्यानंतर संबंधीत पुरवठाधारकास पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४** **लेखाशाखा विभागातील पाच कॅबीनला कारपेट बसविणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्त व्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थानचे लेखाशाखा विभागाने दि.११/०४/२०१७ रोजीचे पत्राने लेखाशाखा विभागात असणा-या लेखाधिकारी, वरिष्ठ लेखापाल अशा एकूण ५ केबीनला पूर्वी कारपेट बसविणेत आलेले आहे. परंतू सदर कारपेट हे साधारणतः १५ वर्षापूर्वी बसविलेले आहे. नित्याच्या वापराने पूर्वी बसविलेले कारपेट जुने व जिर्ण झालेले असून ते जागोजागी फाटलेले असल्याने व्यवस्थीत दिसत नाही. मुख्यलेखाधिकारी यांनी जा.नं.०७/२०१७ दि.११/०४/२०१७ रोजीचे पत्रान्वये लेखाशाखा विभागातील पाचही केबीनला नविन कारपेट बसवून मिळणेबाबत विनंती केली आहे. त्यानुसार विभागामार्फत समक्ष पाहणी करुन मापे घेण्यात आली आहे.

**प्रस्ताव:-** उपरोक्त विषयांकीत कामी खालील तपशिलाप्रमाणे मटेरियलची आवश्यकता आहे.

| Sr.No. | Description | Qty/ Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | Providing, Supplying & fixing 2 mm thk. PVC matting ( Carpet) inclusive of all material, transport, labour & taxes etc. complete. (Make- Wonder Floor)<br>i) Cabin No.01 - ( 4.30x3.30-2.10x1.30) = 11.46m$^2$<br>ii)Cabin No.02- (5.10x3.40)=17.34m$^2$<br>iii)Cabin No.03- (4.10x3.55) = 14.55m$^2$<br>iv)Cabin No.04 –(4.15 x 3.60) = 14.94m$^2$<br>v)Cabin No.05- (4.15 x 3.60) = 14.94m$^2$<br>------------<br>**73.23m$^2$**<br>Say – 787.95 ft$^2$ | 787.95 ft$^2$ | 80/- | 63,036.00 |
| | **R/o Total Amount.** | | | **63,036.00** |

वर नमूद केलेप्रमाणे लेखाशाखा विभागातील पाच केबीनमध्ये कारपेट ( पी व्ही सी मॅटीन) बसविणेकामी रक्कम रु.६३,०३६/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी याकामी येणारे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लेखाशाखा विभागातील पाच कॅबीन बरोबरच देणगी काऊंटरलाही कारपेट बसविणेत यावे. यासाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१५** **फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकडील कायम कर्मचाऱ्यांसाठी गणवेशावर वापरावयाचे साहित्य खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकडे २२ कायम कर्मचारी कार्यरत आहे.सदर कर्मचारी यांना संस्थानमार्फत प्रत्येकी ०२ गणवेश देण्यात आलेले आहेत. परंतु सदर गणवेशावर इतर आवश्यक बाबी जसे ( बुट ,लेदर ब्लेट बॅचसह , ब्ल्यु लेस व्हीसल सह, बॅरेट कॅप ब्लॅक बॅचसह, नेमप्लेट) इ.देणेत आलेले नाहीत त्यामुळे फायर विभागाचे प्रत्येक कर्मचा-यास सदर साहीत्य आवश्यकतेनुसार संस्थानमार्फत खरेदी करुन देणे आवश्यक आहे. सदरचे साहित्य पुणे, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, अहमदनगर येथील पुरवठाधारकांकडुन खरेदी करणे आवश्यक आहे.त्यानुसार २२ कायम कर्मचा-यांसाठी प्रत्येकी ०२ नगाप्रमाणे खालीलप्रमाणे साहित्य अपेक्षित आहे. मा.व्य.समितीचे आदेशाप्रमाणे सदर साहीत्यांची बाजारातील अंदाजे किंमत M.E.MAKATEE & CO ARMED FORCES EQUIPMENT, PUNE यांचेकडुन घेण्यात आलेली असुन सदर दराची प्रत सोबत अवलोकनार्थ जोडलेली आहे.

**फायर विभागातील कर्मचा-यांसाठी खालिल प्रमाणे साहीत्य खरेदी करणे आवश्यक आहे.**

| अ.नं. | साहित्याचे / वस्तुचे नाव | नग | अंदाजे प्रति नग दर | अंदाजे एकुण किमंत |
|---|---|---|---|---|
| ०१ | लेदर ब्लॅक बुट लेससह | २२ जोडी | प्रति जोडी ८००/- | १७६००/- |
| ०२ | ब्लॅक बेल्ट नायलॉन (बक्कल व लोगोसह ) | २२ नग | प्रति नग ३००/- | ६६००/- |
| ०३ | ब्ल्यु व्हिसल सिगल लाईन व्हिसलसह | २२ नग | प्रति नग १००/- | २२००/- |
| ०४ | फटीक कॅप / (निळा / लाल कलर ) | २२ नग | प्रति नग ११०/- | २४२०/- |
| ०५ | नेमप्लेट (मराठी व इंग्रजी ) | २२ नग | प्रति नग १००/- | २२००/- |
| ०६ | शोल्डर स्टील नाव (अग्निशमन विभाग ) | ४४ नग | प्रति नग ४०/- | १७६०/- |
| | | | **अदांजे एकुण किमंत** | **३२,७८०/-** |

**विभागाचा अभिप्राय-** उपरोक्त प्रमाणे फायर अ‍ॅण्ड सेफ्टी विभागाचे २२ कायम कर्मचारी यांचेकरीता साहित्य खरेदी करणेकामी बाजारातुन M.E.MAKATEE & CO ARMED FORCES EQUIPMENT PUNE यांचेकडुन मागविणेत आलेल्या दरानुसार अंदाजे रु३२,७८०/-(अक्षरी रु.बत्तीस हजार सातशे अंशी मात्र) खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे फायर अ‍ॅण्ड सेफ्टी विभागाचे २२ कायम कर्मचारी यांचेकरीता उपरोक्त प्रमाणे साहित्य खरेदी करणेकामी अंदाजे ३२,७८०/- (अक्षरी रु.बत्तीस हजार सातशे अंशी मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदर साहित्य खरेदीकामी पुणे, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, अहमदनगर येथील पुरवठाधारकांकडुन बंद पाकिटात कोटेशन बोलावुन सदर साहित्य खरेदी करुन मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडून न्युनतम दरधारकाकडूल सदरचे साहीत्य खरेदी करता येईल. तसेच अग्निशमन विभागाचा वाढता विस्तार असल्यामुळे विभागाकडे अन्य विभागातील प्रशिक्षीत कायम कर्मचारी वर्ग झालेस त्यांनाही याच मंजुर दराने साहित्य खरेदी करता येईल असे .

**करीता...**

अ. फायर अ‍ॅण्ड सेफ्टी विभागाचे २२ कायम कर्मचारी यांचेकरीता संस्थानने दिलेल्या गणवेशावर नियमित परिधान करणेकामी उपरोक्त अ.नं.०१ ते०६ साहित्य खरेदी कामी येणा-या अंदाजे रु.३२,७८०/- (अक्षरी रु.बत्तीस हजार सातशे अंशी मात्र) खर्चास मान्यता असावी.

ब. उपरोक्त साहित्य खरेदीकामी पुणे, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, अहमदनगर येथील पुरवठाधारकांकडुन बंद पाकिटात कोटेशन बोलाविणेस व सदर कोटेशन मा.खरेदी समितीसमोर उघडुन न्युनतम दर धारकास पुरवठा आदेश देणेस मान्यता असावी.

क. फायर अ‍ॅण्ड सेफ्टी विभागाकडे आवश्यकतेनुसार शताब्दी महोत्सव गर्दिचे कालावधीत कायम कर्मचारी यांचे संख्येत वाढ झालेस त्यांचेकरीता याच मंजुर दराप्रमाणे साहित्य खरेदी करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त **अ** , **ब** आणि **क** बाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, फायर अ‍ॅण्ड सेफ्टी विभागाकडील कायम कर्मचाऱ्यांसाठी प्रस्तावात नमुद केलेले गणवेशावर वापरावयाचे साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रु.३२,८७०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- फायर अ‍ॅण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६** **द्वारावती इमारत समोरील बागेत नवीन शोभेच्या रोपांची लागवड करणे, चिल्ड्रेनपार्कमध्ये वाळू टाकणे व लॉनवर पोयटा टाकुण लेव्हल करणेकामी गार्डन मेन्टनन्सकडून निविदा मागविणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004मधील तरतूद व्यवस्थापन समितीचा-17 (2) (झ) मधील सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन,देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करणे अशी तरतुद आहे.

ठराव क्रमांक - नविन ठराव

प्रस्ताविक- बगीचा विभागामार्फत सन 2001 मध्ये धर्मशाळा परिसरात द्वारावती इमारत समोरील रिकाम्या जागेत झाडे, लॉन लावुन बाग तयार करण्यात आलेली होती. सदर बागेत वेगवेगळ्या प्रकारची शोभेची रोपे/ झाडे, लॉन, चिल्ड्रन पार्क, पाथ-वे, कारंजा तयार करणेत आलेला आहे. त्यामुळे या बागेत दररोज सकाळ-संध्याकाळ श्री साईनाथ रुग्णालयात येणाऱ्या रुग्णाचे नातेवाईक, संस्थान कर्मचारी, द्वारावती निवासस्थान निवासासाठी थांबलेले साईभक्त, शिर्डी शहरातील नागरीक यांची नेहमी वर्दळ असते.

द्वारावती इमारत समोरील बाग बऱ्याच वर्षापुर्वीची झालेली असल्याने सदर बागेतील रोपांची पुर्णत: वाढ होऊन गेल्यामुळे सदरची रोपे खराब दिसत आहे. तसेच सदर बागेत दक्षिण बाजुकडील वॉल कंपाऊंड जवळ काळी माती टाकुण जागा लेव्हल करावयाची आहे.

दि.12/05/2017 रोजी मा.विश्वस्त श्री सचिन तांबे यांनी द्वारावती इमारत समोरील बागेची पाहणी केली असता त्यांनी सदर बागेतील रोपे बदलणेकामी सुचविलेले आहे. सदर बाग ही शिर्डीच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने साईभक्त, शिर्डी शहरातील नागरीक व रुग्णांचे नातेवाईक यांची सतत वर्दळ असल्याने सदरची बाग ही सुदर व आकर्षक ठेवणेसाठी सदर बागेतील लॉनमधील खड्डे बुजवुन लेव्हल करणे व चिल्ड्रेन पार्क मध्ये वाळु टाकणे तसेच खराब झालेली रोपे बदलुन नविन शोभेची रोपांची लागवड करणे आवश्यक आहे.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी, शासन, निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- आर्थीक विषय आहे.

मागणी- द्वारावती इमारत समोरील बागेतील दक्षिण बाजुकडील खड्डा काळी माती टाकुण बुजवुन घेता येईल. तसेच सदर बागेतील पुर्णत: वाढ होऊन खराब झालेली रोपे काढुन नविन रोपे लागवड करणेसाठी तसेच बागेतील लॉनमध्ये पोयटा टाकुण, लेव्हल करुन खड्डे बुजविता येईल. यासाठी साधारणत: 15 ब्रास पोयट्याची आवश्यकता असुन बागेत नविन शोभेची रोपे लावणेकामी रोपे खरेदी करणेचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | रोपाचे नाव | रोपाची ऊंची | एकुण नग | अंदाजे दर (प्रति नग) | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 01 | बकुळ | 8 ते 10 फुट | 10 | 350 | 3500 |
| 02 | ऑरेंज टिकोमा | 1.5 ते 2 फुट | 75 | 20 | 1500 |
| 03 | गोल्डन डुरंटा | 1 ते 1.5 फुट | 300 | 05 | 1500 |
| 04 | आरेका पाम | 3 ते 4 फुट | 70 | 125 | 8750 |
| 05 | ट्रॅव्हलर पाम | 4 ते 5 फुट | 35 | 300 | 10500 |
| 06 | कन्हेर पिंक | 2 ते 3 फुट | 200 | 20 | 4000 |
| 07 | कन्हेर पांढरा | 2 ते 3 फुट | 200 | 20 | 4000 |
| 08 | कन्हेर लाल | 2 ते 3 फुट | 200 | 20 | 4000 |
| 09 | शंकासुर | 2 ते 3 फुट | 110 | 45 | 4950 |
| 10 | जास्वंत लाल साधी | 1 ते 1.5 फुट | 110 | 20 | 2200 |
| 11 | तगर | 2 ते 2.5 फुट | 110 | 60 | 6600 |
| 12 | पावडर पक | 1.5 ते 2 फुट | 110 | 45 | 4950 |
| 13 | गौरी चौरी | 1.5 ते 2 फुट | 150 | 25 | 3750 |
| 14 | रातराणी | 1.5 ते 2 फुट | 60 | 20 | 1200 |
| 15 | मधुकामिनी | 1.5 ते 2 फुट | 100 | 30 | 3000 |
| 16 | कॅशिया गुल्का | 1.5 ते 2 फुट | 70 | 45 | 3150 |
| 17 | लेंटीना पिवळा | 1 ते 1.5 फुट | 60 | 10 | 600 |
| 18 | स्नोबुश | 1.5 ते 2 फुट | 60 | 20 | 1200 |
| 19 | फायकस व्हेरीगेटेड | 1.5 ते 2 फुट | 60 | 35 | 2100 |
| 20 | प्लंबेगो | 1 ते 1.5 फुट | 60 | 20 | 1200 |
| 21 | चाफा लाल | 6 ते 8 फुट | 10 | 1500 | 15000 |
| 22 | ग्लॅफिनिमा | 1.5 ते 2 फुट | 60 | 30 | 1800 |
| | | | | **अ** | **89,450** |
| 23 | पोयटा | - | 15 ब्रास | 1800 प्रती ब्रास | 27,000 |
| 24 | वाळु | - | 35 ब्रास | 2500 प्रती ब्रास | 87500 |
| 25 | वाहतुक व मजुरी | - | - | - | 40000 |
| | | | | **ब** | **1,54,500** |
| | **एकुण अ + ब** | | | | **2,43,950** |

द्वारावती इमारत समोरील बागेत नविन शोभेची रोपे लावणेकामी नविन रोपे खरेदी करणे, तसेच पोयटा खरेदी करणे व चिल्ड्रेन पार्क मध्ये वाळु टाकणेकामी रु.2,43,950/- मात्र (दोन लाख त्र्येचाळीस हजार नऊशे पन्नास) मात्र खर्च अपेक्षीत आहे. याकामी परिसरातील विविध गार्डन मेंन्टन्स करणारे ठेकेदार यांचेकडुन निवीदा मागवुन न्युनत्तम दराने शोभेची रोपे, पोयटा व वाळु खरेदी करुन काम करुन घेता येईल.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत- द्वारावती इमारती समोरील बागेत नविन शोभेची रोपे लावणे, लॉनवर पोयटा व शेणखत टाकुन लेव्हल करणे तसेच चिल्ड्रेन पार्क मध्ये जाड वाळसरा (साधी वाळु) टाकणेकामी परिसरातील विविध गार्डन मेंन्टनन्स करणारे ठेकेदार यांचेकडुन निवीदा मागविणेस प्राप्त झालेल्या निवीदा मा.खरेदी समिती सभेपुढे उघडुन न्युनत्तम दर धारकास मा.उपसमिती सभेपुढे समक्ष बोलावुन त्यास पुरवठा आदेश देऊन त्यांचेकडुन वाळु पोयटा व शोभेची रोपे खरेदी करणेस, याकामी येणाऱ्या एकुण रु.2,43,950/- मात्र (दोन लाख त्र्येचाळीस हजार नऊशे पन्नास) मात्र खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,४३,९५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७** **माहे एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ अखेर दर्शनरांगेत साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले विनियम मधील १७ (१) मध्ये भक्तंगणाना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करून दयाव्यात अशी तरतुद केलेले आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१३ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.५३७ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत लाडु प्रसाद वाटप करणेबाबत निर्णय झालेला आहे.

**प्रस्ताविक:-** उपरोक्त सभेतील निर्णयानुसार दि.१५ ऑगस्ट २०१३ पासुन दर्शनरांगेतील साईभक्तांना प्रत्येकी १०० ग्रॅमचे एक पाकीट या प्रमाणे प्रसाद लाडु पाकीटांचे वाटप करण्यात येत आहे.मा.मुख्य लेखाधिकारी सो.यांनी संदर्भीय क्रं.१ चे पत्रान्वये मोफत लाडु वाटपाचे स्वतंत्र रजिस्टर ठेवावे. प्रत्येक दिवशी उत्पदित केलेली प्रसाद लाडु पाकीटे वाटप केलली पाकीटे व शिल्लक राहिलेली पाकीटे यांचे विविरण दररोज स्वतंत्र ठेवावे. प्रत्येक महिन्यात वाटप केलेले लाडु प्रसाद पाकीटे व त्यासाठी झालेला खर्चाची रक्कम जमा नावे करणेसाठी प्रत्येक महिन्यात तक्ता तयार करुन लेखाशखेकडे पाठविण्यात यावा. प्रत्येक महिन्यात प्रसादरुपी वाटप झालेली प्रसाद लाडु पाकिटे व त्यासाठी एकुण निर्धारीत किंमत याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये नोंद घेणेसाठी विषय ठेवण्यात यावा.प्रत्येक महिन्याचे मोफत लाडु प्रसाद पाकीटांचे रेकॉर्ड अंतर्गत लेखापरीक्षक मार्फत तपासून घेण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत.

मा.मुख्य लेखाधिकारी यांचे उपरोक्त निर्देशाप्रमाणे कॅन्टीन विभागामार्फत प्रत्येक महिन्यात प्रसाद बुंदी पाकिटांचे वाटप, शिल्लक पाकीटे ,मसिक खर्च जमा-नावे करणे इ. कार्यवाही करण्यात येत आहे.

१) मा.व्यवस्थापन सिमतीचे दि.२६/०६/२०१४ रोजीचे सभेतील विषय नं.०८ निर्णय क्र.५६४ अन्वये, दर्शन रांगेतील भक्तांना वाटप केलेला प्रसाद लाडु खर्चाची मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी सो.यांची मान्यतेसाठी सादर करणेत यावा व आर्थिक वर्षाचे शेवटी एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर नोंद घेणेकामी सादर करणेत यावा असा निर्णय झालेला आहे.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/८/२०१६ रोजीचे सभेतील विषय नं.२८ निर्णय क्र.६०९ अन्वये, दर्शन रांगेत दि. ३/९/२०१६पासुन भक्तांना ५०ग्रॅम वजनाचे एक बुंदी प्रसाद पाकिट वाटप करण्यात यावे असा निर्णय झालेला आहे.

लाडु प्रसाद निर्मीती विभागामार्फत प्रसाद बुंदी वाटपासाठी झालेल्या खर्चाचा मासिक अहवाल मा.का/अ. यांचे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे. संदर्भीय क्रं.०२ चे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णया नुसार माहे/एप्रिल २०१६ ते मार्च-२०१७ या आर्थिक वर्षामध्ये मोफत प्रसाद बुंदी वाटपासाठी झालेला खर्च खालील प्रमाणे-

| अ.नं | महिना | बुंदी प्रसाद पाकिटे संख्या | झालेला खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | एप्रिल-२०१६ | १२१७७०० | १,६३,७८,०६५.०० |
| ०२ | मे-२०१६ | १६९३०५० | २,२५,६८,३५६.५० |
| ०३ | जुन-२०१६ | १६५१२०० | २,६५,६७,८०८.०० |
| ०४ | जुलै-२०१६ | १४१५७०० | २,१२,०७,१८६.०० |
| ०५ | ऑगस्ट-२०१६ | १२९६४५० | २,०५,४८,७३२.५० |
| ०६ | सप्टेंबर-२०१६ | ११६९७०० | १,०७,३०,७६३.०० |
| ०७ | ऑक्टोबर-२०१६ | १२३३६०० | १,०५,२२,६०८.०० |
| ०८ | नोव्हेंबर-२०१६ | १५७१२०० | १,३०,०९,५३६.०० |
| ०९ | डिसेंबर-२०१६ | १७४३८०० | १,५६,७६,७६२.०० |
| १० | जानेवारी-२०१७ | १८२४४०० | १,७३,१३,५५६.०० |
| ११ | फेब्रुवारी-२०१७ | १२४९८०० | १,१३,३५,६८६.०० |
| १२ | मार्च-२०१७ | १३०१४०० | १,२६,३६,५९४.०० |
| | **एकुण** | **१७३६८०००** | **१९,८४,९५,६५३.००** |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी अनुसार–** आर्थिक बाब

**विभागाचा अभिप्राय स्पष्ट मत-** माहे/ एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७ आथिक वर्षात १७३६८००० इतके प्रसाद बुंदी पाकीटाचे दर्शन रांगेत वाटप केलेले असुन सदरचे आर्थिक वर्षात याकामी एकूण किंमत रू. १९,८४,९५,६५३/- (अक्षरी रू – एकोणावीस कोटी, चौ-याऐंशी लाख, पंच्याण्णव हजार, सहाशे त्र्येपन्न रूपये मात्र) इतका खर्च झालेला आहे. तरी उपरोक्तप्रमाणे दर्शन रांगेत साईभक्तांना वाटप करणेत आलेले मोफत बुंदी पाकिटे व त्याची निर्धारीत किंमत बाबतची माहीती मा.व्यवस्थापन समितीचे सभेत नोंद घेणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.४७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ अखेर दर्शनरांगेमधील साईभक्तांना मोफत प्रसादरुपाने वाटप केलेल्या बुंदी प्रसाद पाकिटांची व त्याकामी झालेल्या खर्चाचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच लाडू व बुंदी प्रसाद पाकिटांची पॅकींगसाठी आकर्षक/ टिकाऊ कागदाचा वापर करणेत यावा व पॅकींगचा दर्जा सुधारणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**विषय नं.१८** **श्री साई प्रसादालयातील रिकाम्या तेला-तुपाच्या व काजूच्या डब्यांचा माहे एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ अखेर अहवाल.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियम २००४ कलम १७ (४) नुसार निरुपयोगी वस्तुंची विल्हेवाट लावणे.

**मा.व्यवस्थापन समीती सभा ठराव :-** मा.व्य.समीती सभा दिनांक १७/०७/२०१४ मधील निर्णय क्र.५९२

**प्रस्ताविक :-**मा. व्य.त्रिसदस्य समीती सभा दि.१७/०७/२०१४ निर्णय क्र. ५९२ नुसार असे ठरले आहे की, तेला- तुपाचे एकुण डबे, रिकामे डबे कुठे वापरण्यात आले याच्या नोंदी ठेवणेत येऊन, त्याचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमोर व वार्षिक अहवाल मा.त्रिसदस्य समीतीसमोर सादर करणेत यावा.

श्री साई प्रसादालयात सकाळी १०.०० ते रात्री १०.०० या वेळेत साईभक्तांना प्रसादभोजन पुरविले जाते. या सर्व भक्तांना जेवाणामध्ये चपाती, पुरी, भाजी, बर्फी, इ. पदार्थ दिले जात असून साईभक्तांना प्रसाद बनविण्यासाठी खाद्यतेल, गावरान तुप, वनस्पती तुप व काजू वापरले जात असून सदर डब्यांचा मध्यवर्ती भांडारकडून पत्र्याच्या डब्यात पुरवठा होत असतो. सदरील रिकाम्या डब्यांची विक्री ही अभिलेख कक्षामार्फत केली जाते. प्रसादालयात साधारणत: महिन्याकाठी १५-२० डबे गिरण्यांना जाते टाकल्यानंतर पॅकींग म्हणून व प्रसादालयातील साफसफाईकामी वापरले जातात व ते प्रसादालय खाती खर्ची टाकण्यात येतात.

**मागणी :-**मा. व्यवस्थापन समीती सभेतील निर्णयानुसार तेला- तुपाचे एकुण डबे रिकामे झालेले डबे व रिकामे डबे कुठे वापरणेत आले याच्या नोंदी ठेवणेत येऊन त्याचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमोर व वार्षिक अहवाल मा.त्रिसदस्य समीतीसमोर सादर करण्यात यावा असे ठरले होते. त्यानुसार माहे एप्रिल- २०१६ ते मार्च- २०१७ अखेर डब्यांचा कार्यवाहीचा अहवाल आपले माहितीस्तव पुढीलप्रमाणे सादर.

अ) **मागील शिल्लक व आवक होऊन रिकामे झालेले डबे- माहे एप्रिल-२०१६ ते माहे मार्च-२०१७ अखेर.**

| महिना | गावरान तुप डबे | खाद्यतेल डबे | वनस्पती तुप डबे | काजु डबे |
|---|---|---|---|---|
| **मागील शिल्लक डबे** | **०३** | **८०२** | **१७८७** | **२३** |
| माहे एप्रिल-२०१६ | ०० | २१४३ | ३५० | ०३ |
| माहे मे-२०१६ | ०२ | २०९४ | २०० | ०० |
| माहे जून-२०१६ | ०० | २१२१ | १५० | ०१ |
| माहे जुलै-२०१६ | ०० | १२०० | ४३४ | ०१ |
| माहे ऑगस्ट -२०१६ | ०१ | २४७८ | २८० | ०५ |
| माहे सप्टें-२०१६ | ०० | २२६९ | २५१ | ०१ |
| माहे ऑक्टो-२०१६ | ०६ | २५२ | ४०० | ०२ |
| माहे नोव्हें-२०१६ | ०० | ७०० | ३०० | ०१ |
| माहे डिसें-२०१६ | १२ | ९०० | ३०० | ०८ |
| माहे जाने-२०१७ | ०४ | ११४८ | २५८ | ०१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| माहे फेब्रु-२०१७ | ०२ | ९०० | २०० | ०२ |
| माहे मार्च-२०१७ | ०९ | १३९५ | ३५० | ११ |
| **रिकामे झालेले एकुण डबे-** | **३९** | **१८४०२** | **५२६०** | **५९** |

**ब) अभिलेख कक्षामार्फत विक्री करण्यात आलेले रिकामे डबे-**

| महिना | गावरान तुप डबे | खाद्यतेल डबे | वनस्पती तुप डबे | काजु डबे |
|---|---|---|---|---|
| माहे एप्रिल-२०१६ | ०० | ०० | ०० | ०० |
| माहे मे-२०१६ | ०० | ३८७४ | ९६० | ०० |
| माहे जुन-२०१६ | ०० | ११७५ | ०० | ०० |
| माहे जुलै-२०१६ | ०० | १६०२ | ०० | ०० |
| माहे ऑगस्ट -२०१६ | ०० | १६३२ | ०० | ०० |
| माहे सप्टें-२०१६ | ०० | २८०० | १०४० | ०० |
| माहे ऑक्टो-२०१६ | ०० | १२१० | ८१५ | ०० |
| माहे नोव्हें-२०१६ | ०० | ६६४ | ३३२ | ०० |
| माहे डिसें-२०१६ | ०० | ८६५ | १२५ | ०० |
| माहे जाने-२०१७ | ०० | ८७६ | ०० | ०० |
| माहे फेब्रु-२०१७ | ०० | ९० | १३८० | ०० |
| माहे मार्च-२०१७ | ०० | ३४९५ | २१५ | ०० |
| **एकुण विक्री केलेले डबे-** | **००** | **१८२८३** | **४८६७** | **००** |

**क) श्री साईप्रसादालय विभागामध्ये गिरणी पॅकींग, साफसफाईकामी व मंदिर व इतर विभागात वापरलेले रिकामे डबे-**

| महिना | विभाग | गावरान तुप डबे | खाद्यतेल डबे | वनस्पती तुप डबे | काजु डबे |
|---|---|---|---|---|---|
| माहे एप्रिल-२०१६ | १.) प्रसादालयखर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | ०८<br>०१ | ०७<br>०० | ००<br>०० |
| माहे मे-२०१६ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | ०४<br>०१ | ११<br>०० | ००<br>०० |
| माहे जून-२०१६ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग-<br>३) आरोग्य विभाग- | ००<br>००<br>०० | ०५<br>००<br>०० | ११<br>००<br>१०० | ००<br>००<br>०० |
| माहे जुलै-२०१६ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग-<br>३) लाडू विभाग- | ००<br>००<br>०५ | ०८<br>०१<br>०० | १०<br>००<br>०० | ००<br>००<br>२७ |
| माहे ऑगस्ट-२०१६ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | ०८<br>०१ | १०<br>०० | ००<br>०० |
| माहे सप्टें-२०१६ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | ००<br>०१ | ००<br>०० | ००<br>०० |
| माहे ऑक्टो-२०१६ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग-<br>३) आरोग्य विभाग- | ००<br>००<br>०० | ०८<br>००<br>०० | ०८<br>००<br>०० | ००<br>००<br>०० |
| माहे नोव्हें-२०१६ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) मंदिर विभाग- | ००<br>०० | ०८<br>०१ | १०<br>०० | ००<br>०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ३) लाडू विभाग- | ०० | ०० | ०० | ०० |
| माहे डिसें-२०१६ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) पाणीपुरवठा विभाग-<br>३) मंदिर विभाग- | ००<br>००<br>०० | १०<br>००<br>०१ | ०५<br>४०<br>०० | ००<br>००<br>०० |
| माहे जाने-२०१७ | १.) प्रसादालय खर्च-<br>२.) साईनाथ हॉस्पीटल-<br>३) मंदिर विभाग- | ००<br>००<br>०० | ०८<br>००<br>०१ | १०<br>०५<br>०० | ००<br>००<br>०० |
| माहे फेब्रु-२०१७ | १) प्रसादालय खर्च-<br>२) लाडू विभाग-<br>३) मंदिर विभाग-<br>४) अपंग वधु-वर परिचय मेळावा- | ००<br>२४<br>००<br>०० | ०५<br>००<br>०१<br>०६ | ०५<br>००<br>००<br>०३ | ००<br>२०<br>००<br>०० |
| माहे मार्च-२०१७ | १) प्रसादालय खर्च- | ०० | ०८ | ०२ | ०० |
| **एकुण वापरलेले/जमा केलेले रिकामे डबे-** | **एकुण-** | **२९** | **९५** | **२३७** | **४७** |

**ड) एकुण खर्च डबे-**

| महिना | गावरान तुप डबे | खाद्यतेल डबे | वनस्पती तुप डबे | काजु डबे |
|---|---|---|---|---|
| **'ब' नुसार खर्च डबे** | ०० | १८२८३ | ४८६७ | ०० |
| **'क' नुसार खर्च डबे** | २९ | ९५ | २३७ | ४७ |
| **एकुण खर्च डबे-** | २९ | **१८३७८** | **५१०४** | ४७ |

**ई) समरी तक्ता- माहे मार्च-२०१७ अखेर.**

| | गावरान तुप डबे | खाद्यतेल डबे | वनस्पती तुप डबे | काजु डबे |
|---|---|---|---|---|
| अ नुसार आवक डबे | ३९ | १८४०२ | ५२६० | ५९ |
| 'ब' व'क'नुसार खर्च डबे | २९ | १८३७८ | ५१०४ | ४७ |
| **एकुण शिल्लक डबे-** | **१०** | **२४** | **१५६** | **१२** |

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:-**आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** उपरोक्त प्रमाणे माहे एप्रिल- २०१६ ते मार्च- २०१७ अखेर एकुण रिकामे झालेले डबे व त्यांची विल्हेवाट याबाबतचा शिल्लक डब्यांचा अहवालास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी खरेदी करण्यात आलेले तेल/ तुप/ काजूचे डबे व रिकामे डबे याच्या ताळमेळासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९** **सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील श्री साईप्रसादालयातील धान्य- कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :-**सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ भाग-४ मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रस्ताविक :-** श्री साई प्रसादालयामध्ये दररोज अंदाजे ३५ ते ४० हजार साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेत असून उत्सव कालावधीमध्ये ही संख्या वाढून ८० ते ८५ हजारापर्यंत जाते. तसेच दररोज सुमारे ९००० अन्नपाकीटांची विक्री होत आहे. त्याकामी लागणारा किराणा माल, धान्य- कडधान्य डाळी इत्यादी साफ केल्यानंतर वापरासाठी देण्यात येतात. सदर माल मशिनव्दारे व मनुष्यबळाकरवी साफ करण्यात येतो. गहू व हरबरा दाळ स्वच्छ करुन दळण्यात येत असून दळल्यानंतर काही प्रमाणात घट येते. त्याचप्रमाणे दळणकांडन व साफ केल्यानंतर काही प्रमाणात कचरा, खडे, मातेरे निघते. वातावरणात वेळोवेळी होणा-या बदलामुळेही वजनात घट येते. या सर्व कारणामुळे व प्रक्रिया करतांना किराणा मालामध्ये घट-तुट येत असते.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८.६.२००८ चे सभेतील निर्णय क्र.५६० अन्वये सन २००७- २००८ या वर्षात आलेली प्रत्यक्ष घट-तुट खर्चीटाकण्यात आलेली आहे. मात्र सदर घट-तुटीस मान्यता देतांना मा.श्री.ए.जी.लोंगाणी, अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांनी पुढील कालावधीसाठी सुचना (नियमावली) सुचविलेली होती. त्यास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८.६.२००८ चे सभेतील निर्णय क्र.५६० नुसार मान्यता मिळालेली आहे.

१. सन २००७-२००८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचिलत घट-तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असलेने दर सहा महिन्यानंतर प्रस्तावित घट-तुट नांवे टाकणेत यावी.

२. दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे दिसणारा मालाचा साठा याची पडताळणी करावी.

३. दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.व्यवस्थापन समिती समोर अवलोकनार्थ सादर करावा. मात्र प्रस्तावित सरासरी पेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घयावी.

उपरोक्त नियमावलीनुसार दरवर्षी प्रसादालयातील आर्थिक वर्षामध्ये एकुण खर्ची पडलेल्या किराणा मालात प्रत्यक्ष आलेल्या घट-तुटीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.

**मागणी:-** सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षामध्ये दर सहा महिन्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक किराणा मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे खर्ची पडलेला किराणा माल याची तपासणी करण्यात आली आहे. खालील घट-तुटीचे अवलोकन करता प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही मान्य असलेल्या घट-तुटीचे प्रमाणापेक्षा कमी आलेली आहे. त्यामुळे सदरील घट-तुट नांवे टाकण्याच्या नियमावली क्र.०३ नुसार घट-तुटीचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर करावा लागणार आहे.

**सन २०१६-२०१७ मध्ये धान्य-कडधान्य व किराणा मालांमध्ये आलेल्या घट-तुटीचा तपशिल-**

| अ.नं. | मालाचा तपशिल | दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ अखेर प्रत्यक्ष खर्च झालेला माल | दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ अखेर प्रत्यक्ष आलेली घट-तुट | घट-तुटीचे प्रमाण | मान्य झालेल्या घट-तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | किलो/ग्रॅम | किलो/ग्रॅम | टक्केवारीमध्ये | टक्केवारीमध्ये |
| १ | गहु | ११७४२३६.००० | ३०९९२.००० | २.६४ | ३.०० |
| २ | तांदूळ | ८०१४५५.००० | ४५४९.००० | ०.५७ | १.०० |
| ३ | तुरदाळ | ९७८६६.२५० | ६२२.००० | ०.६४ | १.०० |
| ४ | हरबरा दाळ | ४६४६६.५०० | ३७३.५०० | ०.८० | २.०० |
| ५ | मुगदाळ | ७६९९०.००० | ५३८.००० | ०.७० | १.०० |
| ६ | गुळ | २६८६९.२०० | १४४.५०० | ०.५४ | १.०० |
| ७ | रवा | ४८७०२.५०० | ३४३.५०० | ०.७१ | १.०० |
| ८ | शेंगदाणे | ३९८८२.५०० | ३२३.००० | ०.८१ | १.०० |
| ९ | मिरची | १४०३३.००० | ३९०.००० | २.७८ | ४.०० |
| १० | हळद | ९८४१.४५० | २९१.००० | २.९६ | ४.०० |
| ११ | मोहरी | ४८८२.००० | ६८.००० | १.३९ | २.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | जिरे | ६०९२.००० | ९३.००० | १.५३ | २.०० |
| १३ | मसाला | २१४०.४५० | ४४.२५० | २.०७ | २.२५ |
| १४ | धने पावडर | १४२९१.७०० | २६२.५०० | १.८४ | २.५० |
| १५ | खोबरेवाटी | १४९०१.२५० | १०४.००० | ०.७० | १.०० |
| १६ | हरबरा | ६१५६६.२५० | ४५१.००० | ०.७३ | १.०० |
| १७ | वाटाणा | ५१९४५.००० | ३११.००० | ०.६० | १.०० |
| १८ | मुग | ७८४२९.२५० | ५७६.००० | ०.७३ | १.०० |
| १९ | मठ | ८०५००.००० | ५३०.००० | ०.६६ | १.०० |
| २० | मेथी | ३०९.८०० | ४.५५० | १.४७ | २.२५ |
| २१ | सुंठ | २३५.००० | ८.९५० | ३.८१ | ५.२५ |
| २२ | मैदा | ३६०३०.००० | १२९.००० | ०.३६ | ०.५० |
| २३ | भगर | २२५.५०० | ४.५०० | २.०० | २.०० |
| २४ | साबुदाणा | २३८८३.००० | २२८.००० | ०.९५ | १.२५ |
| २५ | कच्चे पोहे | १२३१.५०० | १०.३०० | ०.८४ | १.०० |
| २६ | भाजके पोहे | २०२०.००० | ६३.००० | ३.१२ | ४.०० |
| २७ | डाळया | ४८७.००० | ४.००० | ०.८२ | १.२५ |
| २८ | चवळी | १६८२४.००० | ७४.००० | ०.४४ | १.०० |
| २९ | काबुली चना | ६६८०.००० | ३४.००० | ०.५१ | १.०० |

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान-** आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** तरी उपरोक्तप्रमाणे सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षामध्ये झालेल्या घट-तुटीच्या अहवालास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील धान्य- कडधान्य व किराणा मालाची प्रस्तावात नमुद केलेली घट-तुट कशाचे आधारे काढली, त्यासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.२०** **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ या कालावधीत वैद्यकिय बीलात देण्यात आलेल्या सवतीची नोंद घेणे.**

**प्रस्ताव-** मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे एप्रिल २०१६ मार्च २०१७ मध्ये एकुण ओपीडी रुग्ण १३९,८६९पैकी ३९,०८१ व एकुण आयपीडी रुग्ण १२२८७ पैकी ७०६२रुग्णांना एकुण रु.७,३४,४४,१०९/- इतकी वैद्यकिय बिलात सवलत दिली आहे. रुग्णांच्या गटवारीनुसार विवरण खालीलप्रमाणे

**<u>एप्रिल २०१६</u>**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २६८ | २६,६०,१६२/- | १२,५१,९६२/- | १४,०८,२००/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १६७ | १५,६३,६६४/- | १०,२१,९७५/- | ५,४१,६८९/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०६ | ४२,७९८/- | २०,११०/- | २२,६८८/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त,साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ३१ | १,४१,९७९/- | २५,३३० | १,१६,६४९/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३१५ | १,३७,७८,५३८/- | १,१७,३६,०००/- | २०,४२,५३८/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २०८५ | ८,३२,४००/- | - | ८,३२,४००/- |
| | **एकुण** | **२,८७२** | **१,९०,१९,५४१/-** | **१,४०,५५,३७७/-** | **४९,६४,१६४/-** |

**मे- २०१६**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३१० | २८,४३,५२७/- | १६,१२,७९२/- | १२,३०,७३५/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २२५ | १६,२९,८०१/- | ११,२६,४३१/- | ५,०३,३७०/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १२ | २५,२३४/- | --- | २५,२३४/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त,साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ४० | ३,१५,९३२/- | १४,००० | ३,०१,९३२/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३७५ | १,३४,५९,८८१/- | १,१२,०१,२२९/- | २२,५८,६५२/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,५०१ | १०,३५,७१०/- | - | १०,३५,७१०/- |
| | **एकुण** | **३,४६३** | **१,९३,१०,०८५/-** | **१,३९,५४,४५२/-** | **५३,५५,६३३/-** |

**जुन- २०१६**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३३४ | २९,६९,९१०/- | १५,८७,४९८/- | १३,८२,४१२/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २५१ | २०,३३,६६४/- | १४,४६,४७३/- | ५,८७,१९१/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०७ | २१,३४४/- | १,३२०/- | २०,०२४/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त,साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | १७ | १,९९,१२६/- | ५,००० | १,९४,१२६/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३९३ | १,५७,६८,९७३/- | १,३५,४२,६१०/- | २२,२६,३६३/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत,डायलेसिस | २,२४२ | ९,३८,७९०/- | - | ९,३८,७९०/- |
| | **एकुण** | **३,२४४** | **२,१९,३१,८०७/-** | **१,६५,८२,९०१/-** | **५३,४८,९०६/-** |

## जुलै- २०१६

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २८३ | २८,४८,२९८/- | १५,५८,३८६/- | १२,८९,९१२/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १९५ | १४,५२,४७४/- | ९,८३,३८३/- | ४,६९,०९१/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०८ | ९२,१९८/- | ४३,२००/- | ४८,९९८/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त,साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ४४ | २,३७,५०४/- | - | २,३७,५०४/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३४७ | १,४२,१४,६८९/- | १,२१,७८,१९०/- | २०,३६,४९९/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | २,२२२ | १०,०१,०९०/- | - | १०,०१,०९०/- |
| | **एकुण** | **३,०९९** | **१,९८,४६,२५३/-** | **१,४७,६३,१५९/-** | **५०,८३,०९४/-** |

## ऑगस्ट- २०१६

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३०५ | २८,३४,८९४/- | १३,९०,०६३/- | १४,४४,८३१/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २३५ | १६,४१,४९६/- | ११,४४,४९९/- | ४,९६,९९७/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १६ | १,१२,१३४/- | १५,६४०/- | ९६,४९४/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त,साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ३६ | २,०४,७५१/- | ५,०००/- | १,९९,७५१/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३४० | १,३६,१८,६५८/- | १,१८,००,७५१/- | १८,१७,९०७/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | २,९१५ | १२,९८,२४५/- | - | १२,९८,२४५/- |
| | **एकुण** | **३,८४७** | **१,९७,१०,१७८/-** | **१,४३,५५,९५३/-** | **५३,५४,२२५/-** |

## सप्टेंबर- २०१६

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २९९ | २६,९७,८२०/- | ११,७८,५८३/- | १५,१९,२३७/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २३१ | १६,५५,६६०/- | ११,७०,२५१/- | ४,८५,४०९/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०२ | ६४,१११/- | ४४,०००/- | २०,१११/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त,साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ३२ | २,१२,९१०/- | ७,०००/- | २,०५,९१०/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३६६ | १,४६,८३,७६४/- | १,२७,०९,५७१/- | १९,७४,१९३/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत,डायलेसिस | ३,१२५ | १६,०४,०४०/- | - | १६,०४,०४०/- |
| | **एकुण** | **४,०५५** | **२,०९,१८,३०५/-** | **१,५१,०९,४०५/-** | **५८,०८,९००/-** |

**<u>ऑक्टोबर- २०१६</u>**

| **अ.नं.** | **रुग्णांची गटवारी** | **रुग्ण संख्या** | **एकुण बिल रक्कम** | **बिलापोटी मिळालेली रक्कम** | **वैद्यकिय बिलात दिलेली सवलत** |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २७३ | २६,०४,८४०/- | १०,१८,५३७/- | १५,८६,३०३/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १८१ | १३,६२,९३५/- | ८,९२,४०५/- | ४,७०,५३०/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०६ | २३,१६५/- | ४,१८२/- | १८,९८३/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ४६ | ३,०२,२२१/- | ४,८५५/- | २,९७,३६६/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३०१ | १,४०,८१,९८३/- | १,२३,४२,३०१/- | १७,३९,६८२/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | २,४१६ | १३,००,३८५/- | - | १३,००,३८५/- |
| | **एकुण** | **३,२२३** | **१,९६,७५,५२९/-** | **१,४२,६२,२८०/-** | **५४,१३,२४९/-** |

**<u>नोव्हेंबर- २०१६</u>**

| **अ.नं.** | **रुग्णांची गटवारी** | **रुग्ण संख्या** | **एकुण बिल रक्कम** | **बिलापोटी मिळालेली रक्कम** | **वैद्यकिय बिलात दिलेली सवलत** |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २६६ | २७,४४,६३७/- | ११,९१,८३६/- | १५,५२,८०१/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २२३ | १६,३४,२६०/- | ११,०२,०७४/- | ५,३२,१८६/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ११ | ६६,७५७/- | ३१,०००/- | ३५,७५७/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त,साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ६७ | २,५५,९४२/- | १२,०००/- | २,४३,९४२/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३२७ | १,२७,२३,४२९/- | १,०८,५५,०८२/- | १८,६८,३४७/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | ३,०४९ | १५,९७,४००/- | - | १५,९७,४००/- |
| | **एकुण** | **३,९४३** | **१,९०,२२,४२५/-** | **१,३१,९१,९९२/-** | **५८,३०,४३३/-** |

## डिसेंबर- २०१६

| अ. नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३०९ | ३०,७८,६२०/- | १३,३७,९३४/- | १७,४०,६८६/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २४२ | २०,९०,३५२/- | १३,८८,०८९/- | ७,०२,२६३/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०६ | १,२४,२५८/- | ६१,४१०/- | ६२,८४८/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त,साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ५७ | ४,४१,९१३/- | २,२३,१७५/- | २,१८,७३८/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४१५ | १,६२,४८,५३२/- | १,३८,१८,२४२/- | २४,३०,२९०/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | ३,३२१ | १७,८७,२१०/- | - | १७,८७,२१०/- |
| | **एकुण** | **४,३५०** | **२,३७,७०,८८५/-** | **१,६८,२८,८५०/-** | **६९,४२,०३५/-** |

## जानेवारी- २०१७

| अ. नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३८५ | ३७,८६,४७६/- | १४,०५,०१८/- | २३,८१,४५८/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २८१ | १७,७४,५७०/- | १०,९९,६८०/- | ६,७४,८९०/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ११ | ४१,३०२/- | ८,०००/- | ३३,३०२/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त,साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ११० | ३,९२,२७३/- | १५,०००/- | ३,७७,२७३/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४०८ | १,३७,६३,३८१/- | १,१६,५३,८६२/- | २१,०९,५१९/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत,डायलेसिस | ३,८८७ | २१,४३,८१०/- | - | २१,४३,८१०/- |
| | **एकुण** | **५,०८२** | **२,१९,०१,८१२/-** | **१,४१,८१,५६०/-** | **७७,२०,२५२/-** |

## फेब्रुवारी २०१७

| अ. नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३८९ | ३८,६१,४२६/- | १६,६१,१०७/- | २२,००,३१९/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३०२ | १९,२९,०२९/- | ११,९९,९५२/- | ७,२९,०७७/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०८ | ७१,९७७/- | २८,०००/- | ४३,९७७/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त,साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | १०१ | २,५४,७४०/- | ५,०६०/- | २,४९,६८०/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४०८ | १,८२,६७,७७०/- | १,५८,४६,४०५/- | २४,२१,३६५/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | ३,०७९ | १६,८१,१००/- | - | १६,८१,१००/- |
| | **एकुण** | **४,२८७** | **२,६०,६६,०४२/-** | **१,८७,४०,५२४/-** | **७३,२५,५१८/-** |

## मार्च- २०१७

| अ. नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ४१५ | ३९,०३,३७३/- | १६,२७,१४१/- | २२,७६,२३२/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३४२ | २६,९३,४७१/- | १७,२८,६४६/- | ९,६४,८२५/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०८ | ७३,८०१/- | - | ७३,८०१/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त,साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | १८७ | ३,४९,३००/- | २१,८००/- | ३,२७,५००/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४६० | १,८२,०१,१५८/- | १,५१,८४,८११/- | ३०,१६,३४७/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | ३,२६६ | १६,३८,९९५/- | - | १६,३८,९९५/- |
| | **एकुण** | **४,६७८** | **२,६८,६०,०९८/-** | **१,८५,६२,३९८/-** | **८२,९७,७००/-** |

माहे एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ मध्ये वैद्यकिय बिलात सवलत दिलेल्या एकुण रुग्णांचा तक्ता यासोबत अवलोकनार्थ सादर केला आहे, तरी वैद्यकिय बिलात दिलेल्या सवलतीची नोंद घेण्यासाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ या कालावधीमध्ये वैद्यकिय बीलात देण्यात आलेल्या सवलतीचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

**तसेच संस्थानमार्फत इतर रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकिय आर्थिक अनुदान दिले जाते, हे अनुदान मिळणेसाठीचे निकष व कोण-कोणत्या रुग्णालयांना अनुदान दिले जाते, त्याची यादी सर्व समिती सदस्यांना पुरविणेत यावी, अशा सुचना केल्या.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षीका)

---

**विषय नं.२१** **श्री साईबाबा रुग्णालयातील Dental विभागाकरीता RVG (Software & Sensor) व Dental X-ray Machine wall mounted खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील Dental विभागाने दि.१०/१०/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये RVG (Software & Sensor) व Dental X-ray Machine wall mounted ची मागणी केलेली आहे. रुग्णांचे दातांच्या विकाराचे अचुक निदान होण्यासाठी सदर मशिनचा उपयोग होतो. सदर मशिनव्दारे दातांचा X-ray काढल्यानंतर तो संगणकावर बघता येऊ शकतो, त्यामुळे X-ray काढल्यानंतर Film Develop करण्याची आवश्यकता नसते. Dental विभागामध्ये सध्या एक Kodak या कंपनीचे RVG मशिन असून ते सन २००६ मध्ये रक्कम रु.१,९२,३७५/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आले होते. परंतु सदरहू मशिन हे सध्या व्यवस्थित काम देत नसल्यामुळे त्यांनी नविन अदयावत RVG (Software & Sensor) व Dental X-ray Machine wall mounted ची मागणी केलेली आहे.

तथापि दि.०७/०८/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ५०२ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयातील Dental विभागातील जुने RVG X-ray Machine परत (Buyback) करुन नविन RVG X-ray Machine विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस तसेच जुने RVG X-ray Machine परत (Buyback) करणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र.१२७४ दि.१४/०९/२०१६ अन्वये जुने RVG X-ray Machine परत (Buyback) करणेसाठी मान्यता मिळणेकामी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना पत्र पाठविण्यात आले होते, त्यांनी त्यांचेकडील पत्र क्र.सासंवि-१०१६/ १३४९/ प्र.क्र.१६७/ कां.१६ दि.०३/०२/२०१७ अन्वये दंत विभागातील जुने RVG X-ray Machine परत (Buyback) करण्यास व सदर मशिनची नोंद रुग्णालयाच्या डेडस्टॉकमधून निर्लेखित करण्यास मान्यता मिळालेली आहे.

परंतु श्री साईनाथ रुग्णालयातील Dental विभागाकरीता १ नग RVG X-ray Machine देणगी स्वरुपात प्राप्त झालेले आहे. त्यामुळे उपरोक्त RVG X-ray Machine श्री साईबाबा रुग्णालयातील Dental विभागाकरीता खरेदी करुन देता येईल.

त्यामुळे श्री साईबाबा रुग्णालयातील Dental विभागाने मागणी केल्यापैकी Dental X-ray Machine wall mounted खरेदीकामी M/s. Confident Dental Equipments Ltd., Mumbai यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले असून त्यांचे दरानुसार उपरोक्त खरेदीकामी रक्कम रु.१,१७,६२१/- इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Items | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt.in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Dental X-ray Machine wall mounted | 01 | 117621.00 | 117621.00 |
| | | | **Total Amt.in Rs.** | **117621.00** |

**<u>मागणी</u>–** Dental विभागाकडून दि.१०/१०/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये मागणी प्राप्त झालेली आहे. (औषध विभाग प्राप्त दि.३०/११/२०१६)

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु.३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईनाथ रुग्णालयातील Dental विभागाकरीता १ नग RVG X-ray Machine देणगी स्वरुपात प्राप्त झालेले आहे, त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयाकरीता खरेदी करावयाचे RVG X-ray Machine श्री साईबाबा रुग्णालयातील डेंटल विभागाकरीता खरेदी करुन देता येईल.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील Dental विभागाकरीता Dental X-ray Machine wall mounted विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१,१७,६२१/- (अक्षरी रक्कम रु.एक लाख सतरा हजार सहाशे एकवीस मात्र) चे खर्चास तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकरीता खरेदी करावयाचे RVG X-ray Machine श्री साईबाबा रुग्णालयातील डेंटल विभागाकरीता खरेदी करुन देण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२२ सन 2015-16 या वार्षिक खरेदीमधील B.M.V. Balloon without Accessories चे पुरवठ्याबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीओलॉजी विभागाकरीता सन २०१५-१६ या वर्षाकरीता लागणारे Consignment Basis वरील साहित्य खरेदीकामी दि.०३/०८/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.३१८ मान्यता मिळालेली होती, त्यानुसार दि.२८/०७/२०१५ रोजी पुरवठा धारकांना पुरवठा आदेश देण्यात आलेले होते. त्यामध्ये M/s.Lifetech Scientific Co., Bangalore यांना इकडील पत्र क्र.१२३० दि.२८/०७/२०१५ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला होता व त्यांचेकडून रु.२,००,०००/- सुरक्षा रक्कम म्हणून घेण्यात आलेली आहे. पुरवठा आदेशातील Clause No.15 नुसार त्यांचा निविदा कालावधी ०१ वर्षाचाच होता, परंतु तरीदेखील ते अदयापपर्यंत आपणास नियमित पुरवठा करत होते. परंतु निविदा कालावधी संपल्यामुळे व त्यांना Material Import करण्यासाठी अडचणी येत असल्यामुळे ते आपणास सध्या पुरवठा करण्यास तयार नाहीत.

दि.२८/०४/२०१७ रोजीचे ई-मेल पत्रान्वये M/s.Lifetech Scientific Co., Bangalore यांनी खालीलप्रमाणे कळविले आहे-

"At the outset, we thank you for your support for our products at your esteemed organization. We have been supplying SYM manufactured products from M/s.Lifetech Scientific India Pvt.Limited, Bangalore. As Lifetech Scientific (Shenzhen) has dissociated with SYM, China, the supplies in India has been authorized to M/s.Transcath Therapeutics, K No.516-33/1, Site No.22, 2nd Floor, Pampa Extension, Kempapuram, Bangalore – 560024.

So, M/s.Transcath Therapeutics is authorized to make supply, raise invoice and collect payment on behalf to M/s.Lifetech Scientific India Pvt.Limited, Bangalore at the same supply rates that has been committed by us. We also declare that no other person or distributor other than M/s.Transcath Therapeutics, is given authorization for the same."

तसेच M/s.Transcath Therapeutics, Bangalore यांनी दि.०९/०५/२०१७ रोजीच्या ई-मेल पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे-

"We would like to inform you, that currently our products are not available in Indian market because the manufacturing company has changed their manufacturing site.

As per the guidelines to register the new manufacturing site and products as new product with DCGI and then they allow us to import the products to India.

We have applied for the registration of products with DCGI and it would take at least another six months for us to further to start the import of the products. Once we receive the approval from DCGI will immediately update you the availability and supply of products."

त्यामुळे M/s.Lifetech Scientific Co., Bangalore व M/s.Transcath Therapeutics, Bangalore हे दोन्हीही पुरवठाधारक B.M.V.Balloon पुरवठा करु शकत नाही.

M/s.Lifetech Scientific Co., Bangalore हे डिसेंबर-२०१६ पासून वेळेवर मटेरीयल पुरवठा करत नसल्यामुळे तुलनात्मक तक्त्यातील व्दितीय क्रमांकाचे पुरवठाधारक M/s. Vascular Concept Ltd., Mumbai यांचेकडून B.M.V.Balloon without Accessories- १० नग व B.M.V.Balloon with Accessories- ०३ नग खरेदी करुन सदरहू खरेदीकामी येणारा जास्तीचा खर्च रु.६८,५८८/- M/s.Lifetech Scientific Co., Bangalore यांचेकडून वसुल करण्यात येणार आहे.

सन २०१५-१६ या वार्षिक खरेदीचे तुलनात्मक तक्त्यातील त्यानंतरचे प्राप्त निम्नत्तम दरधारक M/s.Vascular Concept Ltd., Mumbai यांनी B.M.V.Balloon without Accessories साठी रु.३०,४७६/- इतका दर दिलेला होता, परंतु दर वाढल्यामुळे सध्या ते रु.३१,१९१/- या दराने पुरवठा करण्यास तयार आहेत.

<u>**मागणी**</u>– कॅथलॅब विभागाकडून डि.पी.क्र.१४२२ दि.१२/०१/२०१७ अन्वये मागणी प्राप्त झालेली आहे.

<u>**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**</u>

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

<u>**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-**</u> BMV च्या शस्त्रक्रिया तातडीच्या म्हणजे Life Saving स्वरुपात मोडत असल्यामुळे Balloon घेणे अत्यावश्यक असल्यामुळे तसेच सन २०१७-१८ या वार्षिक खरेदीमधील Consignment Basis वरील साहित्य खरेदीकामीच्या ई-निविदेची कार्यवाही चालु असून सदरहू साहित्य उपलब्ध होण्यास अजुन २-३ महिन्यांचा कालावधी लागेल, त्यामुळे सदरहू B.M.V.Balloon without Accessories (All sizes) हे, M/s. Vascular Concept, Mumbai यांचेकडून प्रती नग रु.३१,१९१/- या दराने आवश्यकतेनुसार खरेदी करता येईल.

तरी कॅथलॅब विभागाकरीता आवश्यक असणारे B.M.V.Balloon without Accessories (All sizes) हे, M/s.Vascular Concept Ltd., Mumbai यांचेकडून आवश्यक्तेनुसार प्रती नग रु.३१,१९१/- या दराने खरेदी करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कॅथलॅब विभागाकरीता आवश्यक असणारे B.M.V.Balloon without Accessories (All sizes) हे, M/s.Vascular Concept Ltd., Mumbai यांचेकडून आवश्यक्तेनुसार प्रती नग रु.३१,१९१/- या दराने खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२३** **श्री.अनिल गंगाधर थोरात, लिपीक टंकलेखक, सभाकामकाज विभाग यांचे वैद्यकिय बिल.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक–** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी–** श्री.अनिल गंगाधर थोरात यांचे वडील श्रीगंगाधर थोरात यांना कॅन्सर आजाराचे निदान झाल्याने त्यांना साईनाथ रुग्णालयातील डॉ.बोरुडे यांनी पुढील उपचारासाठी संस्थान मान्य यादीतील नाशिक येथील क्युरी मानवता कॅन्सर सेंटर येथे रेफर केले होते.श्री.अनिल गंगाधर थोरात यांनी त्यांच्या वडिलांना पुर्वी तेथे उपचार घेतलेले आहे व आता पुन्हा त्यांनी दिलेल्या अर्जात पुन्हा उपचारासाठी क्युरी मानवता कॅन्सर सेंटर येथे उपचार घेणे शक्य नव्हते असे त्यांनी दिलेले अर्जात म्हटलेले आहे.म्हणुन त्यांनी नाशिक येथीलच शताब्दी हॉस्पिटल खाजगी रुग्णालय येथे उपचार घेतले.तसेच संस्थान मान्य क्युरी मानवता कॅन्सर सेटंर येथील उपचारा संदर्भात उपचार होतात किंवा नाही असा अभिप्राय दिलेला नाही तसेच तेथील उपचारा संदर्भात अभिप्राय देणे आवश्यक होते परंतु रुग्णाने खाजगी रुग्णालय नाशिक येथीलच शताब्दी हॉस्पिटल येथे उपचार घेतले.

वैद्यकिय बिलाचा परतावा मिळणेकामी त्यांनी नाशिक येथीलच खाजगी रुग्णालय शताब्दी हॉस्पिटल येथे दि.०२.०१.२०१७ ते ०५.०१.२०१७ ,दि.२४.०१.२०१७ ते दि.२७.०१.२०१७, दि.२४.०२.२०१७ ते दि.१७.०२.२०१७ व पुन्हा दि.३१.०३.२०१७ असे वेळोवेळी उपचार घेतलेले आहे. तेथील उपचारापोटी श्री.थोरात यांना रु.९८४११/- इतका खर्च आलेला आहे व वैद्यकिय परतावा मिळणेकामी बीले सादर केलेली आहे.

संस्थान वैद्यकिय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये संस्थान मान्य रेफर रुग्णालयात उपचार होत नसेल तर काही निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास प्रत्यक्ष खर्चाच्या खाट भाडे वजा जाता ८०% रक्कम देण्याची तरतुद आहे.परंतु श्री.थोरात यांनी संस्थान मान्य रुग्णालयात उपचार होते किंवा नाही असा अभिप्राय क्युरी मानवता कॅन्सर सेंटर,नाशिक यांचा दिलेला नाही.परंतु त्यांनी संस्थान मान्य यादीत उपचार होत नव्हते असे त्यांनी दिलेल्या अर्जात म्हटलेले आहे.

श्री.थोरात यांनी वैद्यकिय परतावा मिळणेकामी रक्कम रु.९८४११/- ची बीले सादर केलेली आहे. रक्कम दयावयाची झाल्यास खाट भाडे वजा जाता ८०% रक्कम रु.६५३७६/- देता येईल.

तरी वरील प्रस्ताव योग्य निर्णयार्थ सादर करण्यात आलेला आहे.

**निर्णय क्र.४८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.अनिल गंगाधर थोरात, लिपीक टंकलेखक, सभाकामकाज विभाग यांचे विनंती अर्जाचा विचार करता, त्यांनी मागणी केलेल्या रु.९८४११/- मात्र वैद्यकिय बीलापैकी नियमानुसार खाट भाडे वजा जाता ८०% रक्कम रु.६५३७६/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२४** **श्री.साहेबराव पांडुरंगलंके, लेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांचे वैद्यकिय बिल.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक–** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी–** श्री.साहेबराव पांडुरंग लंके यांची आई फुप्फुसाचा कर्करोग या आजाराच्या निदानाने संस्थान मान्य यादीतील रुबी हॉल क्लिनीक,पुणे येथे वेळोवेळी उपचार घेत होते.तसेच दि.१३.०२.२०१६ रोजी पुन्हा उपचारासाठी नेले असता ज्या डॉक्टरांकडे उपचार चालु होते ते उपलब्ध नसल्याने/ रुग्ण तेथे पोहचण्याआधी डॉक्टर त्यांच्या खाजगी रुग्णालयात गेलेले होते. डॉ.महावीर मोदी यांचे पुण्यातीलच खाजगी रुग्णालय मोदी क्लिनीक ससुण रोड, पुणे येथे असल्याने रुग्णांना त्यांच्या खाजगी रुग्णालयात नेले.तेथे अंतरुग्ण म्हणुन

दि.१३.०२.२०१६ ते दि.१८.०२.२०१६ दरम्यान उपचार घेतले असे त्यांना दिलेल्या अर्जात नमुद केले आहे.त्यासाठी त्यांना तेथील उपचारासाठी ४४७०४/- इतका खर्च आलेला आहे.

श्री साहेबराव पांडुरंग लंके यांनी वैद्यकीय उपचार दि १३/०२/२०१६ ते १८/०२/२०१६ घेऊन वैद्यकीय बिले हे परतावा मिळणेकामी दि. १९/०५/२०१६ रोजी सादर केलेली आहे.सदर बिलामधील कागदपत्राचे अपुर्ततेबाबत लगेचच सदर अधिका-यांना अवगत करण्यात आलेले होते. त्याकामी उपचार करणा-या डॉक्टरांचे सर्टिफिकेट जमा करणेबाबत कळविले होते. सदर सर्टिफिकेटची पुर्तता त्यांनी दि. १७/०३/२०१७ रोजी केलेली आहे. कागदपत्राची पुर्तता उशिरा केल्याने सदर प्रस्ताव सादर करणेस विलंब झालेला आहे.

श्री.साहेबराव पांडुरंग लंके यांनी वैद्यकिय परतावा मिळणेकामी रक्कम रु.४४७०४/-बीले सादर केलेली आहे.संस्थान वैद्यकिय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये निकडीच्या परिस्थितीमध्ये खाजगी रुग्णालयात अंतर उपचार नियम क्रं.१३ तसेच आकस्मिक निकडीच्या प्रसंगी औषधोपचार मान्यता देण्यात एकुण २३ आजारापैकी (पत्रक क्रं.२) (१) फुफ्फुसाच्या विकाराचा झटका (Pulmonary emergency) या फुफूसाच्या विकारातील आजारापैकी त्यांना Lung Cancer आजाराने ग्रस्त होते.त्यांनी वैद्यकिय उपचारापोटी रक्कम रु.४४७०४/- खाट भाडे वजा जाता ८०% रक्कम खाट भाडे वजा जाता रक्कम रुपये २६,९८८/- देता येईल असे मत आहे.

तरी वरील प्रस्ताव निर्णयार्थ सादर करण्यात आलेला आहे.

**निर्णय क्र.४८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.साहेबराव पांडुरंगलंके, लेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांचे विनंती अर्जाचा विचार करता, त्यांनी मागणी केलेल्या रु.४४७०४/- मात्र वैद्यकिय बीलापैकी नियमानुसार खाट भाडे वजा जाता ८०% रक्कम रु.२६,९८८/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२५** **जादा वैद्यकिय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरीमिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –</u> १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक –** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | |
| १ | श्री.प्रशांत भानुदास गोंदकर<br>विभाग-आरोग्य<br>हुद्दा- मदतनीस | वडील | Nephritis Diabetes | डॉ.जयेश वाघुळदे | साईबाबा हॉस्पिटल | ११९५.०० | ११९५.०० |
| | | | | | **एकूण** | **११९५.००** | **११९५.००** |
| | **ब – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | |
| २ | श्री.गोरक्षनाथ जगन्नाथ वाणी<br>विभाग-साईबाबाभक्तनिवास<br>हुद्दा-लिपीक | पत्नी | Ca | डॉ.राम नाईक | आनंद रुषीजी, हॉस्पिटल, अहमदनगर | २९२३०.०० | २९०७०.०० |
| ३ | श्री.कुलभैया शेषराव राधाकृष्ण<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा-कॅथलॅब टेक्नीशियन | वडिल | Ca | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक | १७४५८५.०० | १६१९१५.०० |
| ४ | डॉ.निहार भालचंद्र जोशी<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा-भुलतज्ञ | आई | Ca | डॉ.राम नाईक | प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी व एस.एल.रहेजा हॉस्पिटल, मुंबई | ६०१००.०० | ५८८००.०० |
| | | | | | **एकुण** | **२६३९१५.००** | **२४९७८५.००** |
| | **अ + ब एकूण** | | | | | **२६५११०.००** | **२५०९८०.००** |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.२५०९८०.०० इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन काही औषधे औषध भांडार विभागात उपलब्ध नव्हती तसेच रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे, उपरोक्त तक्त्यामधील कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम, त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२६** **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्हि.टी.एस ओ.टी नं. 2 करीता Cautery Machine खरेदीकामी पुरवठा आदेश देणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 मध्ये दि.१०/०३/२०१५ रोजी शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती, त्यामुळे ओ.टी. मधील Cautery Machine जळाल्यामुळे खराब झालेले आहे. त्यामुळे सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 विभागाने दि.11/05/2015 (औषध भांडार प्राप्त दि.14/05/2015) चे मागणी पत्रकान्वये ०१ नग Cautery Machine ची मागणी केलेली आहे.

सदर Cautery Machine खरेदीकामी M/s. Nirmal Agencies, Ahmednagar यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरपत्रकानूसार सदर Cautery Machine खरेदीकामी अंदाजे रु.५,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. खराब झालेल्या Cautery Machine ची विमा पॉलीस काढण्यात आलेली असल्यामुळे सदर Cautery Machine खरेदी केल्यानंतर त्याचे बील संस्थानला विमापॉलीसी कडून परत मिळणार आहे.

उपरोक्त Cautery Machine विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.५,५०,०००/- चे खर्चास दि.२७/१०/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.३९१ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

वरील मान्यतेनुसार दैनिक दबंग दुनिया– मुंबई, पुण्यनगरी– नाशिक, सामना- पुणे, सामना– औरंगाबाद, संध्यानंद– मुंबई या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण १०५ पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.१२/०१/२०१६ ते २७/०१/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३०/०१/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०३ निविदाधारकांनी निविदा Upload केलेल्या आहेत. संस्थानचे शिर्डी कार्यालयात ०२ निविदा प्राप्त झालेल्या असून, मुंबई कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही, तसेच Upload केलेल्या ३ निविदाधारकांपैकी एका निविदाधारकाची प्रत्यक्षात तांत्रिक निविदा प्राप्त झालेली नाही. Upload केलेल्या ०३ निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Covidien Healthcare India Pvt. Ltd., Mumbai | 29/01/2016 |
| 2 | M/s. Austin Healthcare, Pune | 29/01/2016 |
| 3 | M/s. Aditi Enterprises, Nashik | 30/01/2016 |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. तथापि वरील प्राप्त निविदाधारकांपैकी M/s. Covidien Healthcare India Pvt. Ltd., Mumbai यांनी प्रत्यक्षात निविदेची Hard Copy दिलेली नाही, तसेच Online Upload निविदेमध्ये Machine चा Technical

Compliance दिलेला नाही. त्यामुळे त्यांची निविदा अपात्र ठरवावी लागणार आहे. त्यामुळे सदरचे खरेदीकामी दोनच निविदा पात्र ठरतात, तसेच खरेदीकामी कमीतकमी तीन निविदांची आवश्यकता असल्यामुळे सदरचे खरेदीकामी दि.०९/०६/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेवून वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आलेली होती.

त्यानुसार निविदा विक्रीची मुदत दि.०६/०९/२०१६ ते २१/०९/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२४/०९/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती, तर एकुण ०९ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. त्यास अनुसरुन तीनपेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्याचा अहवाल ई.डी.पी. विभागामार्फत प्राप्त झाल्यानंतर दि.२१/०९/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.२८/०९/२०१६ पर्यंत ई-निविदेस मुदतवाढ देण्यात आली.

त्यास अनसुरुन सदरचे खरेदीकामी प्राप्त झालेल्या सदरहू एकुण तीन ऑनलाईन ई-निविदा दि.२८/१२/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

तसेच उपरोक्त खरेदीकामी पात्र असलेल्या तीन कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा दि.०६/०३/२०१७ रोजीचे मा.उपसमितीचे सभेपुढे संबंधित निविदांधारकांचे समक्ष उघडण्यात येऊन त्यामधील मुळ दरांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | **१,४१,०००/-** |
| 2 | M/s. Nirmal Agencies, Ahmednagar | ६,२४,७५०/- |
| 3 | M/s. Shreya Enterprises, Ahmednagar | ६,७०,०००/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.2 या विभागाकरीता ०१ नग Cautery Machine खरेदीकामी Austin Health Care, Pune यांचे रु.१,४१,०००/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत. परंतु निविदेमध्ये प्राप्त झालेल्या दरांमधील निम्नतम दरधारक व इतर यांचे दरांमध्ये खुपच तफावत दिसून येते. याकरीता सदरहूकामी पुरवठा आदेश देणेपुर्वी Austin Health Care, Pune यांचेकडून Cautery Machine चा वापर करणाऱ्या डॉक्टरांसमोर डेमो घेण्यात यावा व डेमो समाधानकारक असल्यासच त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अन्यथा द्वितीय निम्नतम दरधारकाचा विचार करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस दि.२७/०३/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.२२५(४) अन्वये मान्य करण्यात आली आहे.

त्यानुसार संबंधित निविदाधारकांनी वापर करणा-या डॉक्टरांना Cautery Machine चा Demo दाखविलेला असून Cautery Machine चा वापर करणारे डॉक्टर, डॉ.मिस्त्री व डॉ.विदयुत कुमार सिन्हा यांनी तांत्रिक बाबींच्या तुलनात्मक तक्त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय कळविलेले आहे –

1) We are using Valleylab Cautery since 2006
2) It is precise to deliver coagulation & fulguration mode
3) In India most of Cardiac Center & Surgeon using Valleylab Cautery.
4) Hence we need same or upgraded version.

तसेच डॉ.शेटे यांनी देखील खालीलप्रमाणे अभिप्राय कळविलेला आहे –

We have tested the following cautery during demo and found it to be not satisfactory for our needs.

- Austin Health Care, Make – Seal India, Model – Smart400Vi – not upto the mark.
- Valleylab cautery is time tested & we have been using it since 10 years with excellent results. Hence Valleylab cautery is recommended.

वरीलप्रमाणे ठरावानुसार व डॉक्टरांचे शिफारशीनुसार Valleylab कंपनीच्या Cautery Machine करीता M/s.Nirmal Agencies, Ahmednagar यांचे व्दितीय क्रमांकाचे दर रु६,२४,७५०/- स्विकारुन त्यांना पुरवठा आदेश दयावा लागेल व त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी रु.७४,७५०/- (पुरवठा आदेश रक्कम रु.६,२४,७५०.०० – प्रस्तावित अंदाजे रक्कम रु.५,५०,०००/-) इतका जास्तीचा खर्च येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे Cautery Machine करीता M/s.Nirmal Agencies, Ahmednagar यांचे व्दितीय क्रमांकाचे दर रु.६,२४,७५०/- स्विकारुन त्यांना पुरवठा आदेश देणेस व त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी येणा-या रु.७४,७५०/- (पुरवठा आदेश रक्कम रु.६,२४,७५०.०० – प्रस्तावित अंदाजे रक्कम रु.५,५०,०००/-) इतक्या रक्कमेच्या जास्तीच्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्हि.टी.एस ओ.टी नं. 2 करीता आवश्यक असलेले Cautery Machine खरेदी करणेकामी ३ नामांकित ब्रँडचा उल्लेख करणेत येऊन, नव्याने ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२७** **बायोकेमिस्ट्री ऑटो ॲनालायझर मशिनचे (Konelab 20i) PM Kit खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅब मध्ये रूग्णांचे रक्त तपासणी करणेकामी पुरवठा आदेश क्र. 8371/2005 दि. 08/08/2005 अन्वये मे.ट्रिव्हीट्रॉन डायग्नॉस्टिक प्रा. लि. मुंबई यांचेकडुन Konelab20i हे बायोकेमिस्ट्री ऑटोॲनालायझर मशिन एकुण रू. 16, 50,000/-इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदर मशिन दि. 03/01/06 रोजी कार्यान्वीत करणेत आले असुन सध्या नियमीत वापरात आहे. सध्या दि. 01/04/2017 ते 31/03/2018 या कालावधीत वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत येत आहे. सदर कालावधीत दूरूस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या स्पेअर पार्टची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सदर मशिनमधील लॅम्प, टयुबींग्स, मिक्सींग पॅडल, डिस्पेसिंग सिरींज इ.कन्झुमेबल स्पेअर पार्टचा समावेश असलेली PM Kit वर्षातुन एकदा बदलणे आवश्यक असते. अन्यथा मशिनवर केल्याजाणाऱ्या तपासण्यांचे निष्कर्ष चुकीचे येउ शकतात. सदरचे पार्ट कन्झुमेबल प्रकारचे असल्यामुळे कंपनी AMC/CMC कालावधीमध्ये बदलुन देत नाही. सदर मशिन पॅथोलॉजी विभागात नियमीतवापरात असुन तातडीने दूरूस्त करणे आवश्यक आहे. यापुर्वी सदर PM Kit दि. १५/०२/२०१६ राजी बदलणेत आलेली होती.

**मागणी:-** त्यासाठी कंपनीने पत्र क्र. TRI/DGSTS/005/W005, दि.23/04/2017 (रूग्णालये प्राप्त दि. 29/04/2017) अन्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| Sr. No | Cat No. | Description | Qty. | Rate Per | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 984097 | Konelab20 - PM Kit 12 Months | 01 | 1,00,035.00 | 1,00,035.00 |
| | | | | + Add CST @ 5 % | 5,001.75 |
| | | | | **Total Amount ( Incl. of all Taxes) in Rs** | **1,05,037.00** |

वरीलप्रमाणे बायोकेमिस्ट्री ऑटोॲनालायझर मशिनची PM Kit बदलुन घेणेकामी सर्व करांसहित एकुण रू. 1,05,037/- (अक्षरी रू.एक लाख पाच हजार सदोतीस मात्र) इतका खर्च येणार असुन कंपनीने सदर रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधीशी झालेल्या चर्चेअंती वरील पार्ट श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये प्राप्त झाल्यानंतर सदर रक्कम अदा होणेस स्वीकृती दर्शविली आहे. सदर बायोकेमिस्ट्री ऑटोॲनालायझर मशिनचे स्पेअर पार्टसाठी मे.ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि. चैन्नई हे एकमेव पुरवठाधारक आहेत.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** वरील संस्थान अधिनियमानुसार दूरूस्ती व देखभाल करता येईल. सदर बायोकेमिस्ट्री ऑटो ॲनालायझर मशिनचे स्पेअर पार्ट करीता मे.ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि. चैन्नई हे एकमेव पुरवठाधारक आहेत व त्यांचेकडेच सदर बायोकेमिस्ट्री ऑटो ॲनालायझर चे स्पेअर पार्ट उपलब्ध असतात. सदर दूरूस्ती करीता रु.25000/- पेक्षा अधिक खर्च येणार असलेमुळे मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेणेची आवश्यकता आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सदर 12 Months PM Kit मधील स्पेअर पार्ट हे विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेले असतात त्यामुळे इतर पुरवठाधारक कंपनीकडे उपलब्ध होत नाहीत. सदर मशिन नियमीत वापरात असल्याने तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. तसेच सदर कंपनी हे एकमेव पुरवठाधारक आहेत. त्यामुळे मे.ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि. चैन्नई यांचेकडुन बायोकेमिस्ट्री ऑटो ॲनालायझर मशिन करीता 12 Months PM Kit खरेदी करणेस हरकत नाही असे नम्र मत आहे.तसेच एकलस्त्रोताकडुन खरेदी करण्यासाठी खरेदीदार विभागप्रमुखाने द्यावयाचे प्रमाणपत्र देखील जोडले आहे.

तरी मे.ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि. चैन्नई यांचेकडुन बायोकेमिस्ट्री ऑटो ॲनालायझर मशिन करीता 12 Months PM Kit खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू.1,05,037/- च्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, एकल स्त्रोतकडून खरेदी करतेवेळी, खरेदी नियमावलीमधील अटी/ शर्तीचे पालन करणेत येऊन, त्याप्रमाणे बायोकेमिस्ट्री ऑटो ॲनालायझर मशिन करीता 12 Months PM Kit खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या रु.१,०५,०३७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२८** **श्री गुरुपोर्णीमा उत्सव- २०१७ करीता किर्तनकार व कलाकार निश्चीती व बिदायगी निश्चीती बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्री गुरुपौर्णिमा उत्सव शनिवार, दि.०८/०७/२०१७ ते सोमवार, दि.१०/०७/२०१७ असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. याकामी श्री गुरुपौर्णिमा उत्सव अंदाजपत्रक व श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१७ चे अनुषंगाने करावयाचे नियोजन/कामे याबाबत स्वतंत्र प्रस्ताव दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत सादर करण्यात आलेला होता, त्यास मान्यता मिळालेली आहे.

अ) कीर्तन कार्यक्रम-

| अ.नं. | कीर्तनकाराचे नाव |
|---|---|
| ०१ | ह.भ.प. सौ.अंजली श्रीकृष्ण जोशी, डोंबिवली |
| ०२ | ह.भ.प.गंगाधर नरहर व्यास, डोंबिवली |
| ०३ | ह.भ.प.माधवराव तुकारामपंत आजेगांवकर, परभणी |

ब) कलाकार कार्यक्रम –

श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१७ मध्ये धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम करणेसाठी इच्छुक असणा-या कलाकारांची नावे खालीलप्रमाणे

| अ.नं. | कलाकारांचे नाव | कार्यक्रम | कार्यक्रम करण्याची क्षमता | कलाकार संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ०१ | डॉ.अर्चना एल. सहकारी , गोवा (मो.८६०५१९२७२४) | अभंग, भक्तीगीत व हिंदूस्थानी शास्त्रीय गायन, | दोन तास | ८ ते ९ | ३५,०००/- |
| ०२ | श्री नीरज शर्मा, दिल्ली (मो.९८९१४७१०६६) | साई भजन संध्या | दिड ते दोन तास | ८ ते ९ | विनामुल्य |
| ०३ | श्री गणेश कुमार, SMP Namsanskirtan, Mumbai (फोन ०२२-२५२०४१०९) | अभंग, भक्तीगीत गायण | दिड ते दोन तास | २५ | ५०,०००/- |
| ०४ | नुर ई साई परिवार , श्री. मनीष श्रीवास्तव, गोमती नगर लखनऊ (मो ७३७९२२२२३४) | भजन संध्या | दिड तास | २० | विनामुल्य |
| ०५ | श्री. तरुण नंदे, राजरपूर, उत्तरप्रदेश (मो ९८०७१३१३००) | भजन संध्या | दिड तास | २० | १५,०००/- |
| ०६ | विजय पार्सेकर, मुंबई (मो ९८२०६५६१८९) | साई – स्वर संध्या | दिड ते दोन तास | २७ | २२,०००/- |
| ०७ | श्री.व्ही. निवेदीता,श्री नटेश्वरी फाऊन्डेशन ऑफ आर्ट ॲन्ड कलचर,तेलंगना (मो०९५०५९०८९७९) | कुचिपुडी नृत्य | दिड तास | १० ते १२ | विनामुल्य |
| ०८ | गौरी म्हलोत्रा आणि पार्टी (मो०९९१०००५४१७/ ०९८७१५२८५०५) | भजन संध्या | दिड ते दोन तास | २७ | विनामुल्य |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०९ | यु.साई श्रीप्रदा, हैद्राबाद (मो ९९५९०९६८५४ ) | भजन संध्या | दिड तास | १० | विनामुल्य |
| १० | अवधेश चंदन भारव्दाज,लखनऊ (मो ९४५१७६५२४४ | भजन संध्या | दिड तास | १८ | विनामुल्य |
| ११ | श्री विजय साखरकर, मुंबई (मो ९८२१३९३३२३) | साई-स्वर नृत्योत्सव | दोन तास | २१ | २१,०००/- |
| १२ | के.स्वर्ण श्रीसत्यनारायण पुरम, विजयवाडा (मो.०९८६६२९३४७८) | कुचिपूडी नृत्य | दिड तास | १० ते १२ | विनामुल्य |
| १३ | श्री.राम कोठेकर, बुलढाणा (मो ९६०४३१९६१८) | अभंग, भक्तीगीत, रामायण गायण | दोन तास | ४ ते ५ | १८०००/- |

मा. व्यवस्थापन उपसमितीचे दि.०१.१०.२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.७३३ किर्तनकारांचे पॅनेल यापुढे रद्द करण्यात यावे किर्तनकारांचे अर्ज मागविण्यात यावे व त्यातून किर्तनकारांची निवड करुन किर्तन कार्यक्रम ठेवण्यात यावे असे ठरले आहे.

गुरुपौर्णिमा उत्सवातील कार्यक्रम हे मंदिराचे उत्तर बाजूचे स्टेजवर होत असल्याने भक्तांची कार्यक्रमासाठी चांगल्याप्रमाणे गर्दी होत असते.

उपरोक्त "अ" नुसार किर्तनकारांचे व "ब" नुसार कलाकारांचे कार्यक्रमासाठी अर्ज प्राप्त झालेले आहेत. "अ" मधून योग्य किर्तनकार निवडून किर्तन कार्यक्रम घेता येईल. श्री रामनवमी उत्सवात किर्तनकारास बिदागी/ मानधन रुपये ११,००१/- मात्र देण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर गुरुपौर्णिमा उत्सवात किर्तनाकारास मानधन/ बिदागी देता येईल .

उपरोक्त "ब" तक्त्यात १३ कलाकारांचे कार्यक्रमासाठी अर्ज प्राप्त झालेले आहेत. अ.नं. ११ ते १३ या कलाकारांचे यापुर्वी रामनवमी, पुण्यतिथी, गुरुपौर्णिमा उत्सवात कार्यक्रम झालेले आहेत. अ.नं. ०१ ते १० हे नवीन कलाकार आहेत, सदर कलाकारातून ६ कलाकारांची निवड होऊन प्रत्येक दिवशी दिड तासाचा एक कार्यक्रम ७.३० ते १०.३० या वेळेत दोन कार्यक्रम तीन दिवस आयोजित करता येईल. व संस्थानमार्फत विनामुल्य रुम, व जेवन, नाष्ट्याची व आरती/दर्शन व्यवस्था करता येईल व कॉलम नं.६ मध्ये कलाकारांनी मानधनाची मागणी केलेली आहे. कलाकारांची निवड झाल्यानंतर मानधनाबाबत योग्य निर्णय होणेस विनंती.

वरील "अ" व "ब" निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपोर्णीमा उत्सव- २०१७ मधील किर्तनसेवेकरीता ह.भ.प. सौ.अंजली श्रीकृष्ण जोशी, डोंबिवली यांची रु.११,००१/- मात्र बिदागीवर किर्तनकार म्हणून निश्चिती करणेत आली. तसेच या उत्सवामधील धार्मिक/ सांस्कृतिक कार्यक्रमासाठी उपरोक्त प्रस्तावातील तक्ता ब मधील अ.नं.०४, ०७ व १३ चे कलाकारांना त्यांनी मागणी केलेल्या मानधनावर कार्यक्रम सादर करणेसाठी परवानगी देण्यात आली व उर्वरित कलाकारांनी निश्चिती करणेचे अधिकारी समिती सदस्य मा.श्री.सचिन तांबे व मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करणेत आले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.२९** **गणवेश शिलाई करीता खरेदी केलेल्या कापडाच्या शिल्लक साठयाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील,असे नमुद आहे.

सन २०१४ या वर्षात संस्थान आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांना गणवेश शिलाईकरीता सामान्य प्रशासन विभाग (वशी-५) यांचे प्रस्तावानुसार खरेदी विभागामार्फत विविध पुरवठादारांकडून गणवेश कापड खरेदी करणेत येऊन मे. आर.के. कलेक्शन, नाशिक व मे. नितिन गारमेन्टस, येवला यांना कार्यादेश देण्यात आला होता.

**अ)** संस्थान आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांचे गणवेश शिलाई होऊन खालीलप्रमाणे कापड शिल्लक असलेबाबत भांडार विभाग यांनी दि.०१.०५.२०१७ रोजीचे प्रस्तावान्वये कळविले आहे.

| अ.नं. | तपशिल | शेड नं. | शिल्लक कापड | खरेदी दर प्रति मिटर | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ०१ | अधीक्षक गणवेश कापड | १८३ | १४.७० मिटर | ५३८.०० | ७,९०८.६० |
| ०२ | लिपीक गणवेश कापड | ९९ | १३५.२० मिटर | २४०.०० | ३२,४४८.०० |
| ०३ | टेक्नीकल गणवेश कापड | ४६ | १८.०० मिटर | २४०.०० | ४,३२०.०० |
| ०४ | वार्डबॉय गणवेश कापड | ०१ | २६.९० मिटर | २४०.०० | ६,४५६.०० |
| ०५ | ड्रायव्हर गणवेश कापड | ४९ | ३१.७० मिटर | १९०.०० | ६,०२३.०० |
| ०६ | पहारेकरी गणवेश कापड | १७४ | ९०१.२० मिटर | २४०.०० | २,१६,२८८.०० |
| ०७ | मदतनीस गणवेश कापड | ६९ | १३८९.०० मिटर | २४०.०० | ३,३३,३६०.०० |
| ०८ | आरोग्य कर्मचारी गणवेश कापड | १७२ | ९३.०० मिटर | १९०.०० | १७,६७०.०० |
| | | | | | **६,२४,४७३.६०** |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.१८३ नुसार संस्थान कर्मचा-यांना गणवेश देणेसाठी प्रथमतः ड्रेस डिझायर्नसच्या सल्ल्याने कापडाची कंपनी, रंग व कोड नं. यांची निवड करुन कापड उत्पादक कंपनीकडून/अधिकृत विक्रेत्याकडून विहीत पद्धतीने कापड खरेदी करण्यात यावे व तदनंतर फक्त गणवेश शिलाईसाठी कोटेशन मागविण्यात येऊन कर्मचा-यांचे मापे घेऊन गणवेश तयार करण्यात यावे. व त्याकामी येणा-या रु.२१,३२,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.४ नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन संस्थान कर्मचा-यांना सफारी गणवेश देणे असल्याने शिलाईकामी सफारी कापड खरेदीकामी येणा-या वाढीव रु.२४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

**ब)** सन २०१३ मध्ये संस्थानच्या १८६२ स्त्री /पुरुष कर्मचा-यांना कपडे शिवणेकामी संख्या निश्चित करण्यात आली.

| अ.नं. | कर्मचारी पदनाम | संख्या | प्रत्यक्षात कर्मचारी | गणवेश शिलाई संख्या | खरेदी केलेले कापड मीटरमध्ये | शिलाई साठी वापरलेले कापड मीटीर मध्ये | शिल्लक कापड | सेवानिवृत/निधन झालेले कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| १ | प्रशासकीय अधिकारी | ०५ | ०५ | १० | ३०.०० | ३०.०० | - | - |
| २ | विभाग प्रमुख/वरिष्ठ लिपीक | ५३ | ५३ | १०६ | ३२४.७० | ३१०.०० | १४.७० | ०८ |
| ३ | लिपीक/कुपन विक्रेता | २३० | १९१ | ३८२ | १२४७.२० | ११९२.०० | १३५.२० | ०८ |
| ४ | तांत्रिक पदावरील कर्मचारी | ११५ | १०८ | २१६ | ६५०.०० | ६३२.०० | १८.०० | ०१ |
| ५ | वार्डबाय | ३१ | २४ | ४८ | १७४.९० | १४८.०० | २६.९० | ०४ |
| ६ | वाहन चालक | ३२ | ३१ | ६२ | २०१.०० | १६९.३० | ३१.७० | ०१ |
| ७ | पहारेकरी | १५६ | ० | ० | ९०१.२० | - | ९०१.२० | ०२ |
| ८ | मदतनीस/शिपाई/झेरॉक्स ऑपरेटर/मुकादम | ९४८ | ७८१ | १५६२ | ५६९३.३० | ४३०४.३० | १३८९.०० | ३४ |
| ९ | सफाई कर्मचारी | १६३ | १३६ | २७२ | ९११.०० | ८१८.०० | ९३.०० | ०३ |

उपरोक्त **"ब"** तक्यात कॉलम नं. ३ मध्ये सन २०१३ मध्ये कर्मचारी संख्या निश्चित करण्यात आली होती. सन २०१३ ते २०१६ या कालावधीत कॉलम नं. ९ मध्ये सेवानिवृत्त/निधन झालेल्या कर्मचारी संख्या दर्शविलेली आहे. तसेच अ.नं. ७ पहारेकरी यांचेकरीता खाकी कापड खरेदी करण्यात येऊन, आर.के.कलेक्शन, नाशिक यांना शिलाई करणेकामी कार्यादेश देण्यात आला होता.

तथापि तत्कालीन पोलिस अधीक्षक, मा.लखमी गौतम, अहमदनगर यांनी पत्र क्र.जिविशा/ २२२९/ २०१५ दि.१३.०३.२०१५ रोजीचे पत्रान्वये मा.अध्यक्ष साहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना पहारेकरी गणवेश बदलविणेसाठी तात्काळ कार्यवाही करण्याची निर्देश द्यावे असे कळविले होते.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६.०४.२०१५ रोजीचे सभेमध्ये संस्थान आस्थापनेवरील कायम सुरक्षा रक्षकांचे ड्रेस कोड बदलणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय क्र.११२ असा झाला आहे की, संस्थान आस्थापनेवरील सुरक्षा रक्षकांच्या युनिफॉर्मचा रंग बदलणेस मान्यता देण्यात आली. युनिफॉर्मसाठी खरेदी करण्यात आलेले कापड परत करणेत यावे. जर पुरवठाधारक कापड परत घेत नसेल तर ते कापड विद्यार्थ्यांना किंवा मंदिर सुरक्षिततेसाठी नियुक्त करणेत आलेल्या पोलिस कर्मचा-यांना अथवा इतर विधायक कार्यासाठी देण्यात यावेत.

तुलसी एम्पोरीयम,मेन रोड, सोनई यांनी सदरचे कापड रेमंड मिल परत घेत नसल्यामुळे बदलुन देण्यास असमर्थता दर्शविली.

सदरचे कापडाची विद्यार्थ्यांना किंवा मंदिर सुरक्षिततेसाठी नियुक्त करणेत आलेल्या पोलिस कर्मचा-यांना अथवा इतर विधायक कार्यासाठी देण्यात आलेले नसल्याने सदर कापड भांडार विभागात शिल्लक दिसून येते. तसेच सन २०१३ ते २०१६ या कालावधीत ३४ मदतनीस कर्मचारी सेवानिवृत्त/निधन झाल्याने सदर कर्मचा-यांचे कपडे शिवण्यात आलेले नाही. मदतनीसांची संख्या जास्त प्रमाणात असल्याने, लॉटमध्ये कापड जास्त प्रमाणात येऊ शकते तसेच कर्मचा-याचे शरीरयष्टी कमी/जास्त प्रमाणात असल्याने कापड जास्त किंवा कमी प्रमाण होत असते. सदरच्या कापडास तीन ते चार वर्षाचा कालावधी झालेला असल्याने उपरोक्त **"अ"** तक्यातील दर्शविलेले शिल्लक असलेले रु. ६,२४,४७३.६० रकमेचे कापड कापडकोठी मार्फत काऊंटरवर विक्री करता येईल.

तरी उपरोक्त **"**अ" तक्यातील शिल्लक असलेले पुर्णांकित रु.६,२४,४७४/- (अक्षरी रुपये सहा लाख चोविस हजार चारशे चौ-याहत्तर) मात्र रकमेचे कापड कापडकोठी मार्फत खरेदी दराने विक्री करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित कापडाच्या शिल्लक साठयाची एवढया दिवसांमध्ये कोणत्याही अधिकाऱ्यांनी दखल घेतली, याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली व सदरहू शिल्लक कापडाची कापडकोठी विभागामार्फत तात्काळ विक्री करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.३०** **संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२४ (पैकी) व १२६ (पैकी) चे बाजुने चैनलिंक फेन्सिंग करणेकामी येणारे खर्चास व ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतुद :-** अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**

१. तत्कालीन मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक ०५/०५/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र. १४४(१) (१०) खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*"..उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे शिर्डी येथिल स.नं. १२४ (पैकी) व १२६ (पैकी) चे बाजूने बार्बेड वायर फेन्सिंग व गेट बसविणेस व तसेच याकामी येणा-या अंदाजे रु. २,५७,८२४/- (अक्षरी रुपये दोन लाख सत्तावनहजार आठशे चोवीस) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."*

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत नि.क्र.१३६(२९) अन्वये

*".. यावर सविस्तर चर्चा होऊन ,संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२४ (पैकी) व १२६(पैकी) चे बाजूने बार्बेड वायर फेन्सिंग करणेऐवजी तेथे चैनलींकची जाळी बसविणेत यावी , असे उपसमितीचे मत झाले. याकरीता सदरहू प्रस्ताव रद्द करणेत येऊन सुधारीत प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."*

**प्रस्तावना:-** मौजे शिर्डी येथील स.नं. १२४ पैकी क्षेत्रामधील चिकूचा बाग तसेच स.नं. १२६ पैकी नांदूर्खी रस्त्याचे कडेला असलेल्या पाण्याचे टाकी (ESR) लगतचे संस्थानचे क्षेत्रास चैनलींक जाळीचे कंपाउंड करणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यासाठी सन २०१६-१७ चे जिल्हादरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु.११,७७,४७४/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. जा.नं. ३६२१/२०१७ दि.०६/०१/२०१७

रोजीचे परिपत्रकानुसार येणा-या अंदाजपत्रकीय रक्कम २०% ते ३०% कमी करणेत यावी असे नमूद केले आहे. त्यासार याकामी २०% कपात करुन रु.९,४१,४८०/- इतकी रक्कम येते.

**प्रस्ताव:** तरी याकामी येणारे खर्चास व सदरहू कामासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२४ (पैकी) व १२६ (पैकी) चे बाजुने प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे चैनलिंक फेन्सिंग करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,४१,४८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३१** **साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी साईनगर रेल्वे स्टेशन व नगर-मनमाड रस्त्यांवर रेडीयम मध्ये माहिती व दिशादर्शक फलक तयार करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१(१) च्या खंड (ग) अन्वये समितीकडून, "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे", अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.१३६ (३४) खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*".. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी साईनगर रेल्वे स्टेशन व नगर-मनमाड रस्त्यावर माहिती/ दिशादर्शक फलक रेडियमचे असावेत तसेच निळया रंगाचा फलक व त्यावर पांढ-या रंगाची अक्षरे असावीत, असे समितीचे मत झाले. त्यामुळे सदरहू प्रस्ताव रद्द करणेत येउन, नविन सुधारीत प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली."*

**प्रस्तावना:** मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी साईनगर रेल्वे स्टेशन व नगर-मनमाड रस्त्यावर माहिती / दिशादर्शक फलक तयार करुन बसविणेकामी तयार करणेत आलेले सुधारीत तपशिलानुसार याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे. (Ahmednagar DSR - 2016 - 2017).

| Sr. No. | Description | Qty. | Unit | Approx. Rate | Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Providing and Fixing of **Retro Reflectorised direction** & place identification sign boards made out of retro reflective sheeting of High Intensity prismatic grade conforming to IRC-67: 2,012 & Type IV standards of ASTM D4,956-09 specifications, fixed over 2mm thick Allu. / 4 mm thick ACP sheet supported with back support frame of 35 x 35 x 5mm mild steel angle with areas not exceeding 0.9 Sqm. Supported in mild steel angle iron post 75 x 75 x 6mm - 3.5 mtr height & with MS angle of 50 x 50 x 5mm bracing, firmly fixed to the ground by means of properly designed foundation of M20 grade cement concrete 45 cm x 45 cm x 60 cm, 60 cm below ground level complete (as per Morth specification No.801) (for area Less than 0.9 Sqm). 7 Years Warranty for Retro Reflective Sheeting from the original sheeting manufacturer & a certified copy of 03 years outdoor exposure report from an independent test lab for the product offered shall be submitted by the contractor. Direction Sign boards Above 0.9 Sqm. Spec. No.: IRC-67 of 2012. | | | | |
| a) | **1.20m x 1.80m = 14 Nos. (Two Side Board with one M. S. frame structure).** | 30.24 | Sqm | 14,682/- | 4,43,984/- |
| b) | **1.50m x 1.80m = 02 Nos. (One Side Board).** | 5.40 | Sq.ft | 14,682/- | 79,283/- |
| | **Total Amount (Rs.):** | | | | **5,23,267/-.** |

**प्रस्ताव :** उपरोक्त विषयांकीत कामासाठी येणारे रक्कम रू.५,२३,२६७/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी येणारे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून करुन घेणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी साईनगर रेल्वे स्टेशन व नगर-मनमाड रस्त्यांवर रेडीयम मध्ये माहिती व दिशादर्शक फलक तयार करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,२३,२६७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३२** **श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहा.संपादक, मुंबई कार्यालय यांचे गैरशिस्त वर्तन.**

**प्रस्ताव-** श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहा.संपादक, मुंबई कार्यालय, मुंबई यांचेकडून खालीलप्रमाणे गैरशिस्तवर्तन घडलेले आहे.

श्री. राणे हे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या आस्थापनेचे मुंबई कार्यालय येथे सहाय्यक संपादक या पदावर कार्यरत आहेत. श्री साईलिला (मराठी) व श्री साईलिला (इंग्रजी/हिंदी) या मासिकांची संपादकीय कामाची जबाबदारी त्यांचेवर नेमून देण्यात आलेली आहे. सदर साईलिला मासिक प्रत्येक महिन्याचे १५ तारखेस नियमानुसार विहीत वेळेत प्रसिद्ध होणे आवश्यक आहे. तसेच सदर साईलिला मासिकांचे वितरण साईभक्तांना विहीत वेळेत होणे आवश्यक आहे व ते त्यांचेवर बंधनकारक आहे असे असतांनाही श्री साईलिला (इंग्रजी/हिंदी) माहे नाव्हेंबर/डिसेंबर २०१४ चे मासिक दि.१५-१२-२०१४ अखेर विहीत वेळेत प्रसिद्ध होणे आवश्यक होते. सदर साईलिला मासिक विहीत वेळेत प्रसिद्ध करणेकामी व साईभक्तांना वितरीत करणेकामी त्यांना वरिष्ठांनी अनेकवेळा समक्ष व दुरध्वनीवरुन सुचना दिलेल्या आहेत. तरी देखील त्यांनी नाव्हेंबर/डिसेंबर २०१४ चे श्री साईलिला (इंग्रजी/हिंदी) हे मासिक अद्यापर्यंत प्रसिद्ध केलेले नाही. सदर साईलिला मासिक साईभक्तांना अद्यापर्यंत प्राप्त न झाल्यामुळे ते इकडील कार्यालयास वारंवार दुरध्वनीवरुन विचारणा करतात. श्री साईलीला मासिक प्रत्येक वेळेस विहीत वेळोपेक्षा एक ते दिड महिना उशिराने प्रसिद्ध होत असल्याने त्याबाबत साईभक्तांनी प्रशासनकडे नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी नेमून दिलेल्या कामात ढोबळ निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केलेला आहे. तसेच त्यांना वरिष्ठांनी वेळोवेळी सुचना देऊन देखील ते वरिष्ठांचे सुचना व आदेशाचे पालन करत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. श्री राणे यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून, गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

श्री. सुनिल दत्तात्रय राणे, सहा.संपादक, मुंबई कार्यालय यांची उपरोक्तप्रमाणे,प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-यांचे कर्तव्य इत्यांदीचे उल्लंघन केलेले आहे.

(१) संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

(i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल.

(ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;

(iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

(२) पर्यवेक्षी पद धारण करणारा संस्थानचा प्रत्येक कर्मचारी तात्पुरते त्याच्या नियंत्रणाखाली आणि प्राधिकाराखाली असलेल्या संस्थानाच्या सर्व कर्मचा-यांचा प्रामाणिकपणा आणि सेवेशी एकनिष्ठता कायम राहील याची काळजी घेण्यासाठी शक्य त्या सर्व उपाययोजना अमलात आणेल.

(३) आपली अधिकृत कर्तव्य पार पाडतांना किंवा त्याला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करताना संस्थानाचा कोणताही कर्मचारी आपल्या सर्वोत्कृष्ट निर्णयशक्तीच्या वापराशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने कृती करणार नाही, अपवाद म्हणजे जेव्हा तो आपल्या अधिकृत वरिष्ठांच्या निर्देशानुसार कृती करीत असेल आणि तो अधिकृत वरिष्ठांच्या निर्देशानुसार कृती करीत असेल आणि जेव्हा अशा निर्देशानुसार कृत्य करीत असेल तर त्यानं असे निर्देश लेखी प्राप्त केले पाहिजे, त्याने लवकरात लवकर लेखी पृष्टी प्राप्त करणे आवश्यक आहे.

(४) पोटनियम (३) मधील कोणत्याही गोष्टीचा तदनुसार असा अर्थ लावता येणार नाही कि जेव्हा शक्ती आणि दायित्वाच्या वितरणाच्या योजनेखाली अशा सुचनांची आवश्यकता नसेल तेव्हा वरिष्ठ अधिका-याच्या किंवा प्राधिका-याच्या सुचना मागवून संस्था नच्या आपल्या दायित्वाचे पालन करण्यात कर्मचा-याला टाळाटाळ करण्याची शक्ती प्राप्त होणार नाही.

श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहा.संपादक, मुंबई कार्यालय यांनी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे विनियम ३ चे उल्लंघन केलेले आहे. उपरोक्त कृत्य गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडतात. सदर गैरशिस्त वर्तन श्री. राणे यांनी केलेले असल्याचा आरोप त्यांचेवर ठेवणेत आले होते. सदर गैरशिस्तवर्तनाबाबत श्री राणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४६४/२०१५, दि.२५-०४-२०१५ अन्वये अभिकथनपत्र देण्यात आले होते.

श्री.राणे यांचेवर ठेवण्यात आलेल्या अभिकथनपत्रातील आरोपांची खाते चौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव, खाते चौकशी अधिकारी यांचेमार्फत पूर्ण करण्यात आली असून त्यांनी पूर्णतः नैसर्गिक न्यायतत्वानुसार खातेचौकशीचे काम पुर्ण करुन त्यांचा दि.२२-०५-२०१७ रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल सादर केला आहे.

कसुरदार श्री.राणे यांनी आरोप पत्राचे चौकशीकामी हजर राहून, चौकशीत भाग घेतलेला असुन खाते चौकशीचे कामकाज पुर्ण केलेले आहे. खातेचौकशी अधिकारी यांनी दि.२२.५.२०१७ रोजीचे दिलेल्या अहवालातील निष्कर्ष आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

१) श्री. सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, मुंबई कार्यालय यांना दिनांक २५/४/२०१५ रोजी दिलेल्या अभिकथनपत्रातील आरोप नि:संशयीतरित्या शाबीत झाल्याने श्री.राणे दोषी आहेत.

२) श्री. राणे यांनी श्री.साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) सेवा (वर्तणुक) विनियम २०१३ चे कलम ३ (१), (२), (३) व (४) नुसार गैरशिस्त वर्तन केले म्हणुन दोषी आहेत.

तसेच श्री. सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, मुंबई कार्यालय यांना यापुर्वी जा.नं. एसएसएस/वशी-७ए/ ३५७२/२०११ दि.७-११-२०११ अन्वये संस्थानला सेवेची आवश्यकता नसल्याने दि.०९.११.२०११ पासुन संस्थान सेवेतून सेवामुक्त (टर्मिनेट) करण्यात आले होते. त्यानंतर जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ २९१०/२०१२ दि.२९.९.२०१२ अन्वये दि.०१.१०.२०१२ रोजी सहाय्यक संपादक श्री साईलीला या पदावर श्री.राणे यांना पुर्ववत संस्थान सेवेत हजर करण्यात आले. त्यानंतर श्री.राणे यांना गैरशिस्त वर्तनाबाबत आजपर्यंत लेखी सुचना- १ वेळा, ताकीद- १ वेळा, चार दिवस संस्थान सेवेतून निलंबीत-१ वेळा, ठपका-१ वेळा अशा एकुण-४ वेळा शिक्षा झालेली असून देखील त्यांचे सेवेत व वर्तनात सुधारणा होत नसल्याचे दिसून येते.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ मधील प्रकरण ३ विनियम ५ अन्वये **किरकोळ दंडात्मक कारवाया**

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

**मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** श्री. सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, मुंबई कार्यालय याचे विरुद्ध ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले आहे.

श्री.सुनिल राणे यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत शिक्षा म्हणून त्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ मधील प्रकरण ३ विनियम ५(८) नुसार, सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करावयाचे असल्यास संस्थानचे वतीने मा.कामगार व औद्योगिक न्यायालय, अहमदनगर व मा. दिवाणी न्यायालय सिनीयर डिव्हीजन, कोपरगाव व ज्युनियर डिव्हीजन, राहाता येथे कॅव्हेट अर्ज दाखल करावे लागेल.

तरी श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, मुंबई कार्यालय यांना सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ मधील प्रकरण ३ विनियम ५(८) मधील मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थान सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे ही शिक्षा देणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, मुंबई कार्यालय, मुंबई यांना गैरशिस्त वर्तनाबाबत वेळोवेळी शिक्षा करुनही, त्यांचे सेवेत व वर्तनामध्ये फरक पडत नाही, यावरुन त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नसल्याचे दिसून येते यामुळे श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, मुंबई कार्यालय, मुंबई यांना सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ मधील प्रकरण ३ विनियम ५ (८) मधील मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थान सेवेतून काढून टाकणेत यावे, असे ठरले. तसेच, त्यासाठी नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.३३** **सुरक्षिततेच्या दृष्टीने साईभक्तांचे व त्यांचे जवळील बॅगांची तपासणी करणेकामी बॅगेज स्कॅनर व डोअर फ्रेम मेंटल डिटेक्टर व इत्यादी सुरक्षा साहित्य खरेदी.**

**प्रस्ताव-** मा व्यवस्थापन समितीचे दि.09.10.2014 चे सभेतील केंद्रीय औदयोगिक सुरक्षा बल यांचे मार्फत कन्सल्टंसी सेवा घेणेकामी विषय नं.17 वर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं.902 नुसार श्रींचे मंदिर व मंदिर परिसराचे सुरक्षितता ही बाब अत्यंत महत्वाची असल्यामुळे सुरक्षा यंत्रणा, फायर सेफ्टी, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा वगैरे सुरक्षा विषयक मार्गदर्शनासाठी केंद्र शासनाच्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यासारख्या चांगल्या संस्थेचे मार्गदर्शन घेण्याची संस्थानला आवश्यकता आहे. मार्गदर्शन घेणेसाठी सदर संस्थेची विनामुल्य अथवा मानधन तत्वावर कन्सलटंट म्हणुन नेमणुक करणेबाबत त्यांचेकडे विचारणा करण्यात यावी. तसेच केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल संस्थेकडून श्रींचे मंदिर व मंदिर परीसराच्या सुरक्षेसाठी सुरक्षा कर्मचारी घ्यावयाचे झाल्यास त्यांचे वेतन व मानधन यावर किती खर्च येईल याबाबत सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले होते. त्यानुसार केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यांचेकडे पत्रव्यवहार करुन सुरक्षा व फायर कन्सलटंन्सी फी बाबत चौकशी केली असता त्यांनी 2,50,000 + 75,000 असे एकुण रु.3,25,000/- खर्च कळविल्याने दि. 27/07/2015 रोजी मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे विषय क्र.14 सादर केला असता त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. 225 अन्वये रु.3,25,000/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार सुरक्षा व फायर कन्स्लटंन्सी फी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यांना आदा करणेत आलेली आहे.

त्यानंतर केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाचे (CISF) अधिकारी यांनी दि.14.01.2016 ते दि.18.01.2016 या कालावधीत मंदिर, मंदिर परिसर तसेच संस्थान संलग्न सर्व परिसराची पहाणी करुन आढळुन आलेल्या त्रुटी, उणीवाबाबत सुरक्षिततेच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजना व खरेदी करणे आवश्यक असलेले सुरक्षा साहित्य इत्यादी बाबतचा सविस्तर सुरक्षा अहवाल (कन्सलटंन्सी रिपोर्ट) सुमंत सिंग, असिस्टंट इन्स्पेक्टर जनरल यांनी अहवाल (जा.नं.42014(4)/31/2014 कन्स्लटंन्सी/619 दि.21/03/2016 पत्र) इकडील कार्यालयास सादर केला आहे.

**सदर अहवालातील काही ठरावीक ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे आहे :-**

1) श्री साईबाबा मंदिरामध्ये दर्शनाकरीता साईभक्तांची मोठया प्रमाणावर होणारी गर्दी लक्षात घेता, श्री साईबाबा संस्थान हे वेगवेगळया आतंकवादी संघटनांच्या हिट लिस्टवर असल्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रचंड प्रमाणात होणा-या साईभक्तांच्या गर्दीमुळे आतंकवादी हल्ला, दंगल, पाकीटमारी इत्यादी गुन्हे होवू शकतात. त्याकरीता या संभाव्य धोक्यापासून सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून CISF यांचेकडे सध्या अस्तित्वात असलेल्या सुरक्षाबाबतच्या यंत्रणेसंदर्भात सल्ला घेण्याची आवश्यकता आहे.

2) बऱ्याच वर्षापासुन इराकनंतर भारत आतंकवादांच्या हिटलिस्टवर एक प्रमुख केंद्र बनलेले आहे. मागील काळात सुध्दा भारतात काही प्रमुख धार्मिक स्थळे ( उदा.बोध,गया,अक्षरधाम,अहमदाबाद इ.) आतंकवादाचे प्रमुख लक्ष आहे. शिर्डीतील साईभक्तांची मोठया प्रमाणावर होणारी गर्दी लक्षात घेता साईबाबा संस्थानवर हल्ला झाल्यास साईभक्तांच्या विश्वासाला तडा जाण्याची शक्यता आहे. साईबाबा मंदिर परीसरालगत असणारे हॉटेल्स / लॉजेसची बांधकामे, दुकाने,भिकारी व इतर किरकोळ विक्रेते यांचे वाढते प्रमाण तसेच गेट नं. 1 व 5 हे नगर-मनमाड रोड लगत असुन तेथील रहदारीमुळे संभाव्य धोका निर्माण होवू शकतो. त्यावर योग्य ती कार्यवाही करणे गरजेचे आहे.

3) श्री साईबाबा मंदिर व परीसर येथील सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून करावयाच्या आपतकालीन सुरक्षा व्यवस्थापनाचा आराखडा तयार करणे. करीता यावर नियंत्रण करण्याकरीता दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची कडक तपासणी होणे गरजेचे आहे.

4) मंदिर परीसर, प्रसादालय, एल.पी.जी.स्टोअर, निवासस्थाने व जलसाठे इत्यादी ठिकाणची असणारे गेटस् हे आधुनिक पध्दतीची म्हणजे विजेवर चालणारे स्लायडिंग गेटस् तसेच उघडझाप करणारे बॅरीयर बसविण्यात यावेत. गेट नं.4 येथे वाहनांकरीता इलेक्ट्रिक बुम बॅरीयर (Electrically Boom barrier) बसविण्यात यावेत. महिलांच्या तपासणीसाठी सुलभरीत्या सुविधायुक्त वेगळे बुथ तयार करणे. दर्शन रांग नं. 1 व 2 येथे भक्तांसाठी बॉडी स्कॅनर (Body Scaner) बसविण्यात यावे.

5) मंदिर परीसराचे सर्व प्रवेशव्दार, प्रसादालय, निवासस्थाने व जलसाठ्यांवर तसेच प्रवेशव्दारांवर भक्तांचे व कर्मचाऱ्यांचे DFMD व्दारे त्यांचे तपासणीकरीता सामान तपासणी यंत्र (X-BIS) लावणे आवश्यक आहे. तसेच मंदिर परीसरात फिरता बुलेटप्रुफ मोर्चा (Mobile bullet proof morcha) ठेवण्यात यावा.

6) हत्यारबंद सुरक्षारक्षकांव्दारे वॉच टॉवर वरुन चोवीस तास सुरक्षा करणे. तसेच गेट नं.3 च्या दक्षिण–पुर्व च्या बाजुने कम्पाउंड वॉल नजिक बरेच दुकाने / किरकोळ विक्रेते यांनी अतिक्रमण केले असून तेथे एक नविन वॉच टॉवर (Watch tower) बसविणे आवश्यक आहे. गेट नं.01 च्या वॉलवर धारदार ब्लेडचे प्रोटेक्शन करावे. साईभक्तांचे सुरक्षिततेसाठी मंदिरालगतची असलेली अतिक्रमणे काढणे आवश्यक आहे.

7) मंदिर व मंदिर परीसरातील हालचालीवर लक्ष ठेवण्याकरीताचे सी.सी.टि.व्ही. कॅमे-याचे रेकॉर्डींगवर 24 तास लक्ष केंद्रीत ठेवणे आवश्यक आहे. श्री साईबाबा संस्थानमध्ये सी.सी.टि.व्ही. कंट्रोल रुम फक्त एकच आहे. समाधी स्थळापर्यंत येणाऱ्या व्ही.आय.पी. व स्थानिक साईभक्तांचे जाण्या-येण्याच्या रस्त्यांची पाहणी करणे. साईभक्तांना येण्याजाण्यासाठी असणाऱ्या सर्व गेटवर योग्य त्या सुविधा उपलब्ध करणे. संस्थानमधील सर्व कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणे. संस्थानच्या सर्व गेटवर बसविण्यात येणाऱ्या घातपात विरोधी यंत्रणांची नियमित तपासणी करणे. संस्थानच्या नियोजीत वाहनतळांना चेन लिंक फेन्स करुन सुरक्षा व्यवस्था कडक करणे.

उपरोक्तप्रमाणे दर्शविलेल्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून बसविण्यात येणाऱ्या यंत्रणा (मशिनरी) मंदिर परीसरात कोणकोणत्या ठिकाणी बसविण्यात यावे, याकरीता लागणाऱ्या सुरक्षा साहित्यांचा अंदाजित खर्चासह त्यांनी खालीलप्रमाणे तपशिल दिलेला आहे.

**A SECURITY CONSULTANCY REPORT BY CISF IN RESPECT OF SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI. DTD. 21/03/2016.**

## APPENDIX – "B"

**ACCESS CONTROL SYSTEM FOR SHRI SAIBABA SANSTHAN TRUST**

| Sr. No. | Item Description | Location | Qty | Rate in Rs. | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Biometric Smart Card reader | 1. Gate No.02(02 Nos)<br>2. Gate No.03(02 Nos)<br>3. Gate No.04(02 Nos)<br>4. Central Control room (01 Nos)<br>5. Cash Room (01 Nos)<br>6. Gaonkari Gate (01 Nos)<br>7. Prasadalaya (Approach way to kitchen ladoo Prasad) (02 Nos)<br>8. All Accomodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati (06 Nos)<br>9. Water reservoir (Gate no.02) (01 Nos) | 18 | 15,000 | 2,70,000 |
| 02 | 2 Biometric smart card / finger print readers controller with a buffer of | 1. Gate No.02(01 Nos)<br>2. Gate No.03(01 Nos)<br>3. Gate No.04(01 Nos)<br>4. Central Control room (01 Nos)<br>5. Cash Room (01 Nos) | 14 | 35,000 | 4,90,000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 5000 transaction on the controller complete with power supply unit and enclosure | 6. Gaonkari Gate (01 Nos)<br>7. Prasadalaya (Appoach way to kitchen, laddo Prasad) (01 Nos)<br>8. All Accomodation facilities- SaiAshram, Sai Dharmashala, Dwarawati (06 Nos)<br>9. Water reservoir (Gate no.02) (01 Nos) | | | |
| 03 | Access control software | Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi | 01 | 1,00,000 | 1,00,000 |
| 04 | Electronic Magnetic lock | Emergency Gates i.e.<br>1. Darshan Queue 1 & 2 (Outer side mandir)- Total 02 Nos<br>2. Darshan Queue Bhakti niwas (Ground Floor- 02 Nos, First floor-01, Second Floor-01) Total-04<br>3. Darshan Queue shanti niwas- (Ground floor- 02 Nos, First floor-01, Second floor-01, Third floor-01) Total-05<br>4. Strong Room<br>5. Cash counters in all accommodation facilities (Sai Ashram, Dharmashala, Dwarawati, Saibaba Hospitals) Total-05 | 17 | 6,500 | 1,10,500 |
| 05. | UVSS | Vehicle Gate No.04 | 01 | 15,00,000 | 15,00,000 |
| 06. | Bollards | Vehicle Gate No.04 (06 Nos) | 06 | 1,00,000 | 6,00,000 |
| 07. | Electrically operated sliding gates | 1. Gate No.02<br>2. Gate No.03<br>3. Gate No.04<br>4. Vehicle Gate No.04<br>5. Gate No.05<br>6. Prasadalaya (Approch way to kitchen, ladoo Prasad)<br>7. All accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala-02 Nos | 08 | 2,50,000 (Shall vary as per the length of the gate) | 20,00,000 |
| 08. | Flap barrier | 1. Gate No.02 - (02 Nos)<br>2. Gate No.03 - (02 Nos)<br>3. Gate No.04 - (02 Nos)<br>4. Gavkari Gate - (02 Nos)<br>5. Prasadalaya In Gate - (02 Nos)<br>6. All Accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati - 06 Nos | 12 | 1,00,000 | 12,00,000 |
| 09. | Electrically operated Boom Barrier | 1. Vehicle Gate No.04 Prasadalaya (In Gate)<br>2. Prasadalaya (Approch way to kitchen, ladoo Prasad)<br>3. All accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati-03 Nos<br>4. Water reservoir (gate no.3) | 06 | 50,000 | 3,00,000 |
| 10. | Full Height Turn style | 1. Prasdlaya ((Approch way to kitchen, ladoo Prasad)- 02 Nos<br>2. Water reservoir (gate no.02) -01 Nos. | 03 | 90,000 | 2,70,000 |
| | | | | Total | 68,40,500 |
| 11. | Cable 8 X 1 sq mm armoured | | Lot | | |

# APPENDIX – "C"

## FINANCIAL IMPLICATIONS FOR GADGETS INSTALLATION AT SHRI SAIBABA SANSTHAN TRUST

| Sr. No. | Item Description | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | Access Control System for SSST | As per Appendix-B | | 68,40,500 |
| 02. | Control Panel<br>i) Mandir Complex<br>ii) Prasadalaya<br>iii) Accomodation Facilities (03 Nos)<br>iv) Water Reservoir | 06 | 25,000 | 1,50,000 |
| 03. | X-Ray baggage inspection systems<br>Gate-02 01 Nos.<br>Gate-03 01 Nos.<br>Gate-04 01 Nos.<br>Gate-05 01 Nos.<br>Prasadalaya (IN Gate)-01<br>All Accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati-03 Nos | 08 | 15,00,000 | 1,20,00,000 |
| 04 | DFMD<br>Gate-02 02 Nos.<br>Gate-03 03 Nos.<br>Gate-04 03 Nos.<br>Darshan Queue (1&2)-08 Nos<br>Prasadalaya (IN Gate)-02 Nos<br>All Accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati-06 Nos | 24 | 1,00,000 | 24,00,000 |
| 05. | Body Scanner | 02 | 70,00,000 | 1,40,00,000 |
| 06 | VHF<br>Static base sets with antenna, battery and accessories | 12 | 34,500 | 4,14,000 |
| 07 | VHF hand set with accessories | 75 | 16,000 | 12,00,000 |
| | | | Total | 3,70,04,500 |
| * | Add 10% as installation / testing charges cable supply, Laying etc. Shall be extra | | + | 37,00,450 |
| | | | Total (appro.) | 4,07,04,950 |
| All specifications are indicative for illustrating the concept. The prices are approximate and tend to vary subsrantially with brand, specifications and features. | | | | |

तरी उपरोक्तप्रमाणे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (C.I.S.F) यांनी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून मंदीर, परीसर व संस्थान परीसरात पाहणी करुन दिलेल्या कन्सल्टंन्सी रिपोर्ट मध्ये आढळुन आलेल्या त्रुटी, करावयाच्या उपाययोजना व सुरक्षा साहित्य यंत्रणा खरेदीकामी रु. 3,70,04,500/- + 37,00,450/- (extra 10%) = 4,07,04,950/- (अक्षरी रुपये चार कोटी सात लाख चार हजार नऊशे पन्नास मात्र ) खर्च अपेक्षित असल्याचे कळविले होते.

दि.०९/१०/२०१६ रोजीचे मा.उपसमितीचे सभेत उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन (विषय नं.02, निर्णय क्र.६८९) 'केद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यांनी संस्थान परीसरात पाहणी करुन सादर केलेल्या अहवालामध्ये सुरक्षा साहित्य यंत्रणा खरेदी करणेची शिफारस केलेली आहे, त्यापैकी जे सुरक्षा साहित्य कायमस्वरुपी उपयोगी पडेल असे साहित्य खरेदी करणेस हरकत नाही, तसेच महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळास

सुरक्षा ऑडिट करणे संदर्भात आदेश देण्यात आलेला असून सदरहू साहित्य खरेदी करणेबाबत त्यांचाही अभिप्राय घेण्यात येऊन प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली. '

परंतु महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे पदाधिकारी श्री ए.बी.वाघमारे व इतर यांनी दि.२०-२१/०९/२०१६ रोजी संस्थान व परीसरात समक्ष पाहणी करुन इकडील कार्यालयास अहवाल सादर केला. सदरचे अहवालामध्ये त्यांनी फक्त सुरक्षा बंदोबस्त आराखडा सादर केलेला असून त्यांचेकडील प्राप्त अहवालामध्ये संस्थानला पुरेशा असलेल्या सुरक्षा साहित्यांबाबतचा उल्लेख केलेला नाही.

मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांनी दि.१२ एप्रिल, २०१७ रोजी 'संरक्षण विभागाकडील मेटल डिटेक्टर, सिक्युरीटी इक्युपमेंट खरेदी करणे विषयक प्रस्ताव सादर करणेत यावा' असे निर्देश केलेले आहे. तसेच दि.१२/०५/२०१७ रोजी मा.श्री. रंजनकुमार शर्मा, पोलीस अधिक्षक, अ.नगर व दि.१५/०५/२०१७ रोजी मा.श्री.विनयकुमार चोबे सो., विशेष पोलीस महानिरीक्षक यांनीही साईचे दर्शनार्थ आले असता शिर्डी येथे घेतलेल्या मिटींगमध्ये सुरक्षा साहित्य खरेदी करणेबाबत सूचना केलेली आहे.

नम्र मत :- दि.०९/१०/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आयत्या वेळेचा विषय नं.१८, निर्णय क्र.७५० अन्वये 'प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सीसीटीव्ही कंट्रोल सेलमार्फत सीसीटीव्ही व Security Surveillance यंत्रणा कार्यान्वीत करणे तसेच ध्वनीक्षेपण विभागाकडील Sound & Audio System अद्यावत करणेकामी एकच Consultant ची नेमणूक करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. '

त्यास अनुसरुन सीसीटीव्ही मार्फत Consultant नेमणूक करणेकामी दि.२५/०४/२०१७ रोजी ई-निविदा प्रसिध्द् करण्यात आली असून, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (C.I.S.F) यांनी सादर केलेल्या अहवालानुसार साईबाबा संस्थानला सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून कोणकोणते सुरक्षा साहित्यांची खरेदी करावी लागेल हे तांत्रिकदृष्टया सीसीटीव्ही मार्फत नेमण्यात येणा-या Consultant मार्फत तपासणी करुन आवश्यक तेच सुरक्षा साहित्य खरेदी करता येईल, असे नम्र मत आहे. परंतु सध्या साईभक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन हल्ली उपलब्ध असलेले दोन बॅगेज स्कॅनर नादुरुस्त असल्याने त्यात बॅगांची व पर्सची तपासणी होत नाही. तसेच गेट नं.१, २, ३, ४, द्वारकामाई मंदिर, मुखदर्शन प्रवेशद्वार, निवासस्थानांचे प्रवेशद्वार या ठिकाणी डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर असुन तेही जुने असल्याने बऱ्याचवेळा नादुरुस्त असतात.

करीता साईभक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीने व शताब्दी महोत्सवाचे निमीत्ताने होणारे गर्दीचे नियोजनकामी तातडीची गरज म्हणुन खालील नमुद केलेप्रमाणे तातडीने नवीन सुरक्षा साहित्य खरेदी करुन घेणे आवश्यक आहे.

| Sr.No. | Item Description | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | X-Ray baggage inspection systems<br>Gate-02 01 Nos. Gate-03 01 Nos.<br>Gate-04 01 Nos. Gate-05 01 Nos.<br>Prasadalaya (IN Gate)-01<br>All Accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati-03 Nos | 08 | 15,00,000 | 1,20,00,000/- |
| 02. | DFMD<br>Gate-02 02 Nos.<br>Gate-03 03 Nos.<br>Gate-04 03 Nos.<br>Darshan Queue (1&2)-08 Nos<br>Prasadalaya (IN Gate)-02 Nos<br>All Accommodation facilities- Sai Ashram, Sai Dharmashala, Dwarawati-06 Nos | 24 | 1,00,000 | 24,00,000/- |
| 03. | Body Scanner | 02 | 70,00,000 | 1,40,00,000/- |
| 04. | VHF<br>Static base sets with antenna, battery and accessories | 12 | 34,500 | 4,14,000/- |
| 05. | VHF hand set with accessories | 75 | 16,000 | 12,00,000/- |
| 06. | HHMD<br>Hand Held Metal Detector | 100 | 5000 | 5,00,000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | Total - | 3,05,14,000/- |
| * | Add 10% as installation / testing charges cable supply, Laying etc. Shall be extra | Add | + | 30,51,400/- |
| | | | Total- | 3,35,65,400/- |

तरी उपरोक्तप्रमाणे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (C.I.S.F) यांनी सादर केलेल्या अहवालानुसार साईभक्तांचे सुरक्षेच्या दृष्टीने तातडीची गरज म्हणुन वरील तपशिलाप्रमाणे (बॅगेज स्कॅनर, डिएफएमडी, एचएचएमडी, बॉडी स्कॅनर इ.) सुरक्षा साहित्य ई-निवीदा प्रक्रीया राबवुन खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.3,35,65,400/- (अक्षरी रु. तीन कोटी पस्तीस लाख पासष्ठ हजार चारशे मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचे विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावित सुरक्षा साहित्य खरेदी करणेकामी खुपच जास्त खर्च येत आहे. याकरीता उपरोक्त तक्त्यामधील अ.नं. ०१ चे साहित्य ८ नगांऐवजी ४ नग खरेदी करणेत येऊन, ते मंदिर परिसराचे प्रवेशद्वारांवर वापरणेत यावे. अ.नं.०२ चे साहित्य ४० नग खरेदी करणेत यावे. अ.नं.०३ चे साहित्य फक्त कॅश काऊंटींग हॉलसाठी ०१ नग खरेदी करणेत यावे. अ.नं.०४ चे ०२ नग, अ.नं.०५ चे ७५ नग व अ.नं.०६ चे ४० नग सुरक्षा साहित्य खरेदी करणेत यावे, असे ठरले. तसेच सदरहू सुरक्षा साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.३४** **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेश प्रक्रियेची माहिती अवलोकनार्थ सादर.**

**प्रस्ताव-** **सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम १७ (२ढ) सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणीक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१९१

**प्रस्ताविक:-** औदयोगिक प्रशिक्षणाचे प्रवेश ऑगस्ट २०१५ चे सत्रापासून शासकीय व सर्व खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये राज्य शासनाचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत ऑनलाईन पध्दतीने करण्याचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण /३३१५/प्रक्र-१७/व्यशि-३ दि.१४/०५/२०१५ क्र.०१ नुसार ठरलेले आहे. सदर नियमावलीत संवर्ग आरक्षणानुसार ८० टक्के जागा मध्यवर्ती प्रवेश पध्दतीने व २० टक्के जागा या संस्था स्तरावर भरणेबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच या प्रवेश पध्दतीत ७० टक्के जागा मुळ तालुका स्तरावर, ३० टक्के जागा तालुका बाहय स्तरावर भरणेबाबत निकष लावलेले आहेत. जर एखादया खाजगी औ.प्र.संस्थेला संस्था स्तरावरील २० टक्के जागा त्यांचे स्तरावर भरावयाचे नसतील तर त्या संस्थेने तसे लेखी स्वरुपात शासनाला कळविणे बंधनकारक केलेले आहे. त्यानुसार सदरचा विषय तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेत माहीतीस्तव व संस्थास्तरावरील २० टक्के जागा भरणे बाबतच्या निर्णयासाठी ठेवण्यात आला होता. त्यावर, "श्री साईबाबा औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमधील संस्था स्तरावरील २० टक्के जागा ऑगस्ट २०१५ चे सत्रापासून मध्यवर्ती प्रवेश प्रक्रियेव्दारे (CAP) भरणेत याव्यात तसेच प्रशिणार्थ्यांच्या प्रशिक्षण शुल्कामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात येऊ नये. परंतू शासनाच्या सुधारित दराने प्रशिक्षण अनामत रक्कम रु.५००/- व ग्रंथालय अनामत रक्कम रु.१००/- मात्र आकारण्यात यावी," असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाप्रमाणे ऑगस्ट २०१५ व ऑगस्ट २०१६ चे प्रवेश सत्रात १०० टक्के जागा मध्यवर्ती प्रवेश पध्दती (CAP ) व्दारे भरण्यात आलेल्या आहेत. आता इयत्ता १० वी चे निकालानंतर शासनाची प्रवेश सुचना प्रसिध्द होईल.

**मागणी:-** इयत्ता १० वी चे परिक्षेचे निकालानंतर ऑगस्ट २०१७ चे प्रवेशाकामी शासनाव्दारे लगेचच प्रवेश प्रक्रियेबाबतची कार्यवाही सुरु होईल. या सुरु होणा-या सत्राचे प्रवेश पध्दतीची माहिती अवलोकनार्थ सादर केली आहे.

**अनुमान:-** मान्यतेअंती कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** आता इयत्ता १० वी चे परिक्षेचे निकालानंतर ऑगस्ट २०१७ चे प्रवेशाकामी शासनाव्दारे लगेचच प्रवेश प्रक्रियेबाबतची कार्यवाही सुरु होईल. या सुरु होणा-या सत्राचे प्रवेश पध्दतीची माहिती अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर केली आहे.

**निर्णय क्र.४९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षणार्थ्यांना देण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेचे अवलोकण करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली. तसेच ऑगस्ट- २०१७ चे प्रवेश सत्रात १०० टक्के जागा मध्यवर्ती प्रवेश पध्दती (CAP ) व्दारे भरण्यात याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दि.०८.०६.२०१७ रोजीचे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४९२** दिनांक ०८.०६.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१** **श्री साई पालखी संमेलनासाठी वेलवेट पट्टी खरेदीचे व शिल्लक सन्मानचिन्हाची जुनी ॲक्रेलीक प्लेट काढून नविन ॲक्रेलीक प्लेट खरेदीकामी निम्नतम दर स्विकारणेत येऊन पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्रीसाई पालखी मंडळ प्रतिनिधींचे संमेलन बुधवार, दि.१४/०६/२०१७ रोजी संस्थानमार्फत सिद्ध संकल्प लॉन्स, राहाता येथे आयोजित करण्यात आले आहे. त्याकरीता मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२४, निर्णय क्र.३४३ नुसार साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या पदयात्री पालख्यांचे संमेलन आयोजित करणेकामी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे विविध विभागांनी करावयाचे कामास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे. मंदिर विभागची दि.१४/०५/२०१७ रोजीची मंजूर टिपणीनुसार खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करणेकामी स्थानिक दुकानदार यांचेकडुन कोटेशन्स मागविण्यात आली आहेत.

त्यानुसार सदर प्राप्त झालेले वेलवेट पट्टी खरेदीचे व शिल्लक सन्मानचिन्हाची जुनी ॲक्रेलीक प्लेट काढुन नवीन ॲक्रेलीक प्लेट खरेदीकामी कोटेशन्स खालीलप्रमाणे

**अ) वेलवेट पट्टीचे कोटेशन- ३००० नग**

| अक्र. | पुरवठाधारकांचे नांव | कोटेशन आवकदिनांक/.नं. |
|---|---|---|
| ०१ | मेसर्स.गंगवाल एण्ड सन्स, शिर्डी | ४२८२/ १९.०५.२०१७ |
| ०२ | मे.दिपाली एन्टरप्रायजेस, शिर्डी | ४२८३/१९.०५.२०१७ |
| ०३ | मे.सचिन एजन्सीज, शिर्डी | ४२८४/ १९.०५.२०१७ |
| ०४ | मे.साईसुख शांती होलसेलर, शिर्डी | ४३३२/ २०.०५.२०१७ |

**आ) सन्मानचिन्हाची जुनी ॲक्रेलीक प्लेट काढुन नवीन ॲक्रेलीक प्लेट खरेदीकामीचे कोटेशन- ८५० नग**

| अक्र. | पुरवठाधारकांचे नांव | कोटेशन आवकदिनांक/.नं. |
|---|---|---|
| ०१ | मे.रवि प्रिंटर्स,राहाता | ४२८१/ १९.०५.२०१७ |
| ०२ | मे.चित्रलेखा आर्ट, शिर्डी | ४४३८/ २२.०५.२०१७ |
| ०३ | मे.सोमवंशी एम.जी.राहाता | ४४३९/२२.०५.२०१७ |
| ०४ | मे.विरेश जैस्वाल, शिर्डी | ४५६२/ २३.०५.२०१७ |

उपरोक्तेप्रमाणे वेलवेट पट्टीचे कोटेशन ०४ कोटेशन्सय, सन्मानचिन्हाची जुनी ॲक्रेलीक प्लेट काढुन नवीन ॲक्रेलीक प्लेट खरेदीकामीचे कोटेशन ०४ कोटेशन्स दि.३०/०५/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेमध्ये/ उघडणेत आल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

**१) वेलवेट पट्टीचे कोटेशन- ३००० नग**

| **अक्र.** | **पुरवठाधारकांचे नांव** | **मागणी** | **दर प्रती नग** | **एकुण** |
|---|---|---|---|---|
| **०१** | **मेसर्स.गंगवाल एण्ड सन्स, शिर्डी** | **३०००** | १०.०० | ३०,०००.०० |
| ०२ | मे.दिपाली एन्टरप्रायजेस, शिर्डी | ३००० | १६.०० | ४८,०००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | मे.सचिन एजन्सीज, शिर्डी | ३००० | १५.०० | ४५,०००.०० |
| ०४ | मे.साईसुख शांती होलसेलर, शिर्डी | ३००० | ११.०० | ३३,०००.०० |

**२) सन्मानचिन्हाची जुनी ॲक्रेलीक प्लेट काढुन नवीन ॲक्रेलीक प्लेट खरेदीकामीचा तुलनात्मक तक्ता-**

| अ. क्र. | पुरवठाधारकांचे नांव | मागणी | दर प्रती नग | एकुण |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे.रवि प्रिंटर्स,राहाता | ८५० | ५०.०० | ४२,५००.०० |
| ०२ | मे.चित्रलेखा आर्ट, शिर्डी | ८५० | ३०.०० | २५,५००.०० |
| ०३ | मे.सोमवंशी एम.जी.राहाता | ८५० | २५.०० | २१,२५०.०० |
| **०४** | **मे.विरेश जैस्वाल, शिर्डी** | **८५०** | **२३.००** | **१९,५५०.००** |

उपरोक्तप्रमाणे –

अ.क्र.०१- वेलवेट पट्टी खरेदी करीता मेसर्स.गंगवाल एण्डन सन्सन, शिर्डी यांचे दर रु.१०/- सर्वात कमी (न्युनतम) आहे.

अ.क्र.०२- सन्मानचिन्हाची जुनी ॲक्रेलीक प्लेट काढुन नवीन ॲक्रेलीक प्लेट खरेदीकामी मे.विरेश जैस्वाल, शिर्डी यांचे दर रु.२३/- सर्वात कमी (न्युनतम) आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे वेलवेट पट्टी खरेदीकामी अ.क्र.०१- मेसर्स गंगवाल ए.एस. & कं., शिर्डी यांचे प्राप्त निम्नतम दर व अ.क्र.०२ शिल्लक सन्मानचिन्हाची जुनी ॲक्रेलीक प्लेट काढुन नवीन ॲक्रेलीक प्लेट मे.विरेश जैस्वाल, शिर्डी यांचे निम्नतम दरासंबंधीत चर्चा करणेकामी संबंधीतांना उपसमितीपुढे उपस्थित ठेवणेस व दर अंतिम झालेनंतर सबंधीतांना पुरवठा आदेश देणेस तसेच याकामी येणारे खरेदी खर्चाकरीता मा.व्यवस्थापन समितीस शिफारस करणेकामी प्रस्ताव मा.उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**साईसेवक संमेलनासाठी वेलवेट पट्टी खरेदी करणे व शिल्लक सन्मानचिन्हाची जुनी ॲक्रेलीक प्लेट काढून नविन ॲक्रेलीक प्लेट खरेदी करणेकामी निम्नतम दर असलेले पुरवठाधारक आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, उपसमितीने त्यांचेबरोबर दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, मेसर्स.गंगवाल एण्ड सन्स, शिर्डी यांनी वेलवेट पट्टीचे दर कमी करणेस असमर्थतता दर्शविली. तसेच मे.विरेश जैस्वाल, शिर्डी यांनी सन्मानचिन्हावरील जुनी ॲक्रेलीक प्लेट काढून नविन ॲक्रेलीक प्लेट बसविणेकामी प्रती नग रु.२२/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईसेवक संमेलनासाठी वेलवेट पट्टी खरेदी करणेकामी मेसर्स.गंगवाल एण्ड सन्स, शिर्डी यांचे प्रती नग रु.१०/- मात्र व सन्मानचिन्हावरील जुनी ॲक्रेलीक प्लेट काढून नविन ॲक्रेलीक प्लेट बसविणेकामी मे.विरेश जैस्वाल, शिर्डी यांचे प्रती नग रु.२२/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच सन्मानचिन्हावर SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI, "SHRI SAIBABA SAMADHI CENTENARY YEAR- 2017-18", या नावाची ॲक्रेलीकची प्लेट बसविणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

०२ **मशिनिष्ट ग्राईंडर या व्यवसायाचे Rectagular Magnetic Chuck चे प्राप्त झालेले दरपत्रकाचे तुलनात्मक तक्त्याबाबत.**

**सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम १७ (ढ२) सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणीक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०२/२०१७ चे सभेतील निर्णय क्र.९८

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा औदयोगिक प्रशिक्षण संस्थेत मशिनिस्ट ग्राईंडर हा व्यवसाय ऑगस्ट १९९३ या सत्रापासुन सुरु केलेला आहे. सदर व्यवसायाकरीता आवश्यक असलेली Praga Precession

Surface Grinding Mashine = 02 Nos. ही सन १९९८ मध्ये खरेदी करण्यात आलेली आहे. मशिनचे असेसरीज सोबत Rectangular  Magnetic Chuck प्राप्त झाला होता, त्याचची किंमत रु.१२९८०/- इतकी होती. सदरील मशिनवर या व्यवसायाचे प्रशिक्षणार्थ्यांचे नियमित प्रात्यक्षिक सुरु असते. मशिनचे असेसरीज सोबत प्राप्त झालेला Rectangular Magnetic Chuck चा उपयोग हा मशिनमध्ये जॉब पकडणेकामी केला जातो. मशिनचे असेसरीज सोबत प्राप्त झालेला Rectangular Magnetic Chuck हा खराब झालेला असल्याने मशिनवरुन जॉब न पकडला गेल्याजमुळे जॉब हवेत उडून दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. Rectangular Magnetic Chuck हा नियमित प्रात्यक्षिकात मशिनवर जॉब पकडणेकामी आवश्यक असल्याने तो नविन खरेदी करणेकामी संदर्भ क्र.१ नुसार मा.व्यवस्थासपन समितीने रक्कम रु.१,२२,७००/- मान्यता दिलेली आहे. संदर्भ क्र.२ चे पत्र क्र. एसएसएस/आयटीआय/स्टोअर/१७/२०/२०१५ दि.१३/०४/२०१७ नुसार १० पुरवठादारांकडून दरपत्रकांची मागणी करण्यात आलेली होती. दरपत्रक पाठविण्यासची अंतिम दि.२४/०४/२०१७ होती. प्राप्त झालेले चार दरपत्रके दि.१९/०५/२०१७ चे मा.खरेदी समितीच्यास सभेमध्यी समक्ष उघडण्यात आलेले आहेत. त्याबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | युनियन ट्रेडींग, नाशिक टॅक्ससह | के.पनकिट ॲण्ड कंपनी, मुबंई टॅक्ससह | ॲशियन सेल्स कॉर्पोरेशन, नाशिक टॅक्ससह | बॉम्बे मशिनरी ॲण्ड हार्डवेअर मार्ट, श्रीरामपुर टॅक्ससह | एकुण रक्कम टॅक्ससह |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Rectangular Permanent Magnetic Chuck Size-450x150mm. Appex make Model No.742 (06 Nos.) | <u>१०५०३७.४४</u> Appex make Model No.742 | ११८५४८.४८ Appex make Model No.742 | १०५०७८.३० Appex make Model No.742 | ११०३२२.०० Ultra make | १,०५,०३७.४४ |
| | | | | | | **१,०५,०३७.४४** |

वरील चार पुरवठाधारकांपैकी मे.बॉम्बेत मशिनरी ॲण्ड् हार्डवेअर मार्ट,श्रीरामपुर यांचे दर न्यनितम आहेत परंतु त्यां नी आपले मागणीनुसार Appex make, Model No 742 चे दर नमुद न केल्या मुळे त्यां चे दर ग्राहय धरण्याठत आलेले नाहीत. तिन पुरवठादारांपैकी मे.युनियन ट्रेडींग, नाशिक यांचे प्रति नग दर हे न्यूरनतम आहेत. मे.युनियन ट्रेडींग, नाशिक यांचे दर न्यूनतम असल्याने त्यांना Rectangular Permanent Magnetic Chuck 450x150mm Appex make Model No.742=०६ नग पुरविणेकामी पुरवठा आदेश द्यावा लागेल. सदरील दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता अवलोकनार्थ सोबत जोडलेला आहे.

**मागणी:-** दि.१९/०५/२०१७ रोजी मा.खरेदी समितीच्या सभेमध्ये उघडलेले Rectangular Permanent Magnetic Chuck 450x150mm Appex make Model No.742 चे दरपत्रकांचे तुलनात्मक तक्यातील न्यूनतम दर असलेले मे.युनियन ट्रेडींग, नाशिक यांना प्रस्ताविकात नमुद केल्याप्रमाणे ०६ नग पुरविणेकामी पुरवठा आदेश देता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मशिनीष्ट- ग्राईंडर या व्यवसायासाठी खरेदी करावयाचा Rectangular Permanent Magnetic Chuck 450x150mm Appex make Model No.742 चा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. त्यातील न्यूनतम दरधारक मे.युनियन ट्रेडींग, नाशिक यांना मा.स्थानिक उपसमितीपुढे समक्ष बोलावुन त्यांचेशी चर्चा करुन, त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता असावी.

**औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मशिनिष्ट ग्राईंडर या व्यवसायासाठी Rectagular Magnetic Chuck खरेदी करणेकामीच्या प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.युनियन ट्रेडींग, नाशिक हे दरांबाबत चर्चा करणेसाठी उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दरांवर चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करणेस असमर्थतता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मशिनिष्ट ग्राईंडर या व्यवसायासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ०६ नग Rectagular Magnetic Chuck खरेदी करणेकामी मे.युनियन ट्रेडींग, नाशिक यांचे दरपत्रकामधील मुळ निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

०३ **श्री साईप्रसादालयामधील चपात्या गरम व मऊ राहणेसाठी इन्सुलेटेड बॉक्स खरेदी करणे.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं १४.(भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

**प्रास्तविक**:- मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१५२ नूसार, श्री साई प्रसादालयातील चपाती गरम व मऊ रहाणेसाठी इन्सुलेटेड बॉक्स खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार जा.नं.एसएसएस/ वशि/ प्रसादा/ ३१६/ २०१७ दि.१९/०४/२०१७ चे पत्राद्वारे इन्सुलेटेड बॉक्स खरेदीकामी ०८ एजन्सीकडून दि.०५/०५/२०१७ अखेरपर्यंत दरपत्रक मागविणेत आलेले होते. त्यापैकी विहीत वेळेत खालील ०४ एजन्सींनी दरपत्रके सादर केलेली आहे.

| **अं.नं.** | **कोटेशनधारकाचे नांव** |
|---|---|
| १. | मे.सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर |
| २. | विजय नॉव्हेल्टीज, नाशिक |
| ३. | निलकमल लिमिटेड, नाशिक |
| ४. | मे.महेश इंजिनिअर्स, नाशिक |

वरील पुरवठादाराचे मुदतीत प्राप्त झालेले ०४ बंद कोटेशन दिनांक १९/०५/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, त्यात खालीलप्रमाणे दर देण्यात आलेले आहे.

| **अं.नं.** | **कोटेशनधारकाचे नांव** | **कंपनीचे नांव** | **२५/३० लि.क्षमतेच्या प्रती नगास दर रुपये** | **५० लि.क्षमतेच्या प्रती नगास दर रुपये** |
|---|---|---|---|---|
| १. | मे.सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर | निलकमल | रु.१८९०/- सर्व करांसहीत | **रु.२७४५/- सर्व करांसहीत** |
| | | मिल्टन कं. (३० लि. मध्ये) | रु.१५३०/- सर्व करांसहीत | ---- |
| | | सेलो (२० लि. मध्ये) | रु.२३३१/- सर्व करांसहीत | ----- |
| २. | विजय नॉव्हेल्टीज, नाशिक | निलकमल कं. | रु.२०९०/- सर्व करांसहीत | रु.३६१०/- सर्व करांसहीत |
| ३. | निलकमल लिमिटेड, नाशिक | निलकमल कं. | **रु.१७१०/- सर्व करांसहीत** | रु.३१२२/- सर्व करांसहीत |
| ४. | मे.महेश इंजिनिअर्स, नाशिक | निलकमल कं. | रु.१९७०/- सर्व करांसहीत | रु.३५९०/- सर्व करांसहीत |

**मागणी :-** उपरोक्त प्रास्तविकमधील तुलनात्मक तक्त्यानूसार श्री साई प्रसादालयातील चपाती गरम व मऊ रहाणेसाठी मे.सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर यांचे दर मिल्टन कं.३० लि.क्षमतेसाठी प्रती नगास रु.१५३०/- सर्व करांसहीत व निलकमल कं. ५० लि. क्षमतेसाठी प्रती नगास रु.२७४५/- सर्व करांसहीत असे निम्नतम दर आलेले आहेत.

**संस्थान अधिनियम ठराव यानूसार अनुमान/:-** आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** तरी श्री साई प्रसादालयातील चपाती गरम व मऊ रहाणेसाठी इन्सुलेटेड बॉक्स खरेदीकामी निम्नतम दरधारक यांना कार्यादेश देणेकामी पुढील कार्यवाहीसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**साईभक्तांना प्रसादभोजनामध्ये गरम चपाती मिळावी, हा उद्देश साध्य होणेसाठी, इन्सुलेटेड बॉक्स खरेदीकामी निम्नतम दरांचा विचार न करता, वापरण्यास योग्य असलेले व साईभक्तांना मिळेपर्यंत चपाती गरम रहावी, असे इन्सुलेटेड बॉक्स खरेदी करावे, असे उपसमितीचे मत झाले. याकरीता प्रसादालयामध्ये प्रत्यक्षात काम करणारे कर्मचारी व प्रसादालय प्रमुख यांचे अभिप्रायानुसार वापरण्यास योग्य असलेल्या निलकमल कंपनीच्या नमुन्याची निवड करण्यात आली.**

**त्यानुसार ५० लिटर क्षमतेच्या इन्सुलेटेड बॉक्स खरेदीकामीच्या प्रकियेमधील निम्नतम दरधारक मे.सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर हे आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी**

**उपस्थित होते. त्यांनी निकलकमल कंपनीचे ५० लिटर क्षमतेच्या इन्सुलेटेड बॉक्सचे दर कमी करणेस असमर्थतता दर्शविली.**

**तसेच निलकमल कंपनीच्या २५/ ३० लिटर क्षमतेच्या इन्सुलेटेड बॉक्ससाठी निलकमल लिमिटेड, नाशिक यांचे दर निम्नतम असून, ते सभेसमोर अनुपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साई प्रसादालयातील चपाती गरम व मऊ रहाणेसाठी ५० लिटर क्षमतेचे निलकमल कंपनीचे इन्सुलेटेड बॉक्स खरेदी करणेकामी मे.सोमनाथ गंगाधर रासने, संगमनेर यांचे व २५/ ३० लिटर क्षमतेचे निलकमल कंपनीचे इन्सुलेटेड बॉक्स खरेदी करणेकामी निलकमल लिमिटेड, नाशिक यांचे प्रती नग निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

०४ **पाणी पुरवठा विभागास प्लबींग मेन्टेनंसकरीता प्लबींग साहित्य खरेदी करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, 2004 मधील तरतूद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| 01 | 17 | समितीची कर्तव्ये व अधिकार | 1 | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| 02 | 17 | समितीची कर्तव्ये व अधिकार | 2 (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| 03 | 17 | समितीची कर्तव्ये व अधिकार | 6 | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

दि.22/12/2016 रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत याबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्र.928 संमत करण्यात आलेला आहे.

“....यावर सविस्तर चर्चा होऊन, ऐनवेळी पाईपलाईन लिकेज झाल्यास पाणी पुरवठा खंडीत होवू नये व पाणी वाया जावू नये यासाठी प्रस्तावात नमुद केलेले प्लंबींग साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु सदरहू खरेदीकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.”

**प्रस्तावना:-** श्री साईंच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या भक्तांना निवासाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून संस्थानमार्फत निवासस्थान इमारतींची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर इमारतीमधील खोल्या/हॉल साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीमध्ये साईभक्तांचे वापरासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी पाईपलाईन व्दारे पाण्याचे नळ कनेक्शन देण्यात आलेले आहेत. सततच्या वापराने ब-याच ठिकाणच्या पाईपलाईन, नळ लिकेज होत असतात. पाण्याचा अपव्यय होवू नये यासाठी सदर पाईपलाईनचे लिकेज झाल्यानंतर ते त्वरीत बंद करुन पाणी पुरवठा सुरळीत ठेवणे गरजेचे असते. यासाठी आवश्यक साहित्य कायमस्वरुपी विभागाकडे उपलब्ध ठेवावे लागते.

प्लंबींग मेन्टेनंसकरीता आवश्यक साहित्य पाणी पुरवठा विभागाकडील स्टोअर्समध्ये तसेच संस्थानचे मुख्य भांडार विभागाकडे उपलब्ध नसलेने ऐनवेळी पाईपलाईन लिकेज झाल्यास पाणी पुरवठा खंडीत होवू नये,

पाणी वाया जावू नये यासाठी सदरचे साहित्य खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु.2,95,550/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेस्तव सादर करणेत आलेला होता.

पाणी पुरवठा विभागाकडील दि.13/01/2017 रोजीचे मंजुर टिपणीनुसार याकामी ई-निविदा तयार करणेत येवून दि.17/02/2017 रोजीचे सामना व पुढारी या वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. याकामी फक्त 01 ई-निविदा प्राप्त झालेने इकडील विभागाकडील दि.13/03/2017 रोजीचे टिपणीन्वये मान्यता घेण्यात येवून फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येवून दि.12/04/2017 रोजीचे पुण्यनगरी व सार्वमत या वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरहू ई-निविदा ही www.mahatenders.gov.in या संकेतस्थळवर अपलोड करण्यात आलेली होती.

**प्रस्ताव:-** सदरहू कामी 04 ई-निविदा प्राप्त झालेने दिनांक 19/05/2017 रोजीचे मा.स्थानिक खरेदी समिती सभेत टेक्निकल बीड (तांत्रिक) उघडणेत आले. त्यामध्ये चारही ई-निविदाधारक पात्र झालेने दि.30/05/2017 रोजीचे मा.स्थानिक खरेदी समिती सभेत कमर्सियल बीड उघडणेत आलेले त्यामधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | साहित्याचा तपशिल/कंपनी/मागणी | एक्सेल ट्रेडिंग कंपनी मुंबई 01 | | एशियन सेल्स कार्पो. नाशिक 02 | | **संजय प्रेमसुख बंब कोपरगांव 03** | | श्री विद्यासागर एन्टर.,औरंगाबाद 04 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्र.नग किंमत | एकुण किंमत | प्र. नग किंमत | एकुण किंमत | प्र. नग किंमत | एकुण किंमत | प्र. नग किंमत | एकुण किंमत |
| 01 | आऊटलेट पाईप- 1.1/4" आय.एस.आय. मार्क, 300 नग. | 81.00 | 24300.00 | 37.00 | 11100.00 | 37.50 | 11250.00 | 54.00 | 16200.00 |
| 02 | इनलेट पाईप कोल्ड वॉटर- 1/2"x 2', प्रयाग, वॉटर टेक, 200 नग. | 90.00 | 18000.00 | 72.00 | 14400.00 | 57.00 | 11400.00 | 95.00 | 19000.00 |
| 03 | इनलेट पाईप हॉट वॉटर- 1/2"x2', 100 नग. | 216.00 | 21600.00 | 49.00 | 4900.00 | 65.00 | 6500.00 | 170.00 | 17000.00 |
| 04 | जी.आय पाईप- 1/2", सी-क्लास, स्वास्तिक/प्रकाश सुर्या, 500 फुट | 36.90 | 18450.00 | 37.00 | 18500.00 | 32.00 | 16000.00 | 37.00 | 18500.00 |
| 05 | जी.आय पाईप- 1", सी-क्लास, स्वास्तिक/प्रकाश सुर्या, 500 फुट | 66.60 | 33300.00 | 66.00 | 33000.00 | 57.00 | 28500.00 | 71.63 | 35815.00 |
| 06 | जी.आय युनियन- 1"(हेवी ISIमार्क, 50 नग. | 72.00 | 3600.00 | 62.00 | 3100.00 | 57.00 | 2850.00 | 83.68 | 4184.00 |
| 07 | जी.आय युनियन- 1.1/2", हेवी ISIमार्क, 50 नग. | 135.00 | 6750.00 | 110.00 | 5500.00 | 105.00 | 5250.00 | 145.75 | 7287.50 |
| 08 | जी.आय युनियन-2", हेवी, ISI मार्क, 50 नग. | 207.00 | 10350.00 | 174.00 | 8700.00 | 160.00 | 8000.00 | 235.00 | 11750.00 |
| 09 | फायबर प्रेस कॉक-1/2", प्रयाग/वॉटर टेक, 400 नग. | 144.00 | 57600.00 | 120.00 | 48000.00 | 94.00 | 37600.00 | 178.00 | 71200.00 |
| 10 | फायबर युरिनल प्रेस कॉक-1/2", प्रयाग/वॉटर टेक, 100 नग. | 135.00 | 13500.00 | 113.00 | 11300.00 | 95.00 | 9500.00 | 185.00 | 18500.00 |
| 11 | कमोड शिट कव्हर, सफेद, ISI मार्क, 100 नग | 468.00 | 46800.00 | 370.00 | 37000.00 | 315.00 | 31500.00 | 490.00 | 49000.00 |
| 12 | विमान टाईप जेट स्प्रे, 100 नग | 153.00 | 15300.00 | 152.00 | 15200.00 | 95.00 | 9500.00 | 290.00 | 29000.00 |
| 13 | टेपलॉन टेप 3/4", 20 मिटरचे, 500 नग | 31.50 | 15750.00 | 15.00 | 7500.00 | 25.00 | 12500.00 | 25.00 | 12500.00 |
| 14 | न्हाणी ट्रॅप जाळी 5" - स्टील, 200 नग | 54.00 | 10800.00 | 36.00 | 7200.00 | 20.00 | 4000.00 | 80.00 | 16000.00 |
| 15 | फ्लश टाकी, कमांडर/चॅम्पियन, 30 नग | 1152.00 | 34560.00 | 1170.00 | 35100.00 | 930.00 | 27900.00 | 1220.00 | 36600.00 |
| 16 | हेक्सा ब्लेड- 1", डबल, 200 नग | 5.40 | 1080.00 | 10.00 | 2000.00 | 8.00 | 1600.00 | 15.00 | 3000.00 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 17 | एम-सील-100 ग्रॅम पॅकिंग, 50 नग | 36.00 | 1800.00 | 28.60 | 1430.00 | 28.00 | 1400.00 | 30.00 | 1500.00 |
| 18 | फ्लश टॅन्क ॲसिसरीज-बॉल कॉकसह पुर्ण सेट,कमांडर, 40 नग | 0 | 0 | 690.00 | 27600.00 | 700.00 | 28000.00 | 700.00 | 28000.00 |
| | | | 333540.00 | | 291530.00 | | **253250.00** | | 395036.50 |

वरील तक्त्यात नमुद केलेनुसार, तुलनात्मक दृष्टया संजय प्रेमसुख बंब, कोपरगांव यांचे एकत्रित रु.2,53,250/- मात्र निम्नतम दर आहेत.

तरी पाणी पुरवठा विभागास प्लंबींग मेन्टेनंसकरीता आवश्यक साहित्य खरेदी करणेकरीता योग्य तो निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमिती सभेत निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी पुरवठा विभागास प्लंबींग मेन्टेनंसकरीता आवश्यक असलेले प्रस्तावित साहित्य खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील साहित्यानुसार प्राप्त झालेले निम्नतम दर स्विकारणेत यावे. परंतु जास्त साहित्यांसाठी निम्नतम दर असलेले संजय प्रेमसुख बंब, कोपरगांव हे जर उर्वरित साहित्यही खरेदीप्रक्रियेमधील निम्नतम दरानुसार पुरवठा करणेस तयार असतील व तसे लेखी स्वरुपात देण्यास तयार असतील तर सर्व साहित्य निम्नतम दराने पुरवठा करणेकामीचा त्यांना आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

०५ **साई पालखी मंडळ प्रतिनीधींचे संमेलन कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणे, गुलाब फुले व बुके पुरविणेबाबतचा तुलनात्मक तक्ता.**

श्री साईबाबा संस्थानमध्ये साईसेवक योजना सुरु करणेसंदर्भात, शिर्डीस पालखी घेऊन येणारे पालखीधारकांची सेवा घेणेकामी दि.14/06/2017 रोजी त्यांचे प्रतिनिधींचे संमेलन आयोजीत करणेत आलेले आहे. सदर संमेलनाच्या नियोजनाचा आढावा घेणेकामी दिनांक 15/04/2017 रोजी मा. उपकार्यकारी अधिकारी सो यांचे कक्षामध्ये आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये कार्यक्रमाच्या स्टेजला फ्लॉवर डेकोरेशन तसेच सन्मा. पाहुण्यांच्या स्वागतासाठी बुकेंची व्यवस्था करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

दि.23/05/2017 रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयान्वये, साई पालखी मंडळ प्रतिनीधींचे संमेलन कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणे, गुलाब फुले व बुके खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.90,000/- (नव्वद हजार) मात्र खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- आर्थीक विषय आहे.

मागणी- त्यानुसार साई पालखी मंडळ प्रतिनीधींचे संमेलन कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट गुलाब फुले व बुके खरेदी करणेकामी विविध फुलसजावट करणारे कारागीर यांचेकडुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. प्राप्त झालेली दरपत्रके दि.30/05/2017 रोजीच्या मा. खरेदी समिती सभेपुढे उघडण्यात आली असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | दरपत्रक सादरकर्त्याचे नाव | दरपत्रकात देऊ केलेले एकुण दर |
|---|---|---|
| 01 | एन.के.मॅनेजमेन्ट सर्व्हीसेस, नाशिक | रु. 1,15,800/- |
| 02 | त्र्यंबकेश्वर फ्लॉवर, लोणी | रु. 70,400/- |
| **03** | **भोसले फ्लॉवर डेकोरेटर्स** | **रु. 49,260/-** |
| 04 | द्वारकामाई फ्लॉवर, शिर्डी | रु. 58,300/- |
| 05 | श्री साई फ्लॉवर डेकोरेटर्स, मांजरी खु. (पुणे) | रु. 69,500/- |

**विभागाचा अभिप्राय-** तरी साई पालखी मंडळ प्रतिनीधींचे संमेलन कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट, गुलाब फुले व बुके खरेदी करणेकामी उघडण्यात आलेल्या दरपत्रका मध्ये अ.नं.03 चे भोसले फ्लॉवर डेकोरेटर्स यांचे एकुण दर रु.49,260/- (एकोणपन्नास हजार दोनशे साठ) मात्र सर्वात न्युनत्तम दर प्राप्त झालेला आहे. त्यामुळे भोसले फ्लॉवर डेकोरेटर्स यांना उपसमिती समोर चर्चेसाठी उपस्थित राहणेबाबत कळविता येईल. व त्यांना मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार कार्यादेश देता येईल. व त्यांचेकडुन साई पालखी मंडळ प्रतिनीधींचे संमेलन कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट, गुलाब फुले व बुके खरेदी करणेस मान्यतेसाठी निर्णयार्थ सादर.

**साईसंमेलन कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट, गुलाब फुले व बुके खरेदी करणेकामीच्या प्रकियेमधील निम्नतम दरधारक भोसले फ्लॉवर डेकोरेटर्स हे आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. उपसमिती सभेने त्यांचेबरोबर दरांवर चर्चा केली असता, त्यांनी एकत्रित रु.४५,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईसंमेलन कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणे व कार्यक्रमासाठी गुलाब फुले, बुके खरेदी करणेकामी भोसले फ्लॉवर डेकोरेटर्स यांचे एकत्रित रु.४५,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

०६ **सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता सध्या यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत प्लबींग, मेटनेन्स/ स्वच्छतेचे कामासंबधी दि. ३०/०५/२०१७ रोजीचे खरेदी समिती सभेत वाणिज्यीक बीड उघडून प्राप्त झालेले निम्नतम दरधारकांचे दर स्विकारुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुदः-** १) २१ चा (१) (ग)- साईभक्तांना मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी /सुविधा पुरविणे.

२) (ख) साईभक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठरावः-** दि.०७/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४७७ अन्वये - यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सर्व निवासस्थानांच्या स्वच्छता कामांच्या निविदा एकत्रित काढण्यात याव्यात, जेणेकरुन चांगली सेवा मिळेल व त्यावर नियंत्रण ठेवणे सोपे होईल. याकरीता साईधर्मशाळा विभागाकडे सध्या यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत प्लंबींग, मेटनेन्स / स्वच्छतेचे काम सध्या करत असलेल्या ठेकेदारास इतर निवासस्थानांची मुदत संपेपर्यतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी.

**प्रस्तावीकः -** साईधर्मशाळा विभागात एकुण ६ इमारती असुन १ इमारत साईबाबा संचलित कनिष्ठ महाविद्यालयास वापरण्यास देण्यात आलेली आहे. निवासासाठी एका इमारतीत ३२ हॉल प्रमाणे ५ इमारतीमध्ये एकुण १६० हॉल आहेत, सदरील हॉलमध्ये सहली, ग्रुपने येणारे साईभक्त,अंध/अपंग तसेच हॉस्पीटलमधील रुग्णांचे नातेवाईक, साईप्रसादालय परिसरातील साईभक्त इत्यादींची निवासव्यवस्था करण्यात येते.
साई धर्मशाळामध्ये निवासासाठी आलेल्या साईभक्तांना देण्यात आलेल्या हॉलचा दैनंदिन वापर करुन खाली केल्यानंतर त्याची साफ सफाई तसेच हाऊसकिपींग इमारतीच्या परिसराची स्वच्छता व मेटेनन्स इ. कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेतली जातात.

संदर्भ क्र.२ उपरोक्त ठरावास अनुसरुन द्वारावती भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या निवासस्थानांच्या हाऊसकिपींग स्वच्छता कामांची एकत्रित ई-निविदा प्रक्रिया द्वारावती भक्तनिवास विभागामार्फतराबविणेत यावी असा आदेश झाला.

त्यानुसार द्वारावती भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकरीता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता हाऊसकिपींग कामासाठी येणा-या खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन सादर करावे असे कळविले.

सन २०१६-१७ या मागील वर्षाकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवुन मे.सुमित फॅसिलीटीज प्रा.लि. पुणे यांचे दि. २८/१२/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि.१६/०२/२०१६ ते दि.१५/०२/२०१७ अखेर न्युनतम दर स्विकारुन तसेच दि.०७/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार पुढील पाच महिन्यांसाठी ( दि.१६/०२/२०१७ ते दि.३०/०६/२०१७ अखेर ) रु. ९०,००,०००/- (अक्षरी रुपये नव्वद लाख मात्र) चा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

| अ.नं. | कंपनीचे नांव | कालावधी | दरमहा सर्व करासह रक्कम रुपये | वार्षिक खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१. | मे.सुमित फॅसिलीटीज प्रा.लि. पुणे | दि.१६/०२/२०१६ ते दि.१५/०२/२०१७ | १९,०८,८९८/- | २,२९,०६,७७७.५६ |
| ०२. | मे.सुमित फॅसिलीटीज प्रा.लि. पुणे | दि.१६/०२/२०१७ ते दि.३०/०६/२०१७ | १८,००,०००/- | ९०,००,०००/- |

मे.सुमित फॅसिलीटीज प्रा.लि. पुणे यांचा कामाचा कालावधी दि.३०/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने साईधर्मशाळा विभागाकडील सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग मेटेनन्स/स्वच्छतेचे काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी संदर्भ क्र.१ नुसार मा.व्यवस्थापन समितीची रु.२,६०,००,०००/- (अक्षरी रु.दोन कोटी साठ लाख मात्र)वार्षीक खर्चास मान्यता मिळाली आहे. तसेच २३१ मनुष्यबळ संख्या व १०८ मशिनरी व उपकरणे यांची मान्यता घेऊन एकत्रीत ई-निविदा राबविणेकामी द्वारावती भक्तनिवास विभागाकडे प्रस्ताव सादर करणेत आला.

सन २०१७-१८ या वर्षाकरीता (दि. ०१/०७/२०१७ ते ३०/०६/२०१८ अखेर) साई आश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास या इमारतीच्या एका वर्षाकरीता परिसर स्वच्छता हाऊसकिंपींग व मेटेनन्स कामासाठी ई निविदा तयार करण्यासाठी मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार वर्तमानपत्रातुन तसेच माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानच्या अधिकृत संकेत स्थळावरुन संबंधित कामाची ई-निवीदेबाबत जाहिरात दि. १२/०४/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती.

तसेच ई.डी.पी. मॅनेजर यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याच्या महानिविदा संकेत स्थळावरुन ई-निविदा दि. १७/०४/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. महाराष्ट्र राज्याच्या संकेत स्थळावरून ई-निविदा प्रसिध्दी नंतर ई-निविदा व तांत्रिक बीडचे (Technical Bid) कागदपत्रे दाखल करण्याची मुदत दि.०२/०५/२०१७ रोजी सांयकाळी ५.०० वा. ठेवण्यात आली होती.

सदर ई-निविदेमध्ये मुदतीत ६ निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या. ऑनलाईन व समक्ष प्राप्त लिफाफा क्र. १ तांत्रिक बीड (Technical Bid) दि.१९/०५/२०१७ रोजी मा.खरेदी समिती सभेपुढे उघडणेत येऊन कागदपत्रांना कॅग रिपोर्टप्रमाणे गुण देऊन ज्या निविदाधारकांना ७० टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळाले आहेत, त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला असून त्यामध्ये पात्र अपात्र झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **निविदाधारकांचे नाव** | **मिळालेले गुण** | **पात्र** | **अपात्र** |
|---|---|---|---|---|
| ०१ | बक्क्षी सिक्युरिटी & पर्सनल सर्व्हिसेस प्रा.लिं.मुबई | **९५** | **पात्र** | **...** |
| ०२ | में. बी.व्हि.जी. इंडिया लिं. पुणे | **१००** | **पात्र** | **...** |
| ०३ | अपशॉट युटीलिटी सर्व्हिसेस, शिर्डी | **५५** | **...** | **अपात्र** |
| ०४ | बी.एस.ए. कार्पोरेशन लि.पुणे. | **१००** | **पात्र** | **...** |
| ०५ | एम.पी. एन्टरप्रायझेस ॲन्ड असोसिएटेड लि. पुणे. | **९५** | **पात्र** | **...** |
| ०६ | के. एच. एफ. एम. हॉस्पेटीलिटी ॲन्ड फॅसिलिटी मॅनेजमेन्ट सर्व्हीसेस प्रा. लि. मुबंई . | **७५** | **पात्र** | ... |

सदर निविदाधारकांचे कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन लेखाशाखा विभागाकडून तपासुन घेण्यात आलेले आहेत.

मागणीः- उपरोक्त प्रस्तावित तक्त्यात ६ पैकी ५ निविदाधारक कॅग रिपोर्ट (७० + ३० प्रमाणे % प्रमाणे) पात्र ठरलेले आहेत. पात्र् झालेल्या निविदा धारकांचे वाणिज्यीक बीड दि.३०/०५/२०१७ रोजी खरेदी समिती सभेपुढे महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन उघडणेत आले. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| **Sr No** | **Name Of Company** | **Toal Marks obtained (Out of 100)** | **70% weightage** | **Financial Bid** | **30% weightage** | **Total Weightage ( 4+6)** | **Remark** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | BAKSHI Security & Personnel Services Pvt. LTD. | 95 | 66.50 | 37286808.00 | 27.56 | 94.06 | L-2 |
| 2 | BSA Corporation Limited | 100 | 70.00 | 50602788.00 | 20.31 | 90.31 | L-4 |
| 3 | **Bvg India** | **100** | **70.00** | **34257255.70** | **30.00** | **100.00** | L-1 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | KHFM Hospitality & Facility Management Services Pvt ITD | 75 | 52.50 | 73044000.00 | 14.07 | 66.57 | L-5 |
| 5 | MP Enterprise and associated Limited | 95 | 66.50 | 39275040.00 | 26.17 | 92.67 | L-3 |

**उपरोक्त निविदाधारकांना कॅग रिपोर्ट** (७० **+** ३० प्रमाणे **%** प्रमाणे) गुण देण्यात आले असुन त्यामध्ये अ.नं.३ मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांना१०० **%** गुण असल्याने ते L-1 ठरत आहेत.

**मागणीः- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता** सध्या यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत प्लंबींग, मेटनेन्स/ स्वच्छतेचे कामासंबंधी दि.३०/०५/२०१७ रोजीचे खरेदी समिती सभेत वाणिज्यिक बीड उघडुन प्राप्त झालेले निम्नतम दरधारकाचे दर स्वीकारुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत...

**अधिनियम २००४ नुसार छाननी करुन अनुमानः-** मा. उपसमितीचे शिफारशीनुसार मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने पुढील कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-** सन २०१६-१७ या मागील वर्षाकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवुन मे.सुमित फॅसिलीटीज प्रा.लि. पुणे यांचे दि २८/१२/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि.१६/०२/२०१६ ते दि.१५/०२/२०१७ अखेर न्युनतम दर स्विकारुन तसेच दि.०७/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार पुढील पाच महिन्यांसाठी ( दि.१६/०२/२०१७ ते दि.३०/०६/२०१७ अखेर) रु. ९०,००,०००/- (अक्षरी रुपये नव्वद लाख मात्र )चा कार्यादेश देण्यात आलेला होता. सदर कामाचा कालावधी दि.३०/०६/२०१७ रोजी संपत असल्याने खरेदी समिती सभा दि.३०/०५/२०१७ रोजी निविदाधारकाचे वाणिज्यीक बीड उघडुन त्यामध्ये अ. नं. ०३ मधील मे.बी.व्ही.जी.इ.लि.पुणे यांचे दर न्युतम वार्षिक दर रु. ३,४२,५७,२५५.७० (अक्षरी रु. तिन कोटी बेचाळीस लाख सत्तावन हजार दोनशे पंच्चावन्न पै. सत्तर) मात्र प्राप्त झालेले आहेत.

सदर कामासाठी मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७ अन्वये रु.२,६०,००,०००/- (अक्षरी रु. दोन कोटी साठ लाख मात्र)वार्षिक खर्चास मान्यता मिळाली आहे.

तरी सन २०१७-१८ या वर्षाकरीता करण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेत न्युनतम दरधारकाचे दर रु. ३,४२,५७,२५५.७० (अक्षरी रु. तिन कोटी बेचाळीस लाख सत्तावन हजार दोनशे पंच्चावन्न रु. सत्तर पै.) प्राप्त झालेले असून सन २०१७-१८ साठी रु. ८२,५७,२५५.७०/- (अक्षरी रुपये– बेऐेशी लाख सत्तावन्न हजार दोशने पंच्चावन्न पै. सत्तर मात्रचे) वाढीव खर्चास मान्यता मिळणेस तसेच मे. बी. व्ही. जी. इ. लि. पुणे यांचे न्युतम दर स्विकारुन सन २०१७- १८ (दि. ०१/०७/२०१७ ते ३०/०६/२०१८ अखेर) या कालावधीसाठी हाऊसकिपींग कामासंबंधीचा कार्यादेश देण्यास मान्यता असावी.

सदर निम्नतम दरधारक मे.बी.व्ही.जी.इंडिया प्रा.लि. पुणे यांना स्थनिक उपसमितीचे सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेस व हाऊसकिपींग कामाचा सन २०१७-१८ (दि. ०१/०७/२०१७ ते ३०/०६/२०१८ अखेर) एक वर्षासाठी कार्यादेश देणेकरीता मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सदरचा विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावित कामीच्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या किमान वेतनामध्ये प्रत्येक वर्षी जानेवारी व या जुलै मह्यिांमध्ये वाढ होत असते, या कारणास्तव ई-निविदेमधील निम्नतम दर अंतीम समजणेत यावे, अशी त्यांनी विनंती केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम धर्मशाळा विभागाचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत प्लबींग, मेटनेन्स/ स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांचे प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामध्ये नमुद केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, सदरहूकामी त्यांना दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ अखेर एक वर्ष कालावधीसाठी कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

०७ **बेडशिट, उशिकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करण्याचे कामाचा कार्यादेश देणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम- २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडुन विश्वस्तव्यवस्था निधींचा विनियोग करणे" अशी तरतुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव:-** दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.६० व निर्णय क्र. ६० नुसार सन २०१७-१८ या वर्षाकरीता साईधर्मशाळा विभागाकडील बेडशिट,उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करण्याचे कामासाठी नवीन ठेकेदाराची नेमणुक करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणा-या रु.३,००,००० मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

**प्रस्तावना:-** साई धर्मशाळा हा विभाग दि.१८/०७/२०१३ पासुन पालखी पदयात्रीतील साईभक्तांचे निवासव्यवस्थेसाठी सुरु करण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी एकुण सहा इमारती असून पैकी एक इमारत श्री साईबाबा संस्थान संचलित कनिष्ठ महाविद्यालय यांना वापरण्यासाठी दिलेली आहे. उर्वरीत पाच इमारतीमध्ये प्रत्येकी ३२ हॉल नुसार एकुण १६० हॉल साईभक्तांचे निवासासाठी वापरण्यात येत आहे.

जा.क्र.एसएसएस/वशी-साईधर्मशाळा/६४९२/२०१६, दि.२५/०२/२०१६ रोजीचा पुरवठा आदेशाने दि.१७/०२/२०१६ ते १६/०२/२०१७ अखेर बेडशिट, पिलोकव्हर व चादर धुणे/इस्त्री करणे कामासाठी खालील दरा प्रमाणे व अटी व शर्तीस अधीन राहुन मे. साईश्रध्दा लॉण्ड्री ॲण्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर यांना देण्यात आले होते.

| अ.क्र. | इमारतीचे नाव | तपशिल | दर |
|---|---|---|---|
| १ | साई धर्मशाळा विभाग | बेडशिट | रु.३.०० + सर्व्हीस टॅक्स |
| | | उशीकव्हर | रु. २.०० + सर्व्हीस टॅक्स |
| | | चादर | रु. ६.०० + सर्व्हीस टॅक्स |

तसेच जा.क्र./एसएसएस/वशी-साई धर्मशाळा/५७१०/२०१७ दि. ०३/०२/२०१७ रोजीचे कार्यादेशाने दि. १७/०२/२०१७ ते ३१/०३/२०१७ अखेर १ महिने १५ दिवसाचे कालावधीसाठी मागील दराने मुदत वाढ देण्यात आलेली होती.

दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय व दिनांक १४/०३/२०१७ रोजीचे मंजुर टिपणी नुसार श्री साईबाबा संस्थानचे साई धर्मशाळा मधील साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करण्याचे कामाबाबत अनुभवी व पात्र ठेकेदार यांचेकडुन सिलबंद दरपत्रक मागविणे बाबत दिनांक १०/०४/२०१७ वार सोमवार रोजीचे वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती.

दरपत्रक बंद पाकीटातुन स्विकारण्याची अंतिम मुदत दि. १८/०४/२०१७ वार मंगळवार सायं. ०५.०० वाजेपर्यंत होती. दिनांक १८/०४/२०१७ रोजी पर्यंतचे मुदतीत शिर्डी कार्यालयात ०६ दरपत्रकधारकांनी दरपत्रक प्राप्त झालेल्या असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| अ.नं | दरपत्रकधारकाचे नाव व पत्ता | टेक्नीकल बीड आवक क्रमांक | दरपत्रक आवक क्रमाक | प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | घरोंदा ड्रायक्लिनर्स, प्रो.पा. सौ कावेरी गोंविद राऊत, श्रीरामनगर, कनकुरी रोड, शिर्डी. ता. राहाता. मो. नं.९२२५७९७११६ | १४०९ | १४१० | १७/०४/२०१७ |
| २ | साई लक्ष्मी ड्रायक्लिनर्स, प्रो.पा चित्रा गोरख राऊत, श्रीरामनगर, कनकुरी रोड, शिर्डी. ता. राहाता. मो. ९०११०५२९३९ | १४०३ | १४०२ | १८/०४/२०१७ |
| ३ | साई श्रध्दा लॉण्ड्री ॲण्ड सर्व्हिसेस, श्री विजय अशोकराव चव्हाण, मु.पो. सावळीविहीर, ता. राहाता, जि. अ.नगर. मो. ०९९७५५३३१३३ | १४७६ | - | १८/०४/२०१७ |
| ४ | साईप्रसाद पॉवर लॉण्ड्री ॲण्ड आदेश ड्रायक्लीनर्स, नांदुर्खी बु// चौधरी क्लास समोर, ता. राहाता. मो. ९८८१८६७४३३ | १४७७ | १४७८ | १८/०४/२०१७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | साईदत्त ड्रायक्लिनर्स, मु.पो. शिर्डी ता. राहाता मो. नं. ८८०५५१८८१४ | १४८५ | १४८६ | १८/०४/२०१७ |
| ६ | साई श्रध्दा लॉण्ड्री मु.पो. शिडी ता. राहाता मो. | १४८८ | १४८७ | १८/०४/२०१७ |

साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करण्याचे कामासाठी आलेले ६ दरपत्रक दि. ०६/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत सिलबंद तात्रिक लिफाफे उघडण्यात आले व त्यामध्ये खालील ३ दरपत्रकधारक पात्र झालेले आहे.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नाव व पत्ता | अपात्र / पात्र |
|---|---|---|
| १ | साई श्रध्दा लॉण्ड्री ॲण्ड सर्व्हिसेस, श्री विजय अशोकराव चव्हाण, मु.पो. सावळीविहीर, ता. राहाता, जि. अ.नगर. मो. ०९९७५५३३१३३ | पात्र |
| २ | साईप्रसाद पॉवर लॉण्ड्री ॲण्ड आदेश ड्रायक्लीनर्स, नांदुर्खी बु// चौधरी क्लास समोर, ता. राहाता. मो. ९८८१८६७४३३ | पात्र |
| ३ | साई श्रध्दा लॉण्ड्री मु.पो. शिडी ता. राहाता मो. ९६५७८६७९८६<br>प्रो.पा. साईनाथ केशवराव काटकर | पात्र |

साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करण्याचे कामासाठी पात्र झालेल्या दरपत्रकधारकांचे दरपत्रक दि.१९/०५/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आले, त्यानुसार वाणिज्यीकीय दरपत्रकधारकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे–

| अ. नं. | दरपत्रकधारकाचे नाव | बेडशीट धुवून इस्त्री करणे | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | चादर धुणे |
|---|---|---|---|---|
| | | दर प्रति नगास ( सर्व करासह) | | |
| १ | साई श्रध्दा लॉण्ड्री ॲण्ड सर्व्हिसेस, श्री विजय अशोकराव चव्हाण, मु.पो. सावळीविहीर, ता. राहाता, जि. अ.नगर.<br>मो. नं. ०९९७५५३३१३३ | रु. ३.१० | रु.१.८० | रु.५.९० |
| २ | **साईप्रसाद पॉवर लॉण्ड्री ॲण्ड आदेश ड्रायक्लीनर्स, नांदुर्खी बु// चौधरी क्लास समोर, ता. राहाता. मो.नं. ९८८१८६७४३३** | **रु. २.००** | **रु.१.५०** | **रु.४.००** |
| ३ | साई श्रध्दा लॉण्ड्री मु.पो. शिडी ता. राहाता<br>मो. नं. ९६५७८६७९८६<br>प्रो.पा. साईनाथ केशवराव काटकर | रु. ३.५० | रु.२.०० | रु.६.५० |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्या नुसार मे. श्री साई प्रसाद पॉवर लॉण्ड्री ॲण्ड आदेश ड्रायक्लीनर्स, नांदुर्खी बु// यांचे दर न्युनतम असुन त्यांना २०१७-२०१८ या एक वर्ष कालावधी साठी कार्यादेश द्यावा लागेल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी अनुमान:-** सन २०१७-१८ सालासाठी साईधर्मशाळा विभागात बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करणेचे वार्षिक काम द्यावे लागणार आहे. त्यासाठी न्युनतम दरधारकांस कार्यादेश देणे बाबतचा विषय मा. उपसमितीचे सभेत सादर करावे लागणार आहे.

**मागणी:-** बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करण्याचे कामाचा कार्यादेश देणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/स्पस्ट मत:-** दि.१९/५/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीत दरपत्रक उघडण्यात आलेले असुन मे.श्री साई प्रसाद पॉवर लॉण्ड्री ॲण्ड आदेश ड्रायक्लीनर्स, नांदुर्खी बु// यांचे दर न्युनतम असुन त्यांना एक वर्षासाठी (०१/०६/२०१७ ते ३१/०५/२०१८ अखेर) कार्यादेश देण्याकरीता मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी तसेच न्युनतम दरधारकास मा.उपसमितीचे सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेस सदरचा विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेसमोर सादर.

**बेडशिट, उशिकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करणे कामीचे निम्नतम दरधारक मे.श्री साई प्रसाद पॉवर लॉण्ड्री ॲण्ड आदेश ड्रायक्लीनर्स, नांदुर्खी बु// हे आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. इतर दरपत्रकधारकांच्या दरांच्या तुलनेने खुपच दर कमी दिलेले असल्यामुळे दरपत्रकामधील मुळ निम्नतम दर अंतीम समजणेत यावे, अशी त्यांनी सभेस विनंती केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम धर्मशाळा विभागाकडील बेडशिट, उशिकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करणेकामी मे.श्री साई प्रसाद पॉवर लॉण्ड्री ॲण्ड आदेश ड्रायक्लीनर्स, नांदुर्खी बु/ यांचे प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

०८ **सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग इ.मेटनन्स व स्वच्छता कामासंबधी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग)" भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) "भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**व्यवस्थापन समितीचा ठराव:- मा.व्यवस्थापन समिती दि.०७/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ४७७.**

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे तरतुदीनुसारसन २०१७-१८ या वर्षाकरीता साईधर्मशाळा विभागामार्फतयांत्रिकीकरणासह हाउाकिपींग, विद्युत, प्लंबीग मेटेनन्स/ स्वच्छतेचे आऊटसोर्सिगं पध्दतीने करुन घेणेकामी मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत आला असता त्यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानच्या सर्व निवासस्थानांच्या हाऊसकिंपीग स्वच्छता कामांच्या निविदा एकत्रित काढण्यात याव्यात, जेणेकरुन चांगली सेवा मिळेल व त्यावर नियंत्रण ठेवणे सोपे होईल. याकरीता साईधर्मशाळा विभागाकडे सध्या यांत्रिकीकरणासह हाउाकिपींग, विद्युत,प्लंबीग मेटेनन्स/ स्वच्छतेचे काम करत असलेल्या ठेकेदारास इतर निवासस्थानांची मुदत संपेपर्यतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी.

उपरोक्त ठरावास अनुसरुनदि.०७/०९/२०१७ रोजी व्दारावती भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या निवासस्थानांच्या हाऊसकिपींग स्वच्छता कामांची एकत्रित ई-निविदा प्रक्रिया व्दारावती भक्तनिवास विभागामार्फत राबविणेत यावी असा आदेश झाला.

त्यानुसार व्दारावती भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास वसाईधर्मशाळा विभागाकरीता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता हाऊसकिपींगकामासाठी येणा-या खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन सादर करावे असे कळविले.

सन २०१६-१७ या मागील वर्षाकरीता ई- निविदा प्रकिया रावबून मे.बी.व्ही.जी.इंडिया.लि, पुणे यांचे मा.व्यवस्थापन समिती दि.१४/०७/२०१६ निर्णय क्र.४३८ अन्वये खालीलप्रमाणे न्युनतम दर स्विकारुन दि.०१/०७/२०१६ ते दि.३०/०६/२०१७ अखेर कार्यादेश देण्यात आला.

| अ.नं | कंपनीचेनांव | दरमहा सर्व करासह रक्कम रुपये | वाषिकदर |
|---|---|---|---|
| ०१ | मे.बी.व्ही.जी.इंडिया. लि, पुणे | ५८,४९,५००/- | ७,०१,९४,०००/- |

मे.बी.व्ही.जी.इंडिया.लि, पुणे यांचा कामाचा कालावधी दि.३०/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग मेटेनन्स/स्वच्छतेचे कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७ नुसाररु.५,६५,००,०००/-(अक्षरी रु.पाच कोटी पासष्ट लाख मात्रचे) वार्षिक खर्चास मान्यता मिळाली आहे. तसेच ५३६ मनुष्यबळ संख्या व२३९ मशिनरी व उपकरणे यांची मान्यता घेवून, एकत्रीत ई-निविदा राबविणेकामी व्दारावती भक्तनिवास विभागाकडे प्रस्ताव सादर करणेत आला.

व्दारावती भक्तनिवास विभागामार्फत साईआश्रम भक्तनिवास, व्दारावती भक्तनिवास व साईधर्मशाळा या निवासस्थानांच्या हाऊसकिपींग स्वच्छता कामासंबधी एकत्रित ई-निविदा राबविणेकामीच्या प्रस्तावास व ई-निविदा मसुद्यास दि.२९/०३/२०१७ रोजी मान्यता घेऊन,सदर ई-निविदा जाहिरात वर्तमान पत्रात जनसंपर्क विभागामार्फत दि.१२/०४/२०१७ रोजी प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा दि.१७/०४/२०१७ रोजी अपलोड करणेत आली.

ई-निविदा सादर करणेपुर्वी निविदाधारकांना येणा-या अडचणींचे निरसन करणेकामी दि.१८/०४/२०१७ रोजी प्री-बीड मिटींग घेण्यात येऊन, सदर मिटींगमधील चर्चेनुसार बदल करुन शुध्दीपत्र महाराष्ट्र राज्य शासनाच्या व संस्थानच्या संकेतस्थळावर अपलोड करुन, ई- निविदा अपलोड करणेची अंतीम मुदत दि.०२/०५/२०१७ देण्यात आली होती.

सदर ई-निविदेमध्ये मुदतीत ०६ निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या. ऑनलाइन व समक्ष प्राप्त लिफाफा क्र.१ तांत्रिक बीड (Technical Bid) दि.१९/०५/२०१७ रोजी मा.खरेदी समिती सभेपुढे उघडणेत येऊन, कागदपत्रांना कॅग रिपोर्ट प्रमाणे गुण देऊन ज्या निविदाधारकांना ७०% व त्यापेक्षा जास्त गुण मिळाले आहेत त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला असून त्यामध्येपात्र अपात्र झालेल्या निविदांचा तपशील पुढीलप्रमाणे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | मिळालेले गुण | ७०% पैकी | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|---|
| १ | बक्क्षी सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्व्हिसेस.प्रा.लि,मुंबई | ९५ | ६६.५० | पात्र |
| २ | बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे | १०० | ७०.०० | पात्र |
| ३ | अपशॉट युटीलिटी सर्व्हिसेस, शिर्डी. | **५५** | **३८.५०** | **अपात्र** |
| ४ | बी.एस.ए कार्पोरेशन लि, पुणे | १०० | ७०.०० | पात्र |
| ५ | एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे | ९५ | ६६.५० | पात्र |
| ६ | के.एच.एफ.एम हॉस्पेटीलिटी & फॅसिलिटी मॅनेजमेन्ट सर्व्हिसेस प्रा.लि, मुंबई | ७५ | ५२.५० | पात्र |

सदर निविदाधारकांचे कागदपत्रांचा (Technical Document) तुलनात्मक तक्ता तयार करुन लेखाशाखा विभागाकडून तपासून घेण्यात आलेले आहे.

**मागणी:-** उपरोक्त प्रस्तावित तक्त्यात ०६ पैकी ०५ निविदाधारक कॅग रिपोर्ट (७० + ३० % प्रमाणे) पात्र ठरलेले आहेत. पात्र झालेल्या निविदाधारकांपैकी फक्त ०४ निविदाधारकांनी साईआश्रम भक्तनिवास विभागाकरीता दर (BOQ) सादर केले आहे. सदर पात्र निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड (Financial bid) दि.३०/०५/२०१७ रोजी खरेदी समिती सभेपुढे महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थाळावर ऑनलाईन उघडणेत आले. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | सादर केलेले वार्षिक दर रु. पैसे | ३०% पैकी | स्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे | ७,८५,९६,०६४/- | ३० | L1 |
| २ | बक्क्षी सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्व्हिसेस.प्रा.लि,मुंबई | ८,५९,५६,४०८/- | २७.४३ | L2 |
| ३ | एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे | ९,०३,६५,६४०/- | २६.०९ | L3 |
| ४ | के.एच.एफ.एम हॉस्पेटीलिटी & फॅसिलिटी मॅनेजमेन्ट सर्व्हिसेस प्रा.लि,मुंबई | १४,८७,५८,०००/- | १५.८५ | L4 |

उपरोक्त निविदाधारकांना कॅग रिपोर्ट (७० + ३० % प्रमाणे)गुण देण्यात आले असून त्यामध्ये अ.नं.०१ मे.बी.व्ही.जी.इंडिया.लि, पुणे यांना १०० % गुण असल्याने ते L1ठरत आहेत.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** सन २०१६-१७ या मागील वर्षाकरीता मे.बी.व्ही.जी.इंडिया. लि, पुणे यांचे वार्षिक रक्कम रु.७,०१,९४,०००/- मात्र दरामध्ये हाऊसकिपींग कामाचा कार्यादेश देण्यात आला होता. सदर कामाचा कालावधी दि.३०/०७/२०१७ रोजी संपत असल्याने, खरेदी समिती सभा दि.३०/०५/२०१७ रोजी निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड (Financial bid)उघडून त्यामध्येअ.नं.०१ मे.बी.व्ही.जी.इंडिया.लि, पुणे यांचे निम्नतम वार्षिक दर रु.७,८५,९६,०६४/- (अक्षरी रु. सात कोटी पंच्याऐंशी लाख शहानो हजार चौसष्ट मात्र) प्राप्त झालेले आहेत.

सदर कामासाठी मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०२/२०१७ रोजी सभेतील निर्णय क्र.२७ अन्वये रु.५,६५,००,०००/- (अक्षरी रु. पाच कोटी पासष्ट लाख मात्रचे) वार्षिक खर्चास मान्यता मिळाली आहे.

तरी सन २०१७-१८ या वर्षाकरीता करण्यात आलेल्या ई-निविदा प्रकियेत न्युनतमदरधारकाचे दर रु.७,८५,९६,०६४/- (अक्षरी रु. सात कोटी पंच्याऐंशी लाख शहानो हजार चौसष्ट मात्र) प्राप्त झालेले असून, सन २०१७-१८ साठी रु.२,२०,९६,०६४/- (अक्षरी रु. दोन कोटी वीस लाख शहानो हजार चौसष्ट मात्र) वाढीव

खर्चास मान्यता मिळणेस, तसेच मे.बी.व्ही.जी.इंडिया.लि, पुणे यांचे न्युनतम दर स्विकारुन सन २०१७-१८ (दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८अखेर) एक वर्षासाठी कार्यादेश देणेस मान्यता असावी.

सदर निम्नतम दरधारकमे.बी.व्ही.जी.इंडिया.लि,पुणे यांना मा.स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेस, हाऊसकिपींग कामाचा सन २०१७-१८ (दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ अखेर) एकवर्षासाठी कार्यादेश देणेकरीता मा.व्यवस्थापन सभेकडे शिफारस करणेसाठी सदर प्रस्ताव मा.स्थानिक समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावित कामीच्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या किमान वेतनामध्ये प्रत्येक वर्षी जानेवारी व या जुलै महिन्यांमध्ये वाढ होत असते, या कारणास्तव ई-निविदेमधील निम्नतम दर अंतीम समजणेत यावे, अशी त्यांनी सभेस विनंती केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागाचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत प्लबींग, मेटनेन्स/ स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांचे प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामध्ये नमुद केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ अखेर एक वर्ष कालावधीसाठी कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

०९ **सन २०१७-१८ कालावधीसाठी न्युनतम दरधारकांस लॉन्ड्री कामाचा कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावना:-** सन २०१७-१८ या वर्षासाठी बेडशीट, उशी कव्हर, चादर, टॉवेल धुणे/इस्त्री करणे कामी रु.३२,००,०००/- (अक्षरी रु. बत्तीस लाख मात्र) चे खर्चास व त्याकामी दैनिक वर्तमान पत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन, ई-निविदा मागविण्यास मा.व्यवस्थापन समितीदि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६२मान्यता मिळालेली आहे.

सदरकामाकरीता दि.१६/०३/२०१७ रोजी जाहिरात व ई-निविदा मसुद्यास प्रशासकीय मान्यता घेऊन, जनसंपर्क विभागामार्फत दि.१२/०४/२०१७ रोजी दैनिक वर्तमानपत्रात, माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळ व ई.डी.पी विभागामार्फत महाराष्ट्र राज्य शासनाच्या संकेतस्थळावर ई-निविदा जाहिरात करणेत आली. जाहीरातीनुसारतीन निविदाधारकांनी निविदा प्रक्रीयेमध्ये सहभाग घेऊन ऑनलाईन टेक्नीकल बीड व प्राइज बीड कार्यालयीन वेळेपूर्वी सादर केले असलेबाबत ई.डी.पी विभागाने कळविले आहे.निविदाधारकांनी इकडील विभागाकडे कागदपत्रांच्या हार्ड कॉपीचा लिफाफा वेळेत सादर केलेले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | आवक नं. व दिनांक | लिफाफा संख्या |
|---|---|---|---|
| १ | साई श्रध्दा लॉण्ड्री ॲण्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर | २७०२ दि.०२/०५/२०१७ | १ |
| २ | साईराज लॉण्ड्री सर्व्हिसेस, सावळीविहीर | ३१४२ दि.०६/०५/२०१७ | १ |
| ३ | साईशुभम लॉण्ड्री, सावळीविहीर | ३१४३ दि.०६/०५/२०१७ | १ |

**प्रस्ताव:-** उपरोक्त प्राप्त निविदाधारकांचे तांत्रीक निविदा दि१९/०५/२०१७ रोजीच्याखरेदी समिती समोर उघडण्यात येऊन, तांत्रिक कागदपत्रांचा छाननी तक्ता तयार करण्यात येऊन लेखाशाखा विभागामार्फत तपासून घेण्यात आला आहे. तांत्रिक बीड मध्ये उपरोक्त तीनही निविदाधारक पात्र झाले आहेत.

तांत्रिक बीडमध्ये पात्र झालेल्या तीनही निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड (प्राइज बीड) खरेदी समिती व निविदाधारक यांचे समक्ष दि.३०/०५/२०१७ रोजी उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

**अ) संस्थानचे कपड्यांसाठी दर**

| अ.नं | कपड्यांचा तपशील | साई श्रध्दा लॉण्ड्री (विजय अशोक चव्हाण) प्रती नग दर रु. (सर्वकरासह) | साईशुभम लॉण्ड्री प्रती नग दर रु. (सर्वकरासह) | साईराज लॉण्ड्री प्रती नग दर रु. (सर्वकरासह) |
|---|---|---|---|---|
| १ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | **२.९०** | ३.४५ | ३.३० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | १.७५ | २.०० | १.७७ |
| ३ | टॉवेल धुवून ड्रायर करणे | ३.९० | २.९५ | २.७५ |
| ४ | चादर धुणे | ४.९० | ७.०० | ६.५० |

**ब) भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करणे कामासाठीचे दर**

| अ.नं | कपड्यांचा तपशील | साई श्रध्दा लॉण्ड्री (विजय अशोक चव्हाण) प्रती नग दर रु. (सर्वकरासह) | साईशुभम लॉण्ड्री प्रती नग दर रु. (सर्वकरासह) | साईराज लॉण्ड्री प्रती नग दर रु. (सर्वकरासह) |
|---|---|---|---|---|
| | **पुरुषांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | १६ | ३५ | ३४ |
| २ | शर्ट/टी शर्ट | ८ | १५ | १४ |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ८ | १५ | १४ |
| ४ | जाकेट/स्वेटर | ८ | २५ | २४ |
| | **पुरुषांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | ८ | २० | २० |
| २ | शर्ट/टी शर्ट | ४ | ७ | ७ |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ४ | ७ | ७ |
| ४ | जाकेट/स्वेटर | ४ | १२ | ११ |
| | **महिलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | |
| १ | साडी | २० | ६० | ४० |
| २ | ब्लाऊज | ६ | १५ | १२ |
| ३ | टी-शर्ट | ८ | १५ | १२ |
| ४ | स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट | ८ | १५ | १२ |
| ५ | पॅन्ट/जीन्स | ८ | १५ | १४ |
| ६ | नाईट सुट | १३ | २५ | २० |
| ७ | जाकेट/स्वेटर | ८ | २५ | २० |
| ८ | पेटीकोट/गाऊन | १० | १५ | १२ |
| | **महिलांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | |
| १ | साडी | १२ | ३५ | ३० |
| २ | ब्लाऊज | ३ | ७ | ६ |
| ३ | टी-शर्ट | ५ | ७ | ७ |
| ४ | स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट | ५ | ७ | ७ |
| ५ | पॅन्ट/जीन्स | ५ | ७ | ७ |
| ६ | नाईट सुट | ६ | ७ | ७ |
| ७ | जाकेट/स्वेटर | ५ | १२ | १२ |
| ८ | पेटीकोट/गाऊन | ३ | ७ | ७ |
| | **मुलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | १५ | २५ | २२ |
| २ | शर्ट/टी शर्ट | ८ | १५ | १५ |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ८ | १५ | १५ |
| ४ | जाकेट/स्वेटर | ८ | १५ | १५ |
| ५ | शॉर्ट पॅन्ट | ८ | १५ | १५ |
| | **मुलांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | ८ | १२ | १० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | शर्ट/टी शर्ट | ४ | ७ | ७ |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ४ | ७ | ७ |
| ४ | जाकेट/स्वेटर | ४ | ७ | ७ |
| ५ | शॉर्ट पॅन्ट | ४ | ७ | ७ |

**उपरोक्त तक्त्यात अधोरेखीत केलेले दर हे निम्नतम आहे.**

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-** उपरोक्त तीनही निविदाधारकांचे ई-निविदेव्दारे प्राप्त झालेले वाणिज्यिक बीड (प्राइज बीड) दि.३०/०५/२०१७ रोजीमा.खरेदी समिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामध्ये..

**१) साईश्रध्दा लॉन्ड्री ॲन्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर** (विजय अशोक चव्हाण) यांचे अ) संस्थानचे कपड्यांसाठीचे दर अ.नं. १,२ व ४ (अनुक्रमे बेडशिट धुवून इस्त्री करणे, उशीकव्हर धुवून इस्त्री करणे व चादर धुणे) व साईभक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे व इस्त्री करणे याकामाचे दर निम्नतम आहेत तसेच

**२) साईराज लॉन्ड्री, सावळीविहीर** यांचे अ) संस्थानचे कपड्यांसाठीचे दर अ.नं.०३ (टॉवेल धुवून ड्रायर करणे) कामाचे निम्नतम दर प्राप्त झाले आहेत.

सदर दोन्हीही निम्नतम दरधारकांना मा.स्थानिकउपसमिती सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेस व न्युनतम दरधारकांस लॉन्ड्री कामाचा कार्यादेश देणेकरीता मा.व्यवस्थापन समिती सभेकडे शिफारस करणेसाठी सदर प्रस्ताव मा.स्थानिक उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर, चादर, टॉवेल धुणे/ इस्त्री करणे कामीचे निम्नतम दरधारक साईश्रध्दा लॉन्ड्री ॲन्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर व साईराज लॉन्ड्री, सावळीविहीर हे आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. साईश्रध्दा लॉन्ड्री ॲन्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर यांनी दर कमी करणेस असमर्थतता दर्शविली. तसेच साईराज लॉन्ड्री, सावळीविहीर यांचे फक्त टॉवेल धुवून ड्रायर करणेकामी निम्नतम दर प्राप्त झालेले असून त्यांनी एकाच ॲटमसाठी काम करणेस असमर्थतता दर्शविली. याचवेळी साईश्रध्दा लॉन्ड्री ॲन्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर यांनी ई-निविदेमधील निम्नतम दराने टॉवेल धुवून ड्रायर करणेचे काम करणेस सहमती दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर, चादर, टॉवेल धुणे/ इस्त्री करणेकामी साईश्रध्दा लॉन्ड्री ॲन्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर यांना उपरोक्त निम्नतम दरांमध्ये कार्यादेश देण्यात यावा. तसेच टॉवेल धुवून ड्रायर करणेचे काम ई-निविदेमधील निम्नतम दरांमध्ये करणेस तयार असलेबाबत त्यांचेकडून लेखी स्वरुपात घेण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

१० **आऊटसोर्सिंग कामाचा सन २०१७-१८ कालावधीसाठी न्यनतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

०१) **२१ चा (१) चा (ग)- साईभक्तांना मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी /सुविधा पुरविणे.**

०२) **(ख) साईभक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे....**

**प्रस्तावीक:-** श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत व्दारावती भक्तनिवास इमारत येथे साई भक्तांना राहाण्याची व्यवस्था करण्यात येते. सदर इमारतीमधील खोल्या साईभक्तांनानिवासासाठी देण्यात येतात. त्या खोल्या भक्तांनी दैनंदिन वापर करुन खाली केलेनंतर त्याची साफ-सफाई तसेच हाऊसकिपींग इमारतीच्या परिसराची स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जातात.

**अधिनियम २००४ नुसार छाननी करुन अनुमान:-** दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ या पुढील एक वर्ष कालावधीसाठी व्दारावती भक्तनिवास इमारत व परिसराचे हाऊसकिपींग कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणे संस्थानचे दृष्टीने हितावह आहे. त्याकरीता मोठया विविध प्रकारच्या मशिनरी, लहान विविध उपकरणे, निविदेत नमुद केलेप्रमाणे स्वच्छतेचे केमिकल्स व कर्मचा-यांसह स्वच्छता/हाऊसकिपींग कामाकरीता (आऊटसोर्सिंग) ई-निविदा प्रक्रिया राबविणे.

**व्दारावती भक्तनिवास विभागाचा मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/२/२०१७ रोजीचे सभेतील विषय नं २६ निर्णय क्र.२६ अन्वये. सन २०१७-१८ या वर्षाकरीता द्वारावती भक्तनिवास इमारत व परिसर स्वच्छता / हाऊसकिपींगचे काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी गुणवत्ता व दर याचा विचार करुन, विहीत पध्दतीने ई- निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच सदरहू आऊट सोर्स कामासाठी प्राप्त होणाऱ्या निविदांना कॅग रिपोर्टप्रमाणे **(७०% व ३०%)** गुण देऊन, निविदा प्रक्रिया अंतीम करणेत यावी. अदाजे रुपये १,१२,१३,८९२/- (अक्षरी रुपये :- एक कोटी बारा लाख तेरा हजार आठशे ब्यान्नव रुपये मात्र) खर्चास मान्यता मिळालेली आहे.

सन -२०१७ -१८ या वर्षाकरीता(कालावधी दि.०१/०७/२०१७ ते दि. ३०/०६/२०१८ अखेर) व्दारावती भक्तनिवास या इमारतीच्या एका वर्षाकरीता परिसर स्वच्छता हाऊसकिपींग (आऊट सोर्सींग) कामासाठी ई निवीदा तयार करण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णया नुसार या कामासंबधी ई-निविदा मागविणे कामी जनसंपर्क कार्यालया मार्फत दि.१२/०४/२०१७ रोजी विविध वर्तमान पत्रातुन तसेच माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानच्या अधिकृत संकेत स्थळावरुन संबंधित कामाची ई- निवीदेबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच ज्युनियर ई.डी.पी.मॅनेजर श्री साईबाबा हॉस्पीटल यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याच्या संकेत स्थळावरुन ई-निविदा दि.१७/०४/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती.

महाराष्ट्र राज्याच्या संकेत स्थळावरुन ई-निविदा प्रसिध्दी नंतर ई-निविदा व तांत्रिक बीडचे (Technical Bid) कागदपत्रे दाखल करण्याची मुदत दि.०२/०५/२०१७ रोजी सांयकाळी ५.०० वा. ठेवण्यात आली होती. त्यानतंर स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक बीडचे (Technical Bid) कागदपत्राच्या मुळ प्रती (Soft Copy) शिर्डी, मुबंई कार्यालयात दि. ०६/०५/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करणेबाबत जाहीरातीत नमुद करण्यात आलेले होते. विषयांकित कामासंबधीत वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर प्रसिध्द करणेत आलेल्या जाहिरातीनुसार, निविदा शुल्क व बयाणा रक्कमेच्या डिमांड ड्राफ्टसह इतर कागदपत्राच्या मुळ प्रती म्हणजेच तांत्रिक निविदा खालील निविदा धारकांनी बंद पाकिटात संस्थानचे आवक विभागाकडे तसेच मुबंई कार्यालयात त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे जमा केलेल्या असून, सदरच्या निविदा व्दारावती भक्तनिवास विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त झालेल्या होत्या.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | निविदा जमा झाल्याचे ठिकाण | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | बक्क्षी सिक्युरिटी & पर्सनल सर्व्हिसेस प्रा.लिं.मुबई | शिर्डी कार्यालय | २९४६ दि. ०४/०५/२०१७ |
| ०२ | में. बी.व्हि.जी. इंडिया लिं. पुणे | शिर्डी कार्यालय | ३०८३ दि. ०५/०५/२०१७ |
| ०३ | अपशॉट युटीलिटी सर्विसेस , शिर्डी . | शिर्डी कार्यालय | ३११५ दि. ०५/०५/२०१७ |
| ०४ | बी.एस.ए. कार्पोरेशन लि.पुणे. | शिर्डी कार्यालय | ३११६ दि. ०६/०५/२०१७ |
| ०५ | एम.पी. एन्टरप्रायझेस अॅन्ड असोसिएटेड लि. पुणे. | शिर्डी कार्यालय | ३११७ दि. ०६/०५/२०१७ |
| ०६ | के.एच.एफ.एम.हॉस्पेटीलिटी अॅन्ड फॅसिलिटी मॅनेजमेन्ट सर्व्हीसेस प्रा. लि. मुबंई. | मुबंई कार्यालय | १८० दि.०६/०५/२०१७ |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे दिनांक ०६/०५/२०१७ रोजी सायंकाळी ०५ वाजेपर्यंत संस्थानचे शिर्डी कार्यालयात एकुण ०५ ई – निविदा प्राप्त झालेल्या आहेत. संस्थानचे मुबंई कार्यालयात ०१ निविदा प्राप्त झालेली आहे. या प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदेतील ई-निविदा पात्रते संदर्भातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली आहे.

त्यासाठी सर्वप्रथम तांत्रिक निविदेचा लिफाफा उघडुन त्यातील कागदपत्रे व बयाणा रक्कम मागणीप्रमाणे असल्यास कॅग रिपोर्ट प्रमाणे ७०% व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केलेल्या ई- निविदाधारकास महाराष्ट्र शासनाच्या संकेस्थळावरील बिल ऑफ क्वॉंटिटिज (BOQ) नुसार प्राप्त होणा-या निविदा धारकाचे आर्थिक निविदा (Financial Bid) उघडणेत आले आहे. उपरोक्त विवेचनास अनुसरुन व ई- निविदेच्या जाहीरातीत नमुद केलेनुसार, विषयांकित कामाच्या प्राप्त झालेल्या ०६ तांत्रिक निविदा (Technical Bid) म्हणजेच लिफाफे मा.खरेदी समितीसभेपुढे शनिवार दि.१९/०५/२०१७ रोजी उघडण्यात आले आहे. तसेच उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन लेखाशाखेमार्फत तपासुन घेऊन गुणांक देऊन व निविदा शुल्क चे डी.डी. लेखाशाखेत जमा करण्यात आले आहे.

तसेच निविदाधाराकाचे Technical Doucument मध्ये दिलेल्या अटी/शर्तीनुसार शानाच्या कॅग रिपोर्ट प्रमाणे ०६ निविदाधारकानी सादर केलेल्या कागदपत्रावरुन Technical Scores देण्यात येऊन ज्या कंपनीला ७० व त्यापेक्षा जास्त गुण मिळेल अशा कंपनीचे बीड ऑफ कोटेशन उघडण्यात येईल त्यानुसार निविदाधारकांना खालील तक्यात दर्शविल्या प्रमाणे गुण मिळालेले आहेत. त्याचा सविस्तर गुणांचा तक्ता खालील प्रमाणे सादर केलेला आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | मिळालेले गुण | पात्र | अपात्र |
|---|---|---|---|---|
| ०१ | बक्क्षी सिक्युरिटी & पर्सनल सर्व्हिसेस प्रा.लिं.मुबई | ९५ | पात्र | ... |
| ०२ | में. बी.व्हि.जी. इंडिया लिं. पुणे | १०० | पात्र | ... |
| ०३ | अपशॉट युटीलिटी सर्विसेस , शिर्डी . | ५५ | ... | अपात्र |
| ०४ | बी.एस.ए. कार्पोरेशन लि.पुणे. | १०० | पात्र | ... |
| ०५ | एम.पी. एन्टरप्रायझेस ॲन्ड असोसिएटेड लि. पुणे. | ९५ | पात्र | ... |
| ०६ | के. एच. एफ. एम. हॉस्पेटीलिटी ॲन्ड फॅसिलिटी मॅनेजमेन्ट सर्व्हीसेस प्रा. लि. मुबंई . | ७५ | पात्र | ... |

तरी उपरोक्त ०६ निविदाधाराकांपैकी शासनाच्या कॅग रिपोर्टप्रमाणे ०५ निविदाधारक पात्र झालेले असुन ०१ निविदाधारक अपात्र ठरलेला आहेत. पात्र ०५ निविदाधाराकांचे बीड ऑफ कोटेशन (प्राईज – बीड ) दि.३०/०५/२०१७ रोजी खरेदी समिती पुढे उघडुन त्याचा **तुलनात्मक तक्ता सादर केलेला आहे.**

| अ. नं | निविदाधारकाचे नाव | टेक्निकल बीड मिळालेले मार्क | ७०% पैकी | प्राईज बीड मधील एकुण रक्कम | ३०%पै की | एकुण % (४+६) | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | बक्क्षी सिक्युरिटी & पर्सनल सर्व्हिसेस प्रा.लिं.मुबई | ९५ | ६६.५० | १,२१,१६,४४८ | २८.२२ | ९४.७२ | SB -2(L3) |
| ०२ | में. बी.व्हि.जी. इंडिया लिं. पुणे | १०० | ७०.०० | १,१३,९९,१५४ | ३०.०० | १०० | SB -2(L1) |
| ०३ | बी.एस.ए. कार्पोरेशन लि.पुणे. | १०० | ७०.०० | १,२१,०९००८ | २८.२४ | ९८.२४ | SB -2(L2) |
| ०४ | एम.पी. एन्टरप्रायझेस ॲन्ड असोसिएटेड लि. पुणे. | ९५ | ६६.५० | १,३५,५४,४,४४ | २५.२२ | ९१.७२ | SB -2(L4) |
| ०५ | के.एच. एफ. एम. हॉस्पेटीलिटी ॲन्ड फॅसिलिटी मॅनेजमेन्ट सर्व्हीसेस प्रा. लि. मुबंई. | ७५ | ५२.५० | २,२०,३६,८०० | १५.५१ | ६८.०१ | SB -2(L5) |

*SB = SUCCESSFUL BIDDER

मे. बी.व्ही.जी इंडिया लि. पुणे. हे यशस्वी निविदाधारक आहे. उदा.- L1, तरी मे. बी.व्ही.जी इंडिया लि. पुणे. हे निम्नतम दरधारक असून त्यांना कामाचा कार्यादेश देण्याबाबत निर्णय होण्यास विनंती.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेतील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | बक्क्षी सिक्युरिटी & पर्सनल सर्व्हिसेस प्रा.लिं.मुबई | १,२१,१६,४४८ |
| ०२ | **में. बी.व्हि.जी. इंडिया लिं. पुणे** | **१,१३,९९,१५४** |
| ०३ | बी.एस.ए. कार्पोरेशन लि.पुणे. | १,२१,०९००८ |
| ०४ | एम.पी. एन्टरप्रायझेस ॲन्ड असोसिएटेड लि. पुणे. | १,३५,५४,४,४४ |
| ०५ | के. एच. एफ. एम. हॉस्पेटीलिटी ॲन्ड फॅसिलिटी मॅनेजमेन्ट सर्व्हीसेस प्रा. लि. मुबंई. | २,२०,३६,८०० |

| विभागाचे नाव | मनुष्यबळ संख्या | स्वच्छताकामी मशिनरी व उपकरणे संख्या | इतर साहित्य संख्या | केमिकल | दरमहा सर्व करासह रक्कम रुपये | वाषिक सर्व करासह रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| व्दारावती भक्तनिवास | ७६ | ०८ | ४३ | नामांकित कंपनीचे | ९,४९,९२९/- | १,१३,९९,१५४/- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २६ अन्वये १,१२,१३,८९२/- (अक्षरी रुपये:- एक कोटी, बारा लाख, तेरा हजार, आठशे, ब्यान्नव रुपये मात्र) खर्चास मान्यता मिळालेली आहे.

तरी सन २०१७-१८ या वर्षाकरीता करण्यात आलेल्या ई-निविदा टेंडर मध्ये रुपये - १,१३,९९,१५४/- (अक्षरी रुपये :- एक कोटी, तेरा लाख, नव्यान्व हजार, एकशे, चोपन्न रुपये मात्र) मे. बी.व्ही.जी इंडिया या निविदा धारकाचे निम्नतम दर पात्र ठरले आहे.

तरी सन २०१७-१८ या वर्षाकरीता १,८५,२६२/- (अक्षरी रुपये:- एक लाख, पंच्याऐंशी हजार, दोनशे बासष्ट मात्र) वाढीव खर्चास मान्यता मिळणेस तसेच मे. बी.व्ही.जी इंडिया लि. पुणे. यांना सन -२०१७-१८ (दि.०१/०७/२०१७ ते ३०/०६/२०१८) या वर्षा साठी स्वच्छता कामाचे साहित्य नामाकिंत कंपनीचे केमिकल व पदनिहाय प्रति दिनी ७६ कर्मचा-यासह दर महा रुपये- ९,४९,९२९ /- (अक्षरी रुपये – नऊ लाख, एकोनपन्नास हजार, नऊशे, एकोणतीस मात्र) (सर्व करासह) एक वषासाठी रुपये -१,१३,९९,१५४ (अक्षरी – एक कोटी, तेरा लाख, नव्यान्व हजार, एकशे, चोपन्न मात्र) (सर्व करासह) या रक्कमेत दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ या एका वर्षाच्या कालावधीसाठी यांत्रिकी करणासह निविदेतील अटी/शर्ती नुसार हाऊसकिपींग (आऊट सोर्सींग) काम निम्नतम दरधारकास कार्यादेश देण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी मा.स्थानिक उपसमितीचे सभेसमोर न्युनतम दरधारकास चर्चेसाठी बोलविणेस व सादर करणेस मान्यता असावी.

**प्रस्तावित कामीच्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या किमान वेतनामध्ये प्रत्येक वर्षी जानेवारी व या जुलै महिन्यांमध्ये वाढ होत असते, या कारणास्तव ई-निविदेमधील निम्नतम दर अंतीम समजणेत यावे, अशी त्यांनी सभेस विनंती केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती विभागाचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत प्लबींग, मेटनेन्स/ स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांचे प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामध्ये नमुद केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ अखेर एक वर्ष कालावधीसाठी कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास)

---

११ **सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात निरुपयोगी भंगार साहित्य विक्रीकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांतील उच्चतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूदः** महाराष्ट्र अधिनियम २००४ मधील कलम १४(२) (ग) व कलम १७(४) नुसार संस्थानमधील दैनंदिन वापराने जमा होणारे निरूपयोगी भंगार साहित्याची विक्री करणे.

**मा.व्यवस्थापन समितीचे ठराव व निर्णय-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.०२.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७९ नुसार स्थानिक परिसरातील व्यपा-यांकडून विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून त्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावीकः-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७ चे सभेतील निर्णयानुसार स्थानिक परिसरातील व्यापा-यांकडून Online ई-निविदा मागविणत येवून त्याप्रमाणे संस्थानला खालीलप्रमाणे एकूण-०६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | आवक नंबर | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री कांती देवजी परमार, मालेगांव | ११५४ | १३.०४.२०१७ |
| ०२ | श्री अकबरखॉं सांडेखॉं पठाण, कोपरगांव | १२७९ | १५.०४.२०१७ |
| ०३ | श्री धनराज रामजी चव्हाण, जळगांव. | १२८२ | १५.०४.२०१७ |
| ०४ | मे.न्यु इंडिया स्क्रॅप सेंटर, कोपरगांव | १२८४ | १५.०४.२०१७ |
| ०५ | मे.तुलसीदास वेलजी ॲन्ड कंपनी, कोपरगांव | १३५८ | १७.०४.२०१७ |
| ०६ | मे.जलाराम ट्रेडींग कंपनी, कोपरगांव | १३५९ | १७.०४.२०१७ |

सदरील प्राप्त ई-निविदांतील तांत्रिक निविदा माखरेदी समितीचे दि.०६.०५.२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आल्या असून निविदाधारक यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रिक छाननी अहवालानुसार खालीलप्रमाणे सर्व ०६ निविदाधारक पात्र झालेले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | दिनांक | पात्र/ अपात्र |
|---|---|---|---|
| ०१ | श्री कांती देवजी परमार, मालेगांव | ०६.०५.२०१७ | **पात्र** |
| ०२ | श्री अकबरखॉं सांडेखॉं पठाण, कोपरगांव | ०६.०५.२०१७ | **पात्र** |
| ०३ | श्री धनराज रामजी चव्हाण, जळगांव. | ०६.०५.२०१७ | **पात्र** |
| ०४ | मे.न्यु इंडिया स्क्रॅप सेंटर, कोपरगांव | ०६.०५.२०१७ | **पात्र** |
| ०५ | मे.तुलसीदास वेलजी ॲन्ड कंपनी, कोपरगांव | ०६.०५.२०१७ | **पात्र** |
| ०६ | मे.जलाराम ट्रेडींग कंपनी, कोपरगांव | ०६.०५.२०१७ | **पात्र** |

पात्र ०६ निविदाधारक यांनी सादर केलेल्या ई-निविदांतील वाणिज्यीक निविदा ( Financial Bid) दि.१९.०५.२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आलेल्या आहेत. यामध्ये अकबर सांडेखा पठाण,कोपरगांव व कांती देवजी परमार, मालेगांव यांचे दोन साहित्याचे दर समान आलेले आहेत. संबंधितांना समान कालावधी ठरवून कार्यादेश विभागून देता येईल. तसेच उच्चत्तम दरधारकांस मा.स्थानिक उपसमिती समोर चर्चेस उपस्थित राहणेसाठी कळविता येईल. निविदा धारकांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता माहीतीसाठी सोबत जोडला आहे.

**मागणी:-**

**अ)** उपरोक्त तपशिलानुसार तुलनात्मक दराचे तक्त्यातील व्यापा-यांचे नावाखालील Highlight केलेले दर उच्चत्तम आहेत. प्रस्तावीत केलेप्रमाणे ज्या व्यापा-यांचे दर समान आलेले आहेत, त्यांना समान कालावधी ठरवून कार्यादेश विभागून देता येईल. तसेच उच्चत्तम दरधारकांस मा.स्थानिक उपसमिती समोर चर्चेस उपस्थित राहणेसाठी कळविणेस मान्यता असावी.

**ब)** संस्थान नियमाप्रमाणे उच्चत्तम दर असलेल्या व्यापा-यास संस्थानमधील दैनंदिन वापराने जमा होणारे सादिल स्वरूपाचे तसेच वापरून खराब झालेले निरूपयोगी भंगार डेडस्टॉक साहित्य ई-निविदेतील वार्षिक उच्चत्तम दराने संबंधीत व्यापा-यास कार्यादेश देणेसाठी मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सदरील विषय मा.स्थानिक उपसमिती सभेत निर्णयार्थ सादर.

**सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात निरुपयोगी भंगार साहित्य विक्रीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक ठेकेदार आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. त्यांचेसमोर उपसमितीने याकामी ई-निविदेमध्ये प्राप्त झालेल्या दरांच्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास आले की, काही साहित्य विक्रीकामी मागील वर्षाच्या दरांपेक्षा कमी दर प्राप्त झालेले आहे. यावर उपसमितीने असे साहित्य मागील वर्षाच्या उच्चतम दरामध्ये खरेदी करणेबाबत संबंधीत ठेकेदारांना निर्देश दिले, ठेकेदारांनी ते सभेसमोर मान्य केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात निरुपयोगी भंगार साहित्य विक्रीकामी ज्या साहित्यांसाठी मागील वर्षातील दरांपेक्षा जादा उच्चतम दर प्राप्त झालेले आहेत, ते स्विकारणेत यावेत. तसेच ज्या साहित्यांसाठी मागील वर्षाचे दरांपेक्षा कमी दर प्राप्त झालेले आहेत, असे साहित्य मागील वर्षाच्या उच्चतम दराने विक्री करणेस व तसा संबंधीतांनाकार्यादेश देण्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष)

---

१२ **कनिष्ठ महाविद्यालयातील व्यासपीठ (फलाट) तयार करणेकामी प्लायवुड खरेदी करणेसाठी उघडणेत आलेल्या दरपत्रकांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:** अधिनियमाचे कलम-२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.२८९ खालीलप्रमाणे समंत करण्यात आलेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयातील व्यासपीठ (फलाट) तयार करणेकामी आवश्यक असलेले प्लायवूड व रंगमटेरीअल विहित पध्दतीने दरपत्रके मागविणेत येऊन खरेदीकरणेस व त्याकामी येणा-या अंदाज रु.१,०६,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."*

**प्रस्तावना:** सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरीता संस्थानचे अंतर्गत लेखा परिक्षक यांचे प्रतिनिधींनी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाची पहाणी केली असता कनिष्ठ महाविद्यालयाकडील प्रत्येक वर्गामध्ये शिक्षकांचे शेवटच्या बाकावरील विद्यार्थांपर्यत लक्ष जावे यासाठी व्यासपीठ (फलाट) तयार करणेस सूचना केली आहे. त्यानुसार श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी त्यांचे दि.०३/०३/२०१७ रोजीचे पत्रानुसार इकडील विभागास फलाट तयार करणेस कळविले आहे. याकामी मेकॅनिकल विभागामार्फत १० फुट लांब व ४ फुट रुंद व ९ इंच उंच साईजची एम.एस. स्क्वेअर पाईपची फ्रेम बवून घ्यावी लागेल. सदरहू फ्रेम बनवणेसाठी रु.३९,०००/- मात्र खर्च अपेक्षित असल्याचे मेकॅलिकल विभागामार्फत कळविण्यात आले आहे. सदरहू फ्रेमवर इकडील विभागामार्फत १८ एम एम जाडीचे कमर्शिअल प्लायवूड बसवावे लागणार आहेत.

**प्रस्ताव:** उपरोक्त विषयांकीतकामी खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | मटेरीअलचा तपशिल | परिमाण/ एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | १८ एम एम कर्मशिलअल प्लायवूड साईज- ८'X ४' | २४ नग | २४००/- | ५७,६००/- |
| ०२ | ऑईल पेंट | ३० लिटर | २१०/- | ६,३००/- |
| ०३ | टरपेन ऑईल | १० लिटर | ८०/- | ८००/- |
| ०४ | वुड प्रायमर | २० लिटर | १५५/- | ३,१००/- |
| ०५ | एम.एस. स्वेअर पाईप साईज- ४०X४०X३एम एम | ७५० फुट | ५२/- | ३९,०००/- |
| | | | **एकूण रुपये** | **१,०६,८००/-** |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे सदरहुकामी येणारे रु.**१**,०६,८००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी व सदरचे कामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून मटेरीअल खरेदी करणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र. २८९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.त्यानुसार इकडील जा.क्र. २१७/२०१७ दि.०९/०५/२०१७ रोजीचे कोटेशन पत्रान्वये प्लायवूड खरेदीकामी सिलबंद कोटेशन मागविण्यात आले होते. सदरहूकामी ०५ पुरवठादार यांनी कोटेशन सादर केलेले आहे.

| अ.नं. | पुरवठादारांचे नांव/ गांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | गौतम प्लायवूड, कोपरगांव | ३८१७ | १३/०५/२०१७ |
| ०२ | प्रसाद प्लायवूड ॲण्ड हार्डवेअर, राहाता | ३७८० | १२/०५/२०१७ |
| ०३ | पटेल प्लायवूड ॲण्ड हार्डवेअर, शिर्डी | ३७८६ | १२/०५/२०१७ |
| ०४ | न्यु डेको होम, कोपरगांव | ४०४० | १५/०५/२०१७ |
| ०५ | सुमंगल प्लायवूड, कोपरगांव | ४०३३ | १६/०५/२०१७ |

सदरहू प्राप्त झालेले दरपत्रक मा. खरेदी समितीचे दि. १९/०५/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आले

| मालाचा तपशिल | परिमाण एकक | ठेकेदाराचे नांव | दर | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १८ एम एम कर्मशिअल प्लायवूड साईज- ८'X ४' मेक- ग्रिन प्लाय, सेंच्युरी, ग्रीन इकोटेक | २४ नग | गौतम प्लायवूड, कोपरगांव | २०८०/- | ४९,९२०/- बिर्ली | -- |
| | | प्रसाद प्लायवूड ॲण्ड हार्डवेअर, राहाता | २४९६/- | ५९,९०४/- (ग्रीन ईकोटेक) | -- |
| | | पटेल प्लायवूड ॲण्ड हार्डवेअर, शिर्डी | २,४४७/- | ५८,७२८/- (सेंच्युरी) | -- |
| | | **न्यु डेको होम, कोपरगांव** | **१,९८४/-** | **४७,६१६/- (ग्रीन ईकोटेक)** | **निम्नतम** |
| | | सुमंगल प्लायवूड, कोपरगांव | १,९९७.६३ | ४७,९१३/- (SMP) | -- |

उपरोक्तपैकी गौतम प्लायवूड, कोपरगांव व सुमंगल प्लायवूड, कोपरगांव यांनी कोटेशन पत्रात नमूद केलेल्या कंपन्याचे दर दिलेले नसल्याने त्यांचे कोटेशन अपात्र ठरविण्यात आले आहे. इतर पुरवठादार यांनी देऊ दरांचा तुलनात्मक तपशिल विचारात घेता पुरवठादार न्यु डेकोहोम, कोपरगांव यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत.

तरी उपरोक्त प्रमाणे न्यु डेको होम, कोपरगांव यांचे दर स्विकारुन त्यांचेकडून प्लायवूड खरेदीकरणेकामी त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

**प्रस्तावितकामीचे निम्नतम दरधारक ठेकेदार आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. त्यांनी दर कमी करणेस असमर्थतता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ महाविद्यालयामध्ये व्यासपीठ (फलाट) तयार करणेकामी आवश्यक असलेले प्लायवुड खरेदी करणेकामी न्यु डेको होम, कोपरगांव यांचे एकत्रित रु.४७,९१३/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**१३ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील पुरुष वॉर्डमध्ये ॲल्युमिनिअम पार्टीशन तयार करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.८९ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील पुरुष जनरल वॉर्डमध्ये ॲल्युमिनिअम पार्टीशन तयार करुन घेणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या रु.४८,१९९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावनाः-** मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त मान्यतेनुसार श्री साईबाबा हॉस्पीटलमधील पुरुष जनरल वॉर्डमध्ये ॲल्युमिनिअम पार्टीशन तयार करुन घेणेकामी इकडील जा.नं.१५४/२०१७ दि.०८/०४/२०१७ रोजी कोटेशन मागणी पत्राने कोटेशन मागविणेत आले असून, प्राप्त कोटेशन दि.१९/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिमाण / एकक | यशश्री ॲल्युमिनिअम ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव | | विमल ॲल्युमिनिअम ॲण्ड ग्लास, कोपरगांव | | रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | | साई ग्लास ॲण्ड ॲल्युमिनिअम वर्क्स, साकुरी | | श्री दुर्गा ग्लास ॲण्ड हार्डवेअर, नाशिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम |
| १. | Providing & Fixing in position powder coated aluminum Partition | 157.12 Sqft. | 160/- | 25139/- | 204.30 | 32099/- | 210/- | 32995/- | 210/- | 32995/- | 198/- | 31109/- |
| २. | Providing & Fixing in position single shuttered aluminum Door | 21 Sqft. | 210/- | 4410/- | 312/- | 6552/- | 622/- | 13062/- | 300/- | 6300/- | 245/- | 5145/- |
| ३. | Door Closer | 1 No. | 1200/- | 1200/- | | | | | 2300/- | 2300/- | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Total. | 30749/- | | 38651/- | | 46057/- | | 41595/- | | 36254/- |
| +13.5% Vat Rs. | 4151/- | | -- | | -- | | -- | | --- |
| Total Amount Rs. | **34900/-** | | 38651/- | | 46057/- | | 41595/- | | 36254/- |
| Remarks: | **Lowest** | | | | | | | | |

**प्रस्ताव:** तरी श्री साईबाबा हॉस्पीटलमधील पुरुष जनरल वॉर्डमध्ये अॅल्युमिनिअम पार्टीशन तयार करुन घेणेकामी ठेकेदार यशश्री अॅल्युमिनिअम अॅण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव यांचे निम्नतम दरानुसार येणारे रु.३४,९००/- मात्रचे खर्चास तसेच यशश्री अॅल्युमिनिअम अॅण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव यांना कार्यादेश देणेकरीता मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सदरील विषय मा. उपसमितीचे सभेचे निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावितकामीचे निम्नतम दरधारकास आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी बोलविणेत आले होते, परंतु ते सभेसमोर अनुपस्थित होते**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील पुरुष वॉर्डमध्ये अॅल्युमिनिअम पार्टीशन तयार करणेकामी यशश्री अॅल्युमिनिअम अॅण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव यांचे एकत्रित रु.३४,९००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**१४ साईआश्रम भक्तनिवासस्थान येथील लिफ्टचे ARD युनिटकरीता जुने बॅटरीज बायबॅक करुन नविन बॅटरीज खरेदी करणेकामी उघडण्यात आलेल्या कोटेशनबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३०३ अन्वये साईआश्रम भक्तनिवास येथील लिफ्टच्या ARD युनिटच्या जुनी बॅटरीज बायबॅक करुन नविन बॅटरीज खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये ९१,७२८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. सदर मान्यतेनुसार जा.नं. एसएसएसटी/ मेकॅनिकल/ ७०२/ २०१७ दिनांक ०९/०५/२०१७ अन्वये ८ पुरवठादार यांना दर देणेबाबत कळविण्यात आले होते. या पत्रात दरपत्रके पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक २०/०५/२०१७ पर्यत देण्यात आली होती. या मुदतीत खालील पुरवठादार यांचे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत :

| अ.नं. | पुरवठादारांचे नांव | अ.नं. | पुरवठादारांचे नांव |
|---|---|---|---|
| १. | मे. साई तेज एन्टरप्रायजेस, शिर्डी | २. | मे. साई बॅटरीज अॅण्ड इनव्हर्टर सेल्स सर्व्हीस, शिर्डी |
| ३. | मे. अजय बॅटरी अॅण्ड इनव्हर्टर, राहाता | ४. | मे. महिंद्रा बॅटरी अॅण्ड अॅटो पार्ट, साकुरी |

उपरोक्त पुरवठादारांचे प्राप्त झालेले ४ दरपत्रके दिनांक ३०/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले, त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत :

| अ.नं. | पुरवठादारांचे नांव | नविन बॅटरी दर रुपये | जुने बॅटरी बायबॅक दर रुपये | एकूण दर / नग (बायबॅक वजा जाता) | मागणी नग | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मे. साई तेज एन्टरप्रायजेस, शिर्डी | २,२००/- | ३६०/- | १,८४०/- | ५२ | ९५,६८०/- |
| २. | मे. साई बॅटरीज अॅण्ड इन्व्हर्टर सेल्स सर्व्हीस, शिर्डी | २,२५०/- | ३२०/- | १,९३०/- | ५२ | १,००,३६०/- |
| ३. | मे. अजय बॅटरी अॅण्ड इनव्हर्टर, राहाता | २,२२५/- | २८०/- | १,९४५/- | ५२ | १,०१,१४०/- |
| ४. | मे. महिंद्रा बॅटरी अॅण्ड अॅटो पार्ट, साकुरी | २,३१०/- | ३००/- | २,०१०/- | ५२ | १,०४,५२०/- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार मे. साई तेज एन्टरप्रायजेस, शिर्डी यांचे जुनी बॅटरी बायबॅक जाता एका बॅटरी करीता रुपये १,८४०/- मात्रचे दर निम्नतम आहेत. सदर दराबाबत चर्चा/वाटाघाटी होणेकामी मा. स्थानिक उप-समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करुन पुढील कार्यवाही करता येईल.

तरी साईआश्रम भक्तनिवास येथील लिफ्टच्या ARD युनिटच्या जुनी बॅटरीज बायबॅक करुन नविन बॅटरीज खरेदी करणेकामी निम्नतम दरधारक मे. साई तेज एन्टरप्रायजेस, शिर्डी यांचेशी चर्चा / वाटाघाटी करुन पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव मा. स्थानिक उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावितकामीचे निम्नतम दरधारक मे.साई तेज एन्टेरप्रायजेस, शिर्डी हे आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. त्यांनी कोटेशनमध्ये दिलेले दर कमी करणेस असमर्थतता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, तरी साईआश्रम भक्तानिवास येथील लिफ्टच्या ARD युनिटच्या जुन्या बॅटरीज बायबॅक करुन नविन बॅटरीज खरेदी करणेकामी मे.साई तेज एन्टेरप्रायजेस, शिर्डी यांचे प्रती नग रु.१,८४०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

१५ **भांडार विभागाकरीता हमाली कामाचे मुदतवाढीबाबत.**

मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०२.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णयक्र. २७ अन्वये सन २०१६-१७ चे हमाली कामासाठी ई-निविदा मागविणेचा निर्णय झाला होता, त्यानुसार महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि. १०.०३.२०१६ ते दि.२९.०८.२०१६ या कालावधीत तीन वेळा ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली, त्यानंतर दोन वेळा मुदतवाढही देणेत आली, मात्र तरीही हमाली कामाचे ई-निविदेस प्रतिसाद मिळाला नाही.

त्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७०६ अन्वये सन २०१६-१७ करीता हमालीचे काम देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत यापुर्वी झालेले निर्णय रद्द करणेत येवून, याकामी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार जा.नं.एसएसएस/भांडार/ ३९०७/ २०१६, दि.२५.१०.२०१६ अन्वये स्थानिक हमालांकडून कोटेशन/ दरपत्रके मागविणेत आली, तसेच संस्थानचे संकेतस्थळावरही सदर कोटेशन मागणी फॉर्म व जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती.

त्यानंतर विहीत मुदतीत फक्त ०३ कोटेशन/ दरपत्रके प्राप्त झालेली होती, सदरचे कोटेशन दि.२८.१२.२०१६ रोजीचे मा. उप समितीचे सभेत उघडणेत आली व सभेतील निर्णयानुसार कोटेशनमधील निम्नतम दरधारक श्री. बबन बन्सी तनपुरे, शिर्डी व श्री. रामराव शंकर गायकवाड, शिर्डी, यांना माहे जानेवारी ते जुन २०१७ या कालावधीसाठी जा.नं. एसएसएस/भांडार/५८६३/२०१७ व जा.नं. एसएसएस/ भांडार/ ५८६४/ २०१७, दि.१०.०२.२०१७ अन्वये हमाली कामाचा कार्यादेश देण्यात आलेलाआहे, उपरोक्त आदेशानुसार त्यांचेकडुन हमालीचे काम करुन घेण्यात येत आहे. दि. ०१ जाने. ते दि.१५ मे.२०१७ या कालावधीत हमाली कामासाठी एकूण रु. १,१२,६००/- इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे, तसेच उर्वरित ९ महिन्यांसाठी शताब्धी वर्षातील संभाव्य वाढत्या गर्दीचा विचार करता अंदाजे रु. २,९०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

श्री. बबन बन्सी तनपुरेव श्री. रामराव शंकर गायकवाड,शिर्डी,यांनी त्यांचे दि.२०.०५.२०१७ व दि.२२.०५.२०१७ रोजीचे पत्रान्वये सन २०१७-१८ या आर्थिकवर्षातील पुढील उर्वरित नऊ महिन्यांसाठी (माहे जुलै २०१७ ते मार्च २०१८ पर्यंत) मागील आहे त्याच दरांमध्ये व अटी/शर्तीसह काम करणेस तयार असल्याचे संस्थानला कळविले आहे.

हमाली टेंडरची कार्यपद्धतीव दरांबाबत महाराष्ट्र शासनाचे, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर, यांचेकडुन माहिती घेतली असता, त्यांचे जा.क्र. जिउनि/वि-८/कृउबास/हमालीतोलाई/दरवाढ/१३, दि.१३.०६.२०१६ रोजीचे परिपत्रक दि.२५.०५.२०१७ रोजी संस्थानला प्राप्त झाले आहे. त्यानुसार शासनाचे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडुन हमाली कामासाठी तीन वर्षांतून एकदाच टेंडर काढुन दर निश्चित केले जातात, त्यांचे सध्यांचे हमालीचेदर रु. ५.२७ प्रती क्विंटल इतके आहे तर वाराई ही वाहन चालकाकडून अदा केली जात असल्याने त्या दराबाबत निश्चिती झालेली नाही, मात्र बाजारभावाप्रमाणे वाराई रु. ६०/- ते ७०/- प्रती टन असल्याचे समजते, संस्थानमध्ये हा दर प्रति टन रु.४०/- मात्र आहे.

**<u>सन २०१५-१६ व सन २०१६-१७ चे हमाली कामाचे दरांचा तक्ता खालीलप्रमाणे.</u>**

| **अ.नं.** | **मालाचे नांव/ वजन** | **परिमाण** | **सन २०१५-१६ चे हमालीचे दर** | | **सन २०१६-१७ चे हमालीचे दर** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | **रुपये** | **पैसे** | **रुपये** | **पैसे** |
| ०१ | साखर, गहू, तांदुळ, हरभरा, तुरदाळ, मुगदाळ, हरभरा डाळ व इतर किराणा माल. (२५/३०/३५ कि.गॅ. वजनाची गोणी) | प्रती क्विंटल | ०३ | ०० | ०३ | ७५ |
| ०२ | मिनरल वॉटर बॉक्स (१ लि./ ५०० मि.) | प्रती बॉक्स | ०० | ४० | ०० | ६० |
| ०३ | बिस्कीट, पेपर कप, चहा पावडर, कॉफी इ. बॉक्स | प्रती बॉक्स | -- | -- | ०० | ५० |

| अ.नं. | मालाचे नांव/ वजन | परिमाण | सन २०१५-१६ चे हमालीचे दर | | सन २०१६-१७ चे हमालीचे दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | पेपर पिशवी (२५ किलो वजनाची गोणी) | प्रती बॅग | -- | -- | ०० | ५० |
| ०५ | गावरान तुप, वनस्पती तुप, खाद्यतेल व काजु पाकळी यांचे डबे (१०/१५ कि.गॅ. वजनाचा डबा) | प्रती डबा | ०० | ५० | ०० | ८० |
| ०६ | पत्रावळ (१,००० नगाचा बंडल) | प्रती बंडल | -- | -- | ०० | ७५ |
| ०७ | ब्लिचींग पावडर(२५ किलो वजनाची गोणी) | प्रती गोणी | ०० | ७० | ०० | ५० |
| ०८ | लिंडेन बी.एच.सी. किंवा इतर पावडर (५०किलो वजनाची गोणी) | प्रती गोणी | ०१ | ०० | ०० | ५० |
| ०९ | तुरटी (सुटी असल्याने) | प्रती क्विंटल | ०२ | ०० | ०२ | ५० |
| १० | लोखंडी सामान | प्रती टन | २० | ०० | २० | ०० |
| ११ | पुस्तके/ फोटो, प्लॅस्टिक वस्तु, इतर | प्रती क्विंटल | ०४ | ०० | ०४ | ०० |
| १२ | क्यॉयर फोम गाद्या, चादरी गाठ,बेडशिट्स गाठ, उश्या गाठ. | तळ मजला | ०१ | ०० | ०१ | ०० |
| | | २/३ रा मजला | ०१ | ०० | ०१ | ०० |
| १३ | वाराई (संस्थान व्यतिरिक्त आलेल्या वाहनातुन) | प्रती टन | ४० | ०० | ४० | ०० |

वरील तक्त्याचे अवलोकन करता संस्थानचे सध्याचे हमालीचे दर हे शासनाचे सहकार, पणन व वस्त्रोद्योगविभागाने निश्चित केलेल्या दरांपेक्षा तसेच स्थानिक बाजारपेठेतील दरांपेक्षा जवळपास ४० %कमी आहेत, तसेच वरील दोन्ही हमालांना संस्थानचे हमालीकामाचा अनुभव असून त्यांचे आजपर्यंतचे कामकाज विनातक्रार व समाधानकारक आहे. त्यामुळे वरील दोन्हीहमालांना पुढील नऊ माहिन्यांसाठी मुदतवाढ दिल्यास संस्थानचे कुठलेही आर्थिक नुकसान होणार नाही, उलट निविदा प्रक्रियेत येणारा संभाव्य खर्च व वेळेची बचत होईल, असे नम्र मत आहे.

मध्यवर्ती भांडार विभागाकडील सध्याचे दोन्ही हमालांना पुढील नऊ महिन्यांसाठी (माहे जूलै २०१७ ते मार्च २०१८ पर्यंत) संस्थानचे सन २०१६-१७ चे हमालीचे मंजुर दर व अटी/ शर्तीसह मुदतवाढ देणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. २,९०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख नव्वद हजार मात्र) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरचा विषय मा. व्यवस्थापन उप समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्याचे हमालीचे दर हे शासनाचे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने निश्चित केलेल्या दरांपेक्षा तसेच स्थानिक बाजारपेठेतील दरांपेक्षा जवळपास ४० % कमी आहेत तसेच सध्याचे दोन्ही हमालांना संस्थानच्या हमाली कामाचा अनुभव असून त्यांचे आजपर्यंतचे कामकाज विनातक्रार व समाधानकारक आहे, या प्रस्तावात नमुद केलेल्या बाबींचा विचार करता, मध्यवर्ती भांडार विभागाकडील सध्याचे दोन्ही हमालांना माहे जूलै २०१७ ते मार्च २०१८ पर्यंत नऊ महिने कालावधीसाठी मागील मंजुरदराने व पुर्वीच्याच अटी/ शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**१६ सन २०१७-१८ करीता प्रसादालय विभागासाठी भाजीपाला खरेदी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१७-१८ करिता किराणा माल व अनुषंगिक साहित्य रक्कम रु.५६,७०,००,०००/- मात्रची खरेदी ई-निविदा पध्दतीने व भाजीपाला रक्कम रु.४ कोटी कृषि उत्पन्न बाजार समिती, साकुरी, राहाता या ठिकाणाहून खरेदी करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.०२०१७ सभेपुढे प्रस्ताव सादर केला असता, भाजीपाला खरेदीसुध्दा ई-निविदा पध्दतीने प्रत्येकी ३ महिन्यांसाठी दर मागवून खरेदी करावी, असा निर्णय झाला होता.

वरील निर्णयास अनुसरुन भाजीपाला खरेदीकामी ३ महिन्याचे चार टप्प्यांमध्ये ऑनलाईन ई-निविदा मागविन्यात आल्या होत्या. यामध्ये आठ ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर ८ निविदाधारकांच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.१९.०४.२०१७ रोजी उघडण्यात आल्या होत्या. हे सर्व निविदाधारक तांत्रीक निविदेमध्ये पात्र ठरले होते. सदर पात्र ८ निविदाधारकांचे Commercial Bid दि.१९.०५.२०१७ रोजी मा.खरेदी समिती सभेत उघडण्यात आलेले आहेत.

त्याचा टप्पेनिहाय तपशील खालीलप्रमाणे –

## माहे एप्रिल-२०१७ ते जुन-२०१७

| अ.नं. | तपशिल | मागणी | परिमाण | तिरुपती व्हेजि. कंपनी | साळुंके ट्रेडींग कंपनी | महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी | जे.के.आलू भंडार | मे.जय योगेश्वर ॲण्ड कंपनी | जय मल्हार ट्रेडींग कंपनी | समर्थ ट्रेडर्स | किसान ट्रेडींग कंपनी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ |
| 1.00 | **अ) सर्व हंगामात उपलब्ध असलेला भाजीपाला** | | | | | | | | | | |
| 1.01 | बटाटा - चांगल्या प्रतीचा व मोठा | 75000.00 | किलो | 20.00 | 12.00 | 12.85 | **9.00** | 15.00 | **9.00** | 12.00 | 14.50 |
| 1.02 | कांदा - चांगल्या प्रतीचा व मोठा | 37500.00 | किलो | 14.00 | 11.00 | **9.75** | 10.00 | 17.00 | 0.00 | 10.50 | 16.00 |
| 1.03 | लसूण - चांगल्या प्रतीचा व वाळलेला | 5000.00 | किलो | 80.00 | **45.00** | 69.00 | 80.00 | 60.00 | **45.00** | 90.00 | 59.00 |
| 1.04 | हिरवी मिरची - लवंगी | 11250.00 | किलो | 100.00 | 40.00 | 0.00 | 0.00 | 35.00 | **25.00** | 50.00 | 34.00 |
| 1.05 | वांगे - गावरान | 17500.00 | किलो | 20.00 | 25.00 | 40.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | 22.00 | **19.00** |
| 1.06 | पत्ता कोबी - चांगल्या प्रतीचा | 25000.00 | किलो | 12.00 | 12.50 | 10.50 | 0.00 | 8.00 | 0.00 | 13.00 | **7.50** |
| 1.07 | भोपळा - चांगल्या प्रतीचा | 43750.00 | किलो | 18.00 | **15.00** | 18.00 | 0.00 | 17.00 | 0.00 | 20.00 | 16.00 |
| 1.08 | टोमॅटो - चांगल्या प्रतीचे | 6250.00 | किलो | 20.00 | 20.00 | 0.00 | 0.00 | 18.00 | 0.00 | 20.00 | **17.50** |
| 1.09 | पालक - चांगल्या प्रतीचा | 7500.00 | किलो | 30.00 | **20.00** | 0.00 | 0.00 | 25.00 | 0.00 | 25.00 | 24.00 |
| 1.10 | कढीपत्ता - चांगल्या प्रतीचा | 750.00 | किलो | 100.00 | **40.00** | 40.00 | 0.00 | 120.00 | 0.00 | 45.00 | 115.00 |
| 1.11 | डांगर - चांगल्या प्रतीचे व मोठे | 15000.00 | किलो | 20.00 | 12.00 | 14.00 | 0.00 | 12.00 | 0.00 | **10.00** | 11.50 |
| 1.12 | कोथींबीर - चांगल्या प्रतीची | 2250.00 | किलो | 120.00 | **40.00** | 0.00 | 0.00 | 65.00 | 0.00 | 60.00 | 64.00 |
| 1.13 | सिमला मिरची - चांगल्या प्रतीची | 750.00 | किलो | 25.00 | 35.00 | 0.00 | 0.00 | 23.00 | 0.00 | **20.00** | 22.00 |
| 1.14 | लिंबू - चांगल्या प्रतीचे | 50.00 | किलो | 80.00 | 65.00 | 0.00 | 40.00 | 40.00 | 0.00 | 0.00 | **39.00** |
| 1.15 | आद्रक (आले) - चांगल्या प्रतीचे | 1000.00 | किलो | 50.00 | 25.00 | 35.00 | 20.00 | 20.00 | 20.00 | 20.00 | **19.00** |
| 2.00 | **ब) हंगामामध्ये उपलब्ध असलेला भाजीपाला** | | | | | | | | | | |
| 2.01 | फुलकोबी चांगल्या प्रतीचा- आवश्यकतेनुसार | 500.00 | किलो | 40.00 | **22.00** | 0.00 | 0.00 | 30.00 | 0.00 | 25.00 | 29.00 |
| 2.02 | गाजर - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 375.00 | किलो | 30.00 | **18.00** | 0.00 | 0.00 | 25.00 | 0.00 | 22.00 | 24.00 |
| 2.03 | भेंडी - चांगल्या प्रतीची आवश्यकतेनुसार | 100.00 | किलो | 40.00 | 35.00 | 0.00 | 0.00 | 30.00 | 0.00 | 35.00 | **29.00** |
| 2.04 | मेथी भाजी - चांगल्या प्रतीची आवश्यकतेनुसार | 75.00 | किलो | 100.00 | 40.00 | 0.00 | 0.00 | 40.00 | 0.00 | **10.00** | 39.00 |
| 2.05 | काकडी - चांगल्या प्रतीची आवश्यकतेनुसार | 150.00 | किलो | 30.00 | **20.00** | 0.00 | 0.00 | 25.00 | 0.00 | **20.00** | 24.00 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2.06 | शेवगा - चांगल्या प्रतीचा आवश्यकतेनुसार | 25.00 | किलो | 40.00 | 30.00 | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | 20.00 | **19.00** |
| 2.07 | अळूपाने - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 400.00 | किलो | 225.00 | **25.00** | 0.00 | 0.00 | 250.00 | 0.00 | 0.00 | 260.00 |
| 2.08 | रताळे - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 25.00 | किलो | 50.00 | **25.00** | 0.00 | 0.00 | 29.00 | 0.00 | 0.00 | 28.00 |
| 2.09 | बीट - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 12.50 | किलो | 40.00 | **15.00** | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | 0.00 | 20.00 |

**माहे जुलै-२०१७ ते सप्टेंबर-२०१७**

| अ.नं. | तपशिल | मागणी | परिमाण | तिरुपती व्हेजि.कंपनी | साळुंके ट्रेडींग कंपनी | महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी | जे.के.आलू भंडार | मे.जय योगेश्वर ॲण्ड कंपनी | जय मल्हार ट्रेडींग कंपनी | समर्थ ट्रेडर्स | किसान ट्रेडींग कंपनी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ |
| **1.00** | **अ) सर्व हंगामात उपलब्ध असलेला भाजीपाला** | | | | | | | | | | |
| 1.01 | बटाटा - चांगल्या प्रतीचा व मोठा | 75000.00 | किलो | 25.00 | 20.00 | 15.95 | **11.00** | 20.00 | **11.00** | 15.00 | 19.00 |
| 1.02 | कांदा - चांगल्या प्रतीचा व मोठा | 37500.00 | किलो | 16.00 | 18.50 | 14.50 | **13.00** | 20.00 | 0.00 | 15.00 | 19.00 |
| 1.03 | लसूण - चांगल्या प्रतीचा व वाळलेला | 5000.00 | किलो | 100.00 | **55.00** | 99.00 | 90.00 | 80.00 | 60.00 | 90.00 | 75.00 |
| 1.04 | हिरवी मिरची - लवंगी | 11250.00 | किलो | 100.00 | 38.00 | 0.00 | 0.00 | 32.00 | **25.00** | 50.00 | 31.00 |
| 1.05 | वांगे - गावरान | 17500.00 | किलो | 30.00 | 30.00 | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | 30.00 | **19.00** |
| 1.06 | पत्ता कोबी - चांगल्या प्रतीचा | 25000.00 | किलो | 20.00 | 15.00 | 0.00 | 0.00 | 10.00 | 0.00 | 15.00 | **9.50** |
| 1.07 | भोपळा - चांगल्या प्रतीचा | 43750.00 | किलो | **15.00** | 16.50 | 0.00 | 0.00 | 16.00 | 0.00 | 20.00 | 16.00 |
| 1.08 | टोमॅटो - चांगल्या प्रतीचे | 6250.00 | किलो | **20.00** | 35.00 | 0.00 | 0.00 | 23.00 | 0.00 | 25.00 | 22.00 |
| 1.09 | पालक - चांगल्या प्रतीचा | 7500.00 | किलो | 40.00 | 25.00 | 0.00 | 0.00 | 25.00 | 0.00 | 25.00 | **24.00** |
| 1.10 | कढीपत्ता - चांगल्या प्रतीचा | 750.00 | किलो | 100.00 | **40.00** | 0.00 | 0.00 | 120.00 | 0.00 | 45.00 | 115.00 |
| 1.11 | डांगर - चांगल्या प्रतीचे व मोठे | 15000.00 | किलो | 25.00 | 15.00 | 0.00 | 0.00 | 10.00 | 0.00 | 10.00 | **9.50** |
| 1.12 | कोथींबीर - चांगल्या प्रतीची | 2250.00 | किलो | 150.00 | **40.00** | 0.00 | 0.00 | 60.00 | 0.00 | 60.00 | 59.00 |
| 1.13 | सिमला मिरची - चांगल्या प्रतीची | 750.00 | किलो | 30.00 | 32.00 | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | 25.00 | **19.00** |
| 1.14 | लिंबू - चांगल्या प्रतीचे | 50.00 | किलो | 70.00 | 35.00 | 0.00 | **30.00** | 40.00 | 0.00 | 60.00 | 39.00 |
| 1.15 | आद्रक (आले) - चांगल्या प्रतीचे | 1000.00 | किलो | 70.00 | 28.00 | 40.00 | 25.00 | 25.00 | 30.00 | 35.00 | **24.00** |
| **2.00** | **ब) हंगामामध्ये उपलब्ध असलेला भाजीपाला** | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2.01 | फुलकोबी चांगल्या प्रतीचा-आवश्यकतेनुसार | 500.00 | किलो | 70.00 | 25.00 | 0.00 | 0.00 | 25.00 | 0.00 | 30.00 | **24.00** |
| 2.02 | गाजर - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 375.00 | किलो | 30.00 | **18.00** | 0.00 | 0.00 | 25.00 | 0.00 | 25.00 | 24.00 |
| 2.03 | भेंडी - चांगल्या प्रतीची आवश्यकतेनुसार | 100.00 | किलो | 40.00 | 35.00 | 0.00 | 0.00 | 30.00 | 0.00 | 35.00 | **29.00** |
| 2.04 | मेथी भाजी - चांगल्या प्रतीची आवश्यकतेनुसार | 75.00 | किलो | 120.00 | 40.00 | 0.00 | 0.00 | 32.00 | 0.00 | **20.00** | 31.00 |
| 2.05 | काकडी - चांगल्या प्रतीची आवश्यकतेनुसार | 150.00 | किलो | 20.00 | 20.00 | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | 20.00 | **19.00** |
| 2.06 | शेवगा - चांगल्या प्रतीचा आवश्यकतेनुसार | 25.00 | किलो | 60.00 | 30.00 | 0.00 | 0.00 | 15.00 | 0.00 | 40.00 | **14.00** |
| 2.07 | अळूपाने - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 400.00 | किलो | 225.00 | **25.00** | 0.00 | 0.00 | 170.00 | 0.00 | 0.00 | 170.00 |
| 2.08 | रताळे - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 25.00 | किलो | 40.00 | 25.00 | 0.00 | 0.00 | 25.00 | 0.00 | 0.00 | **24.00** |
| 2.09 | बीट - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 12.50 | किलो | 40.00 | **15.00** | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | 0.00 | 20.00 |

**माहे आक्टोंबर-२०१७ ते डिसेंबर-२०१७**

| अ.नं. | तपशिल | मागणी | परिमाण | तिरुपती व्हेजि.कंपनी | साळुंके ट्रेडींग कंपनी | महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी | जे.के.आलू भंडार | मे.जय योगेश्वर अॅण्ड कंपनी | जय मल्हार ट्रेडींग कंपनी | समर्थ ट्रेडर्स | किसान ट्रेडींग कंपनी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ |
| **1.00** | **अ) सर्व हंगामात उपलब्ध असलेला भाजीपाला** | | | | | | | | | | |
| 1.01 | बटाटा - चांगल्या प्रतीचा व मोठा | 75000.00 | किलो | 25.00 | 22.00 | 17.95 | **12.00** | 31.00 | **12.00** | 15.00 | 20.00 |
| 1.02 | कांदा - चांगल्या प्रतीचा व मोठा | 37500.00 | किलो | 16.00 | 16.00 | 17.95 | **10.00** | 20.00 | 0.00 | 18.00 | 16.00 |
| 1.03 | लसूण - चांगल्या प्रतीचा व वाळलेला | 5000.00 | किलो | 100.00 | **65.00** | 109.00 | 120.00 | 70.00 | 70.00 | 90.00 | 90.00 |
| 1.04 | हिरवी मिरची - लवंगी | 11250.00 | किलो | 100.00 | 30.00 | 0.00 | 0.00 | **27.00** | 30.00 | 45.00 | 60.00 |
| 1.05 | वांगे - गावरान | 17500.00 | किलो | 30.00 | 30.00 | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | **15.00** | 25.00 |
| 1.06 | पत्ता कोबी - चांगल्या प्रतीचा | 25000.00 | किलो | 20.00 | 15.00 | 0.00 | 0.00 | **9.00** | 0.00 | 12.00 | 15.00 |
| 1.07 | भोपळा - चांगल्या प्रतीचा | 43750.00 | किलो | **15.00** | 16.00 | 0.00 | 0.00 | 19.00 | 0.00 | **15.00** | **15.00** |
| 1.08 | टोमॅटो - चांगल्या प्रतीचे | 6250.00 | किलो | 20.00 | 20.00 | 0.00 | 0.00 | **17.00** | 0.00 | 20.00 | 19.00 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.09 | पालक - चांगल्या प्रतीचा | 7500.00 | किलो | 40.00 | **22.00** | 0.00 | 0.00 | 27.00 | 0.00 | 25.00 | 30.00 |
| 1.10 | कढीपत्ता - चांगल्या प्रतीचा | 750.00 | किलो | 100.00 | **38.00** | 0.00 | 0.00 | 130.00 | 0.00 | 45.00 | 100.00 |
| 1.11 | डांगर - चांगल्या प्रतीचे व मोठे | 15000.00 | किलो | 25.00 | 16.00 | 0.00 | 0.00 | 10.00 | 0.00 | **8.00** | 20.00 |
| 1.12 | कोथींबीर - चांगल्या प्रतीची | 2250.00 | किलो | 150.00 | **30.00** | 0.00 | 0.00 | 40.00 | 0.00 | 40.00 | 80.00 |
| 1.13 | सिमला मिरची - चांगल्या प्रतीची | 750.00 | किलो | 50.00 | 25.00 | 0.00 | 0.00 | **21.00** | 0.00 | 25.00 | 30.00 |
| 1.14 | लिंबू - चांगल्या प्रतीचे | 50.00 | किलो | 70.00 | 35.00 | 0.00 | **25.00** | 45.00 | 0.00 | 30.00 | 35.00 |
| 1.15 | आद्रक (आले) - चांगल्या प्रतीचे | 1000.00 | किलो | 70.00 | 30.00 | 40.00 | **20.00** | 25.00 | 40.00 | 35.00 | 50.00 |
| **2.00** | **ब) हंगामामध्ये उपलब्ध असलेला भाजीपाला** | | | | | | | | | | |
| 2.01 | फुलकोबी चांगल्या प्रतीचा- आवश्यकतेनुसार | 500.00 | किलो | 70.00 | 22.00 | 0.00 | 0.00 | **20.00** | 0.00 | 30.00 | 50.00 |
| 2.02 | गाजर - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 375.00 | किलो | 30.00 | **18.00** | 0.00 | 0.00 | 25.00 | 0.00 | 20.00 | 29.00 |
| 2.03 | भेंडी - चांगल्या प्रतीची आवश्यकतेनुसार | 100.00 | किलो | 40.00 | 35.00 | 0.00 | 0.00 | **30.00** | 0.00 | 35.00 | **30.00** |
| 2.04 | मेथी भाजी - चांगल्या प्रतीची आवश्यकतेनुसार | 75.00 | किलो | 120.00 | 40.00 | 0.00 | 0.00 | 35.00 | 0.00 | **10.00** | 100.00 |
| 2.05 | काकडी - चांगल्या प्रतीची आवश्यकतेनुसार | 150.00 | किलो | 20.00 | 20.00 | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | **15.00** | 19.00 |
| 2.06 | शेवगा - चांगल्या प्रतीचा आवश्यकतेनुसार | 25.00 | किलो | 60.00 | 30.00 | 0.00 | 0.00 | **19.00** | 0.00 | 20.00 | 50.00 |
| 2.07 | अळूपाने - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 400.00 | किलो | 225.00 | **25.00** | 0.00 | 0.00 | 170.00 | 0.00 | 0.00 | 225.00 |
| 2.08 | रताळे - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 25.00 | किलो | 40.00 | **25.00** | 0.00 | 0.00 | 30.00 | 0.00 | 0.00 | 35.00 |
| 2.09 | बीट - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 12.50 | किलो | 40.00 | **15.00** | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | 0.00 | 40.00 |

**माहे जानेवारी-२०१८ ते मार्च-२०१८**

| अ.नं. | तपशिल | मागणी | परिमाण | तिरुपती व्हेजि.कंपनी | साळुंके ट्रेडींग कंपनी | महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी | जे.के.आलू भंडार | मे.जय योगेश्वर ॲण्ड कंपनी | जय मल्हार ट्रेडींग कंपनी | समर्थ ट्रेडर्स | किसान ट्रेडींग कंपनी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ | दर प्रती कि.ग्रॅ |
| **1.00** | **अ) सर्व हंगामात उपलब्ध असलेला भाजीपाला** | | | | | | | | | | |
| 1.01 | बटाटा - चांगल्या प्रतीचा व मोठा | 75000.00 | किलो | 15.00 | 18.00 | 12.75 | **9.00** | 20.00 | 12.50 | 10.00 | 19.00 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.02 | कांदा - चांगल्या प्रतीचा व मोठा | 37500.00 | किलो | 14.00 | 18.00 | 14.85 | **11.00** | 25.00 | 0.00 | 15.00 | 24.00 |
| 1.03 | लसूण - चांगल्या प्रतीचा व वाळलेला | 5000.00 | किलो | 110.00 | 70.00 | 79.00 | 80.00 | 65.00 | 80.00 | 80.00 | **64.00** |
| 1.04 | हिरवी मिरची - लवंगी | 11250.00 | किलो | 100.00 | 35.00 | 0.00 | 0.00 | 30.00 | 40.00 | 40.00 | **29.00** |
| 1.05 | वांगे - गावरान | 17500.00 | किलो | 20.00 | 28.00 | 40.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | **15.00** | 19.00 |
| 1.06 | पत्ता कोबी - चांगल्या प्रतीचा | 25000.00 | किलो | 14.00 | 14.00 | 10.50 | 0.00 | 10.00 | 0.00 | 12.00 | **9.50** |
| 1.07 | भोपळा - चांगल्या प्रतीचा | 43750.00 | किलो | 20.00 | **16.00** | 18.00 | 0.00 | 19.00 | 0.00 | 20.00 | 18.00 |
| 1.08 | टोमॅटो - चांगल्या प्रतीचे | 6250.00 | किलो | 23.00 | 20.00 | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | **15.00** | 19.00 |
| 1.09 | पालक - चांगल्या प्रतीचा | 7500.00 | किलो | 30.00 | **20.00** | 0.00 | 0.00 | 30.00 | 0.00 | 25.00 | 29.00 |
| 1.10 | कढीपत्ता - चांगल्या प्रतीचा | 750.00 | किलो | 100.00 | **40.00** | 0.00 | 0.00 | 100.00 | 0.00 | 45.00 | 100.00 |
| 1.11 | डांगर - चांगल्या प्रतीचे व मोठे | 15000.00 | किलो | 13.00 | 16.00 | 14.00 | 0.00 | 12.00 | 0.00 | **10.00** | 11.00 |
| 1.12 | कोथींबीर - चांगल्या प्रतीची | 2250.00 | किलो | 90.00 | **30.00** | 0.00 | 0.00 | 45.00 | 0.00 | 50.00 | 44.00 |
| 1.13 | सिमला मिरची - चांगल्या प्रतीची | 750.00 | किलो | 25.00 | 30.00 | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | 25.00 | **19.00** |
| 1.14 | लिंबू - चांगल्या प्रतीचे | 50.00 | किलो | 70.00 | 35.00 | 0.00 | 30.00 | **20.00** | 0.00 | 40.00 | **20.00** |
| 1.15 | आद्रक (आले) - चांगल्या प्रतीचे | 1000.00 | किलो | 70.00 | 28.00 | 35.00 | **20.00** | 30.00 | 40.00 | 35.00 | 29.00 |
| **2.00** | **ब) हंगामामध्ये उपलब्ध असलेला भाजीपाला** | | | | | | | | | | |
| 2.01 | फुलकोबी चांगल्या प्रतीचा- आवश्यकतेनुसार | 500.00 | किलो | 25.00 | 20.00 | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | 30.00 | **19.00** |
| 2.02 | गाजर - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 375.00 | किलो | 35.00 | **18.00** | 0.00 | 0.00 | 25.00 | 0.00 | 20.00 | 24.00 |
| 2.03 | भेंडी - चांगल्या प्रतीची आवश्यकतेनुसार | 100.00 | किलो | 40.00 | 35.00 | 0.00 | 0.00 | 30.00 | 0.00 | 31.00 | **29.00** |
| 2.04 | मेथी भाजी - चांगल्या प्रतीची आवश्यकतेनुसार | 75.00 | किलो | 100.00 | 40.00 | 0.00 | 0.00 | 40.00 | 0.00 | **10.00** | 39.00 |
| 2.05 | काकडी - चांगल्या प्रतीची आवश्यकतेनुसार | 150.00 | किलो | 25.00 | 20.00 | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | 20.00 | **19.00** |
| 2.06 | शेवगा - चांगल्या प्रतीचा आवश्यकतेनुसार | 25.00 | किलो | 50.00 | 30.00 | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | 30.00 | **19.00** |
| 2.07 | अळूपाने - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 400.00 | किलो | 250.00 | **25.00** | 0.00 | 0.00 | 180.00 | 0.00 | 0.00 | 180.00 |
| 2.08 | रताळे - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 25.00 | किलो | 50.00 | 25.00 | 0.00 | 0.00 | **20.00** | 0.00 | 0.00 | **20.00** |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2.09 | बीट - चांगल्या प्रतीचे आवश्यकतेनुसार | 12.50 | किलो | 35.00 | **15.00** | 0.00 | 0.00 | 20.00 | 0.00 | 0.00 | 20.00 |

भाजीपाला ब-याच वर्षांपासुन राहाता कृषी उत्पन्न बाजार समिती राहाता येथुन खरेदी करण्यात येत होता. भाजीपाला खरेदीकामी ई-निविदा प्रक्रिया प्रथमच करण्यात येत आहे. त्यामुळे मागील खरेदीचे दर उपलब्ध नाहित.

तरी उपरोक्त चार टप्प्यातील Online प्राप्त तुलनात्मक तक्त्यांतील गडद व अधोरेखित केलेल्या न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उप समितीचे सभेत सादर.

**सन २०१७-१८ करीता प्रसादालय विभागासाठी भाजीपाला खरेदी करणेकामी चार टप्प्यामध्ये राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक आजचे उपसमिती सभेसमोर चर्चा करणेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेबरोबर चर्चा करताना शेतकऱ्यांना हमीभाव देण्याची अपेक्षा व्यक्त केली, यास सर्व ठेकेदारांनी सहमती दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ करीता प्रसादालय विभागासाठी आवश्यक असलेला भाजीपाला जुलै- २०१७ पासून प्रत्येकी ३ महिन्यांसाठी खरेदी करणेकामी प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**१७ आरोग्य विभागाकरीता काथा मॅटीन खरेदीकामी ई-निविदेतील न्युनतम दरांबाबत निर्णय होणेबाबत.**

आरोग्य विभागाकरीता काथा मॅटीन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.९,८८,९६०/- (अक्षरी रु. नऊ लाख अठ्ठयाऐंशी हजार नऊशे साठ) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेनंतर सदर काथा मॅटीन खरेदीकामीमहाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती.

सदरचे खरेदीकामी ऑनलाईन प्राप्त पाच ई-निविदा- तांत्रिक निविदा दि.०३.०४.२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उघडल्या असता त्यामध्ये चार निविदा पात्र तर एक निविदा अपात्र ठरलेली होती.

पात्र चार निविदाधारकांच्या व्यापारी निविदा (Commercial Bid) दि.१९.०५.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या आहेत. त्याचा ऑनलाईन प्राप्त तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे–

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | M B TRADING COMPANY | Asian Sales Corporation | RIDDHI ENTERPRISES | SABOO DECOPRIDE PRIVATE LIMITED |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate | Rate | Rate | Rate |
| 1.00 | **३ फुट रुंदीचे काथ्याचे मॅटीन**<br>Width 3 ft. X Lenth 35 ft. = 01 Piece<br>Width 3 ft. X Lenth 40 ft. = 01 Piece<br>Width 3 ft. X Lenth 50 ft. = 08 Piece<br>Width 3 ft. X Lenth 54 ft. = 01 Piece<br>Width 3 ft. X Lenth 56 ft. = 01 Piece<br>Width 3 ft. X Lenth 60 ft. = 01 Piece<br>Width 3 ft. X Lenth 70 ft. = 01 Piece<br>Width 3 ft. X Lenth 75 ft. = 01 Piece | 2370.00 Sq.Ft | 47.70 | **30.50** | 46.80 | 44.50 |
| 2.00 | **४ फुट रुंदीचे काथ्याचेमॅट**<br>Width 4 ft. X Lenth 36 ft. = 01 Piece<br>Width 4 ft. X Lenth 42 ft. = 01Piece<br>Width 4 ft. X Lenth 47 ft. = 02 Piece<br>Width 4 ft. X Lenth 50 ft. = 26 Piece<br>Width 4 ft. X Lenth 65 ft. = 01 Piece | 6148.00 Sq.Ft | 48.60 | **30.50** | 46.80 | 44.50 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3.00 | **५ फुट रुंदीचे काथ्याचे मॅट**<br>Width 5 ft. X Lenth 25 ft. = 01 Piece<br>Width 5 ft. X Lenth 32 ft. = 01 Piece<br>Width 5 ft. X Lenth 34 ft. = 01 Piece<br>Width 5 ft. X Lenth 40 ft. = 01 Piece<br>Width 5 ft. X Lenth 50 ft. = 13 Piece<br>Width 5 ft. X Lenth 57 ft. = 01 Piece<br>Width 5 ft. X Lenth 65 ft. = 01 Piece<br>Width 5 ft. X Lenth 67 ft. = 01 Piece<br>Width 5 ft. X Lenth 74 ft. = 01 Piece<br>Width 5 ft. X Lenth 78 ft. = 01 Piece | 5610.00 Sq.Ft | 50.40 | **30.50** | 46.80 | 44.50 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दर गडद व अधोरेखित केलेले आहेत. तसेच मॅटीनचे नमुनेही मागविण्यात आलेले आहेत.

मॅटीनची मागील २-३ वर्षात खरेदी विभागाकडून खरेदी करण्यात आलेली नाही. आरोग्य विभागाकडे याबाबत माहिती घेतली असता आरोग्य विभागानेही २-३ वर्षात खरेदी केलेली नाही. त्यामुळे मागील खरेदीचे दर उपलब्ध नाहीत. तथापी याकामी अंदाजे खर्च रक्कम रु.९,८८,९६०/- ला मान्यता घेतलेली असून न्युनतम दराने खरेदीसाठी रक्कम रु.४,३०,९०४/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर.

**प्रस्तावितकामीचे निम्नतम दरधारक एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. इतर पुरवठाधारकांच्या दरांच्या तुलनेने खुपच दर कमी दिलेले असल्यामुळे ई-निविदेमधील मुळ निम्नतम दर अंतीम समजणेत यावे, अशी त्यांनी सभेस विनंती केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आरोग्य विभागाकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे काथ्याचे मॅटीन खरेदी करणेकामी एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग/ खरेदी विभाग)

---

**१८ मंदिर विभागाचे व्दारकामाईतील धुनी करीता रानशेणी खरेदीकामी ई-निविदेतील न्युनतम दरांबाबत निर्णय होणेबाबत.**

मंदिर विभागाकरीता सन २०१७–१८ करीता व्दारकामाईतील धुनीसाठी आवश्यक १,५०,००० किलो गोवरी खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.९,००,०००/- (अक्षरी रु.नऊ लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेनंतर सदर खरेदीकामीमहाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती.

सदरचे खरेदीकामी ऑनलाईन प्राप्त तीन ई-निविदा तांत्रिक निविदा दि.१९.०५.२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उघडल्या असता तीनही निविदाधारकांच्या निविदा तांत्रिक दृष्ठ्या पात्र ठरलेल्या होत्या.

पात्र तीनही निविदाधारकांच्या व्यापारी निविदाही (Commercial Bid) दि.१९.०५.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आल्या आहेत. त्याचा ऑनलाईन प्राप्त तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे –

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.ofQty | Units | RAVINDRA VIJAY DEORE | SANTOSH MOTIRAM SURYAVANSHI | Vijay Dhondu Gawali |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate |
| 1.00 | रानशेणी गोवरी (वाळलेली) | 150000.00 | किलो | **5.10** | 5.50 | 5.25 |

तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दर गडद व अधोरेखित केलेले आहेत.

मागील वर्षी गोवरी रु.५.४० पैसे प्रती किलोदराने खरेदी करण्यात आलेली होती. तथापी याकामी अंदाजे खर्च रक्कम रु.९,००,०००/- ला मान्यता मिळालेली असून न्युनतम दराने गोवरी खरेदीसाठी रक्कम रु.७,६५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर.

**प्रस्तावितकामीचे निम्नतम दरधारक रविंद्र विजय देवरे हे आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. मागील वर्षीच्या निम्नतम दरांपेक्षाही या वर्षी कमी दर दिलेले आहेत, यामुळे ई-निविदेमधील मुळ निम्नतम दर अंतीम समजणेत यावे, अशी त्यांनी सभेस विनंती केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर विभागाचे व्दारकामाईतील धुनी करीता रानशेणी खरेदी करणेकामी रविंद्र विजय देवरे यांचे प्रति किलो रु.५.१० मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**१९ पाणी पुरवठा विभागाकरीता ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस खरेदीकामाचे ई-निविदेतील न्युनतम दरांबाबत निर्णय होणेबाबत.**

पाणी पुरवठा विभागाकरीता ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडरखरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१२,१६,५००/- (अक्षरी रु. बारा लाख सोळा हजार पाचशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती.

सदरचे खरेदीकामी ऑनलाईन प्राप्त सात ई-निविदा- तांत्रिक निविदा दि.०३.०४.२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उघडल्या असता सातही निविदा पात्र ठरलेल्या होत्या.

पात्र सातही निविदाधारकांच्या व्यापारी निविदा (Commercial Bid) दि.१९.०५.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या आहेत. त्याचा ऑनलाईन प्राप्त तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे–

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | Manisha Enterprises | G.S.Commercial Corporation | Sai Sales Corporation | SVS Chemical Corporation | VIKRAMCHEMICALS | SARK CHEMICAL | K S ENTERPRISES |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate |
| 1.00 | ब्लिचींग पावडर - (विक्रमग्रासिम) ब्रँड, डी.सी.एच.(डी.एस.सी.एल.) आय.एस.आय. मार्क, ३४% क्लोरीनउपलब्ध | 35.00 | मे. टन | 19000.00 | 0.00 | 18160.00 | 15500.00 | **14760.00** | 0.00 | 16840.00 |
| 2.00 | फेरिक ॲलम - (१६% ॲलोमिना फेरिक उपलब्ध) | 60.00 | मे. टन | 9890.00 | 0.00 | 6993.00 | 0.00 | **6464.00** | 6550.00 | 6750.00 |
| 3.00 | क्लोरीन गॅससिलेंडर (१०० किलो वजन) | 40.00 | सिलेंडर | 0.00 | **3000.00** | 5130.00 | 0.00 | 15000.00 | 0.00 | 0.00 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दर गडद व अधोरेखित केलेले आहेत.यातील मागिल वर्षीचे सदर Items खरेदीचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | Items चे नाव | दर प्रती टन/सिलेंडर रु. | खरेदीची प्रक्रिया |
|---|---|---|---|
| १. | ब्लिचींग पावडर | १५,०००/- | खरेदी विभाग |
| २. | फेरीक ॲलम | ६,६५०/- | पाणी पुरवठा विभाग |
| ३. | क्लोरीन गॅस | ४,०००/- | पाणी पुरवठा विभाग |

तथापी याकामी अंदाजे खर्च रक्कम रु.१२,१६,५००/- ला मान्यता घेतलेली असून न्युनतम दराने खरेदीसाठी रक्कम रु.१०,२४,४४०/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त ऑनलाईन प्राप्त तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दरांबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर.

**वार्षिक ब्लिचींग पावडर व फेरीक ॲलम खरेदी प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक विक्रम केमिकल्स यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. त्यांनी ब्लिचींग पावडरकरीता ई-निविदेमध्ये दिलेले दर कमी करणेस असमर्थतता दर्शविली व फेरीक ॲलम खरेदीकामी दिलेल्या प्रति मे.टन रु.६,४६४/- ऐवजी रु.६,४०० मात्र अंतीम दर देऊ केले. तसेच क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदीकामीचे निम्नतम दरधारक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी पुरवठा विभागाकरीता फेरीक ॲलम खरेदीकामी विक्रम केमिकल्स यांनी दिलेले अंतीम दर तसेच ब्लिचींग पावडर व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकामी प्रस्तावामधील तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधारेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

२० **पाणी पुरवठा विभागाकरीता प्लंबींग साहित्य खरेदीकामी ई-निविदेतील न्युनतम दरांबाबत निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे पाणी पुरवठा विभागाकरीता प्लंबींग साहित्य खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे संकेत स्थळावर ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यामध्ये ऑनलाईन तीन निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्यामुळे सदर तीन निविदांचे ऑनलाईन Technical Bid दि.२७.१२.२०१६ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आले होते. यामध्ये २ निविदा पात्र तर १ निविदा अपात्र ठरलेली होती.

त्यामुळे दि.२२.०२.२०१७ते दि.१४.०३.२०१७ या कालावधीत फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. मुदतीअंती २ निविदा प्राप्त झाल्याने त्यास शासनाचे खरेदी नियमावलीनुसार एक आठवडयाची म्हणजेच दि.२३.०३.२०१७ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली होती. परंतु मुदतवाढ देऊनही मुदतीअंती दोनच ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

शासनाचे दि.०१.१२.२०१६ चे सुधारित खरेदी नियमावलीतील ४:४:३:१ निविदा कालावधीस मुदतवाढ यामध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

<u>४:४:३:१ निविदा कालावधीस मुदतवाढ-</u>

निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे. तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्यास, संबंधीत खरेदी अधिका-याने प्रथम किमान एक आठवडयाची मुदतवाढ द्यावी. अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखिल तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास दुस-यांदा एक आठवडयाची मुदतवाढ द्यावी. त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देऊ नये.

कामाची पूर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर, खरेदी अधिकारी(दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर देखील) ३ निविदा पेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमुद करेल. अशा प्रसंगी, किमतीच्या वाजवीपणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल.

वरील नमुद वस्तूस्थिती व शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील वरील तरतुदीस अनुसरुन दि.११.०४.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत तांत्रिक ई-निविदा उघडण्यात येऊन तांत्रिक कागदपत्रांची पडताळणी केली असता दोन्ही निविदाधारकांच्या निविदा तांत्रिक दृष्टया पात्र ठरलेल्या होत्या.

पात्र दोन्ही निविदाधारकांच्या व्यापारी निविदा दि.०६.०५.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या आहेत. त्यांचा ऑनलाईन प्राप्त तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे –

| Sl.No | Description of Work / Item(s) | No. of Qty | Units | EXCEL TRADING COMPANY | Union Trading |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate |
| 1.00 | लॉग बॉडी कॉक (नं.5037) - कंपनी - जग्वार | 78.00 | नग | 1080.00 | **<u>998.00</u>** |
| 2.00 | बेसीन पिलर कॉक (नं.CQT-231698) - कंपनी - जग्वार | 28.00 | नग | 3006.00 | **<u>2810.00</u>** |
| 3.00 | सी.पी.ॲंगल कॉक (नं.CQT-23०५३) - कंपनी - जग्वार | 78.00 | नग | 666.00 | **<u>635.00</u>** |
| 4.00 | वॉल हॅंगिग कमोडसंडास भांडे कव्हर, जेटसह सफेद (नं.०२९८) -कंपनी - पॅरिवेअर | 28.00 | नग | 6084.00 | **<u>4200.00</u>** |
| 5.00 | ग्रेनाईट व्हाईटराऊंड बेसीन (नं.०४४८) -कंपनी - पॅरिवेअर | 28.00 | नग | **<u>1980.00</u>** | 2180.00 |
| 6.00 | फ्लश व्हॉल (नं.FLV १०९५) - कंपनी -जग्वार | 28.00 | नग | 2700.00 | **<u>2540.00</u>** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 7.00 | हॅन्ड जेटस्प्रे - कंपनी - जग्वार | 50.00 | नग | 1224.00 | **1000.00** |
| 8.00 | १/२" गेट व्हॉल - कंपनी - लिडर | 50.00 | नग | 603.00 | **390.00** |
| 9.00 | १" गेट व्हॉल - कंपनी - लिडर | 25.00 | नग | 1008.00 | **710.00** |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दर गडद व अधोरेखित केलेले आहेत.

तसेच सुधारित खरेदी नियमावलीतील तरतूद क्रं.४.४.३.१ नुसार दि.२९.०३.२०१७ रोजी पाणीपुरवठा विभागाला पत्राव्दारे कळवून त्यांचेकडून सदर साहित्याचे बाजारातील दर मागविण्यात आलेले होते. पाणी पुरवठा विभागाने सदर Items चे दोन विक्रेत्याकडून बाजारभावाचे दर घेऊन दि.०३.०४.२०१७ रोजी खरेदी विभागाला दिलेले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | साहित्याचा तपशिल | मागणी | ई-निविदा दर | मार्केट दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | लॉग बॉडी कॉक (नं.5037) - कंपनी - जग्वार | 78 | **998.00** | 914.00 | |
| 2 | बेसीन पिलर कॉक (नं.CQT-231698) - कंपनी - जग्वार | 28 | **2810.00** | 2575.00 | |
| 3 | सी.पी.ॲगल कॉक (नं.CQT-23०५३) - कंपनी - जग्वार | 78 | **635.00** | 581.00 | |
| 4 | वॉल हॅगिग कमोडसंडास भांडे कव्हर, जेटसह सफेद (नं.०२९८) -कंपनी - पॅरिवेअर | 28 | **4200.00** | 4000.00 | |
| 5 | ग्रेनाईट व्हाईटराऊंड बेसीन (नं.०४४८) -कंपनी - पॅरिवेअर | 28 | ***1980.00** | 1339.00 | *दर मॉडेल क्रं. CO 407 चे आहेत. |
| 6 | फ्लश व्हॉल (नं.FLV १०९५) - कंपनी -जग्वार | 28 | **2540.00** | 2327.00 | |
| 7 | हॅन्ड जेटस्प्रे - कंपनी - जग्वार | 50 | **1000.00** | 1246.00 | |
| 8 | १/२" गेट व्हॉल - कंपनी - लिडर | 50 | **390.00** | 295.00 | |
| 9 | १" गेट व्हॉल - कंपनी - लिडर | 25 | **710.00** | 602.00 | |

वरील नमुद ई निविदा दर (D) व मार्केट दर (E) रकान्याची तुलना करता मार्केट रेट थोडे कमी आहेत. परंतु सदर मार्केट रेट हे नाशिक Ex shop आहेत. तर D मध्ये नमुद केलेले दर हे सर्व करांसह शिर्डी संस्थान भांडार पोहचचे आहेत. त्यामुळे मार्केट रेट कमी आहेत असे म्हणता येणार नाही.

तसेच अ.नं.५ ग्रेनाईट व्हाईटराऊंड बेसीन (नं.०४४८) पॅरिवेअरचे न्युनतम दर व मार्केट रेटमध्ये तफावत आहे. तथापि सदर पॅरिवेअर कंपनीचे ४४८ नंबरचे बेसीनचे भांडे मॉडेल बंद झालेचे समजते त्यामुळेCO 407 या मॉडेलचे दर संबंधीत न्युनतम दरधारकाने दिलेले आहेत. हे त्यांनी निविदा भरतांनाच हार्ड कॉपीसोबत सादर केलेले पत्रात नमूद केलेले आहे.

तरी वर नमूद गडद व अधोरेखित न्युनतम दरांबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर.

**पाणी पुरवठा विभागाकरीता प्लंबींग साहित्य खरेदी प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक युनियन ट्रेडींग कंपनीचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. उपसमितीने ई-निविदेमधील दरांच्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता, त्यामध्ये युनियन ट्रेडींग यांचे दर बाजारभावापेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास आले. उपसमितीने याबाबत त्यांचे प्रतिनिधींना विचारणा केली असता, त्यांना माहिती देता आली नाही.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी पुरवठा विभागाकरीता आवश्यक असलेले प्रस्तावित प्लंबींग साहित्य खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक बाजारभावातील दराने सदरहू साहित्य पुरवठा करण्यास तयार असतील तर, तसे त्यांचेकडून लेखी स्वरुपात घेऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**२१ सन २०१७-१८ किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्य खरेदीसाठी A, B, C, D व L ग्रुपमधील ३० Items चे ऑनलाईन प्राप्त न्युनतम दरांबाबत निर्णय होणेबाबत.**

सन २०१७-१८ वर्षासाठी किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्यासाठी ग्रुप वाईज ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| ग्रुप | तपशील |
|---|---|
| A | कडधान्य, डाळी, किराणामाल |
| B | मसाले |
| C | ड्रायफ्रुट |
| D | वनस्पती तूप |
| E | पत्रावळ |
| F | चहा पावडर व कॉफी |
| G | गहू, तांदुळ, साखर व हरभराडाळ |
| H | खाद्यतेल |
| I | टोण्ड गाय दुध |
| J | लॅमिनेटेड पेपर पिशवी व प्लॅस्टिक पिशवी |
| K | पेपरकप |
| L | पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर |
| M | इतर वस्तु |

याकामी एकुण खालील नमुद ४९ निविदाधारकांनी विविध ग्रुपमध्ये निविदा सादर केल्या होत्या.

१. आकाश ट्रेडर्स, औरंगाबाद
२. गुप्ता एंटरप्रायजेस, पुणे
३. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक
४. माऊली फुड प्रॉडक्ट, औरंगाबाद
५. पुखराज रामनिवास, जळगांव
६. रुपल सिंडीकेट्स, मुंबई
७. ओम साई आनंद ट्रेडर्स, पुणे
८. पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी
९. आर.मुथा राईस हाऊस, औरंगाबाद
१०. संदिप ट्रेडींग कंपनी, नांदेड
११. धनराज मोहनराज जैन, अकोला
१२. हिरालाल चुन्नीलाल ॲण्ड कंपनी, नांदेड
१३. कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड
१४. गीता ट्रेडींग कपंनी, सातारा
१५. साहिल ट्रेडींग कंपनी, नांदेड
१६. संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव
१७. रुपचंद भागचंद कासलीवाल, श्रीरामपूर
१८. पुष्कर फुड कॉर्पोरेशन, पुणे
१९. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक
२०. श्री गणेश ड्राय फ्रुट्स, पुणे
२१. धर्मपाल सत्यपाल लिमीटेड, भिवंडी
२२. लेक सिटी ड्राय फ्रुट्स प्रा.लि., पुणे
२३. इंडिया सेल्स कॉर्पोरेशन, पुणे
२४. संचेती फॅमिली फुड्स डंडिया प्रा.लि., पुणे
२५. बोला सुरेंद्र कामथ ॲण्ड सन्स, केंडीजे (कर्नाटक)
२६. खुशी एजन्सीज, नाशिक

२७. श्री प्रॉडक्ट्स, सिन्नर
२८. कुणाल टि सेंटर, शिर्डी
२९. मुरलीधर अॅण्ड कांतीलाल, कराड
३०. सुरेसा टी लिमीटेड, मुंबई
३१. व्ही.एम.डिस्ट्रिब्युटर्स, नाशिक
३२. संजय ट्रेडींग कंपनी, नाशिक
३३. सुरजमल जयनारायण, पिपरीया, हौशंगाबाद (म.प्र.)
३४. उषा अॅग्रोटेक, सुपा
३५. श्री सत्यसाई ऑईल इंडस्ट्रिज अॅण्ड रिफायनरी, नांदेड
३६. गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगांव
३७. श्री स्वामी समर्थ डिस्ट्रिब्युटर्स, तिसगांव
३८. प्रभात डेअरी लिमीटेड, रांजणखोल
३९. एअरो प्लास्ट लिमिटेड, बहादुरगड, हरियाणा
४०. हरिओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रिज, कोल्हापुर
४१. नीट प्रिंट्स, अहमदनगर
४२. सुपर सील्स, नाशिक
४३. अल्फा कार्बनलेस पेपर्स मॅन्यु.कंपनी प्रा.लि., नवी मुंबई
४४. आर.एम.डेव्हलपर, पुणे
४५. श्री सुप्रिम सेल्स कॉर्पोरेशन, नाशिक
४६. सुयोग नेचर केअर, जयपुर
४७. साई अॅग्रो इंडस्ट्रि, टाकळी
४८. वीरसाई अॅग्रो इंडस्ट्रिज, शिर्डी
४९. साई बेव्हरेजेस, सुपा

सदर ४९ निविदांची तांत्रिक कागदपत्रांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे२१ निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्या होत्या, तर ०८ निविदाधारक अंशत: अपात्र ठरले आहेत.

१. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक
२. पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी
३. संदिप ट्रेडींग कंपनी, नांदेड
४. हिरालाल चुन्नीलाल भराडीया अॅण्ड कंपनी, नांदेड
५. कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड
६. गीता ट्रेडींग कंपनी, सातारा
७. संतोष ट्रेडींग कंपनी, जळगाव
८. पुष्कर फुड कॉर्पोरेशन, पुणे
९. रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक
१०. साहिल ट्रेडींग कंपनी, नांदेड
११. पुखराज रामनिवास, जळगाव
१२. धनराज मोहनराज जैन, अकोला
१३. सुरजमल जयनारायण, पिपरीया, हौशंगाबाद
१४. श्री स्वामी समर्थ डिस्ट्रिब्युटर्स, तिसगाव
१५. व्ही.एम.डिस्ट्रिब्युटर्स, नाशिक
१६. हरीओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रिज, कोल्हापुर
१७. निट प्रिंट्स, अहमदनगर
१८. श्री सुप्रिम सेल्स कॉर्पोरेशन, नाशिक
१९. सुयोग नेचर केअर, जयपुर
२०. साई अॅग्रो इंडस्ट्रि, टाकळी
२१. वीर साई इंडस्ट्रिज, शिर्डी

एकूण ४९ निविदांतील २८ निविदाधारक पुर्णत: अपात्र ठरले आहेत,. सदर निविदांचा ग्रुपवाईज पात्र-अपात्रतेचा तपशिल खालीलप्रमाणे –

| ग्रुपचे नांव | तपशिल | आलेल्या निविदा | अपात्र निविदा | पात्र निविदा |
|---|---|---|---|---|
| A | कडधान्य, डाळी, किराणामाल | २० | १० | १० |
| B | मसाले | १८ | ०९ | ०९ |
| C | ड्रायफ्रुट्स | ११ | ०८ | ०३ |
| **ग्रुपचे नांव** | **तपशिल** | **आलेल्या निविदा** | **अपात्र निविदा** | **पात्र निविदा** |
| D | वनस्पती तुप | ०५ | ०२ | ०३ |
| E | पत्रावळ व द्रोण | ०४ | ०३ | ०१ |
| F | चहा पावडर व कॉफी | ११ | ०९ | ०२ |
| G,G1,G2,G3 | गहु, तांदुळ, साखर व हरभराडाळ | २० | १४ | ०६ |
| H,H1,H2,H3 | खाद्यतेल | ०५ | ०४ | ०१ |
| I,I1,I2,I3 | टोण्ड गाय दुध | ०४ | ०२ | ०२ |
| J | लॅमिनेटेड पेपर पिशवी व प्लॅस्टिक पिशवी | ०४ | ०२ | ०२ |
| K | पेपरकप | ०६ | ०२ | ०४ |
| L | पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर | ०५ | ०२ | ०३ |

वरील पात्र निविदाधारकांनी निविदेसोबत सादर केलेले नमुने मा.उपसमितीचे दिनांक १२.०५.२०१७ रोजीचे सभेत निवडण्यात आले.

सदरचे ग्रुप A मधील अ.नं. १,१५,१६,२०,२१,२२,२३,२५,२६,२८,२९,३१ वर नोंदविलेल्या १२ Items साठी, ग्रुप B मधील अ.नं. ४,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१९,२० वर नोंदविलेल्या १५ Items साठी, ग्रुप C मधील अ.नं. १,२ या दोन Items साठी, ग्रुप E मधील १,२,३ या तीन Items साठी, ग्रुप F मधील अ.नं. १,२ या दोन Items साठी, ग्रुप G,G1,G2,G3 मधील अ.नं. १,३-३A या दोन Items साठी, ग्रुप H,H1, H2,H3 मधील अ.नं. १ Item साठी, ग्रुप I,I1,I2,I3 मधील अ.नं. १ या Item साठी, ग्रुप J मधील अ.नं. १ ते ६ या सहा Items साठी दोन किंवा त्यापेक्षा कमी नमुने निवडलेले आहेत.

त्यामुळे सदर Items साठी फेर ई-निविदा प्रक्रिया करण्याचे तसेच तांदुळासाठी प्रसादालयाकडून कुठला तांदुळ पाहिजे, याची माहिती घेऊन फेर ई-निविदा प्रक्रिया करणेबाबत दिनांक १२.०५.२०१७ रोजीचे मा.उपसमितीचे सभेत झालेले चर्चेत ठरले होते.

तसेच ग्रुप M साठी एकाच निविदाधारकांने निविदा भरली होती. तथापि तीही अपात्र ठरली होती. त्यामुळे ग्रुप M मधील अ.नं.१ व २ साठी फेर ई-निविदा प्रक्रिया करावी लागेल.

ग्रुप A,B,C,E,F,G,H,I,J व M मधील एकुण ४६ Items साठी फेर ई-निविदा प्रक्रिया करण्याचे ठरले होते.

वरील A,B,D,G,K व L गृपमधील पात्र निविदाधारकांचे Commercial Bid दि. ३०.०५..२०१७ रोजी मा.खरेदी समिती सभेत उघडण्यात आलेले आहेत.सदर तांत्रिकदृष्टया पात्र ठरलेल्या व नमुने निवड झालेल्या निविदाधारकांचा ३० Items चा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. तसेच सदर Items चे सन २०१६-१७ चे न्युनतम दरांचा तक्ता सोबत सादर केला आहे.

तरी A,B,D,G,K व L गृपमधील ३० Items चे सोबतचे तुलनात्मक तक्त्यांतील गडद व अधोरेखित केलेल्या ऑनलाईन प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उप समितीचे सभेत सादर.

**सन २०१७-१८ किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्य खरेदीसाठी A, B, D, G, K व L ग्रुपमधील ३० Items खरेदीकामीच्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक आजचे उपसमिती सभेसमोर, त्यांनी दिलेल्या दरांवर चर्चा करणेसाठी उपस्थित होते. सभेने त्यांचेबरोबर दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, मुगदाळ खरेदीकामीचे निम्नतम दरधारक कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड व संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड यांनी प्रती क्विंटल रु.७,६५३/- ऐवजी रु.७,६३०/- मात्र अंतीम दर देऊ**

**केले. पापड खरेदीकामीचे निम्नतम दरधारक पुष्कर फुड कार्पोरेशन, पुणे यांनी प्रती क्विंटल रु.१९,०००/- ऐवजी रु.१८,९९८/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**सन २०१७-१८ करीता किराणामाल व इतर अनुषंगिकसाहित्य खरेदीसाठी A, B, D, G, K व L ग्रुपमधील ०२ Items खरेदी करणेकामी उपरोक्तप्रमाणे दिलेले अंतीम दर व उर्वरित २८ Items किराणा मालासाठी ई-निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त झालेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच ज्या मालासाठी समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, असा किराणा माल खरेदी करणेकामी समान विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

२२ **संस्थान वाहनांसाठी, विद्युत जनीत्र तसेच इतर विभागांना लागणारे इंधन खरेदी बाबत.**

**महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील तरतुदः-** कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याहीसर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यकत्यासोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्येअसतील,"असे नमुद केलेले आहे.

**प्रस्तावनाः-** दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१२५ अन्वये, संस्थान वाहने, विद्युत जनीत्रे, लॉन्ड्री, फॉगिंग मशिन व इतर कामाकरीता लागणारे इंधन (डिझेल व पेट्रोल) खरेदी कामीस्पर्धात्मक दर प्राप्त होणेसाठी शिर्डी पासुन ०५ कि.मी अंतरातील पेट्रोलपंपधारकांकडून नव्याने प्रचलित इंधन दरात प्रति लिटर सुट व इंधन बिलास एक महिना क्रेडीट मिळणे बाबत सुधारीत दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली.

उपरोक्त निर्णयानुसार, जा.नं.एसएसएस/वाहन/१६६/२०१७ दि.०८/०४/२०१७ अन्वये,संस्थान वाहने, विद्युत जनीत्रे, लॉन्ड्री,फॉगिंग मशिन व इतर कामाकरीता लागणारे इंधन (डिझेल व पेट्रोल) खरेदी कामीशिर्डी पासुन ०५ कि.मी अंतरापर्यंतचेपेट्रोलपंपधारकांकडून नव्याने प्रचलित इंधन दरात प्रति लिटर सुट व इंधन बिलास एक महिना क्रेडीट मिळणे कामी परिसरातील ०९ पेट्रोल पंपधारकांकडून दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यापैकी ०५ पेट्रोल पंपधारकांकडून दरपत्रके प्राप्तझालेली असुन सदर दरपत्रके दि.०६/०५/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आली होती. सदर दरपत्रकामध्ये देवु केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | पुरवठाधारकांचेनांव | वाहन विभाग तेपेट्रोलपंप अंतर (जाणे व येणे) | दरपत्रकात दिलेली सुट | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | मा.आ. श्री राधाकृष्ण विखे पा.सह. ट्रक्स वाहतुक संस्था लि., प्रवरानगर, साकुरीपंप | ६ कि.मी. | ०.६० पैसे प्रति लिटर **H-2** | १ महिना क्रेडीट |
| ०२ | साई समर्थ, नगर-मनमाड रोड, शिर्डी | १.८ कि.मी. | ---- | १५ दिवस क्रेडीट |
| ०३ | साईकृष्ण पेट्रोलियम,पिंपळवाडीरोड, शिर्डी | ५.८ कि.मी. | ०.२० पैसे प्रति लिटर H-3 | १५ दिवस क्रेडीट |
| ०४ | साई समर्थ पेट्रोलियम,नगर-मनमाडरोड, निमगांव | १० कि.मी. | ०.६० पैसे प्रति लिटर **H-2** | ---- |
| ०५ | श्री साई सर्व्हिस सेंटर, सावळीविहीर | १३ कि.मी. | ०.७५ पैसे प्रति लिटर **H-1** | ---- |

खरेदी समितीचे शिफारशीनुसार, संस्थान वाहने, विद्युत जनीत्रे, लॉन्ड्री,फॉगिंग मशिन व इतर कामाकरीता लागणारे इंधन (डिझेल व पेट्रोल) खरेदी कामीउपरोक्त पैकी H-1 (अ.नं.०५) व H-2 (अ.नं.०१ व ०४) अशा एकुण ०३ पुरवठादारांना मा. स्थानिक उपसमिती समोर चर्चेसाठी बोलावुन, चर्चेअंती निर्णय घेवुन मा.व्यवस्थापन समितीस शिफारस करणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता.

दि.१२/०५/२०१७ रोजीचे मा.स्थानिक उपसमितीचे सभेतील विषय क्र.१५ अन्वये, "संस्थानसाठी आवश्यक असणारे इंधन खरेदी करणेसाठी ज्या पेट्रोलपंपधारकांनी दर दिलेले आहेत, त्यांचे पेट्रोलपंपावर वाहन जाणे-येणेसाठी किती खर्च येईल, त्यासह सभेसमोर सादर करणेत यावे", अशी शिफारस केलेली आहे.

सदर निर्णयानुसार, इंधन खरेदी करणेसाठी ज्या पेट्रोलपंपधारकांनी दर दिलेले आहेत, त्यांचे पेट्रोलपंपावर वाहन जाणे-येणेसाठी इंधनाकरीता येणा-या खर्चाचा तक्ता खालील प्रमाणे आहे. (डिझेल दर प्रति लिटर रु.६०/- प्रमाणे)

| अ.नं. | तपशिल | पुरवठाधारक पेट्रोलपंप | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मा.आ.श्री राधाकृष्ण विखे पा.सह. ट्रक्स वा.सं.लि.,प्रवरानगर, साकुरीपंप | साई समर्थ, नगर-मनमाड रोड,शिर्डी | साईकृष्ण पेट्रोलियम, पिंपळवाडी रोड, शिर्डी | साई समर्थ पेट्रोलियम, नगर-मनमाडरोड निमगांव | श्री साई सर्व्हिस सेंटर, सावळीविहीर |
| | | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१ | **वाहन विभाग ते पंपअंतर (जाणे व येणे प्रति ट्रिप)** | **६ कि.मी.** | **१.८ कि.मी.** | **५.८ कि.मी.** | **१० कि.मी.** | **१३ कि.मी.** |
| ०२ | **देवु केलेली सुट व क्रेडीट मर्यादा** | **०.६० प्र.लि.<br>१ महिना<br>H-2** | **०.०० प्र.लि.<br>१५ दिवस** | **०.२० प्र.लि.<br>१५ दिवस<br>H-3** | **०.६० प्र.लि.<br>-----<br>H-2** | **०.७५ प्र.लि.<br>-----<br>H-1** |
| **अ)** | **बसेस-२४ करीता** | | | | | |
| | सरासरी- ४ कि.मी. प्र. लि. नुसार जाणे येणे करीता लागणारे इंधन | १.५ | ०.५ | १.५ | २.५ | ३.१ |
| | प्रति लि. रु.६०/- प्रमाणे येणारा खर्च | ९०/- | ३०/- | ९०/- | १५०/- | १८६/- |
| | सरासरी १०० लि. इंधन भरलेस मिळणारी सुट | ६०/- | --- | २०/- | ६०/- | ७५/- |
| | **सुट वजा जाता खर्च** | **३०/-** | **३०/-** | **७०/-** | **९०/-** | **१११/-** |
| **ब)** | **मालवाहतुक-१५ करीता** | | | | | |
| | सरासरी- १० कि.मी. प्र. लि. नुसार जाणे येणे करीता लागणारे इंधन | ०.६ | ०.२ | ०.६ | १.० | १.३ |
| | प्रति लि. रु.६०/- प्रमाणे येणारा खर्च | ३६/- | १२/- | ३६/- | ६०/- | ७८/- |
| | सरासरी ४० लि. इंधन भरलेस मिळणारी सुट | २४/- | -- | ८/- | २४/- | ३०/- |
| | **सुट वजा जाता खर्च** | **१२/-** | **१२/-** | **२८/-** | **३६/-** | **४८/-** |
| **क)** | **कार्यालयीन-१३ करीता** | | | | | |
| | सरासरी- ११ कि.मी. प्र. लि. नुसार जाणे येणे करीता लागणारे इंधन | ०.६ | ०.२ | ०.६ | ०.९ | १.२ |
| | प्रति लि. रु.६०/- प्रमाणे येणारा खर्च | ३६/- | १२/- | ३६/- | ५४/- | ७२/- |
| | सरासरी ४० लि. इंधन भरलेस मिळणारी सुट | २४/- | --- | ८/- | २४/- | ३०/- |
| | **सुट वजा जाता खर्च** | **१२/-** | **१२/-** | **२८/-** | **३०/-** | **४२/-** |
| **ड)** | **रुग्णवाहिका-११ करीता** | | | | | |
| | सरासरी- १० कि.मी. प्र. लि. नुसार जाणे येणे करीता लागणारे इंधन | ०.६ | ०.२ | ०.६ | १.० | १.३ |
| | प्रति लि. रु.६०/- प्रमाणे येणारा खर्च | ३६/- | १२/- | ३६/- | ६०/- | ७८/- |
| | सरासरी ४० लि. इंधन भरलेस मिळणारी सुट | २४/- | -- | ८/- | २४/- | ३०/- |
| | **सुट वजा जाता खर्च** | **१२/-** | **१२/-** | **२८/-** | **३६/-** | **४८/-** |

विद्युत विभागामार्फत सर्व विद्युत जनित्राकरीता लागणारे इंधन एकत्रित टॅकरद्वारे आणुन सर्व ठिकाणी खाली करण्यात येते. एक टॅंकर मध्ये एका वेळेस सरासरी २,००० लिटर डिझेल आणण्यात येते. श्री साई सर्व्हिस सेंटर, सावळीविहीर यांचे अंतर १३ कि.मी. असलेतरी त्यांनी दिलेली सुट प्र.लि. रु.०.७५/- विचारात घेता या कामी २००० लि. X ०.७५ = रु.१५००/- सुट मिळेल तर पेट्रोलपंपा वर जाणे व येणे तसेच सर्व ठिकाणी डिझेल खाली करणे यासाठी ट्रॅक्टरद्वारे सरासरी २.२५ तास लागतात. या कामी १ लिटर डिझेल खर्च होतो. म्हणजे बाजारभावानुसार ६०/- इंधन खर्च होऊन या कामी प्रति ट्रिप रु.१,४४०/- बचत होईल.

**मागणीः-** तरी संस्थान वाहने, विद्युत जनीत्रे, लॉन्ड्री,फॉगिंग मशिन व इतर कामाकरीता लागणारे इंधन (डिझेल व पेट्रोल) खरेदी कामी उपरोक्त दरपत्रकधाकरांचे पेट्रोलपंपावर वाहन जाणे-येणेसाठी येणा-या इंधन खर्चाचे अवलोकन करुन पुरवठादार निश्चित करणे व त्यांना कार्यादेश देणे कामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर शिफारस करणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी आवश्यक असलेले इंधन खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या दरांमध्ये, ज्या पंपधारकांनी प्रती लिटर जास्तीत जास्त सुट देऊ केली आहे, त्यांचे पेट्रोल पंप वाहन विभागापासुन बऱ्याचशा अंतरावर आहेत. त्या ठिकाणी वाहन जाणे-येणेकामी वाहनाची झीज होणार आहे, त्यासाठी इंधन लागणार आहे. तसेच वेळही वाया जाणार आहे. याकरीता जवळच्या पेट्रोलपंपावरुन इंधन खरेदी करणेत यावे अथवा याबाबत दुसरा सोयीस्कर पर्यायाचा विचार करणेत यावा. तोपर्यंत संस्थानसाठी आवश्यक असलेले इंधन पुर्वीप्रमाणेच खरेदी करणेत यावे. तसेच दरम्यानचे कालावधीमध्ये शिर्डी पोलिस स्टेशन मालकीच्या पेट्रोलपंपाचा वापर करता येईल का व इंधनाचा दर काय राहील, याबाबत पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडून अभिप्राय मागविणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**२३ संस्थान संचलित श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी बससेवा सुरु करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील तरतुदः-**

१) कलम १७ (१) मध्ये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील" असे नमुद केलेले आहे .

२) कलम १७ (२) (ढ) मध्ये, विशेषकरुन आणि पोट-कलम (१) मधील तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, समिती सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील,असे नमुद आहे.

**प्रस्तावनाः-** दि.२८/०४/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३२६ नुसार, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी संस्थान मार्फत बससेवा उपलब्ध करुन देणेत यावी व यासाठी स्कुलबस खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत यावा.

तसेच, कोणत्या गावांना स्कुलबस सुविधा पुरवावयाची व सदरहू स्कुलबसचे प्रवास शुल्क किती आकारावयाचे यावर सविस्तर चर्चा करणेसाठी स्थानिक उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले आहे

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी सन-२०१६-१७ करीता स्कुलबस सुविधाकरीता गाव निहाय विद्यार्थीनी संख्या खालील प्रमाणे कळविलेली होती.

| अ.नं. | गाव | संख्या | अ.नं. | गाव | संख्या | अ.नं. | गाव | संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिर्डी | २५२ | १० | पिंपळस | २ | १९ | सावळीविहीर खु. | १६ |
| २ | नांदुर्खी खु. | १५ | ११ | अस्तगांव | ५ | २० | निघोज | ३५ |
| ३ | नांदुर्खी बु. | २९ | १२ | पिंपळवाडी | ६० | २१ | निमगांव | ४३ |
| ४ | कनकुरी | १८ | १३ | बिरेगांव बन | ६ | २२ | सोनेवाडी | २ |
| ५ | डो-हाळे | ३६ | १४ | रुई | ३२ | २३ | न.पा.वाडी | ८ |
| ६ | को-हाळे | ७ | १५ | शिंगवे | २ | २४ | निमगांववाडी | १० |
| ७ | काकडी | १ | १६ | पुणतांबा | २ | २५ | निमशेवाडी | ७ |
| ८ | साकुरी | १७ | १७ | कोऱ्हकी | ४ | | **एकुण** | **६६६** |
| ९ | राहाता | १७ | १८ | सावळीविहीर बु. | ४० | | | |

दि.२८/०४/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३२६ नुसार, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी संस्थान मार्फत बससेवा उपलब्ध करुन देणेसाठी स्कुलबस खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणे करीता कोणत्या गावांना स्कुलबस सुविधा पुरवावयाची याबाबत स्थानिक उपसमिती पुढे निर्णय होणे आवश्यक आहे. त्या निर्णयानुसार, निश्चित झालेल्या संख्येनुसार बस खरेदीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**अ) बस थांबे:-**

**<u>तक्ता क्रमांक ०३</u>**

**०१) सर्व मुलींना बससेवा उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास:-**

| अ.नं. | ठिकाण | जाणे+ येणे अंतर कि.मी. अंदाजे (आणणे +सोडणे) | संख्या | एकुण | प्रति कि.मी. रु.१/- नुसार जमा होणारी अंदाजित रक्कम (०३ X ०४ X २३० शालेय दिवस ) | आवश्यक बस संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ |
| ०१ | रुई | २१+२१=४२ | ३२ | ३६ | ३,०९,१२०/- | ०१ बस | कोहकी येथील मुलांना दत्त मंदीर स्टॉप येथे बोलवावे लागेल. |
| | कोहकी (दत्त मंदिर) | २३+२३=४६ | ०४ | | ०,४२,३२०/- | | |
| ०२ | पिंपळवाडी | १८+१८=३६ | ६० | ७२ | ५,९६,१६०/- | २ बसेस | नपावाडी+ पुणतांबा+ शिंगवे येथील मुलींना पिंपळवाडी येथे बोलवावे लागेल. |
| | शिंगवे-२+ नपावाडी-८+ पुणतांबा-२ | | १२ | | | | |
| ०३ | नांदुर्खी बु. | २४+२४=४८ | २९ | ५२ | ३,२०,१६०/- | ०१ बस | काकडी येथील ०१ मुलगी को-हाळे येथे बोलवावे लागेल. |
| | नांदुर्खी खु. | २६+२६=५६ | १५ | | १,९३,२००/- | | |
| | को-हाळे-७+ काकडी-०१ | ३६+३६=७२ | ०८ | | १,३२,४८०/- | | |
| ०४ | डो-हाळे | २४+२४=४८ | ३६ | ५४ | ३,९७,४४०/- | ०१ बस | |
| | कनकुरी | १८+१८=३६ | १८ | | १,४९,०४०/- | | |
| ०५ | सावळीविहीर खु. | १६+१६=३२ | ४० | ५६ | २,९४,४००/- | ०१ बस | |
| | सावळीविहीर बु. | १७+१७=३४ | १६ | | १,२५,१२०/- | | |
| ०६ | राहाता-२७- पिंपळस-२+ अस्तगांव-५ | १९+१९=३८ | २४ | ४१ | २,०९,७६०/- | ०१ बस | साकुरी येथील मुली नगर-मनमाड रोडवरुन घेता येतील व सोडता येतील. पिंपळस व अस्तगांव येथील मुलींना राहाता येथे बोलवावे लागेल. |
| | साकुरी | १७+१७=३४ | १७ | | १,३२,९४०/- | | |
| ०७ | शिर्डी-२५२+ बन-६ | १५+१५=३० (३०X ७ बस) | २५८ | ३५५ | २४,४९,५००/- | ७ बस | |
| | निघोज | | ३५ | | | | |
| | निमगांव | | ४३ | | | | |
| | सोनेवाडी | | २ | | | | |
| | निमगांववाडी | | १० | | | | |
| | निमशेवाडी | | ७ | | | | |
| | एकुण-५२० कि.मी. | **एकुण** | **६६६** | **६६६** | **५३,५१,६४०/-** | **१४ बस** | |

**संस्थानमार्फत, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपरोक्त तक्ता क्र.०१ नुसार सर्व मुलींकरीता बससेवा द्यावयाची झाल्यास खालील तपशिला प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.**

१) **बसेस खरेदी खर्च-** सदरचे ज्युनिअर कॉलेज सकाळी १०.०० ते सायं.०५.०० या वेळेत असल्यामुळे सर्व मुलींना एकाच वेळेस शाळेमध्ये घेवुन यावे लागेल व परत घरी सोडावे लागेल. उपरोक्त मुलींची संख्या विचारात घेता वरील प्रमाणे एकुण ६६६ मुलींकरीता नवीन १४ बसेस (५४+२ सिटर) खरेदी करणे आवश्यक आहे. सदर कामी प्रति बस अंदाजे रु.२३,५०,०००/- प्रमाणे एकुण बसेस करीता रु.३,२९,००,०००/- इतका खर्च येईल.

२) **कर्मचारी वेतन खर्च-** प्रति बसकरीता ०१ वाहन चालक व ०१ मतदनीस या प्रमाणे एकुण १४ बसेस करीता १४ वाहन चालक व १४ मदतनीस कर्मचारी उपलब्ध करुन द्यावे लागतील, त्यानुसार या सेवेसाठी ०१ कंत्राटी वाहन चालकाचे प्रति महा वेतन रु.१३,५००/- व कंत्राटी मदतनीस कर्मचारी प्रतिमहा वेतन रु.१०,०००/- प्रमाणे १४ बसेस करीता प्रतिमहा रु.३,२९,०००/- प्रमाणे रु.३९,४८,०००/- इतका वार्षिक वेतन खर्च अपेक्षीत आहे.

३) **इंधन खर्च-** १४ बसेस करीता प्रति दिन अंदाजे ५२० कि.मी. अंतराकरीता ४ कि.मी. प्रती लिटर प्रमाणे १३० लिटर डिझेल X अंदाजे रु.६२/- प्रति लिटर प्रमाणे रु.८,०६०/- प्रति दिवस याप्रमाणे वार्षिक (२३० शालेय दिवसाकरीता) अंदाजे रु.१८,५३,८००/- मात्र इंधन खर्च अपेक्षीत आहे.

४) **दुरुस्ती व देखभाल खर्च-** १४ बसेसचे दुरुस्ती व देखभाल खर्च प्रति बस रु.५०,०००/- प्रमाणे १४ बसेस करीता रु.७,००,०००/- खर्च अपेक्षीत आहे.

५) **विमा खर्च-** सर्व बसेसची किंमत व विद्याथीनी संख्या (५४+२) नुसार विमा करणे करीता अंदाजे प्रति बस फी रु.८७,५००/- X १४ प्रमाणे रु.१२,२५,०००/- प्रति वर्ष खर्च येतील.

६) **RTO टॅक्स खर्च-** RTO कार्यालयाचे प्रचलित नियमानुसार, इयत्ता दहावी पेक्षा पुढील वर्गाकरीता टॅक्ससाठी प्रति सिट रु.१९००/- प्रमाणे X ५४ सिट करीता रु.१,०२,६००/- प्रति बस प्रमाणे १४ बसेस करीता एकुण रक्कम रु.१४,३६,४००/- खर्च येईल. याकरीता सदरच्या बसेस कनिष्ठ महाविद्यालयाचे नावावर रजिष्ट्रेशन कराव्या लागतील, याकामी कनिष्ठ महाविद्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.

उपरोक्त अ.नं.०१ ते ०६ करीता खालील प्रमाणे एकुण खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशिल | भांडवली खर्च (रु.) | अंदाजे वार्षिक खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | नवीन १४ बसेस खरेदी खर्च | ३,२९,००,०००.०० | ६५,८०,०००.०० (२०% घसारा) |
| ०२ | कर्मचारी वेतन खर्च (वार्षिक) | --- | ३९,४८,०००.०० |
| ०३ | इंधन खर्च (वार्षिक) | --- | १८,५३,८००.०० |
| ०४ | दुरुस्ती व देखभाल खर्च (वार्षिक) | --- | ७,००,०००.०० |
| ०५ | विमा खर्च(वार्षिक) | --- | १२,२५,०००.०० |
| ०६ | RTO टॅक्स खर्च(वार्षिक) | --- | १४,३६,४००.०० |
| | **एकुण अंदाजे खर्च** | **३,२९,००,०००.००** | **१,५७,४३,२००.००** |

०२) **शिर्डी, निमगांव व निघोज व्यतिरीक्त** इतर सर्व ठिकाणचे मुलींना संस्थान बस देणेचे असल्यास खालील प्रमाणे मार्ग/ बस थांबे करावे लागतील.

| अ.नं. | ठिकाण | जाणे+ येणे अंतर कि.मी. अंदाजे (आणणे +सोडणे) | संख्या | एकुण | प्रति कि.मी. रु.१/- नुसार जमा होणारी अंदाजित रक्कम (०३ X ०४ X २३० शालेय दिवस ) | आवश्यक बस संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०७** | **०८** |
| ०१ | रुई | २१+२१=४२ | ३२ | ३६ | ३,०९,१२०/- | ०१ बस | कोहकी येथील मुलांना दत्त मंदीर स्टॉप येथे बोलवावे लागेल. |
| | कोहकी (दत्त मंदिर) | २३+२३=४६ | ०४ | | ०,४२,३२०/- | | |
| ०२ | पिंपळवाडी | १८+१८=३६ | ६० | ७२ | ५,९६,१६०/- | २ बसेस | नपावाडी+ पुणतांबा+ शिंगवे येथील मुलींना पिंपळवाडी येथे बोलवावे लागेल. |
| | शिंगवे-२ + नपावाडी-८ + पुणतांबा-२ | | १२ | | | | |
| ०३ | नांदुर्खी बु. | २४+२४=४८ | २९ | ५२ | ३,२०,१६०/- | ०१ बस | काकडी येथील ०१ मुलगी को-हाळे येथे |
| | नांदुर्खी खु. | २६+२६=५६ | १५ | | १,९३,२००/- | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | को-हाळे-७ + काकडी-०१ | ३६+३६=७२ | ०८ | | १,३२,४८०/- | | बोलवावे लागेल. |
| ०४ | डो-हाळे | २४+२४=४८ | ३६ | | ३,९७,४४०/- | ०१ बस | |
| | कनकुरी | १८+१८=३६ | १८ | ५४ | १,४९,०४०/- | | |
| ०५ | सावळीविहीर खु. | १६+१६=३२ | ४० | | २,९४,४००/- | ०१ बस | |
| | सावळीविहीर बु. | १७+१७=३४ | १६ | ५६ | १,२५,१२०/- | | |
| ०६ | राहाता-२७ + पिंपळस-२+ अस्तगांव-५ | १९+१९=३८ | २४ | ४१ | २,०९,७६०/- | ०१ बस | साकुरी येथील मुली नगर-मनमाड रोडवरुन घेता येतील व सोडता येतील.पिंपळस व अस्तगांव येथील मुलींना राहाता येथे बोलवावे लागेल. |
| | साकुरी | १७+१७=३४ | १७ | | १,३२,९४०/- | | |
| | एकुण-३१० कि.मी. | **एकुण** | **३११** | **३११** | **२९,०२,१४०/-** | **७ बस** | |

संस्थानमार्फत, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपरोक्त तक्ता क्र.०२ नुसार मुलींकरीता बससेवा द्यावयाची झाल्यास खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **भांडवली खर्च (रु.)** | **अंदाजे वार्षिक खर्च** |
|---|---|---|---|
| ०१ | नवीन ७ बसेस खरेदी खर्च | १,६४,५०,०००.०० | ३२,९०,०००.०० (२०% घसारा) |
| ०२ | कर्मचारी वेतन खर्च (वार्षिक) | --- | १९,७४,०००.०० |
| ०३ | इंधन खर्च (वार्षिक) | --- | ११,१२,२८०.०० |
| ०४ | दुरुस्ती व देखभाल खर्च (वार्षिक) | --- | ३,५०,०००.०० |
| ०५ | विमा खर्च(वार्षिक) | --- | ६,१२,५००.०० |
| ०६ | RTO टॅक्स खर्च(वार्षिक) | --- | ७,१८,२००.०० |
| | **एकुण अंदाजे खर्च** | **१,६४,५०,०००.००** | **८०,५६,९८०.००** |

०३) **शिर्डी व नगर-मनमाड रस्त्यावरील गांवे** वगळुन इतर गावातील मुलींना बससेवा संस्थान मार्फत द्यावयाची असल्यास खालीलप्रमाणे मार्ग/ बस थांबे करावे लागतील.

**तक्ता क्रमांक ०३**

| **अ. नं.** | **ठिकाण** | **जाणे+ येणे अंतर कि.मी. अंदाजे (आणणे +सोडणे)** | **संख्या** | एकुण | **प्रति कि.मी. रु.१/- नुसार जमा होणारी अंदाजित रक्कम (०३ X ०४ X २३० शालेय दिवस )** | **आवश्यक बस संख्या** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०७** | **०८** |
| ०१ | रुई | २१+२१=४२ | ३२ | ३६ | ३,०९,१२०/- | ०१ बस | कोहकी येथील मुलांना दत्त मंदीर स्टॉप येथे बोलवावे लागेल. |
| | कोहकी (दत्त मंदिर) | २३+२३=४६ | ०४ | | ४२,३२०/- | | |
| ०२ | पिंपळवाडी | १८+१८=३६ | ६० | ७२ | ५,९६,१६०/- | २ बसेस | नपावाडी+ पुणतांबा+ शिंगवे येथील मुलींना पिंपळवाडी येथे बोलवावे लागेल. |
| | शिंगवे-२ + नपावाडी-८ + पुणतांबा-२ | | १२ | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३ | नांदुर्खी बु. | २४+२४=४८ | २९ | ५२ | ३,२०,१६०/- | ०१ बस | काकडी येथील ०१ मुलगी को-हाळे येथे बोलवावे लागेल. |
| | नांदुर्खी खु. | २६+२६=५६ | १५ | | १,९३,२००/- | | |
| | को-हाळे-७ + काकडी-०१ | ३६+३६=७२ | ०८ | | १,३२,४८०/- | | |
| ०४ | डो-हाळे | २४+२४=४८ | ३६ | ५४ | ३,९७,४४०/- | ०१ बस | |
| | कनकुरी | १८+१८=३६ | १८ | | १,४९,०४०/- | | |
| | एकुण-२३८ कि.मी. | **एकुण** | **२१४** | **२१४** | **२१,३९,९२०/-** | **५ बस** | |

संस्थानमार्फत, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपरोक्त तक्ता क्र.०३ नुसार मुलींकरीता बससेवा द्यावयाची झाल्यास खालील तपशिला प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशिल | भांडवली खर्च (रु.) | अंदाजे वार्षिक खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | नवीन ५ बसेस खरेदी खर्च | १,१७,५०,०००.०० | २३,५०,०००.०० (२०% घसारा) |
| ०२ | कर्मचारी वेतन खर्च (वार्षिक) | --- | १४,१०,०००.०० |
| ०३ | इंधन खर्च (वार्षिक) | --- | ८,५५,६००.०० |
| ०४ | दुरुस्ती व देखभाल खर्च (वार्षिक) | --- | २,५०,०००.०० |
| ०५ | विमा खर्च (वार्षिक) | --- | ४,३७,५००.०० |
| ०६ | RTO टॅक्स खर्च (वार्षिक) | --- | ५,१३,०००.०० |
| | **एकुण अंदाजे खर्च** | **१,१७,५०,०००.००** | **५८,१६,१००.००** |

**ब) मुलींकडून घ्यावयाचे फी बाबतः-**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (एस.टी.) मधील प्रवाशांकडून सध्या सरासरी एक रुपया प्रति कि.मी. पेक्षा अधिक भाडे आकारले जाते. तसेच प्रति तिकीट एक रुपया अधिभार घेण्यात येतो.

श्री साईबाबा संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयाकडील विद्यार्थीनीकरीता बससेवा उपलब्ध करुन दिल्यास येणारा खर्च विचारात घेता सवलतीच्या दरात उपरोक्त बस थांब्यानुसार व प्रत्यक्ष होणा-या प्रवासानुसार, प्रति कि.मी. एक रुपया (प्रति दिवसा प्रमाणे) एकुण शालेय २३० दिवसा करीता (वार्षिक) बस शुल्क आकारणी करता येईल.

**मागणीः-** उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने, खाली नमुद केलेल्या बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे -

०१. उपरोक्त 'अ' मधील तक्ता क्र. १, तक्ता क्र. २ अथवा तक्ता क्र. ०३ पैकी कोणत्या गावातील मुलींना बससेवा उपलब्ध करुन द्यावी.

०२. परिच्छेद 'ब' प्रमाणे बस प्रवास शुल्क आकारावे किंवा कसे?

तरी उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णयार्थ सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान संचलित श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी बससेवा सुरु करणेसाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या तक्ता क्र.३ प्रमाणे कार्यवाही करणेस, सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच बससेवेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थीनींकडून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंहामंडळाच्या कार्यपध्दती व बस थांब्यानुसार तसेच प्रत्यक्ष होणाऱ्या प्रवासानुसार प्रति कि.मी. रु.१/- मात्र प्रति दिन याप्रमाणे एकुण २३० शालेय दिवसांचे वार्षिक बस शुल्क आकारणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**सदरहू इतिवृत्त कायम करताना, बस शुल्क वगळता उपसमितीची इतर शिफारस मान्य करण्यात आली व संस्थान संचलित श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी विनामुल्य बससेवा सुरु करणेत यावी, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. तसेच या बसमध्ये सीसीटीव्हीची व्यवस्था करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

२४ **संस्थान व रुग्णालये विभागाचा मालमत्ता विमा पॉलीसी व श्री साईभक्तांचा अपघाती विमा पॉलीसीचे नुतनीकरणासाठी प्राप्त झालेल्या न्युनतम दराबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालमत्तेचे विमा संरक्षण व श्री साईभक्तांचा अपघाती व घातपाती विमा संरक्षण मिळणेसाठी संस्थानकडून दरवर्षी राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांकडून निविदा मागवून त्यातील न्युनतम दरांची निविदा स्विकारुन विमा संरक्षण घेतले जाते.

त्याअनुषंगाने, दि.१० जुलै,२०१७ ते दि.११ जुलै,२०१८ अखेर संस्थान व रुग्णालय मालमत्ता विमा, तसेच दि.१२ ऑगस्ट,१२०१७ ते दि.११ ऑगस्ट, २०१८ अखेर श्री साईभक्त अपघाती/घातपाती विमा पॉलीसी नुतनीकरणाच्या प्रस्तावास, उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये मान्यता मिळाली आहे. मिळालेल्या मान्यतेनुसार संस्थानने फक्त राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांना जा.क्र.एसएसएस/वशी/लेखा/१०७५/२०१७ दि.३१ मे,२०१७ चे पत्रान्वये त्यांचे न्युन्नतम दरपत्रके बंद लिफाफ्यामध्ये दि.०६ जून,२०१७ अखेर देणेबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार त्यास अनुसरुन राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांनी त्यांचे न्युनत्तम दर सिलबंद लिफाफ्यामध्ये संस्थानला सादर केलेले होते. सादर केलेली दरपत्रकांची सिलबंद पाकीटे दि.०७ जून,२०१७ रोजीच्या मा. खरेदी समिती सभेमध्ये, मा.कार्यकारी अधिकारी, उप-कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखाधिकारी, सो. यांचे समक्ष उघडण्यात आली.

राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असुन, त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| **अ.नं** | **राष्ट्रीयीकृत विमा कंपनी** | **संस्थान मालमत्ता विमा** | **रुग्णालय मालमत्ता विमा** | **श्री साईभक्त अपघात विमा** |
|---|---|---|---|---|
| १. | युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि, शिर्डी | **१४,५०,९४७/-** | ६,६९,५७२/- | ८,५१,०००/- |
| २. | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | २५,११,०००/- | **५,८९,१८९/-** | **४,६०,०००/-** |
| ३. | नॅशनल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | २५,००,०००/- | ७,००,०००/- | ७,००,०००/- |
| ४. | दि. न्यु इंडिया एश्योरन्स कं.लि, श्रीरामपुर | १५,११,१७०/- | ५,९५,९५०/- | ५,११,०००/- |

उपरोक्तप्रमाणे, संस्थान व रुग्णालये मालमत्तेसाठी व श्री साईभक्त अपघात विमासाठी खालील कंपन्यांचे न्युन्नतम प्रिमियम दर प्राप्त झालेले आहेत.

| **अ.नं** | **तपशिल** | **राष्ट्रीयीकृत विमा कंपनी** | **न्युन्नतम प्रिमियम दर रुपये** |
|---|---|---|---|
| १. | संस्थान मालमत्ता विमा | युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि, शिर्डी | १४,५०,९४७/- |
| २. | रुग्णालये मालमत्ता विमा | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | ५,८९,१८९/- |
| ३. | श्री साईभक्त अपघात विमा | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | ४,६०,०००/- |

तरी वरील तक्त्यातील अ.नं.०१ ते ०३ या राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांचे दर हे न्युनतम असल्याने ते स्विकारुन त्यांचेकडून दि.१० जुलै, २०१७ ते दि.११ जुलै, २०१८ अखेर संस्थान व रुग्णालये मालमत्ता विमा, तसेच दि.१२ ऑगस्ट, २०१७ ते दि.११ ऑगस्ट, २०१८ अखेर श्री साईभक्त अपघाती/घातपाती विमा पॉलीसी नुतनीकरणास मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा.उपसमितीची सभेसमोर सविनय सादर.

**संस्थान व रुग्णालये विभागाचा मालमत्ता विमा पॉलीसी व श्री साईभक्तांचा अपघाती विमा पॉलीसीचे नुतनीकरण करणेकामी राबविणेत आलेल्या प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. उपसमिती सभेसमोर चर्चेअंती त्यांनी खालीलप्रमाणे अंतीम दर देऊ केले.**

| **अ.नं** | **तपशिल** | **राष्ट्रीयीकृत विमा कंपनीचे नाव** | **दरपत्रकामधील निम्नतम दर रुपये** | **चर्चेअंती देऊ केलेले एकत्रित दर रु.** |
|---|---|---|---|---|
| १. | संस्थान मालमत्ता विमा | युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि, शिर्डी | १४,५०,९४७/- | **१४,००,०००/-** |
| २. | रुग्णालये मालमत्ता विमा | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | ५,८९,१८९/- | **५,७५,०००/-** |
| ३. | श्री साईभक्त अपघात विमा | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | ४,६०,०००/- | **४,५०,०००/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान व रुग्णालये विभागाचा मालमत्ता विमा पॉलीसी व श्री साईभक्तांचा अपघाती विमा पॉलीसीचे नुतनीकरण करणेकामी उपरोक्त तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले अंतीम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

२५ **मंदिर विभागामार्फत होणाऱ्या पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी मान्यवर निश्चितीबाबत.**

संस्थानमार्फत श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ मध्ये मंदिर विभागामार्फत वीणा, साईसच्चरित पोथीची मिरवणूक, श्रींच्या प्रतिमा (फोटोची) मिरवणूक, अध्याय वाचन, श्रींची पाद्यपुजा, गुरुस्थान येथे रुद्राभिषेक पुजा अशा कार्यक्रमाचे आयोजन मान्यवरांचे हस्ते करणे असल्याने. मान्यवरांची नावे निश्चित झाल्यानंतर वीणा कोणी घ्यावा, पोथी कोणी घ्यावी, श्रींचा फोटो कोणी घ्यावा, अध्यायाचे वाचन कोणी करावे, श्रींची पाद्यपुजा, कोणी करावी, रुद्राभिषेक पुजा कोणी करावी याबाबत रुपरेषा निश्चित करता येईल.

**आजचे उपसमिती सभेमध्ये मंदिर विभागामार्फत होणाऱ्या पाद्यपुजा व इतर कार्यक्रमांसाठी खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे मान्यवरांची निश्चिती करणेत आली.**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| ०८/०७/२०१७ शनिवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री.चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष<br>**पोथी–** मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य<br>**प्रतिमा-** मा.ॲड मोहन जयकर- सदस्य व मा.श्री.सचिन तांबे- सदस्य |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन –**<br>१. मा.श्री.सुरेश हावरे, अध्यक्ष<br>२. मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य<br>३. मा.सौ.योगिता शेळकेपाटील, सदस्या<br>४. मा.श्री.सचिन तांबे, सदस्य<br>५. मा.श्री.प्रताप भोसले, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा –** मा.कार्यकारी अधिकारी |
| ०९/०७/२०१७. रविवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, सदस्य<br>**पोथी–** मा.श्री.चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष |
| | | **प्रतिमा-** मा.श्री.प्रताप भोसले- सदस्य व मा.डॉ.राजेंद्र सिंह- सदस्य<br>(मा.डॉ.राजेंद्र सिंह उपस्थित नसल्यास मा.ॲड मोहन जयकर) |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री.सुरेश हावरे, अध्यक्ष |
| १०.०७.२०१७ सोमवार | सकाळी ६.०० वाजता | **उत्सवाचा सांगता दिवस** |
| | | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री.चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष |
| | सकाळी ६.३० वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक–** मा.उपकार्यकारी अधिकारी |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१७ निमित्ताने करण्यात येणाऱ्या पाद्यपुजा व इतर कार्यक्रमांसाठी उपरोक्तप्रमाणे सदस्यांची निश्चिती करणेस व याबाबत सर्व सदस्यांना लेखी स्वरुपात कळविणेत मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **दि.०८.०६.२०१७ रोजीचे झालेल्या रुग्णालय उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४९३** दिनांक ०८.०६.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या रुग्णालय उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **रुग्णालयामधील व्हिजीटींग वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मानधन नियमावलीबाबत.**

**अधिनियम २००४ तरतुद-** कलम १३(४) नुसार समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये आणि कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा, मंत्रालय, मुंबई दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे

शासन मान्य आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३- "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी. तसेच अटी-शर्त क्र.८ समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही."

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –**

**१)** दि. २२/०९/२००७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ७७०

"पूर्वीच्या दरपत्रकात कन्सलटेशनवर लागू असलेल्या ७०% दर ६०% वर, जनरल सर्जरीवर डॉक्टर ५५.५५%, भुलतज्ञ १६.६६% वरुन डॉक्टर ४५%, भुलतज्ञ १३%, पूर्वी कन्सलटेशनचे दर वॉर्डप्रमाणे वाढत जात होते ते सर्व वॉर्डमध्ये जनरल वॉर्डप्रमाणे कमी राहतील. डिलक्सचे रुमचा दर रु. ८००/- वरुन रु. ५००/- व ह्दय शस्त्रक्रिया विभागात अॅन्जीओग्राफी रु. ६,०००/- वरुन रु. ५,०००/- तर परफ्युजनिस्ट व कॅथलॅब ऑपरेटरला प्रतिकेसनुसार मसिक वेतनाव्यतिरीक्त मोबदला, इंन्सेटीव्हीस्ट यांना मासिक रु. २०,०००/- ऐवजी प्रति केस नुसार मोबदला, पॅथॉलॉजिस्ट यांना २% वरुन ५% वाढ असे ठळक बदल करण्यास मान्यता देण्यात आली. "

**२)** दि. ०८/१०/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.३७५(५).

"संस्थान रुग्णालयामध्ये व्हिजीटींग पद्धतीने सेवा करण्याची संधी मिळावी, यासाठीबरेचसे तज्ञ डॉक्टर्स संस्थानकडे अर्ज करतात व ते अर्ज सभेसमोर सादर करणेत येऊन त्यांना परवानगी देण्यामध्ये बराचसा कालावधी जातो. याकरिता यापुढे व्हिजीटींग पद्धतीने सेवाकरण्याची इच्छा व्यक्त करणारे अर्ज आल्यास यावर निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले. "

**३)** दि. २८/११/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ५३४.

"संस्थान रुग्णालयामधील व्हिजीटींग डॉक्टरांच्या मानधनाची नियमावली ठरविणे अगोदर आज रोजी संस्थान रुग्णालयामध्ये किती व्हिजीटींग डॉक्टर आहेत, त्यांना सध्या किती मानधन देण्यात येते व किती मानधन द्यावयाचे आहे याच्या संपूर्ण तपशीलासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा."

**४)** दि. ०९/१०/२०१६ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ६९०(७).

"रुग्णालयामध्ये असलेले व्हिजीटींग डॉक्टर वेळेवर हजर होत नाही व रुग्णाची गैरसोय होते, असे समितीच्या निदर्शनास आले आहे. व्हिजीटींग डॉक्टरांना वेळेचे बंधन राहावे याकरिता त्यांना बायोमेट्रिक सिस्टीम बसविणेत यावी व त्या वेळेनुसार, त्यांचे मानधन काढणेत यावे. तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांकडून आकारण्यात येणा-या दरामध्ये व डॉक्टरांना देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्त्यामध्ये बरीचशी तफावत आहे. याकरीता दोन्ही रुग्णालयामधील समान कार्य असणारे विभाग एकत्रित यावे. या व इतर अनुषंगिक बाबींचा अंतर्भाव करणेत येऊन, सदरहू नियमावली फेरसादर करणेत यावी." अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.

**प्रास्ताविक–** मा.त्रिसदस्य समिती दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३७५ (५) नुसार व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांच्या नेमणूका करून मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८.११.२०१५ रोजीचे सभेत प्रस्तावित केलेल्या मानधन नियमावलीनुसार मानधन देण्यात आलेले आहे. मा. व्यवस्थापन समिती दि. २८.११.२०१५ रोजीचे सभेत संस्थान रुग्णालयातील व्हिजीटींग डॉक्टरांच्या मानधनाची नियमावली ठरविणे अगोदर आज रोजी संस्थान रुग्णालयामध्ये किती व्हिजीटींग डॉक्टर आहेत?. त्यांना सध्या किती मानधन देण्यात येते? व किती मानधन द्यावयाचे आहे? याच्या संपूर्ण तपशीलासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करण्यात यावा. असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार मा. व्यवस्थान समिती दि.०८/१०/२०१६ रोजीचे सभेत मानधनाबाबत फेरप्रस्ताव सादर करणेत आला. त्यावर सध्या रुग्णालयामध्ये असलेले व्हिजीटींग डॉक्टर वेळेवर हजर होत नाहीत व रुग्णांची गैरसोय असे समितीचे निदर्शनास आले आहे. व्हिजीटींग डॉक्टरांना वेळेचे बंधन राहावे, याकरिता त्यांना बायोमेट्रिक सिस्टीम बसविण्यात यावी व त्या वेळेनूसार त्यांचे मानधन काढण्यात यावे. तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांकडून आकारण्यात येणा-या दरामध्ये व डॉक्टरांना देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्यामध्ये बरीचशी तफावत आहे. याकरीता दोन्ही रुग्णालयामधील समान कार्य असणारे विभाग एकत्रित करण्यात यावे व इतर अनेक अनुषंगिक बाबींचा अंतर्भाव करणेत येऊन सदरहु मानधन नियमावली फेरसादर करण्यात यावी, असा निर्णय क्र. ६९० (७) झालेला आहे.

दि. ०८/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार सर्व व्हिजीटींग अधिकारी यांना ठरवून दिलेल्या ओ.पी.डी. दिवशी व ओ.पी.डी. वेळेत रुग्ण तपासणीसाठी रुग्णालयात उपस्थित राहणेबाबत दि. ०३.१२.२०१६ रोजीचेपत्राद्वारे कळविलेली आहे तसेच आ.टी. विभागास दि. ०७.१२.२०१६ रोजीचे पत्रान्वये सर्व व्हिजीटींग वैद्यकीयअधिका-यांचे थंब इम्प्रेशन घेणेबाबत कळविले आहे.

यापूर्वी श्री साईबाबा रुग्णालयाकडील नेत्ररोग विभाग व स्त्रीरोग विभाग श्री साईनाथ रुग्णालयात एकत्रित करण्यात आले आहे. सध्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात खालील विभाग कार्यान्वित आहेत.

| अ.नं. | श्री साईबाबा रुग्णालयातील विभाग | दोन्ही रुग्णालयाकडे समान कार्य असलेले विभाग | श्री साईनाथ रुग्णालयाकडील विभाग |
|---|---|---|---|
| ०१. | ह्यदयविकार विभाग | ------- | कान, नाक, घसा |
| ०२. | ह्यदयशस्त्रक्रियाविभाग | ------- | नेत्र विभाग |
| ०३. | मेंदू शस्त्र क्रिया विभाग | ------- | स्त्रीरोग विभाग |
| ०४. | मुत्रविकार विभाग | ------- | बालरोग विभाग |
| ०५. | अस्थिरोग व शस्त्रक्रिया विभाग | १) अस्थिरोग व शस्त्रक्रिया विभाग | अस्थिरोग व शस्त्रक्रिया विभाग |
| ०६. | मॅक्सिलोफेसियलविभाग | ------- | होमिओपॅथी |
| ०७. | शल्यचिकीत्सा विभाग | २) शल्यचिकीत्सा विभाग | शल्यचिकीत्सा विभाग |
| ०८. | वैद्यकीय उपचार विभाग | ३) वैद्यकीय उपचार विभाग | वैद्यकीय उपचार विभाग |
| ०९. | दंत विभाग | ४) दंत विभाग | दंत विभाग |
| १०. | रेडिओलॉजी विभाग (एमआरआय, सीटी स्कॅन, एक्स रे, सोनोग्रोफी) | ५) रेडिओलॉजी विभाग | रेडिओलॉजी विभाग (एक्स रे, सोनोग्रोफी) |
| ११. | पॅथॉलॉजी विभाग | ६) पॅथॉलॉजी विभाग | पॅथॉलॉजी विभाग |
| १२. | फिजिओथेरपि विभाग | ७) फिजिओथेरपि विभाग | फिजिओथेरपि विभाग |
| १३. | आहार तज्ञ विभाग | ------- | आयुर्वेद विभाग |
| १४. | ------- | ------- | त्वचारोग विभाग |
| १५. | ------- | ------- | डायबेटिक केअर सेंटर |

उपरोक्त विभागांपैकी समान कार्य असलेले सहा विभाग दोन्ही रुग्णालयाकडे कार्यान्वित आहेत. ट्रोमा, मेंदूशस्त्रक्रिया व अॅक्सीडेंट केसेस मध्ये अस्थिरोग, शस्त्रक्रिया विभाग (जन.सर्जरी, फेसिअल सर्जरी), शल्यचिकीत्सा विभाग, वैद्यकीय उपचार विभाग, रेडीओलॉजी विभाग, फिजीओथेरपी विभाग हे विभाग दोन्ही रुग्णालयाकडे आवश्यक आहेत.

सबब, श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयासाठी व्हिजीटींग डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता व स्पेशियालीटी यावरुन पुढीलप्रमाणे नियमावली बनविता येईल.

| अ.नं. | स्पेशियालिटी | प्रति व्हिजीट (पूर्ण दिवस) मानधन |
|---|---|---|
| ०१. | एमबीबीएस+डीप्लोमाधारक | ४००० |
| ०२. | एमबीबीएस+एमडी/डीएनबी/एफसीपीएस (फिजीशियन ब्रांचेस) | ५००० + संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०३. | एमबीबीएस+एमएस/डीएनबी/एफसीपीएस (सर्जिकल ब्रॅचेस उदा. गायनॅक आर्थो, जन.सर्जरी, फेसिअल सर्जरी) | संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०४. | एमबीबीएस+एमडी/डीएनबी/एफसीपीएस+डीएम/डीएनबी (सुपर स्पेशियालीटी फिजीशियन, न्युरो, नेफ्रो, गॅस्ट्रो, आन्को) | ५००० + संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०५. | एमबीबीएस+डीएम/डीएनबी कार्डीओलॉजी | संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०६. | एमबीबीएस+ एमएम/ डीएनबी/ एफसीपीएस+ एमसीएच/ डीएनबी (सुपरसर्जिकल ब्रांचेस उदा, न्युरोसर्जन, आन्कोसर्जन, युरोसर्जन, सीव्हीटीएस, प्लास्टिक सर्जरी) | संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०७. | एमबीबीएस+डीग्री / डीप्लोमाधारक | श्री साईनाथ रुग्णालय |

| | | |
|---|---|---|
| | | पदविकाधारक रु. ४,००० मानधन<br>पदविधारक रु. ५,००० मानधन |

**मागणी–** व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांकरिता प्रस्तावीत केलेली मानधन नियमावली मंजूर करणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** सध्या नव्याने व्हिजीटींग अधिका-यांच्या नेमणूका करावयाच्या असून काही व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांच्या नेमणूकीचा कालावधी संपलेला आहे व त्यांना पुन्हा नेमणूक देणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती दि. २८.०४.२०१७ रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ३४७ खालीलप्रमाणे झालेला आहे

"रुग्णालयामधील व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांच्या मानधनाबाबतची उपरोक्त नियमावली रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावी".

तरी, मा.व्यवस्थापन समिती दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३४७ नुसार, व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांना मानधन देणेकामी प्रस्तावित नियमावलीबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयासाठी व्हिजीटींग डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता व स्पेशियालीटी याचा विचार करुन तयार करणेत आलेल्या प्रस्तावित नियमावलीस मान्यता देण्यात यावी. परंतु सदरहू नियमावलीची अंमलबजावणी करणेपुर्वी त्यास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी. तसेच शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत व्हिजीटींग डॉक्टरांना त्यांच्या पुर्वीच्या नेमणूक आदेशाप्रमाणे मानधन/ प्रोत्साहन भत्ता आदा करणेत यावा.**

**याचबरोबर संस्थान रुग्णालये चालविणेसाठी कंन्सल्टंसी कंपनीची नेमणूक करणेसाठीचा अभ्यासपुर्वक प्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०२ **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे सन २०१७-१८ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर प्रत्यक्ष चर्चा करुन निश्चीत करणेबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद:** 1) पृ. क्र. 355, समितीच्या अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये 14(2) ख
2) पृ. क्र. 356, समितीची कर्तव्ये व अधिकार 17 (2) झ
3) पृ. क्र. 359, विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग 21 (1)(क), 21 (2) (ग)

**प्रस्ताविक-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये (दि 31/03/2016 पर्यंत) एकुण रु. 39,57,09,858.80/- इतक्या रकमेचे 14,319 मेडीकल इक्वीपमेंटस, उपकरणे, मशिनरी तसेच फर्निचर खरेदी करणेत आले असुन सन 2006 पासून नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी सन 2016-17 या वर्षाकरीता 258 नग मशिन्सचे संबंधीत 22 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण रु. 68,87,211/- इतक्या रकमेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले होते.

तसेच, श्री साईनाथ रूग्णालयात (दि.31/03/2016 पर्यंत) एकुण रु.12,34,92,219.80/- इतक्या रकमेचे 13233 मेडीकल इक्विपमेंट मशिनरी, उपकरणे खरेदी करणेत आले असुन (सन 1999 पासून) नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी सन 2016-17 या वर्षाकरीता 43 नग मशिन्सचे संबंधीत 11 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभाली करीता एकुण रु. 8,85,149/- इतक्या रकमेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले होते.

सदर कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दूरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थित काम देत आहेत.त्यामुळे विवीध कंपन्यासोबत केलेले सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे सन 2017-18 ( दि 01/04/2017 तेदि 31/03/2018) या एक वर्षाच्या कालावधीकरीता नुतनीकरण करणे आवश्यक आहे. तसेच ज्या मशिन्सचे वॉरंटी कालावधी संपले आहे अशा मशिन्सचे नव्याने AMC/ CMC करणे आवश्यक आहे.

उपरोक्त मशिन्सचे स्पेअरपार्टस हे Monopoly याप्रकारचे असल्यामुळे बाजारात उपलब्ध होत नाही म्हणुन सदरच्या मशिनचे AMC/CMC त्याच कंपन्यांकडे करणे आवश्यक आहे. सदर मशीन्सकरीता जर On call Basis नुसार कंपन्यांकडून सर्व्हिस घेण्यात आली आणि आवश्यकतेनुसार स्पेअरपार्टस व कन्झ्युमेबल्स बदलण्यात आले तर येणारा खर्च वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या रक्कमेपेक्षा अधिक असेल.

**मागणी:** सन 2017-18 या वर्षाकरीता श्री साईबाबा हॉस्पिटल येथील सोबतच्या तक्त्यामध्ये (परीशिष्ट 'अ') दिलेल्या 274 नग मशिन्सचे संबंधीत 23 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. त्या करीता अंदाजे रू.87,51,518/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच श्री साईनाथ रूग्णालयाचे सोबतच्या तक्त्यामध्ये (परीशिष्ट 'ब') दिलेल्या एकुण 48 नग मशिन्सचे संबंधीत 12 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. त्या करीता अंदाजे रू.11,84,371/- इतका खर्च अपेक्षित आहे.

काही कंपन्यांनी मागील वर्षीप्रमाणेच दर दिलेले असुन काही कंपन्यांनी दरामध्ये वाढ केली आहे.मागील वर्षी काही कंपन्यांनी सर्व्हीस टॅक्स मध्ये जरी वाढ झाली होती तरी अतिरिक्त सर्व्हीस टॅक्सची मागणी केलेली नव्हती. तसेच दोन्ही रुग्णालयातील वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता असलेल्या मशिन्सची संख्या मागील वर्षापेक्षा वाढलेली असल्यामुळे अंदाजे खर्चाचे रकमेत देखील वाढ दिसून येत आहे.

वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबतप्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करणेसव त्यासाठी येणा-या अंदाजे खर्चास दि. 28/04/2017 रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता देणेत आली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** वरीलसंस्थान अधिनियमानुसार दुरूस्ती व देखभाल करता येईल.

वार्षिक सर्व्हिस कॉट्रॅक्टबाबत मा.व्य. समितीच्या दि. 20/05/2007 च्या सभेतील विषय क्र.33 निर्णय क्र.386 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे. "दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थित काम देत आहेत.त्यामुळे विवीध कंपन्यांसोबत केलेले सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे सन 2017-18 (दि 01/04/2017 ते दि 31/03/2018) या एक वर्षाच्या कालावधीकरीता नुतनीकरण करणे आवश्यक आहे. तसेच ज्या मशिन्सचे वॉरंटी कालावधी संपले आहे अशा मशिन्सचे नव्याने AMC/CMC करणे आवश्यक आहे.

उपरोक्त मशिन्सचे स्पेअरपार्टस हे Monopoly या प्रकारचे असल्यामुळे बाजारात उपलब्ध होत नाही म्हणुन सदरच्या मशिनचे AMC/CMC त्याच कंपन्यांकडे करणे आवश्यक आहे. सदर मशीन्सकरीता जर On call Basis नुसार कंपन्यांकडून सर्व्हिस घेण्यात आली आणि आवश्यकतेनुसार स्पेअरपार्टस व कन्झ्युमेबल्स बदलण्यात आलेतर येणारा खर्च वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या रक्कमेपेक्षा अधिक असेल.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वरीलप्रमाणे एकुण 274 नग मशीन्सचे आणि श्री साईनाथ रूग्णालयाचे एकुण 48 नग मशिन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी संबंधीत 18 कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित मान्यता असावी.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वरीलप्रमाणे एकुण 274 नग मशीन्सचे आणि श्री साईनाथ रूग्णालयाचे एकुण 48 नग मशिन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी संबंधीत 18 कंपन्यांचे प्रतिनिधी, त्यांनी दिलेल्या दरांवर चर्चा करणेसाठी आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर हजर होते. रुग्णालय उपसमितीने त्यांचेबरोबर दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, संबंधीतांनी खालीलप्रमाणे अंतीम दर देऊ केले

**Annexure 'A'**

**SHRI SAIBABA HOSPITAL, SHIRDI**

**List of Machines for RENEWAL of AMC/ CMC to be done For Period From Dt. 01/04/2017 To Dt.31/03/2018.**

| Sr. no. | Deptt. | Equipment Name | Name of Company | Current year AMC Amount in Rs. | Rate After Nagotation |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Pathlab | Immunoassy Analyser (Vidas PC) | M/s. Biomerieux (I) Pvt. Ltd. New Delhi | 46609 AMC (2PMS) | **46609** |
| 2 | Pathlab | 5 Part Diff.Blood Cell Counter (Make:Sysmax; XS-1000i & sampla, Sr. # 683296;66463) | M/s. Transasia Biomedical .Ltd. Mumbai | 118500 CMC (4PMS) | **99943** |
| 3 | Pathlab | 3 Part Cell Counter (Erma PCE-210; Sr.# 22120) | M/s AGD Biomedical Pvt. Ltd. Mumbai | 25520 AMC (Incl.Control & P.P Tubing) (PMS-3) | **24360** |
| 4 | Pathlab | Blood Gas Analyzer (Model:Cobas b221) | M/s.Roche Diagnostics India Pvt .Ltd Mumbai. | 138000 CMC with Consumables (PM kit & Electrodes) (1 PMS | **138000** |
| 5 | Pathlab | Fully Automatic Biochemistry Analyzer ( Konelab 20i) | M/s. Trivitron Healthcare Pvt. Ltd. Chennai | 62903 AMC (2 PMS) | **61000** |
| 6 | Pathlab | Fully Automatic Biochemistry Analyzer ( Nanolab 240) | M/s. Trivitron Healthcare Pvt. Ltd. Chennai | 33206 AMC (2PMS | **33206** |
| 7 | Histo path | Leica Tissue Processor (Model– TP 1020) | M/s DHR Holding India Pvt. Ltd, Mumbai | 20440 AMC (2PMS) | **20440** |
| 8 | Radiology | Laser Imager (DVB 8900) | M/s. Carestream Health India Pvt. Ltd., Mumbai | 165000 CMC (2PMS) | **165000** |
| 9 | Radiology | CR Classic | | 75000 CMC (2PMS) | **75000** |
| 10 | C.T.Scan | DryPix 7000 Laser Printer | M/s.Fujifilm India Pvt Ltd,Mumbai | 100936 CMC (4PMS) | **free service from company, CMC NR** |
| 11 | C.T.Scan | 160 K.V.A.UPS (Socomec) | M/s.Socomac India Pvt Ltd. | 136007 CMC (4PMS) | **116613** |
| 12 | Gen.OT | Cautery Machine (ACC-PU) | M/s . Surgicare Ltd. Mumbai | 3716 AMC (3PMS) | **3716** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 13 | Radiology | 500 mA X-ray with motorized Table (HD/KLH Sr. No. 3837) | | 46662 AMC (3PMS) | **44273** |
| 14 | Gen.O.T. | C-arm II TV System (MM5E; S.#3360) | | 43863 AMC (3PMS) | **41617** |
| 15 | Ortho OT | C-arm II TV System (MM5C; Sr.# 3207) | M/s Siemens Ltd. Mumbai | 48998 AMC (3PMS) | **46489** |
| 16 | Neuro OT | C-arm II TV System (MM5E; S.#3152) | | 48969 AMC (3PMS). | **48969** |
| 17 | Sonograph y | Colour Doppler (Sonoline ; G-50) | | 42263 AMC (3PMS) | **42263** |
| 18 | Cardiac Ward | Mobile X-ray Machine (Multimobil 2.5; Sr. # 33429) | | 17486 AMC (3 PMS) | **16913** |
| 19 | Neuro OT | Operating Microscope (Model- OPMI Vario) | M/s Carl Zeiss India Pvt. Ltd | 42961 AMC (2PMS) | **42961** |
| 20 | CVTS-1, Cathlab | Valleylab Cautery Machines -2Nos.( i) Force 2 , ii) Force FX) | M/s. Vitek Medisystems, Mumbai | 24309 AMC (2PMS) | **23152** |
| 21 | CVTS-2 | JOSTRA Heart-Lung M/C with Heater cooler Unit (HL-20 with HCU-30;Sr.# 94002028 & 93101487) | | 438719 CMC (2PMS) | **438719** |
| 22 | Cardiac Ward | ICU Ventilators (Maquet Servo S) – 3Nos. | | 229005 CMC (2PMS) | **222462** |
| 23 | ICCU,GIC U, CRU-1,Casulty | Ventilators(Servo i-4,Servo s-8) – 12 Nos. | M/s. Maquet Medical India Pvt. Ltd. Mumbai | 1533307 CMC (2PMS) | **1533307** |
| 24 | CVTS-1 | Intra Aortic Balloon Pump (Model: DATASCOPE CS100 S.# SA03841-E5) | | 208908 CMC (2PMS) | **208908** |
| 25 | CVTS-1 | JOSTRA Heart-Lung M/C with Heater cooler Unit (HL-20 & HCU-20; Sr.# 100092; 100161) | | 642514 CMC (2PMS) | **642514** |
| 26 | GICU | Multipara. Monitor –8 Nos (Planet 50) | M/s. Skanray Technologies Pvt Ltd,Mysore | 132836 CMC (2PMS) | **130023** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 27 | All Wards | Multipara Monitors- 20 Nos. with CMS System (Star Plus 200 + Skyline - 55) | | 406640 CMC (2PMS) | **398017** |
| 28 | Ortho Reco./ Dialysis | Planet 40 – 2 Nos. | | | |
| 29 | CRU-2 /FGW | Planet 50n – 2 Nos. | | | |
| 30 | CVTS-2/ CRU-3 | Star-55-11 nos. | | 179745 CMC (2PMS) | **175924** |
| 31 | Neuro ICU, GICU | Multi para Monitors with ETCO2 -2 nos (Star-55) | | 34488 CMC (2PMS) | **34488** |
| 32 | FGW-2, Dialysis-1 | 5 Para. Monitors-3 nos. (Star-55) | | 42113 CMC (2PMS) | **33758** |
| 33 | CRU-1, ICCU, CVTS-1 &2, Cathlab, Gen.OT 1&2 , Ortho OT, Cardiac Ward | Philips Multi para Monitors (MP-20) -35 No; MMS (M3001A)-37 No; Hemodynamic MMS (M3012A)-3 No; ETCO2 Attachment (M4735A)- 05 No; Defib (Heart Start XL)-01 No. | M/s. Philips Electronics India Ltd., Mumbai | 1446757 CMC (2PMS) | **1308802** |
| | | Philips Multi para Monitor-1 No. (MP 30) | | | |
| | | Central Monitoring System 3150-02Nos | | | |
| 34 | Neuro Reco./ ICCU/ GICU/ CRU-1 / Dialysis / SSH ICCU | Puritan Bennett-840- 10 Nos | M/s.Covidien Healthcare India Pvt.Ltd.,Mumbai | 1262823 CMC (2PMS) | **1262823** |
| 35 | All Wards | ECG (Cartiart 8408 View) -7 Nos; Pulse Oximeters (PO5529)-5 Nos; Defibrillators (DF2509)- 3No; Cardiart 9108-01No. | M/s. Saitrons Medical Equipment, Loni | 152100 CMC (2PMS) | **143273** |
| 36 | GICU/ ICCU/ CRU-1&4 / Cath lab | Defibrillators (Model Life pack20)- 5Nos | M/s Summit Healthcare, (P) Mumbai | 275439 CMC (2PMS) | **275439** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 37 | CRU-3 / CVTS-2 | Defibrillator-3Nos (Model Life pack20) | | 65439 CMC (2PMS) | **65439** |
| 38 | Gen.OT/Ortho/ ICCU / CRU-1/ CVTS-1 | 10KVA Online UPS (Make -Unline) -5 Nos. | M/s Tejas Electronics A` Nagar | 18620 AMC (2PMS) | **18620** |
| 39 | X-ray / CRU-3 | 5KVA Online UPS 2 No (Make- WINGS -1,AVO-1). | | 2880 AMC (2PMS) | **2880** |
| 40 | X-ray | 3KVA Online UPS (Numeric) | | 2700 AMC (2PMS) | **2700** |
| 41 | GICU/ Pathlab /Blood Bank | 2KVA Online UPS -07 No.(Consol-6Nos, AVO-1No) | | 9940 AMC (2PMS) | **9940** |
| 42 | CVTS-2 / Dialysis | 10 KVA UPS (AVO)-02 no. | | 4980 AMC (2PMS) | **4980** |
| 43 | All Wards | B Braun Syringe Pump- 90 Nos (Model- Perfusor Compact) | M/s Service one Thane | 198000 AMC (2PMS) & One Calibration) | **198000** |
| 44 | CVTS-2 | Boyles Machine with Ventilator (Febius Plus, S.# ASCA-0089 Vaporizer-1Nos) | M/s Draeger Medical (I) Pvt. Ltd. | 64567 CMC (2PMS) | **64567** |
| 45 | CVTS-1 | Boyles Machine with Ventilator (Febius CE) | | 30056 AMC (2PMS) | **29484** |
| 46 | Neuro OT | Boyles Machine with Ventilator (Febius Plus; S.# ASDD-0025) | | 67594 CMC (2PMS) | **58945** |
| 47 | Dialysis | Dialysis Machine- 3 Nos (Nipro Surdial) | M/s.M.H. Enterprises Nalasopara (West) | 60000 | **N.R.** |

**Annexure 'B'**
**SHRI SAINATH HOSPITAL, SHIRDI**
**List of Machines for RENEWAL of AMC/ CMC to be done For Period From Dt. 01/04/2017 To Dt.31/03/2018.**

| Sr. no. | Deptt. | Equipment Name | Name of Company | Current year AMC Amount in Rs. | Rate After Nagotation |
|---|---|---|---|---|---|
| 1 | I.C.C.U | Ventilator with Compressor–1 No (EVITA 2 DURA; Sr.#APRB-0090) | M/s. Draeger Medical India Pvt. Ltd. Mumbai | 27837 AMC (2PMS) | **26767** |
| 2 | Blood Bank/Blood Donation Center | Tube Sealer (Compo Safe XS-1000) 2 No | M/s.Terumo Penpol Ltd.Mumbai | 21698 CMC (3PMS) | **21698** |
| | | Blood Collection Monitor-3 Nos. (D 601) | | 27600 CMC (3PMS) | **27600** |
| | | Platelet Incubator & Agitator-200 | | 14283 CMC (3PMS) | **14283** |
| | | Tube Sealer (XS-1010)- 3 No | | 32775 CMC (3PMS) | **32775** |
| 3 | Pathology Lab | Fully Automatic Biochemistry Analyser-1 No (EM-200). | M/s. Transasia Biomedical Ltd. Mumbai | 82370 CMC (4PMS) | **82267** |
| 4 | Pathology Lab | Cell Counter Machine-1 No. (Erma PCE-210; Sr. # 22073) | M/s. AGD Biomedical Pvt. Ltd., Mumbai | 25520 AMC (with.Control & P.P Tubing) (PMS-3) | **24360** |
| 5 | Pathology Lab | Cell Counter Machine-1 No. (Erma PCE-210; Sr. # 29701) | M/s. AGD Biomedical Pvt. Ltd., Mumbai | 16804 AMC (with.Control & R.P Tubing) (PMS-3) | **14700** |
| 6 | ICCU &O.T. | Star-55-11 nos. & Skyline 55-1 no. | M/s.Skanray Technologies Pvt.Ltd | 194580 CMC (2PMS) | **180937** |
| 7 | Blood Bank | Various Remi Equipts.-7 Nos. (BR -280 SR (BDI-763/08); RPFV-240 (BDI-1184/09); BR-120 SR (BDI1211/09); BR-120 SR (BDI-1212/09); BR120 SR (BDI1210/09); RS-12R (LCCM-1647/09) KBM-70+) | M/s Remi Sales & Engg. Ltd. Thane | 109982 AMC (4 PMS) | **109982** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | Radiology Dept. | 500 mA X-ray Machine with 2 Tube and II TV (HD/KLH; Sr.# 31173) | M/s. Siemens Ltd, Mumbai. | 90944 AMC (2PMS) | **86287** |
| 9 | Ortho O.T | C-Arm (MM5E; Sr. # 3189) | M/s. Siemens Ltd, Mumbai. | 47755 AMC (2PMS) | **45310** |
| 10 | Radiology Dept. | FCR Capsula XL2 (SL#6825382) DPX-7000 (SL#17142634) | M/s.Fujifilm Indai Pvt Ltd.,Mumbai | 178932 CMC (4PMS) | **free service from company , CMC NR** |
| 11 | Surg. O.T. | Valleylab Cautery Machine (Force FX; Sr.# F1D67724A) | M/s. Vitek Medical System Pvt.Ltd. Mumbai | 12154 AMC (2PMS) | **12154** |
| 12 | Opthal O.P.D | Carl Zeiss Equipments-6 nos; Humphrey Field Analyser (HFA 720i) Slit Lamp (SL 115)-2No. Yag Laser (Yag III) Green Laser (Visulas 532s) Op.Microscope (Model-OPMI VISU140) | M/s. Carl Zeiss India Pvt. Ltd. Mumbai | 240450 AMC (2PMS) | **240450** |
| 13 | Surg.O.T .,ENT OT | 10KVA online UPS-3 Nos, 2KVA Online UPS- 1No. | M/s Tejas Electronics, A` Nagar | 14545 AMC (4PMS) | **14545** |
| 14 | Surg. O.T. | Meditronic Defibrillator-2nos.(LP-20; Sr.# 39444823;39155363) | M/s.Summit Healthcare Pvt.Ltd.Mumbai | 46142 CMC (2PMS) | **46142** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे सन २०१७-१८ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी संबंधीत पुरवठाधारकांनी दिलेले, उपरोक्त अ व ब तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच लवकरच राज्यामध्ये GST करप्रणाली लागु होत असून या करप्रमाणालीप्रमाणे पुरवठाधारकांनी सध्या दिलेल्या कराच्या दरात वाढ अथवा घट झाल्यास ती संबंधीत पुरवठाधारकास बंधनकारक राहील, याबाबत उपरोक्त पुरवठाधारकास समज देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **श्री साईबाबांच्या चरणी रु.२५,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त अधिक देणगी देणाऱ्या साईभक्तांना प्रसाद रुपात चांदीची प्रतिमा भेट देणेकामी पादुकांचीप्रतिमा असलेली चांदीची नाणी बनविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ८७२ खालीलप्रमाणे पारित करणेत आलेला आहे -

***“*** *.. .. रक्कम रु. २५,०००/- व त्यापुढील रकमेची / वस्तु साहित्याची देणगी देणा-या साईभक्तांस २० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या श्री साई पादुका तसेच साईचरित्र ग्रंथ व एक श्रीडी फोटो प्रसाद रुपाने देण्यात यावा, असे ठरले. यासाठी विहीत पध्दतीने चांदीच्या पादुका बनविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.* ***”***

उपरोक्त निर्णयास अनुसरुन, मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस लेखाशाखेमार्फत दिनांक २४ जानेवारी, २०१७ अन्वये विषयांकित प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेत आलेला होता.

लेखाशाखेमार्फत सादर करणेत आलेल्या विषयांकित प्रस्तावास मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक १८ एप्रिल, २०१७ चे शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. या शासन निर्णयात प्रामुख्याने खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे –

*१. श्री साईबाबा संस्थानच्या देणगी काऊंटरवर रोख स्वरुपात अथवा सोने-चांदीच्या रुपात अथवा चेक / डीडी / Dr / Cr कार्डव्दार, ऑनलाईन / परकीय चलनाव्दारे श्री साईबाबांच्या चरणी रु. २५ हजार वा त्यापेक्षा जास्त अधिक रक्कम देणगीच्या रुपात देणा-या भक्तांना संस्थानव्दारे श्री साईबाबांची प्रतिमा व पादुका असलेली २० ग्रॅम वजनाची चांदीची प्रतिमा, श्री साईचरित्र ग्रंथ आणि श्री साईबाबांचा एक थ्री डी फोटो प्रसादरुपात भेट देण्याच्या व्यवस्थापन समितीच्या निर्णयाला शासन मान्यता देण्यात येत आहे.*

*२. विधी व न्याय विभाग, शासन निर्णय दि. ३१.०५.२००७ मध्ये नमुद कार्यपध्दतीचा अवलंब करुन संस्थानकडे जमा असलेली चांदी वितळवून प्रतिमा तयार करण्याची कार्यवाही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी करावी.*

उपरोक्त शासन निर्णयात नमुद केलेल्या बाब क्रमांक ०२ नुसार तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३१ ऑगष्ट, २०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५९९ नुसार, संस्थानकडे देणगी रुपाने जमा असलेल्या सोने-चांदीच्या वस्तू वितळवून, त्यापासून प्राप्त होणारे शुध्द सोने-चांदी पासून उचित वजनाची नाणी / पेडंटस / पादुका बनविणेस मान्यता मिळणेकामी अलाहिदा स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत आलेला असून, सदरचा प्रस्ताव मा. शासन स्तरावर मान्यतेस्तव विचाराधीन आहे.

**(ब)** विषयांकित प्रस्तावाच्या आणि दिनांक१८ एप्रिल, २०१७ रोजीचे शासन निर्णयाच्या अंमलबजावणीचे अनुषंगाने, मा. व्यवस्थापन समितीने दिनांक २३-२४ मे, २०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ४५३ नुसार असा निर्णय पारित केला आहे की,

*“.. ..समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर येणा-या गुरुपौर्णिमा उत्सवापासून देणगीदार साईभक्तांना चांदीच्या पादुका भेट स्वरुपात देण्यात याव्या, असा समितीचा मानस आहे. याकरीता संस्थानकडील सोने-चांदी वितळविणेस शासन मान्यता प्राप्त होईपर्यन्त विहित वित्तीय पध्दतीने प्रत्येकी २० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या पादुका खरेदी करण्यात येऊन, गुरुपौर्णिमा उत्सव – २०१७ पासून देणगीदार साईभक्तांना भेट स्वरुपात देण्यात याव्यात. ”*

उपरोक्तमा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसारआणि लेखाशाखेकडील दिनांक ३१ मे, २०१७ रोजीचे मंजूर टिपणीनुसार, भारत सरकारचे पूर्ण स्वामित्व असलेल्या / उपक्रम असलेल्या भारत सरकार टंकसाळ, मुंबई (INDIA GOVERNMENT MINT, MUMBAI) या आयएसओमानांकित संस्थेस पादुकांची प्रतिमा असलेली २० ग्रॅम शुध्द चांदीची २००० नग नाणी बनवून पुरवठा करणेकामी दरपत्रक सादर करणेबाबत दिनांक०६ जून,२०१७ रोजी पत्र देणेत आले होते.

**(क)** उपरोक्त परिच्छेदात विवेचन केलेनुसार, भारत सरकारचे पूर्ण स्वामित्व असलेल्या / उपक्रम असलेल्या भारत प्रतिभूति मुद्रण तथा मुद्रा निर्माण निगम लिमिटेड, नवी दिल्ली या प्रमुख संस्थेची घटक संस्था असलेल्या भारत सरकार टंकसाळ, मुंबई या आयएसओ मानांकित संस्थेने त्यांचेकडील जा. क्र. III-4/मातौरि/४३०/२०१७, दिनांक १२ जून, २०१७ अन्वये खालीलप्रमाणे दरपत्रक सादर केलेले आहे -

| अ.नं. | तपशील | मागणी | दर रुपये | रक्कम रुपये | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईंच्या पादुकांची प्रतिमा असलेली चांदीची नाणी वजन– २० ग्रॅम/ आकार– वर्तुळाकार ३५ एमएम/ धातू– शुध्द चांदी ९९.९ / ॲक्रेलिक वर्तुळाकार डबी पॅकिंगसह | २००० नग | १३२९=०० प्रति नाणी | २६,५८,०००=०० | **२६,८९,८९६=००** |
| | + कर (एमव्हॅट) १.२० टक्के | | | ३१,८९६=०० | |
| | | | **(अ)** | **२६,८९,८९६=००** | |
| ०२ | श्री साई पादुका प्रतिमेची डाय (Die) बनविणेचा एकवेळ खर्च | ०१ नग | | १,३४,३८९=०० | **१,७१,५९८=००** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | + एक्साईज डयुटी १२.५० टक्के | | | १६,७९९=०० | |
| | उपरक्कम | | | १,५१,१८८=०० | |
| | + कर (एमव्हॅट) १३.५० टक्के | | | २०,४१० =०० | |
| | | | **(ब)** | **१,७१,५९८=००** | |
| | | | | **एकुण (अ+ब)** | **२८,६१,४९४=००** |

तसेच संबंधित संस्थेने दरपत्रकात खालील **अटी-शर्ती** नमूद केलेल्या आहेत –

०१. साहित्य पुरवठयाचे वेळेस १०० टक्के आगाऊ रक्कम आदा करावी लागेल.

०२. साहित्य पुरवठा कालावधी पुरवठा आदेश मिळालेपासून ४-५ आठवडयात मिळेल.

०३. साहित्याचे पुरवठा दर हे मुंबई कार्यस्थळावर पुरवठयाचे आहेत.

०४. साहित्य पुरवठा दराची वैधता ३० दिवस राहिल.

०५. साहित्य पुरवठयाचे वेळेस लागू असलेले शासकीय कर आदा करावे लागतील.

०६. चांदीच्या नाण्याचे डिझाईन तयार करुन पाठविले आहे, त्यावर स्वाक्षरीकिंत मान्यता देणे आवश्यक राहिल.

**(ड)** उपरोक्त परिच्छेद क मध्ये नमूद केलेप्रमाणे, भारत सरकार टंकसाळ, मुंबई (INDIA GOVERNMENT MINT, MUMBAI) यांनी सादर केलेल्या दरपत्रकानुसार, श्री साई पादुकांची प्रतिमा असलेली २० ग्रॅम वजनाची चांदीची नाणी २००० नग (चांदीसह) बनविणेकामी एकूण रक्कम रुपये २८,६१,४९४/- मात्र इतका खर्च येईल. यामध्ये डाय बनविणेचा एकवेळचा खर्च रुपये १,७१,५९८/- मात्र समाविष्ट आहे. सदरचा डाय बनविणेचा खर्च वजा केल्यास नाणी बनविणेसाठी रक्कम रुपये २६,८९,८९६/- मात्र इतका खर्च येईल.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करतां, श्री साईबाबांच्या चरणी रुपये २५,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त अधिक देणगी देणा-या साईभक्तांना प्रसाद रुपात श्री साई पादुकांची प्रतिमा असलेली चांदीची नाणी भेट देणेकामी अंदाजित पूर्णाकिंत रक्कम रुपये १३४५/- मात्र प्रति नाणे इतका खर्च येईल. सदरचे नाणे बनविणेसाठी लागणारी डाय ही संस्थान मालकाची राहणार असल्याने, डाय बनविणेकामी लागणारा खर्च यामध्ये गृहितधरलेला नाही.

यापुर्वी भारत सरकारचे पूर्ण स्वामित्व असलेल्या / उपक्रम असलेल्या भारत प्रतिभूति मुद्रण तथा मुद्रा निर्माण निगम लिमिटेड, नवी दिल्ली या प्रमुख संस्थेची घटक संस्था असलेल्या भारत सरकार टंकसाळ, मुंबई (INDIA GOVERNMENT MINT, MUMBAI) या आयएसओ मानांकित संस्थेकडून संस्थान व्यवस्थापनाने सन २००९-२०१० मध्ये प्रत्येकी २० ग्रॅम वजनाची चांदीची नाणी (ॲक्रेलिक डबी पॅकिंगसह) बनवून घेतलेली आहेत.

तरी आता, विषयांकित प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांस अनुसरुन, रुपये २५,०००/- मात्र वा त्यापेक्षा जास्त देणगी देणारे साईभक्तांना संस्थान व्यवस्थापनामार्फत प्रसाद रुपाने भेट द्यावयाचे २० ग्रॅम वजनाच्या पादुकांची प्रतिमा असलेल्या२००० नगचांदीची नाणी केंद्र शासन मान्यता प्राप्त भारत सरकार टंकसाळ, मुंबई (INDIA GOVERNMENT MINT, MUMBAI) या संस्थेकडून दरपत्रकात नमूद केलेल्या अटी-शर्तीनुसार,थेट तयार करुन घेणेसआणिसदरची नाणी तयार झालेनंतर मुंबईहून शिर्डी येथे आणणेकामी विमा व इतर बाबींसाठी लागणारे अनुषंगिक खर्चासह याकामी येणारे अंदाजित एकूण रक्कम रुपये २९ लाख मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांस अनुसरुन, रुपये २५,०००/- मात्र वा त्यापेक्षा जास्त देणगी देणारे साईभक्तांना संस्थान व्यवस्थापनामार्फत प्रसाद रुपाने भेट द्यावयाचे २० ग्रॅम वजनाच्या श्रींच्या पादुकांची प्रतिमा असलेली चांदीची नाणी केंद्र शासन मान्यता प्राप्त भारत सरकार टंकसाळ, मुंबई (INDIA GOVERNMENT MINT, MUMBAI) या संस्थेकडून दरपत्रकात नमूद केलेल्या अटी-शर्तीनुसार व चांदीच्या मुल्यांमध्ये होणाऱ्या वाढ अथवा घटीस अधीन राहून, १०००० नग थेट तयार करुन घेणेस तत्वत: मान्यता देण्यात आली. यापैकी प्रथमत: २००० नग चांदीची नाणी तयार करुन घेण्यात यावी व याप्रमाणे भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच सदरची नाणी तयार झालेनंतर मुंबईहून शिर्डी येथे आणणेकामी विमा व इतर बाबींसाठी येणाऱ्या खर्चासही मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ मध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी नामांकित कलाकारांना निमंत्रीत करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णयः-**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १७१.
२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८०.
३. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५८.

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन केल्यास संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने प्रयत्न करणेत येत आहे.मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक सादर करणेत आले होते. त्यावर निर्णय क्र.३५८ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांचे स्वरुप पाहून संबंधीतांना मोफत कार्यक्रम सेवा सादर करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात यावे. जे कलाकार मोफत कार्यक्रम सादर करणेस तयार नसतील, अशा कलाकारांकडून मानधनाबाबतचा प्रस्ताव घेऊन, या कार्यक्रमांसाठी देणगीदार/ प्रायोजक मिळतात का, ते पहावे अन्यथा त्यांच्या मानधनाबाबत व्यवस्थापन समिती उचित निर्णय घेईल.*

**प्रस्तावः-** श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन केल्यास संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीकोनातून आयोजित करावयाच्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे यशस्वीतेसाठी नामवंत कलाकारांना निमंत्रीत करणे गरजेचे आहे. त्यासाठी सोबतचे परिशिष्टात उपलब्ध तारखा व नामवंत कलाकारांची यादी नमूद केली आहे.

तरी शताब्दी वर्षातील आयोजित कार्यक्रमासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत ठरलेप्रमाणे सोबतचे परिशिष्टात नमूद केलेल्या यादीमधून नामवंत कलाकार निश्चित करणेस व कलाकार निश्चित झालेनंतर त्यांना निमंत्रीत करणेसाठी पत्रव्यवहार करणेस तसेच त्यांचे मानधन निश्चित करणेसाठी सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस सविनय सादर.

**निर्णय क्र.४९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ मध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी सोबत परिशिष्ट म्हणून सादर केलेल्या नामांकित कलाकारांच्या यादीमधील कलाकारांचशी संपर्क करुन, ते शिर्डी येथे कार्यक्रम सादर करणेस तयार आहेत का, हे पहावे व त्यांचे मानधनासह तारखा घेण्यात येऊन, याबाबबतचा फेरप्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- समधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने साईबाबांच्या कार्याचा प्रचार व प्रसार करणाऱ्या साप्ताहीक, मासिक, द्वैमासिक व त्रैमासिकांच्या प्रतिनिधींचे संमेलन शिर्डी येथे आयोजित करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक –**निरंक.

**प्रस्ताविक –**श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने श्री साईबाबांच्या कार्याचा प्रचार व प्रसार करणा-या देशतील साप्ताहीके, मासिके, व्दैमासिके, त्रैमासिके आदिंचे संपादक/प्रतिनिधींचे संमेलन शिर्डी येथे आयोजित करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष महोदयांनी दिलेले आहेत. देशाच्या विविध राज्यातील साप्ताहीके, मासिके, व्दैमासिके, त्रैमासिके व साई दुचित्रवाहीण्याव्दारे साईबाबांच्या कार्याचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणावर होत आहे. तसेच ब-याच साप्ताहिकांचे, मासिकांचे, व्दैमासिकांचे व त्रैमासिकांचे संपादक/प्रतिनिधी बाबांचे भक्त असल्याने ते बाबांच्या जिवन कार्यावर अनेक लेख त्याच्या साप्ताहिक/मासिकांव्दारे प्रसिध्द करतात. सदरची प्रसिध्दी माध्यमे ही बाबांच्या समाधी शताब्दी सोहळयामध्ये प्रसिध्दीच्या दृष्टीने महत्वाची भुमिका पार पाडतील. त्यादृष्टीने त्यांचे संस्थानच्या वतीने शिर्डीमध्ये संम्मेलन भरवून त्यांना श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे कालावधीत शिर्डीत होणा-या कार्यक्रमांना प्रसिध्दी देणेबाबत चर्चा/हितगुज करता येईल. अशा साप्ताहीक, मासिक, व्दैमासिक व त्रैमासिकांच्या प्रतिनिधींची माहिती (यादी) जनसंपर्क विभागामार्फत संकलीत करण्याची कार्यवाही चालू आहे. जनसंपर्क कार्यालयाकडे उपलब्ध यादीतील माहितीनुसार देशातील मासिके, व्दैमासिके, त्रैमासिके, साप्ताहीके व साईवाहिन्यांच्या सुमारे १०० प्रतिनिधींचे संम्मेलन शिर्डी येथे आयोजित करणेकामी चर्चाकरुन संमेलनाची तारीख निश्चित करता येईल.

उपरोक्त कार्यक्रमासाठी येणा-या साप्ताहीक,मासिक, व्दैमासिक व त्रैमासिकांच्या प्रतिनिधींची निवास व्यवस्था, दर्शन/आरती, भोजन व येण्या-जाण्याची व्यवस्था संस्थानमार्फत करणेस मा.अध्यक्ष महोयांनी सांगितले आहे. त्यानुसार कार्यक्रमास उपस्थित राहणा-या मासिके, व्दैमासिके, त्रैमासिके, साप्ताहीके व साईवाहिन्यांच्या प्रत्येकी ०१ किंवा ०२ प्रतिनिधींची व्यवस्था करता येईल. कार्यक्रमासाठी उपस्थित राहणा-या प्रतिनिधीची निवास व्यवस्था व्दारावती भक्तनिवासस्थान येथे करता येईल. मात्र व्दारावती भक्तनिवासस्थानातील खोल्या ह्या ऑनलाईन बुक होतात त्यांचे उपरोक्त कालावधीतील ऑनलाईन बुकींग व्यवस्था बंद ठेवावी लागेल. सदरचा कार्यक्रम हॉटेल सेंट लॉरेन्स येथील हॉलमध्ये घेता येईल. यासाठी सदरचा हॉल पहाणीकरुन बुक करावा लागेल याबाबतची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत करता येईल. कार्यक्रमासाठी येणा-या प्रतिनिधींची एक वेळ भोजनाची व्यवस्था हॉटेल सेंट लॉरेन्स येथे श्री साईप्रसादालय विभागाने करावी व इतर वेळी भोजनाची व्यवस्था

श्री साई प्रसादालयात करता येईल. दर्शन/आरतीची व्यवस्था जनसंपर्क विभाग व संरक्षण विभागामार्फत करता येईल. उपरोक्त सर्व व्यवस्था संस्थान मार्फत विनाशुल्क करावी लागेल. तसेच कार्यक्रमासाठी येणा-या साप्ताहीक, मासिक, व्दैमासिक, त्रैमासिक व साई वाहिन्यांच्या प्रतिनिधींना कार्यक्रमाचे निमंत्रण देणेकामी निमंत्रण पत्राचा मसुदा तयार करणे, कार्यक्रमाचा मिनीट टू मिनीट प्रोग्राम तयार करणे, कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थित प्रतिनीधींच्या नोंदी ठेवणे व ई-मेल करणेबाबतची कार्यवाही श्री साईबाबा ज्युनिअर कॉलेजचे प्रा.विकास शिवगजे, माहिती तंत्रज्ञान विभाग व सामान्य प्रशासन विभागामार्फत करता येईल. या संम्मेलनास येणा-या प्रतिनिधींनी त्यांची येण्या–जाण्याची व्यवस्था स्वतः करावी असे मत आहे. याकरीता सदर कार्यक्रमाची तारीख निश्चित झाल्यावर संस्थानच्या विविध विभागांकडून संमेलन आयोजनासाठी आवश्यक ती कामे करुन घेणेस व यासाठी येणा-या सर्वसमावेश खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**मागणी-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास जगतीक स्तरावर प्रसिध्दी देणेसाठी देशातील साप्ताहिके, मासिके, व्दैमासिके व त्रैमासिके आदिंच्या प्रतिनिधींचे शिर्डी येथे संम्मेलन आयोजित करणेबाबत.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय–** मा.अध्यक्ष महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार साईबाबांच्या कार्याचा प्रचार व प्रसार करणा-या देशातील साप्ताहीक, मासिक, व्दैमासिक व त्रैमासिकांच्या प्रतिनिधींचे शिर्डी येथे संमेलन आयोजित करुन कार्यक्रमासाठी येणा-या संपादक/प्रतिनिधींशी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कालावधीत होणा-या विविध कार्यक्रमांना प्रसिध्दी देणेकामी विचार विनिमय करता येईल. कार्यक्रमासाठी उपस्थित राहणा-या प्रतिनिधीची निवास व्यवस्था व्दारावती भक्तनिवासस्थान येथे निशुल्क करता येईल. मात्र व्दारावती भक्तनिवासस्थानातील खोल्यांचे उपरोक्त कालावधीतील ऑनलाईन बुकींग बंद ठेवावी लागेल. सदरचा कार्यक्रम हॉटेल सेंट लॉरेन्स येथील हॉलमध्ये ठेवावयाचा असल्याने हॉलची पहाणीकरुन बुक करणेबाबतची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत करता येईल. कार्यक्रमासाठी येणा-या प्रतिनिधींची एक वेळ भोजनाची व्यवस्था हॉटेल सेंट लॉरेन्स येथे श्री साईप्रसादालय विभागाने करावी व इतर वेळी भोजनाची व्यवस्था श्री साई प्रसादालयात करता येईल. दर्शन/आरतीची व्यवस्था जनसंपर्क विभाग व संरक्षण विभागामार्फत करता येईल. उपरोक्त सर्व व्यवस्था संस्थानमार्फत विनाशुल्क कराव्या लागतील. तसेच संमेलनासाठी येणा-या प्रतिनिधींनी त्यांची येण्या-जाण्याची व्यवस्था स्वतः करावी. या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणा-या प्रत्येक साप्ताहीक, मासिक, व्दैमासिक व त्रैमासिकांच्या ०१ किंवा जास्तीत जास्त ०२ प्रतिनिधींना कार्यक्रमाचे ठिकाणी प्रवेश द्यावा असे मत आहे. तरी वर निर्देशीत केलेली व इतर आवश्यक सर्व कामे संबंधीत विभागांकडून करुन घेणेस व त्यासाठी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता असावी.

तथापि सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने साईबाबांच्या कार्याचा प्रचार व प्रसार करणाऱ्या साप्ताहीक, मासिक, द्वैमासिक व त्रैमासिकांच्या प्रतिनिधींचे संमेलन शिर्डी येथे आयोजित करणेस व त्यानुशंगाने येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदर संमेलनास श्री साईबाबांच्या जीवनाविषयी टि.व्ही.मालीका व डॉक्युमेंटरी तयार करणेस इच्छुक असणाऱ्या संस्थांचेप्रतिनिधींना आमंत्रित करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **अकुशल, कुशल व तांत्रीक पदे आऊटसोर्स पध्दतीने भरण्याबाबतची नियमावली- २०१७.**

**निर्णय क्र.४९७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११ वी प्रवेशाबाबत नियमावली.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम २००४ मधील तरतूद</u>-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४) मधील तरतूद क्र.१७(१) व १७ (२)(ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्म निरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**<u>प्रास्ताविक</u>-** श्री साईबांबाचे पदस्पर्शाने पावन झालेल्या पुण्यभुमि शिर्डी येथे सन २०००-२००१ मध्ये १ जुलै २००० रोजी कनिष्ठ महाविद्यालयाची स्थापना होऊन विज्ञान शाखेचा वर्ग सुरु झाला. या कनिष्ठ महाविद्यालयाचा जून २००० पासून शासनाच्या शिक्षण खात्याची कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता प्राप्त झाली. संगणकाच्या ज्ञानाची गरज ओळखुन जुन २००२पासून कनिष्ठ महाविद्यालयात माहिती तंत्रज्ञान हा विषय सुरु करण्यात आला. सध्या ३५ संगणकासह आदर्श अशी अदययावत माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा तसेच भौतिकशास्त्र, जीवशास्त्र आणि रसायनशास्त्र या विषयांसाठी सुसज्ज प्रयोगशाळा उभारण्यात आलेल्या आहेत. शिर्डी येथील विविध विदयार्थी संघटना,राजकीय क्षेत्राची मान्यताप्राप्त पक्षांचे नेते ग्रामस्थ,पालक यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे मार्फत मुलामुलींसाठी, विज्ञान शाखेत कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रश्न संस्थान मार्फत सोडविण्यात यावा या बद्दल आग्रह धरला होता.या सर्व बाबींचा विचार करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीच्या मा.व्यवस्थापन समितीने सन २००५-२००६पासुन शिर्डी येथे कनिष्ठ महाविदयालयात मुलामुलींसाठी कला , विज्ञान आणि वाणिज्य शाखा सुरु करण्यात आल्या. सन २०१७-१८ मध्ये इ. ११ वी कला शाखेच्या ३, वाणिज्य शाखेच्या ३ आणि विज्ञान शाखेच्या ४ तुकड्या अशा एकूण १०

वर्ग तुकड्या असून प्रत्येक तुकडीची प्रवेश क्षमता ८० आहे. या १० वर्गतुकड्यांमध्ये इ. ११ वी साठी एकूण प्रवेश क्षमता ८०० आहे.

**मागणी-** इ.११ वी च्या वर्गात प्रवेश देण्यासाठी खालील प्रमाणे नियम करून प्रवेश प्रक्रिया प्रस्तावित आहे.

**इयत्ता ११ वी प्रवेश नियम-**

१) कनिष्ठ महाविद्यालयात इ.११ वी च्या कला व वाणिज्य शाखेच्या प्रत्येकी ३ तुकड्या असून विज्ञान शाखेच्या ४ तुकड्या आहेत.

२) प्रत्येक तुकडीची विद्यार्थी प्रवेश क्षमता ८० आहे. कला व वाणिज्य शाखेत २४० आणि विज्ञान शाखेत ३२० प्रवेश देण्यात येतील.

३) इ.१० वी चा निकाल लागल्या नंतर शासनाच्या शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार इ.११ वी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले जाते, त्यानुसार इ. ११ वी प्रवेशाची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

४) सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश गुणवत्ता व शासनाचे आरक्षण विषयक नियम विचारात घेऊन दिले जातील.यात अनुसूचित जातींसाठी १३%,अनुसूचित जमातींसाठी ७%,इतर मागास प्रवर्गासाठी १९%,भटक्या जमाती व विमुक्त जाती करीता ११%, विशेष मागास प्रवर्ग यांचेसाठी २% आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी ४८% जागा आरक्षित असतील.

५) प्रवेशासाठी राखीव प्रवर्गातील विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास रिक्त असलेल्या जागेवर इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल.

६) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांचे नियमानुसार इ.१० वी मध्ये सामान्य गणित विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इ.११ वी /१२ वी च्या वर्गात गणित विषय अभ्यासासाठी घेता येत नाही.

७) संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.१८/७/२००५ च्या सभेतील विषय न.२९/निर्णय क्र.३६० नुसार विद्यार्थ्यांसाठी (मुलांसाठी) नाममात्र शैक्षणिक शुल्क रु.३३०/- आकारण्यात येईल आणि मुलींना मोफत शिक्षण देण्यात येईल. मुलींसाठी शैक्षणिक शुल्क असणार नाही.प्रवेश अर्ज सर्वांना मोफत देण्यात येईल.

८) दि.७/१/२०१७ चा शासन निर्णय व मा.शिक्षण उपसंचालक,पुणे यांचे दि२४/४/२०१७ चे पत्रानुसार मुंबई, पुणे व पिंपरी चिंचवड नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या महापालिका क्षेत्रात सन २०१७-१८ मध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल. उर्वरीत महाराष्ट्रात ऑफलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल. त्यानुसार संस्थानच्या कनिष्ठ महाविद्यालयात ऑफलाईन प्रवेश प्रक्रिया होईल.

**संस्थान अधिनियम ठराव यानुसार अनुमान-** सदरचा इ.११ वी प्रवेशाच्या नियमावलीचा विषय धोरणात्मक आहे.

**विभागाचा अभिप्राय स्पष्ट मत-** संस्थानच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत व्यवस्थापन कोट्यातील संस्था स्तरावरील २० टक्के प्रवेशासह सर्व प्रवेश गुणवत्तेनुसार देण्यात येतात.त्याच धोरणानुसार कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११ वी चे व्यवस्थापन कोट्यातील ५ टक्के प्रवेशासह सर्वप्रवेश १०० टक्के गुणवत्तेनुसार देता येतील.

प्रस्तावित केलेल्या प्रवेश नियमानुसार इयत्ता ११ वी च्या वर्गात प्रवेश देण्याची कार्यवाही करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११ वी प्रवेशाबाबतच्या उपरोक्त नियमावलीचे अवलोकन करणेत येऊन, सदरहू नियमावलीस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कनिष्ठ महाविद्यालय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **नियोजित श्री साईबाबा दर्शनरांग प्रकल्पाचे जागेवर Geo Technical Investigation करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद –**

१. अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मीक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी

योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील, अशी तरतूद आहे.

२. अधिनियमाचे कलम २१(१)मधील खंड (ग) अन्वये, "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे."

**मा. व्यवस्थापन समिती निर्णयः-** मा. व्यवस्थापन समितीच्या दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं. २४१ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

"....यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सोयीसाठी दि.१२.१२.२०१६ पासून बायोमेट्रीक बेस टाईम स्लॉट दर्शनव्यवस्था सुरु करण्यात आलेली आहे. या प्रणालीमध्ये साईभक्तांना श्रींचे दर्शनासाठी दर्शनरांगेमध्ये जाणेसाठीची वेळ मिळते. यामुळे पुर्वी प्रस्तावित करण्यात आलेल्या ३०,००० साईभक्तांच्या क्षमतेच्या व रु.३४०.२० कोटी मात्र खर्चाच्या मोठया स्वरुपाच्या प्रकल्पाची आता आवश्यकता नाही. त्याकरीता साईनिवास अतिथीगृह व सुलभ शौचालय या इमारती आहे तशाच ठेवून फक्त जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.१ व २ या जुन्या इमारती काढून त्या ठिकाणी नवीन दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच याकामी आर्किटेक्टमाथुर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांचेकडून नियोजित इमारतींचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात यावे. तसेच जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.१ व २ या इमारतींमध्ये साईभक्तांसाठी चालविण्यात येणारे विविध सेवा-सुविधांचे काऊंटर्स योग्य जागेची निश्चिती करणेत येऊन, इतरत्र स्थलांतरीत करण्यात यावे व या जुन्या इमारती पाडणेसाठी (Demolition) प्रथमतः स्वतंत्र निविदा मागविण्यात याव्या. याचबरोबर यापुर्वी रु.३४०.२० कोटी मात्र खर्चाच्या प्रकल्पाबाबत शासनाकडे सादर करण्यात आलेल्या दि.२३.०४.२०१६ रोजीचा प्रस्ताव रद्द करणेत येऊन, वरीलप्रमाणे सुधारीत प्रकल्पास राज्य शासनाची मान्यता घेणेसाठी नव्याने प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले."

**प्रस्तावनाः-** मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयान्वये शिर्डी सर्व्हे नं.२/४, ३/१, ३/७ मधिल संस्थान मालकीचे जागेवर नियोजीत श्री साईबाबा दर्शनरांग इमारतीचे बांधकाम करणे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने सध्याच्या अस्तित्वातील साईप्रसाद नं. ०१ व ०२ या जुन्या इमारती व त्यास सलग्न असणारे किरकोळ बांधकामे, शेड पाडणे प्रस्तावित आहे. त्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली आहे. आर्किटेक्ट माथूर ॲण्ड कापरे असो., नवि दिल्ली यांनी स्ट्रक्चरल डिझाईन तयार करणेसाठी नियोजीत बांधकामाच्या जागेवर दहा विविध ठिकाणी बोअर होल घेऊन जिओ टेक्निकल सर्व्हे रिपोर्ट लवकरात लवकर सादर करणेचे कळविले आहे. सदर जिओ टेक्निकल सर्व्हे करीता प्राथमिक ढोबळ अंदाजाकरीता रु.२.२५ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्तावः-** तरी नियोजीत श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग प्रकल्पाचे बांधकामाकरीता GeoTechnical Investigation करणेकामी अंदाजे रु.२.२५ लक्ष मात्र इतक्या अपेक्षित खर्चास व वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.४९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नियोजीत श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग प्रकल्पाचे बांधकामाकरीता GeoTechnical Investigation करणेकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **श्री साईबाबा मंदिर परिसराचे थ्री डी मॉडेल तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम -२००४ मधिल तरतूदः-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोटकलम (१) च्या. खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्त मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा मंदिर व परिसरात अचनाक आपतकालीन परिस्थीती उद्‌भवल्यास त्या परीस्थीतीचा सामना करण्यासाठी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून संभाव्य परिस्थीती योग्य पध्दतीने हताळण्या करिता श्री साईबाबा मंदिर व परिसरांचे थ्री डी मॉडेल ची आवश्यकता असल्याने दोन सेटअपमध्ये तयार करुन मिळणेबाबत शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांनी त्यांचे दि.२२/०५/२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. तसेच सदर थ्री डी मॉडेलचा एक सेट संस्थानकरीता तयार करणेबाबत मा. उपकार्यकारी अधिकारी सो यांनी सूचना दिल्या आहेत.

त्यानुसार श्री साईबाबा मंदिर व परिसराचे एकूण ०३ थ्री डी मॉडेल तयार करुन घ्यावे लागतील. याबाबत अशा प्रकारचे काम करणा-या व्यक्तींकडून माहिती घेतली असता सदर ३ डी मॉडेल तयार करणेसाठी खालिल दोन पर्याय उपलब्ध असलेबाबत माहिती मिळाली.

**पर्याय क्र. ०१**

| Sr.No | Description | No's | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | Architectural Scale Model<br>Preparation of Architectural Scale model of Saibaba Temple Complex Made by White edge mount board of 1.5 mm thickness with colouring landscaping, path way glass box cover, Base etc. complete. Scale of model (1:100 to 1:125) including<br>Size 6'x4' | 03 | 60,000/- | 1,80,000/- |
| | Total Amount | | | 1,80,000/- |

**पर्याय क्र. ०२**

| Sr.No | Description | No's | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | Proposed Model for, SHRI SAIBABA SAMADHI MANDIR PREMISES, in survey no.1 & 2, part at shirdi, master plan, as per drawing details model & photos, various type of material, lighting effect etc.<br>As per drawing & site detail model.<br>a) Base Size: 5 feet x 3 feet. Aluminium and plywood<br>b) Scale : 1:150 detail Model<br>c) Use of Material: Acrylic sheet, Computerized Acrylic cutting & deco colour spray Painting, Landscpae & all details, 5 mm acrylic box cover. Etc. Complete | 03 | 5,33,450 | 16,00,350/- |
| | Total Amount | | | 16,00,350/- |

वरीलपैकी पर्याय क्र.०१ चे मॉडेल हे ब्लॉक स्वरुपाचे असेल. म्हणजेच त्यामध्ये इमारतींचे बारीक तपशिल दर्शविण्यात येणार नाहीत. तसेच लाईटींग ईफेक्ट नसतील. पर्याय क्र.०२ चे मॉडेल हे डिटेल स्वरुपाचे असेल. त्यामध्ये इमारतीचे बारीक-सारीक तपशिल दर्शविण्यात येतिल. लाईटींग इफेक्ट असेल.

तरी वरीलपैकी एका पर्यायाची निवड होऊन त्यासाठी येणा-या खर्चास तसेच याकामी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसराचे प्रस्तावातील पर्याय क्र.०२ प्रमाणे ०२ नग थ्री डी मॉडेल तयार करुन घेण्यात यावे, असे ठरले. तसेच त्याकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**त्याचबरोबर श्री साईबाबा मंदिर परिसराचे संगणकीय प्रणालीमध्येही थ्री डी मॉडेल तयार करुन घेण्यात यावे, असेही चर्चेअंती ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.१०** **वस्तु व सेवाकर (GST) अंतर्गत दि.०१.०४.२०१७ पासून नोंदणी दाखला घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** आर्थिक वर्ष २०१७-१८ पासून व्हॅट कर कायद्याचे रुपांतर General Sales Tax (GST) मध्ये झाले असून दि.१ जुलै २०१७ पासून सरकारने अमलात आणण्याचे ठरविले असून हा कायदा संपूर्ण भारतात लागू होणार असल्याचे भारत सरकारने जाहिर केले आहे. संस्थानला व्हॅट कर कायदा लागू नसलेबाबतची केस ट्रॅब्युनलमध्ये असून सदर बाब न्यायप्रविष्ठ असून संस्थानला अशा व्यवहारांवर अद्याप व्हॅटकर भरावा लागलेला नाही. विक्रीकर व व्हॅटबाबत संस्थान संबंधित माहिती खालीलप्रमाणे आहे

आपले संस्थानने सन १९७२ पासून विक्री कराचा नोंदणी दाखला घेऊन परप्रांतातून तांदूळ खरेदी करून त्याचा उपयोग भोजनालयासाठी करीत असे व त्यानुसार C-Form मिळवून परप्रांतीय व्यापाऱ्यांना परप्रांतातील व्यवहारासाठी वापरला जाणारा C-Form देऊन तांदूळ खरेदी करीत असे परंतु पूढे जेवणावळीवर व भेटवस्तूंवरील विक्रीवर (लिलावविक्री) यावर आकारणी सुरु झाली त्याविरुद्ध आपण अपील करून व्यापारी नाही असे खात्याच्या निदर्शनास आणले परंतु खालील अधिकारयांनी तो मुद्धा अमान्य करून आकारणी योग्य ठरवली त्याविरुद्ध आपण मा.न्याधीकरण, मुंबई यांचेकडे S.A. नंबर २२१/१९८९ प्रमाणे दि.२०/०३/१९९० च्या निकाला प्रमाणे मा.न्याधीकरण, मुंबई यांनी संस्थान व्यापारी नाही असा निकाल दिला. त्यानंतर विक्रीकराचे रुपांतर मूल्य वर्धित कर कायदा २००२ मध्ये झाले त्यातील तरतुदीनुसार व्यापारी यांची व्याप्ती वाढविण्यात आली, त्यामध्ये व्यापारी/भागीदारी/संस्था/सोसायटी/सरकारीआस्थापना/ कमिशनएजन्ट/ई. सर्व खरेदी विक्री करणारे व्यापारी असून ते VAT कर भरण्यास पात्र आहे, अशी व्याख्या केल्यामुळे संस्थान या व्याख्येमध्ये बसत नाही असे मुद्दे उपस्थित करून मा.विक्रीकर आयुक्त, मुंबई यांना दि.१८/०३/२००९ रोजी अर्ज केला होता त्यामध्ये खालील मुद्दे मांडण्यात आले होते.

१. श्री साईबाबा संस्थान, शिर्डी कायदा २००४ अन्वये करीत असलेले व्यवहार व पुरवीत असलेल्या सेवा ह्या VAT कायद्यात मोडतात का? व संस्थान व्यापारी आहेत का?.
२. संस्थान करीत असलेले व्यवहार व भाविकांना पुरवीत असलेल्या सेवा उदा. प्रसाद भोजन, प्रसाद अन्न पाकीटे, पेय हे विक्री व्यवहारात मोडतात का?
३. आम्ही वरील व्यवहारांवर मूल्य वर्धित कर कायदा २००२ अन्वये कर भरण्यास पात्र आहोत का?

यावर त्यांनी दि.२०/०९/२००९ रोजी दिलेल्या निर्णयानुसार उपस्थित केलेले मुद्दे अमान्य केल्यामुळे पुन्हा मा.न्यायाधीकरण, मुंबई यांचेकडे प्रथम अपिल केलेले आहे व ते अद्याप प्रलंबित आहे. त्यांना आपण त्वरित निकाल देण्यासाठी विंनती अर्ज केलेले आहेत व सध्या हा निकाल लवकरच लागण्याची शक्यता आहे.

सदरबाबत संस्थानचे सन १९९१ पुर्वीपासून विनामुल्य विक्रीकर, व्हॅट संबंधित काम पाहणारे कर सल्लागार श्री.शशिकांत कुलकर्णी व श्री.सुनिल सोनवणी, नाशिक आणि श्री.ए.एल.कुलकर्णी, कोपरगांव यांचेकडे विक्रीकर विभागाने MVAT Act, कलम ६४ अंतर्गत आलेल्या नोटीस संबंधि मार्गदर्शन घेतले व संस्थानला विक्रीकरात सुट होती त्याप्रमाणे VAT करात सुट मिळावी व त्याबाबत DDQ न्यायप्रविष्ठ असून त्यानंतर निर्णय घेतला जाईल असे दि.८.५.२०१७ रोजी कळविले आहे. दि.३०.०५.२०१७ रोजी कर सल्लागार यांनी संस्थान पुरवित असलेल्या सेवा व करत असलेले भक्तांशी निगडीत व्यवहार हे व्यापारी संज्ञात येण्याची शक्याता आहे. त्यामुळे सावधगीरी म्हणून संस्थानने दि.०१.०७.२०१७ पासून नोंदणी दाखला घेण आवश्यक आहे असे त्यांना वाटते असे त्यांनी कळविले आहे व जर मा.न्याधिकरण, मुंबई यांनी DDQ मध्ये संस्थानच्या बाजूने व्यापारी नसल्याचा निकाल दिला तर घेतलेला GST नंबर रद्द करता येईल. परंतू विरोधात निकाल लागला तर नोंदणी दाखला घेतला नाही त्यामुळे कर, व्याज, दंडाची आकारणी लागू शकते. मागील ८ वर्षांची माहिती पुरवावी लागेल. त्यामुळे स्वतःहून नोंदणी दाखला घ्यावा असे त्यांनी कळविले आहे.

विभागाचा अभिप्रायः- मा.न्याधिकरण, मुंबई यांचा निकाल येईपर्यंत नव्याने लागू झालेल्या वस्तू व सेवाकर (GST) कायद्यातर्गंत नोंदणी दाखला घेण्यास व त्यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करण्यास व DDQ चे निकालानुसार कार्यवाही करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वस्तु व सेवाकर (GST) अंतर्गत दि.०१.०४.२०१७ पासून संस्थानची नोंदणी करणेसाठी इतर सनदी लेखापालांचा अभिप्राय घेण्यात यावा व इतर देवस्थानांकडून माहिती घेण्यात यावी. तसेच कायदेतज्ञ समिती सदस्य मा.ॲडमोहन जयकर यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे व त्यानंतर वस्तु व सेवाकर (GST) नोंदणीबाबत कार्यवाही करावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११** **बांधकाम विभागामार्फत तयार करण्यात येणाऱ्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे कामासाठी सिमेंट खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबासाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधील तरतुद-** *अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट–कलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची*

*देखभाल व्यवस्थापन व प्रशासन" करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडुन विश्वस्तव्यवस्थेचा निधीचा विनीयोग करण्याची तरतुद आहे.*

**प्रस्तावना:-** बांधकाम विभागामार्फत संस्थान परिसरातील इमारतींचेदैनंदिन दुरुस्ती व देखभालीचे कामेकेली जातात.याकामासाठी आवश्यक असणारे सिमेंट सध्या बांधकाम विभागामार्फत आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी केले जाते. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७११ अन्वये सन २०१६-१७ करीता दैनंदिनसंस्थान परिसरातील इमारतींची देखभाल दुरुस्तीसाठी व विभागांतर्गत कामांसाठी ९०० सिमेंट गोण्याआवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी करणेस व या कामी अंदाजीत रक्कम रु.२,७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यतादेण्यात आली होती. सन२०१६-१७ या आर्थिक वर्षातीलबांधकाम विभागाकडील सिमेंट गोण्यांचा तपशिल खालिल प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | सिमेंट गोण्यांची संख्या |
|---|---|---|
| ०१ | सन २०१५-२०१६ या वर्षातील शिल्लक सिमेंट गोण्या | ५०८ |
| ०२ | सन २०१६-२०१७ या वर्षात खरेदी केलेल्या सिमेंट गोण्या | ७८० |
| ०३ | देणगी आलेल्या सिमेंट गोण्या | ५१ |
| | एकुण प्राप्त सिमेंट गोण्या - | **१३३९** |
| | खर्च झालेल्या सिमेंट गोण्या - | ९७८.५० |
| | एकुण शिल्लक गोण्या - | **३६०.५०** |

उपरोक्त पैकी शिल्लक असलेल्या गोण्यांमधुन दि.०१/०४/२०१७ ते दि.०५/०६/२०१७ अखेरसंस्थान परिसरातील इमारतींचे दैनंदिन दुरुस्ती व देखभालीचे कामासाठी २१०.५० सिमेंट गोण्या खर्च झालेल्या असुन आज रोजी विभागाकडे १५० सिमेंट गोण्या शिल्लक आहेत. सन २०१७-१८या आर्थिक वर्षासाठीसंस्थान परिसरातील इमारतींचे दुरुस्ती व देखभालीचे कामांसाठी व श्रींचे समाधी शताब्दी वर्ष असल्याने तातडीने निघणाऱ्या कामांसाठी सिमेंट गोण्या खरेदी करणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव:-** सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी (४३ ग्रेड सिमेंट) अल्ट्राटेक, ए.सी.सी., बिर्लाअे-१, बिर्ला गोल्ड व अंबुजा या कंपन्याचे,अधिकृत विक्रेत्यांकडुन ७५० सिमेंट गोण्या आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी करता येतील. याकामी खालिल प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशिल | परिमाण | दर | एकक | एकुणरक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | अल्ट्राटेक, ए.सी.सी., बिर्लाअे-१, बिर्ला गोल्ड व अंबुजा या कंपनीचे सिमेंट | ७५० | ३२०/- | प्रति गोणी | **२,४०,०००/-** |

**विभागाचा अभिप्राय/मत:-** तरी बांधकाम विभागामार्फत करणेत येणा-या इमारतींचे दैनंदिन दुरुस्ती व देखभालीचे कामांसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता ७५० सिमेंट गोण्या वर नमुद केलेल्या कंपन्यांचे अधिकृत विक्रेत्यांकडुन दरपत्रके मागवुन आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी करणेस व याकामी अंदाजित रक्कम रु.२,४०,०००/- मात्र पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, बांधकाम विभागामार्फत करणेत येणाऱ्या दैनंदिन दुरुस्तीव देखभालीचे कामांसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता आवश्यक असलेल्या ७५० सिमेंट गोण्या खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या कंपन्यांचे अधिकृत विक्रेत्यांकडुन दरपत्रके मागवुन आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी करणेस व याकामी अंदाजित रक्कम रु.२,४०,०००/- मात्र पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१२** **मंदिर परिसर व साईप्रसादालय या ठिकाणी वॉटर हायड्रंट यंत्रणेसाठी ०२ स्वतंत्र आर.सी.सी.पाण्याच्या टाक्या बांधकाम करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-2004 मधील तरतूद :-**

अधिनियमाचे कलम-२१ (१) मधील पोटकलम (क)अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे". अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थानचे मंदिर परिसर, जुने प्रसादालय परिसर व श्री साईप्रसादालयात वॉटर हायड्रंट यंत्रणेकरीता वापरणेत येत असलेल्या टाक्यांमधून सदर परिसरातील इमारतींच्या दैनंदिन वापरासाठी पाण्याचा पुरवठा केला जातो. सदर पाण्याचे टाक्यांचा इतर कारणांसाठी वापर केला जात असल्यामुळे या परिसरात आगीची मोठी घटना घडल्यास व त्यावेळी संबंधित टाकीमध्ये पाणी कमी प्रमाणात शिल्लक असल्यास सदर यंत्रणा निष्क्रीय ठरु नये म्हणुन वॉटर हायड्रंट यंत्रणेसाठी स्वतंत्र पाण्याची टाकी करणेबाबत फायर अॅण्ड सेफ्टी विभागाने कळविले होते. याकामी संस्थानचे समाधी मंदिर परिसर, जुने प्रसादालय परिसर व श्री साईप्रसादालय या ठिकाणी प्रत्येकी ७.५ मी. लांबी X ७.५ मी.रुंदी व ४ मी. उंचीचे २,२५,०००/- लिटर क्षमतेच्या तिन स्वतंत्र पाण्याच्या टाक्या बनविणेस तसेच विद्युत मोटार, जॉकी पंप व डिझेल इंजिन बसविणेसाठी प्रत्येक ठिकाणी ६ मी.X ५मी. साईजचे मजबूत कॉंक्रीटीकरण ओटा तयार करणेबाबत फायर अॅण्ड सेफ्टी विभागाने कळविले होते.

फायर अॅण्ड सेफ्टी विभागाचे मागणी प्रमाणे समाधी मंदिर परिसराकरीता सध्याचे केशव मंदिराचे जागेत व श्री साई प्रसादालयाकरीता गॅस प्लॉंटचे जवळील जागेत प्रत्येकी एक अशा २,२५,००० ली. क्षमतेच्या दोन R.C.C पाण्याच्या टाक्या जमिनिचेवर (Above Ground) बनविणेकरीता अंदाजे रु.५०,००,०००/- मात्र खर्चास अथवा, RHINO कंपणीमार्फत बनविण्यात येणा-या Corrugated profile Zincalume Steel Water Storage Tank विकत घेऊन उपरोक्त दोन्ही परिसरांत वापरता येईल. प्रत्येकी २,२५,००० लिटर क्षमतेच्या दोन टॅंक विकत घेणेकामी अंदाजे रक्कम रु.३० लक्ष मात्र खर्चास मान्यता मिळणेसाठी दि.२२/१२/२०१६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर सदरहू सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र. ९१० संमत करणेत आलेला आहे.

*" यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, वॉटर हायड्रंट यंत्रणेकरीता आर सी. सी. पाण्याची टाकी बनविणेकामी मोठया प्रमाणात खर्च करणेऐवजी संस्थान तलावामधून स्वतंत्र पाईपलाईनद्वारे पाणी संस्थान परिसरातील विहींमध्ये सोडणेत यावे व आवश्यक त्या वेळी फायर पंप सेटद्वारे सदरहू पाण्याचा वापर करणेत यावा."*

उपरोक्त निर्णयानुसार कार्यवाही करणेसाठी इकडील विभागाचे दि.१६/०१/२०१७ रोजीचे पत्राने जुने प्रसादालय परिसरातील विहीरीमध्ये पाण्याचा साठा करणेसाठी विहीरीला कॉंक्रीटचे अस्तरीकरण करणेबाबत पाणी पुरवठा विभागाचा अभिप्राय मागविणेत आला. त्यांचे दि.२०/०१/२०१७ रोजीचे टिपणीद्वारे खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

१. संस्थानचे साठवण तलावापासून जुने प्रसादालय व साई प्रसादालय या ठिकाणच्या फायर यंत्रणेकरीता स्वतंत्र पाईपलाईन टाकण्यात यावी व याकामाचा समावेश महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचे मार्फत सर्व्हे करुन तयार करणेत आलेल्या प्रस्तावात समावेश करणेत यावा.

२. जुने प्रसादालय परिसरातील विहीरीला कॉंक्रीटचे अस्तरीकरण केल्यास विहीरीचा नैसर्गिक पाण्याचा स्त्रोत बंद होईल, म्हणून आहे ती विहीर जतन करुन ठेवणे योग्य होईल.

**त्यानंतर फायर अॅण्ड सेफ्टी विभागाने त्यांचेकडील दि.०९/०५/२०१७ रोजीच्या टिपणीद्वारे फायर फायटींग यंत्रणेकरीता स्वतंत्र पाण्याच्या टाक्या उभारणेबाबत खालील प्रमाणे कळविले आहे.**

अ) **सध्याची वस्तुस्थिती-** सध्या मंदिर परीसर व श्री साई प्रसादालय परीसरात विहीर नाही. तसेच जुने प्रसादालय निवासस्थान परीसरात एक विहीर असुन तेथे दर्शन रांग प्रकल्प नियोजित आहे. जुने प्रसादालय निवासस्थान परीसरातील विहीरीमध्ये सोडलेले पाणी मोठया प्रमाणात आपत्कालिन घटना घडल्यास किंवा घडविल्यास विदयुत पुरवठा खंडीत झालेनंतर पाणी उचलणेकरीता स्वयंचलित डिझेल फायर पंपाची आवश्यकता भासणार आहे. विहीरीमध्ये स्वयंचलित फायर पंप बसविणे शक्य नाही. तसेच विदयुत पंपाने साईप्रसादालय परीसरातील विहीरीचे पाणी उचलून मंदीर परीसर व श्री साईप्रसादालय परीसरातील फायर यंत्रणेच्या टाक्यांमधे टाकणे यासाठी मोठया प्रमाणात विलंब होऊन आपत्कालिन प्रसंगी अग्निसुरक्षितेच्या कामात व्यत्यय निर्माण होणार आहे. तसेच त्यासाठी विहीरीवरील यंत्रणा हाताळणीसाठी स्वतंत्र कर्मचारी यांची नियमित नेमणूक करावी लागेल. सध्या मंदिर परीसर तसेच श्री साईप्रसादालय परीसरातील दैनंदिन पाणी वापराचे टाक्यांवरच वॉटर हायड्रंट यंत्रणा कार्यान्वित आहे. वॉटर हायड्रंट यंत्रणेसाठी स्वतंत्र राखीव पाण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे आगीची मोठी घटना घडल्यास पाणी किती उपलब्ध राहील याबाबत शाश्वती नाही.

**ब) आवश्यकता-** मंदिर परीसर व श्री साईप्रसादालय परीसरात स्वतंत्र पाण्याच्या टाक्या फायर विभागाकडील डिझाईन प्रमाणे केलेस टाकीचे खालिल रिकाम्या ७ फुट उंचीचे जागेत विदयुत मेन पंप, स्टॅन्डबाय पंप व स्वयंचलित फायर डिझेल पंप बसविता येतील तसेच ग्रॅव्हीटीने पंपास पाणी उपलब्ध होऊन सक्शन

फेल्युअरच्या तक्रारी होणार नाही. सदर यंत्रणा ऑटो मोडवर कार्यान्वित ठेवून आपत्कालिन प्रसंगी पाण्याचे कॉक उघडताच विनाविलंब १८०० लि. प्र. मि. प्रेशरने किमान दोन तास अग्निशमन कार्यासाठी स्वतंत्र राखीव पाणी उपलब्ध राहील. त्यामुळे फायर अॅण्ड सेफ्टी विभागाने सदरहू प्रस्ताव खालील बाबींसह फेर सादर करणे बाबत कळविले आहे.

१. जुने प्रसादालय परीसरात सध्याचे इमारती काढून त्याजागी नियोजित दर्शन रांग, पाण्याच्या टाक्या, इमारतींसाठी अत्याधुनिक फायर फायटींग व्यवस्था तसेच फायर टेंडर पार्किंगची व्यवस्था प्रस्तावित आहे. त्यामुळे तेथील प्रस्तावित पाण्याची टाकी व डिझेल इंजिन सह तत्सम यंत्रणा उभारणी कार्यवाही नवीन प्रस्तावीत प्रकल्पामध्ये करता येईल.

२. समाधी मंदिर परीसरातील शांतीनिवास टेरेसवरील सध्याचे पाण्याचे दोन टाक्यांची क्षमता १,६०,००० लिटर्स असून सध्या त्या टाक्यांचे आजच्या परीस्थीतीनुसार पाणी पूर्ण क्षमतेने भरले जात नाही. सदर टाक्यांमधील पाण्याचा वापर हा मंदिर परीसर, सेवाधाम, साईनाथ छाया, गेट नं.२ समोरील जनरल बाथरुम, साई समर्पन तसेच मंदिर परीसरातील गार्डन साठी केला जातो. त्यामुळे आगीचे घटनेवेळी पाण्याची कमतरता भासू शकते. त्याकरीता मंदीर परीसरात आगीचे घडणा-या संभावित घटनांवर तातडीने मात करण्यासाठी किमान दोन तास पुरेल इतक्या क्षमतेच्या २,२५,००० लिटर्स पाण्याचे टाकीची स्वतंत्र आवश्यकता आहे. सदर पाण्याची टाकी मंदिर परीसरातील सध्याचे सुतारी ठिय्याचे जागेवर करता येईल.

३. श्री साई प्रसादालयातील सध्याचे पिण्याचे पाण्याचे १ लाख लिटर्स क्षमतेच्या हौदावर सदर परीसरातील वॉटर हायड्रंट यंत्रणा कार्यान्वित आहे सदर यंत्रणेकरीता ६ इंची पाईपलाईन संपूर्ण परीसर, गॅस टॅक करीता कार्यान्वित असून त्यासाठी ५० हॉर्सपावरच्या दोन इलेक्ट्रीक मोटारी बसविण्यात आलेल्या आहे. परंतू सदर हौदामध्ये पाण्याची आवक ३ इंची पाईपलाईन व्दारे होत असून त्याच क्षमतेने प्रसादालयाचे दैनंदिन वापरासाठी पाणी पुरवठा होत आहे. त्यामुळे सदर हौदातील पाणीसाठा कायम अल्प राहतो. सदर परीसरामध्ये आगीची घटना घडल्यास वॉटर हायड्रंट यंत्रणा चालू केल्यास पाण्याची कमतरता भासू शकते. तरी सदर परीसरात दोन तास पुरेल इतक्या क्षमतेची किमान २,२५,००० लिटर्स क्षमतेची स्वतंत्र टाकीची आवश्यकता आहे.

समाधी मंदिर व श्री साईप्रसादालय परीसरात आपत्कालीन प्रसंगी विजपुरवठा खंडीत झालेनंतर वॉटर हायड्रंट यंत्रणा कार्यान्वित राहणेसाठी स्वयंचलित डिझेलपंप बसविणे व त्याकामी स्वतंत्र पाण्याच्या टाक्यांची आवश्यकता आहे. मा.आयुक्त,राज्य गुप्त वार्ता विभाग,महाराष्ट्र यांची सूचना **तसेच** आपत्कालीन परीस्थितीत पाण्याची कमतरता भासू नये म्हणून खालील प्रमाणे कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.

१. मंदिर परीसरातील पुर्वेकडील सध्याचे सुतारी ठिय्याचे जागेवर व श्री साईप्रसादालय परीसरातील फायर पंप रुम शेजारी यापुर्वी फायर विभागामार्फत दिलेल्या डिझाईन प्रमाणे पाण्याच्या टाक्यांची स्वतंत्र निर्मीती करुन दयावी.

२. श्री साईप्रसाद निवासस्थान परीसरातील प्रस्तावित दर्शन रांग प्रकल्पात नव्याने वॉटर हायड्रंट यंत्रणा, पाण्यासाठी स्वतंत्र २,२५,००० लिटर्स क्षमतेचा ओव्हर हेड टॅक, अग्निशमन वाहन नगर मनमाड रोग लगत उभे करण्याची व्यवस्था करावी.

संस्थानचे फायर अॅण्ड सेफ्टी विभागाने वरीलप्रमाणे मागणी बांधकाम विभागाकडे केलेली आहे.

**प्रस्तावः-** फायर अॅण्ड सेफ्टी विभागाचे मागणीनुसार वरीलप्रमाणे २,२५,००० ली क्षमतेच्या दोन पाण्याच्या टाक्या या कायमस्वरुपी बनविणे आवश्यक असल्याने त्या RCC बांधकामात बनविणे योग्य होईल असे मत आहे. याप्रमाणे दोन RCC टाक्या बांधकामासाठी प्राथमिक ढोबल अंदाजानुसार रु.५४ लक्ष इतका खर्च येईल.

याबाबत खालिल बाबींवर निर्णय होणे अपेक्षित आहे.

१) वरीलप्रमाणे प्राथमिक ढोबल अंदाजानुसार येणारे रु.५४ लक्ष इतक्या खर्चास मान्यता देणे.

२) याकामी ई- निविदा मागविणेस व त्याकरीता महाराष्ट्र शासन, सां.बां. विभाग शासन निर्णय दि.१२/०४/२०१७ अन्वये जिल्हा स्तरावर मराठी (१ वृत्तपत्र), राज्य स्तरावर मराठी (२ वृत्तपत्र), हिंदी (१ वृत्तपत्र) व राष्ट्रीय स्तरावर इंग्रजी (२ वृत्तपत्र) याप्रमाणे निविदा सूचना प्रसिध्द करणेस मान्यता देणे.

३) सदर दोन टाक्यांचे RCC design करुन घेण्यासाठी स्ट्रक्चरल कंन्सल्टंटस् कडून कोटेशन्स मागविणेस मान्यता देणे.

तरी वरील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे मागणीनुसार २,२५,००० ली क्षमतेच्या दोन ओव्हरहेड पाण्याच्या टाक्या RCC बांधकामात तयार करणेकामी प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे सौजन्याने व शिर्डी ग्रामस्थ शिर्डी यांचे सहकार्याने २३ वा श्री साईसच्चरित पारायण सोहळा साजरा करणेस व अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :-** साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम नं. १७ (१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

समितीची कर्तव्ये व अधिकार– १७ (१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

१७.(२) ठ- श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**प्रस्ताविक–** श्रावण शु//१, सोमवार दि.२४/०७/२०१७ ते श्रावण शु//८,सोमवार दि.३१/०७/२०१७ या कालावधीत श्री साईसच्चरित पारायण सोहळा साजरा करणे करीता संस्थानमार्फत याकामी खर्चाचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, नाटयरसिक संच,शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ यांचे संयुक्त विद्यमाने श्री साईसच्चरीत पारायण सोहळयाचे आयोजन समाधी मंदीर परिसरात गेल्या २२ वर्षापासून करण्यात येते. नाटय रसिक संच, शिर्डी यांचे मार्फत पारायणार्थीचे नाव नोंदणी करण्यात येते. याकामी शिर्डी ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य असते.

या पारायण सोहळयासाठी शिर्डी ग्रामस्थ, नाटयरसिक संच, शिर्डी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने हा सोहळा पार पडला जातो. या पारायण सोहळयाचे आयोजनात खालीलप्रमाणे ठळक कामे करावी लागतात.

१) मंडप व स्टेज व फुले डेकोरेशन
२) नियोजीत कीर्तनकार, कलाकार बिदागी जाणे-येण्याचे प्रवास खर्चासह.
३) मिरवणूक खर्च,बँड,वाद्य इत्यादी.
४) पत्रिका, हॅन्डबील, बॅनर, इत्यादी छपाई.
५) चहा व नाश्ता, श्रींचे पारायण समाप्ती नंतर महाप्रसाद भंडारा.

नाटय रसिक संच फक्त वाचकांचे नोंदणी व बॅचेचा खर्च करतात तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत नाटय रसिक संच, शिर्डी यांचे मदतीने सन १९९५ पासून म्हणजेच गेल्या २२ वर्षापासून दरवर्षी सामुदायिक श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित केला जातो.

पारायणात सुमारे ५००० साईभक्त सहभाग घेत असतात. दरवर्षी पारायण सोहळयाची रुपरेषा पुढील प्रमाणे असते.

१) दररोज सकाळी ७.०० ते ११.३० - पुरुष पारायणार्थी
२) दररोज दुपारी १.०० ते ५.३० - महिला पारायणार्थी
३) दररोज रात्रौ ७.३० ते ९.३० - निमंत्रीतांचे कीर्तन/ व्याख्यान/ इतर करमणुकीचे कार्यक्रम.
४) आठव्या दिवशी साईसच्चरित ग्रंथाची गावातून शोभा यात्रा.
५) अवतरणिकेच्या दिवशी एकच बॅच ( स्त्री व पुरुष ) राहील.
६) नवव्या दिवशी काला कीर्तन व महाप्रसाद भंडारा.

**खर्चाचे अंदाजपत्रक-** मागील वर्षी श्रावण मासानिमित्त आयोजित पारायण सोहळयास संस्थान मार्फत आलेला खर्च व यावर्षी पारायण आयोजित करावयाचे असल्यास याकामी संस्थानला येणारा अंदाजे खर्च याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **श्री साई सच्चरित पारायण सोहळा-२०१६** | | **श्री साई सच्चरित पारायण सोहळा-२०१७ अंदाजे खर्च** |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप, मॅटिन व स्टेज | ३,८३,१८५.०० | ४,२३,९६०.०० | ६,००,०००.०० |
| २ | कलाकार बिदागी | १,०८,०००.०० | १०,०४७६.०० | ३,००,०००.०० |
| ३ | प्रसाद खर्च, (चहा, कॉफी व दुध खर्चासह) | ७,००,०००.०० | ५,६७,६०५.०० | ६,००,०००.०० |
| ४ | जादा (कंत्राटी) कामगार | १,००,०००.०० | १,२०,७६८.०० | १,५०,०००.०० |
| ५ | इतर खर्च (फर्निचर,भाडे,प्लस्टिक कापड, फोटोग्राफी किरकोळ खर्च इ.) | ३०,०००.०० | २४,७२०.०० | ३५,०००.०० |
| ६ | फुल सजावट खर्च | १०,०००.०० | ०.०० | ५०,०००.०० |
| ७ | विद्युत रोषणाई | १०,०००.०० | ०.०० | ३५,०००.०० |
| | **एकुण** | **१३,४१,१८५.००** | **१२,३७,५२९.००** | **१७,७०,०००.००** |

मागील वर्षी श्रावण मासातील पारायण ग्रामस्थांचे आग्रहास्तव १६ गुंठे जागेत घेण्यात आले होते. ५००० पारायणार्थी पारायणासाठी सहभागी झाले होते. यात सकाळी पुरुष व दुपारी महिला असे दोन वेळेत वाचनाचे आयोजन केले होते.

१) सन ११९५ साली दिक्षीत वाड्याच्या सभागृहात झाले. १९९६ पासून ते सन २००६ पर्यत गेट नंबर ४ चे परीसरात आयोजीत करण्यात येत असे.

२) साईभक्तांच्या संख्येत वाढ झाल्याने त्यांच्या जाणे- येणेस जागा अपुरी पडत असल्याने सन २००७ पासून १६ गुंठे जागेत आयोजित करणेत येते.

३) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/७/२०१६ निर्णय क्र. १८० व ४३६ अन्वये “श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सौजन्याने व नाटय रसिक संच, शिर्डी यांचे सहकार्याने २२ वा श्री साईसच्चरीत पारायण सोहळा साजरा करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१३,४१,१८५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच, पारायण सोहळा संपल्यानंतर काही स्थानिक सहली आयोजक पारायणार्थींना घेऊन धार्मिक ठिकाणी सहली काढतात व त्या वाहनांवर पारायण सोहळयाचे फलक लावतात, त्यामुळे बाहेरील भक्तांमध्ये चुकीचा संदेश जातो. यासाठी स्थानिक सहली आयोजकांना सहलीच्या वाहनांवर व ओळखपत्रांवर पारायण सोहळयाचे नावाचा उल्लेख करु नये,असे लेखी कळविणेत यावे. पारायण सोहळयामध्ये होणारा सर्व खर्च संस्थानने करावा व विविध ठिकाणी लावणेत येणा-या फलकांवर साईबाबा संस्थान व्यतिरिक्त इतर मंडळांची नावे लिहीणेत येऊ नये, असे ठरले ”

४) मागील वर्षी श्री साईसच्चरीत पारायण सोहळा या कार्यक्रमाच्या फलकावर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ आयोजित असा उल्लेख करण्यात आला होता. याही वर्षी मागील वर्षी प्रमाणे कार्यवाही करता येईल.

५) १६ गुंठे जागेत टेनसाईड फॅब्रीक शेड उभारण्याचे असल्याने,तसेच साईकॉम्प्लेक्स गाळयात साई भक्तांना दर्शनासाठी लवकरच बायोमेट्रीक मोफत दर्शन पास सुविधा काऊंटर चालू करण्यात येणार आहे. त्यामुळे त्याठिकाणी भक्तांची गर्दी होणार आहे. साई सच्चरित पारायणार्थींची संख्येत दर वर्षी वाढ होत असल्याने, श्री साई सच्चरित पारायणाचे आयोजन १६ गुंठे जागेत करता येणार नाही. त्याऐवजी साईनगर मैदान याठिकाणी जागा व्यवस्थीत करुन त्याठिकाणी मंडप, मॅटिन व स्टेज उभारणी करुन पारायणार्थींना चांगल्या प्रकारे सुविधा उपलब्ध करुन देता येईल.

६) अंदाजे रक्कम रुपये खर्च रु.१७,७०,०००.०० (अक्षरी रुपये सतरा लाख, सत्तर हजार) मात्र चे खर्चास मंजूरी मिळणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रमाणे श्रावण मासातील पारायण साईनगर मैदान याठिकाणी आयोजित करणेस याकामी संस्थानला येणारे अंदाजे रु.१७,७०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख, सत्तर हजार) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सौजन्याने व शिर्डी ग्रामस्थ शिर्डी यांचे सहकार्याने २३ वा श्री साईसच्चरित पारायण सोहळा साजरा करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच दरवर्षीप्रमाणे याही वर्षी साईसच्चरित्र पारायण गेट नं.०३ समोरील १६ गुंठे जागेमध्ये आयोजित करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **शताब्दी महोत्सव २०१८ चे गर्दीचे नियोजनाकामी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन, पुणे यांचेमार्फत आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद –** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीचे कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक :- निरंक**

**प्रास्तविक:-** श्री साईबाबा समाधीस सन २०१८ मध्ये शंभर वर्ष पुर्ण होत आहेत. त्यानिमीत्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते १९ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी अखेर) श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्यात येणार आहे. शताब्दी वर्षाचे कालावधीत श्रींचे दर्शनासाठी साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. कुंभमेळा २०१५ चे वेळी यशवंतराव चव्हाण विद्या विकास प्रशासन प्रबोधीनी पुणे यांचे मार्फत आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करुन यशदा, पुणे यांचे संचालक, कर्नल सुपनेकर यांचे सुचनेनुसार गर्दीचे नियोजन करण्यात आले होते.

आता श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होणार असल्याने गर्दीचे नियोजन व आपत्कालीन परिस्थीतीमध्ये करावयाच्या उपाययोजना याकामी यशदा यांचेमार्फत आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे आवश्यक असल्याने आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेकामी यशदा यांचेमार्फत प्रत्यक्ष पहाणी करुन येणाऱ्या खर्चाचा अंदाज घेणेकामी जा.नं.एसएसएस/ वशि/ संरक्षण/ ८६३/ २०१७ दि.१९/०५/२०१७ चे पत्राने मा.संचालक, यशदा, पुणे यांना पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्यानुसार डायरेक्टर, सी.डी.एम.यशदा, पुणे यांनी जा.नं.CDM/१११७/शिरडी-२०१७ दि.०३/०६/२०१७ चे पत्रान्वये, शताब्दी महोत्सव २०१८ चा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेस तयार आराखडा तयार करण्यासाठीच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे कळविल्या आहेत.

A) आराखडा बनविण्याचा एकुण खर्च रु. ३ लाख यशदा यांना देय राहील. काम मंजुर झाल्यानंतर यशदा यांच्या नांवे ६०% रक्कम RTGS द्वारे जमा करावी लागेल.

B) योग्य प्रबंधनाने सुरुवातीची बोलणी केल्यानंतर आणि काम करण्याची पद्धत स्विकार केल्यानंतर आपतकालीन व्यवस्था आराखडा तयार करण्यासाठी यशदा कंपनी कमीत कमी ३० दिवस घेईल्.

C) तयार करण्यात आलेल्या आपतकालीन व्यवस्था आराखडा श्री साईबाबा संस्थान यांनी इतर वरिष्ठ प्रबंधकीयांबरोबर आणि त्याचप्रमाणे विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांनी पुर्णविलोकन केल्यावर प्राथमिकरित्या मंजूर करणे.

D) प्रतिसाद आराखडा/ जबाबदारी (प्रमुख्याने गर्दी नियंत्रण आराखडा) प्रतिसाद देण्याऱ्या पध्दतीवर अवलंबून असेल. यासाठी, हा कार्यक्रम प्रभावीपणे पार पाडण्यासाठी जबाबदार असणाऱ्या घटकांची सहमती गरजेची असेल.

आराखडा तयार करण्याची पध्दती खालीलप्रमाणे असेल:- काम करणाऱ्या दलांना कार्यक्रमामध्ये कोणत्या वेळेला जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे आणि अपेक्षित गर्दीचा आकडा किती असेल याबाबत प्रामुख्याने माहिती द्यावी.

अस्तित्वात असलेला कुठलाही आराखडा, जर एखाद्या जबाबदार प्रबंधनाने तयार केलेला असेल, तर सध्या कायम काम चालू आहे आणि केलेल्या आराखडयाची माहिती देणे.

कार्यक्रमाच्या स्थानाची आणि त्याच्या आजुबाजूच्या परिसराची संभावित धोक्याची पातळी ओळखणे. आराखडा तयार करण्यात येतांना खालील मुद्दे समाविष्ट असतील.

i. साजोसामानासाठी कमीटींची स्थापना करणे.
ii. प्रबंधनातील सर्वांनी, काय काम करावयाचे आणि आपल्या विभागाचे काय काम असेल, हे समजून घेणे.
iii. प्रबंधनाबरोबर चर्चा करुन यशदा कंपनीने संभावित धोक्याची पातळी ओळखून माहिती देणे.
iv. प्रत्येक प्रबंधकाने धोक्याची पातळी ओळखून आपल्या विभागासाठी बचावतंत्राची शिफारस करणे/ धोक्याची तिव्रता कमी करण्यासाठी उपाय सुचविणे.
v. साधनांची पुर्तता करणे.
vi. प्रतिसादीय तंत्र (प्रतिसाद देणाऱ्या पध्दतीवर अवलंबुन)
vii. आपतकालीन व्यवस्था आराखडा तयार करणे.
viii. विभागीय आयुक्त यांना आराखडा सादर करणे आणि DDMA यांच्याकडून मंजूरी घेणे.
ix. आराखडा जमा करणे.

काम करणाऱ्या दलांना प्रशिक्षण द्यावयाचे असल्यास यशदा यांच्या अटीनुसार सशुल्क असेल, यशदा कंपनी केवळ आपतकालीन व्यवस्था आराखडा बनविण्यास जबाबदार असेल, त्याला कार्यान्वीत करण्याची संपुर्ण जबाबदारी जिल्हा प्रशासनाबरोबर संपर्क करुन श्री साईबाबा संस्थान प्रशासनाची असेल.

**अनुमान :-** धोरणात्मक.

**मागणी:-** शताब्दी वर्ष २०१८ चे गर्दीचे नियोजनकामी यशदा, पुणे यांचे मार्फत आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत**:- श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष २०१८ कालावधीत शिर्डी येथे भेट देणाऱ्या सर्व भाविकांचे दर्शन सुखकर व्हावे तसेच आपतकालीन व्यवस्थापनासह कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न अबाधीत ठेवणेसाठी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधीनी, पुणे यांचे मार्फत आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

तरी शताब्दी महोत्सव २०१८ चे गर्दीचे नियोजनकामी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेकामी डायरेक्टर यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन, पुणे यांना रु.३,००,०००/- (अक्षरी रु.तिन लाख मात्र) आदा करणेस (ॲडव्हान्सपोटी ६०% रक्कम रु.१,८०,०००/- व आराखडा तयार झालेनंतर उर्वरीत ४०% रक्कम रु.१,२०,०००/-) RGTS द्वारे आदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१५** **मंदिर परिसरातील भक्तनिवास तळमाळा दर्शनरांगेतील आपत्कालीन गेटसमोरील रिलींगमध्ये स्लायडींग गेट तयार करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियमामधील तरतूद २०१४** : (१) कलम १४ (२) घ – भक्तांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (२) कलम २१(१)(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

**प्रस्तावना**:- फायर ॲन्ड सेफ्टी विभागाचे जा.नं.१२१/२०१७ दिनांक १२.५.२०१७ चे मान्य टिपणीनुसार मंदिर परिसरातील सुरक्षिततेच्यादृष्टीने भक्तनिवास तळमाळा येथील एमर्जन्सी गेटमधून आपत्कालीन परिस्थिती उदभवल्यास साईभक्तांना सुरक्षित बाहेर काढण्यास अडचण येऊ नये म्हणून समोरील आडव्या रेलीगला स्लायडींग गेट तयार करुन मिळणेबाबत कळविले आहे.

सन २०१६ मध्ये संरक्षण विभागाच्या मागणीनुसार शांतीनिवास तळमाळा दर्शन रांगमधील रिलींगला इकडील विभागामार्फत १८ नग स्लायडींग गेट तयार करुन बसविण्यात आलेल आहेत. त्यावेळी सदर गेट

बनविणेकरीता रक्कम रु. २,४४,५८०/- मात्र खर्च आलेला होता. त्याचप्रमाणे भक्तनिवास हॉलमधील आपत्कालीन गेट समोरील प्रत्येक रांगेतील दोन स्टेनलेस स्टीलची रेलींग काढून त्या ठिकाणी रेलींगला मॅच होईल असे स्टेनलेस स्टीलचे स्लायडींग गेट बसविता येईल. याकरीता एकुण १८ नग स्लायडींग गेट बाहेरील वर्कशॉपधारक/ फॅब्रिकेटर्स यांचेकडून तयार करुन, नियोजित ठिकाणी बसविता येईल. याकामी खालील तपशीलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | मटेरिअलचा तपशील | मागणी | अंदाजे दर रुपये | खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | SS304 - 2" Dia Round Pipe 2 mm | 400 Ft. | 300/- | 1,20,000/- |
| 2. | SS304 – 1" Dia Round Pipe 1.6 mm | 750 Ft. | 115/- | 86,250/ |
| 3. | SS304 – Flat 25 x 10 mm | 150 Ft. | 260/- | 39,000/- |
| 4. | SS304 – Bend 2" | 18 Nos. | 265/- | 4,770/- |
| 5. | Wheel | 36 Nos. | 100/- | 3,600/- |
| 6. | Locking Arrangement (9 Set) | 1 Nos. | 2,000/- | 2,000/- |
| | | | **एकूण :** | **2,55,620/-** |

उपरोक्तप्रमाणे भक्तनिवास इमारतीचे हॉल समोरील रेलींगला आपत्कालीन गेट तयार करुन बसविणेकामी अंदाजे रुपये २,५५,६२०/- खर्च अपेक्षित आहे.

तरी भक्तीनिवास दर्शन हॉलमध्ये गेटसमोरील रिलींगमध्ये आपत्कालीन स्टेनलेस स्टीलचे स्लायडींग गेट तयार करुन बसविणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारक यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये २,५५,६२०/- (अक्षरी रुपये दोन लाख, पंच्चावन हजार, सहाशे वीस ) मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल. यासाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तिनिवास दर्शन हॉलमध्ये गेटसमोरील रिलींगमध्ये आपत्कालीन स्टेनलेस स्टीलचे स्लायडींग गेट तयार करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,५५,६२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार टेलिफोन विभागातील दुरध्वनी यंत्रणा अद्यावत करणेकामी नेमण्यात आलेले तांत्रिक सल्लागार DSG Consultant Pvt. Ltd. Mumbai यांना DBR (Detail Brief Report) चे प्रात्यक्षिक सादरीकरण करणेसाठी बोलाविणेस व सादरीकरणानंतर पुढील कार्यवाही ई-निविदा मागवुन अंतिम करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद :-क्र.२१-(१)** अन्वये समितीकडुन विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याहीजनासाठी करणेबाबत तरतूद आहे.त्यातील पोटकलम **(क)** अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे. **(ग)** भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठीकिंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा सभारंभ पार पाडण्यासाठी सोई व सुविधा पुरविणे.

**प्रास्ताविक:-** मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार टेलिफोन विभागातील अद्ययावत दुरध्वनी यंत्रणेसाठी तांत्रिक सल्लागार म्हणून DSG Consultant Pvt. Ltd. Mumbaiयांची नेमणुक करण्यात आलेली असून, त्यांना याकामी कार्यादेश देण्यात आलेला आहे. तथापी, नेमणुक करण्यात आलेल्या DSG Consultant Pvt. Ltd. Mumbaiयांचे प्रतिनिधी यांनी शिर्डी येथे येऊन प्रत्यक्ष सर्व ठिकाणी On Site Visit करुन त्यांनी Existing Telecommunication System, Connectivity of Existing Setup, Existing Telecom Equipment, Existing Structured Cabling Infra इत्यादी बाबींचा सखोल अभ्यास करुन, त्यांनी संस्थानला अद्यावत टेलीफोन यंत्रणा (EPABX System)कशा प्रकारची असावी,याबाबत DBRतयार केलेला आहे.सदर DBR मध्ये त्यांनी त्यांचेRecommendation मध्ये Proposed Solutions, System Features, Proposed Connectivity, Budgetary Estimate इत्यादी बाबींचा समावेश केला असुन, त्यांनी सदरचा DBR मसुदा दि.०७/०४/२०१७ रोजीचे ई-मेलव्दारे पाठविला आहे.सदर DBRचे प्रात्यक्षिक,नियुक्त सल्लागार

यांनी दि.१९/०४/२०१७ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांना व दि.०३/०६/२०१७ रोजी मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांना दाखविले आहे.

सदर प्रात्यक्षिकाअंती मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांनी सल्लागार यांना काही महत्वपुर्ण सुचना करुन DBR मधील Budgetary Estimate पुन्हा तपासुन, सदर DBR चे प्रात्यक्षिक होणा-या मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादरीकरण दाखवून मा.व्यवस्थापन समितीच्या सभेने सुचविलेल्या बदलांची नोंद घेऊन सदरहू सुचनांचा समावेश प्रसिध्द करण्यात येणा-या निविदा प्रक्रियेत करुन, तांत्रिक दृष्ट्या कालबाहय झालेली सिमेंस व जुनी मॅट्रीक्स कंपनीची दुरध्वनी यंत्रणा ई-निविदा प्रक्रियेव्दारे नव्याने नियुक्त होणा-या पुरवठादारास परत (Buy Back) करुन संस्थानला अद्यावत दुरध्वनी यंत्रणाखरेदी करणेकामी ई-निविदा मागविणेस तसेच संस्थानचे संकेतस्थळावर मराठी व इंग्रजी मध्ये जाहीरात प्रसिध्द करुन,मुंबई व पुणे येथुन प्रकाशित होणारे जास्त खपाचे मराठीव इंग्रजी वृत्तपत्रातजाहिरात प्रसिध्द करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरहु प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**मागणी:-** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे तसेच मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार टेलीफोन विभागातील नविन प्रस्तावित दुरध्वनी यंत्रणेसाठी नेमण्यात आलेले तांत्रिकसल्लागार DSG Consultant Pvt. Ltd. Mumbai यांनी तयार केलेल्या DBRचे प्रात्यक्षिक सादरीकरण करणेकामी त्यांना व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निमंत्रित करुन सदर सादरीकरणाच्या वेळी मा.व्यवस्थापन समितीने सुचविलेल्या बदलांची नोंद घेऊन, सदरहू सुचनांचा समावेश प्रसिध्द करण्यात येणा-या निविदा प्रक्रियेत करुन, तांत्रिक दृष्ट्या कालबाहय झालेली सिमेंस व जुनी मॅट्रीक्स कंपनीची दुरध्वनी यंत्रणा ई-निविदा प्रक्रियेव्दारे नव्याने नियुक्त होणा-या पुरवठादारास परत (Buy Back) करुन संस्थानला अद्यावत दुरध्वनी यंत्रणाखरेदी करणेकामी ई-निविदा मागविणेस तसेच संस्थानचे संकेतस्थळावर मराठी व इंग्रजी मध्येजाहीरात प्रसिध्दकरुन,मुंबई व पुणे येथुन प्रकाशित होणारे जास्त खपाचे मराठीव इंग्रजी वृत्तपत्रातजाहिरात प्रसिध्द करणेस व याकामी येणा-याखर्चास मान्यता मिळणेकामी व श्री साईचे शताब्दी महोत्सवाचे दृष्टीकोनातुन पुढील कार्यवाही लवकरात लवकर होणेकामी सदरहु प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी,शासन निर्देश, तांत्रिक ,कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान :-** तांत्रिक,आर्थिकव प्रशासकिय.

**विभागाचा अभिप्राय:-** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणेश्री साईचे शताब्दी महोत्सवाचे दृष्टीकोनातुन तसेच संस्थानचे दैनंदिन वाढत्या व्यापामुळे दुरध्वनी यंत्रणा अद्ययावत करणेकामीची कार्यवाही लवकरात लवकर होणेकामी नियुक्त केलेल्यातांत्रीक सल्लागार DSG Consultant Pvt. Ltd. Mumbai यांना मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांनी काही महत्वपुर्ण सुचना करुन DBR मधील Budgetary Estimate पुन्हा तपासुन, सदर DBR चे प्रात्यक्षिक होणा-या मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादरीकरण करणेकामी त्यांना बोलविणेत यावे व त्यावेळी मा.व्यवस्थापन समितीने सुचविलेल्या बदलांची नोंद घेऊन, सदरहू सुचनांचा समावेश प्रसिध्द करण्यात येणा-या ई-निविदा प्रक्रियेत करुन व तांत्रिक दृष्ट्या कालबाहय झालेली सिमेंस व जुनी मॅट्रीक्स कंपनीची दुरध्वनी यंत्रणा ई-निविदा प्रक्रियेव्दारे नव्याने नियुक्त होणा-या पुरवठादारास परत (Buy Back) करुन संस्थानला अद्यावत दुरध्वनी यंत्रणा खरेदी कामी ईनिविदा मागविणेस तसेच संस्थानचे संकेतस्थळावर मराठी व इंग्रजी मध्ये जाहीरात प्रसिध्द करुन, मुंबई व पुणे येथुन प्रकाशित होणारे जास्त खपाचे मराठीव इंग्रजी वृत्तपत्रातजाहिरात प्रसिध्द करणेस व याकामी येणा-याखर्चास मान्यता मिळणेकामी सदरहु प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५०७** **आजचे सभेसमोर नवीन दुरध्वनीयंत्रणेचे खरेदी करणेकामी नेमणूक करणेत आलेले तांत्रिक सल्लागार DSG Consultant Pvt. Ltd. Mumbai हे उपस्थित होते. सभेसमोर त्यांनी या यंत्रणेमधील प्रस्ताव ०१ (अंदाजे खर्च रु.१.६ कोटी + टॅक्स) व प्रस्ताव ०२ (अंदाजे खर्च रु.१.४२ कोटी + टॅक्स) चे सादरीकरण दाखविले. तसेच सभेने विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सादरीकरणामधील प्रस्ताव क्र.०२ प्रमाणे नवीन दुरध्वनी यंत्रणा खरेदी करणेत यावी व जुनी यंत्रणा कालबाहय झालेली असल्यामुळे बायबॅक करणेत यावी, असे ठरले. त्यासाठी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१.४२ कोटी + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच नवीन प्रस्तावित दुरध्वनी यंत्रणेचा Onsite Warranty कालावधी ०३ वर्षाचा व त्यानंतर ०५ वर्षाचे (CAMC) दर मागविणेत यावे. त्याचप्रमाणे या यंत्रणेमध्ये साईभक्तांना संस्थानच्या**

**विविध प्रकल्पांची माहिती IVRS द्वारे ऐकावयास मिळावी व त्यांना संदेश वगैरे पाठविता येतील, याचा समावेश करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- ध्वनिक्षेपण व टेलिफोन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता नविन संगणकीय प्रणाली व त्यास सुसंगत लागणारे हार्डवेअर खरेदी करणेची प्रक्रिया संपुर्ण प्रकल्प शासन नियुक्त अधिकृत कन्स्लटंन्सी कंपनी मार्फत होणेकामी, त्यांचे सादरीकरणे पाहणे तसेच त्यांची प्राप्त झालेली दरपत्रके उघडणे व त्यातील निम्नतम दर असलेल्या कन्स्लटंन्सी कंपनीस कार्यादेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **मा.व्यवस्थापन समितीचा ठराव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.23/05/2017 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 415

**प्रास्ताविक–** महाराष्ट्र शासनाचा दि.01/07/2014 रोजीचाGAD - मातंस 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH) Mantralaya, Mumbai - 400032 अध्यादेशानुसार महाराष्ट्र शासनाने दि. 01/07/2014 तेदि. 30/06/2017 याकालावधीसाठी खालील कंन्सल्टंन्सी एजन्सींची नियुक्ती करण्यात आलेली आहे –

1) M/s Accenture, 2) M/s Deloitte
3) M/s Ernst & Young, 4) M/s KPMG, 5) M/s PwC

संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता नविन संगणकीय प्रणाली व त्यास सुसंगत लागणारे हार्डवेअर खरेदी करणेची प्रक्रीया व संपुर्ण प्रकल्प शासन नियुक्त अधिकृत कन्सल्टंन्सी कंपनीमार्फत होणेकामी, उपरोक्त नमुद कंपन्यांचे दरपत्रके सिलबंद पाकिटात स्विकारणेस मान्यता मिळणेकामी, सदरचा विषय दि.23/05/2017 रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आला असता, खालीलप्रमाणे निर्णय पारित झालेला आहे.–

"यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता HMIS, PACS, TELEMEDICINE या संगणकीय प्रणाली खरेदी करणेकामी प्रसिद्ध केलेली ई-निविदा प्रक्रीयारद्दकेलेबाबतची नोंद घेण्यात येऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच, सदरहूकामी नवीन यंत्रणा कार्यान्वित करुन घेण्याचे प्रक्रीयेमध्ये अधिक कार्यक्षमता आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या कंन्सल्टंन्सी कंपन्यांकडून तात्काळ दरपत्रके मागविणेत यावी, असे ठरले."

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त नमुद निर्णयाप्रमाणे व दि.01/07/2014 रोजीचे महाराष्ट्र शासनाचे अध्यादेशानुसार महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या उपरोक्त नमुद कंन्सल्टंन्सी एजन्सींना दि.15/06/2017 रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर/ मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांचे समोर सादरीकरण सादर करणेकामी, दि. 31/05/2017 रोजीचे टिपणीन्वये मान्यता घेण्यात आलेली असून दि.03/06/2017, दि. 05/06/2017 व दि. 13/06/2017 रोजीचे ई-मेल द्वारे संबंधीत 5 ही कंपन्यांना पत्र पाठवून त्यांना शिर्डी येथे आमंत्रित करण्यात आलेले आहे.

**मागणी–** दोन्ही रुग्णालयाच्या संगणकीय प्रक्रियेमध्ये अधिक कार्यक्षमता आणण्यासाठी सदरची कार्यवाही अधिकृत कंन्सल्टंन्सी एजन्सीचे मार्गदर्शनाखाली होणेकामी, मा. व्यवस्थापन समिती/ मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांचे समोर उपरोक्त कंपन्यांचे सादरीकरण पाहून, त्यांची प्राप्त झालेली सीलबंद दरपत्रके मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे उघडून निम्नत्तम दरधारकाशी वाटाघाटी करून सदर कंपनीची पुढील 5 वर्षाकरिता नियुक्ती करून, त्यांचेकडून्दोन्हीहॉस्पिटलकरीता HMIS, PACS, TELEMEDICINE यासंगणकीयप्रणाली व त्यास अनुषंगीक लागणारे संगणके, संगणकीय साहित्यांची खरेदी व सदरची सर्व यंत्रणा कार्यान्वित करून घेणेची कार्यवाही करणेकामी, त्यांना कार्यादेश देता येईल, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी, दोन्ही रुग्णालयाच्या संगणकीय प्रक्रियेमध्ये अधिक कार्यक्षमता आणण्यासाठी सदरची कार्यवाही अधिकृत कंन्सल्टंन्सी एजन्सीचे मार्गदर्शनाखाली होणेकामी, मा. व्यवस्थापन समिती/ मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांचे समोर उपरोक्त कंपन्यांचे सादरीकरण पाहून, त्यांची प्राप्त झालेली सीलबंद दरपत्रके मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे उघडून, निम्नत्तम दरधारकाशी वाटाघाटी करून सदर कंपनीची पुढील 5 वर्षाकरिता नियुक्ती करणेस तसेच, त्यांचे कडून दोन्ही हॉस्पिटलकरीता HMIS, PACS, TELEMEDICINE या संगणकीय प्रणाली व त्यास अनुषंगीक लागणारे संगणके, संगणकीय साहित्यांची खरेदी व सदरची सर्व यंत्रणा कार्यान्वित करून घेणेकामी, त्यांना कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास आपली मान्यता असावी.

**निर्णय क्र.५०८** **संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता नविन संगणकीय प्रणाली विकसीत करणेकामीचे सादरीकरण दाखविणेसाठी M/s Deloitte- Mumbai, M/s KPMG- Mumbai व M/s PwC- Mumbai या कंपन्यांचे प्रतिनिधी आजचे सभेसमोर उपस्थित होते, त्यांनी सभेस सादरीकरण दाखविले व सभेने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. यानंतर उपरोक्त प्रस्तावामधून Telemedicine सुविधा वगळणेत येऊन, सुधारित दर घेण्यात यावे, असे समितीने सुचविले. त्यानंतर संबंधीतांकडून प्राप्त झालेली सुधारित दरपत्रके आजचे सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.**

| **अ.नं.** | **कंन्सल्टंन्सी एजन्सीचे नाव** | **दरपत्रकामधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| १ | M/s Accenture, | Absent |
| २ | M/s Deloitte, Mumbai | १,७८,९९,७५०/- |
| ३ | M/s Ernst & Young, Mumbai | Absent |
| ४ | M/s KPMG, Mumbai | ६३,४२,५००/- |
| ५ | M/s PwC, Mumbai | **४९,८६,९७५/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता नविन संगणकीय प्रणाली विकसीत करणेकामी कन्सल्टंटची नेमणूक करणेसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक M/s PwC, Mumbai यांना, त्यांनी दिलेल्या दरांवर चर्चा करणेसाठी स्थानिक उपसमिती सभेसमोर बोलविणेत येऊन, त्यांचेकडून अंतीम दर घेण्यात यावे व त्यानंतर संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने एक फिजिओथेरपिस्ट मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम कलम २००४ तरतुद–** कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवाकर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र.३ –"सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतानासमितीनेसदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी."तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

**प्रस्ताविक-** डॉ किशोर गोडगे, न्युरोसर्जन (११ महिने कालावधीसाठी) यांचे दि. १७/०५/२०१७ रोजीचे पत्र प्राप्त झाले असुन त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

"As our dept of Neurosurgery consistaly doing well with good admission for operative work up as well as trauma patient.

Almost every patient required intense physiotherapy and rehabilitation which is also main point of treatment protocol. But due to inadequate staff it don't possible.

So kindly consider it in view of patient better care and to make our hospital as tertiory hub".

आकृतीबंधात फिजिओथेरपिस्ट पदाची पात्रता, पदसंख्या व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| रूग्णालयाचे नाव | पदनाम | शैक्षणिक पात्रता | पद संख्या | सध्या कार्यरत कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| श्री साईनाथ रूग्णालय | फिजिओथेरपिस्ट | 1) Age not more than 38 for open & 43 for Reserved category<br>2) Master of Physiotherapy (M.Ph)/ | ०१ | ०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | M.Sc.(Physiotherapy) from any Government recognized University OR<br>2) Bachelor of Physiotherapy (BPTh) / B.Sc.(Physiotherapy) with Experience of minimum of 5 years as a physiotherapist.<br>3) MS-CIT | | |
| श्री साईबाबा हॉस्पिटल | सिनीअर फिजिओथेरपिस्ट | 1) Age not more than 38 for open & 43 for Reserved category<br>2) Master of Physiotherapy (M.Ph)/ M.Sc.(Physiotherapy) from any Government recognized University OR<br>2) Bachelor of Physiotherapy (BPTh)/ B.Sc.(Physiotherapy) with Experience of minimum of 5 years as a physiotherapist.<br>3) MS-CIT | ०१ | ०१ (स्थायी) (प्रत्यक्ष काम श्री साईनाथ रूग्णालय) |
| | ज्युनिअर फिजिओथेरपिस्ट | 1) Age not more than 38 for open & 43 for Reserved category<br>2) Bachelor of Physiotherapy (BPTh) / B.Sc.(Physiotherapy)<br>3) MS-CIT | ०३ | ०२ कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत. (०१ प्रत्यक्ष काम श्री साईनाथ रूग्णालय व ०१ प्रत्यक्ष काम श्री साईबाबा हॉस्पिटल) |

श्री साईबाबा रूग्णालयात मेंदुरोग तज्ञ यांनी फिजिओथेरपिस्टची मागणी केलेली आहे. मेंदुरोग रूग्णांकरीता स्पिच थेरपी, लिंब थेरपी व कार्डीयाक रूग्णांकरीता चेस्ट थेरपी ईत्यादी करीता आणखी एका फिजिओथेरपिस्टची मागणी केलेली आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी मंजुर असलेल्या आकृतीबंधात ज्युनिअर फिजिओथेरपिस्टची ३ पदे मंजुर असुन सध्या दोनच कंत्राटी फिजिओथेरपिस्ट कार्यरत आहेत. त्यातील एक श्री साईनाथ रूग्णालयाकडे काम करत असल्याने श्री साईबाबा हॉस्पिटलकडे फक्त एकच फिजिओथेरपिस्ट कार्यरत आहेत. तथापि सध्या आणखी एका फिजिओथेरपिस्टची आवश्यकता आहे.

**मागणी-** ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नेमणूक.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने घेतल्यास रू. ८२५७/-.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत–** सध्या बिंदूनामावलीचे काम अंतीम झालेले नाही. श्री साईबाबा रूग्णालयाकडे कनिष्ठ फिजिओथेरपिस्टची आवश्यकता असुन संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने एक फिजिओथेरपिस्ट घेणेबाबत वैद्यकीय संचालक यांनी सुचविलेले आहे.

तरी, संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने एक फिजिओथेरपिस्ट घेणेबाबतनिर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रूग्णालयात मेंदुरोग तज्ञ यांच्या मागणीचा विचार करता, श्री साईबाबा रुग्णालयामध्ये तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधीकरीता सध्या संस्थानला कंत्राटी पध्दतीने कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारामार्फत एक फिजिओथेरपिस्ट, इतर फिजिओथेरपिस्टला देत असलेल्या वेतनावर घेण्यात यावा.**

**याचवेळी अशीही चर्चा झाली की, कार्डीओलॉजी विभागाकरीता एका क्लिनीकल असिस्टंटची आवश्यकता आहे, याकरीता क्लिनीकल असिस्टंटही ठेकेदारामार्फत ११ महिने कालावधीसाठी, क्लिनकल असिस्टंट पदाच्या वेतनश्रेणीच्या आसपासच्या वेतनावर घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **श्री साईप्रसादालयात दैनंदिन तयार होणारे प्रसाद भोजन विद्यार्थ्यांना दैनिक शालेय पोषन आहार म्हणून देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –**सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी,शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा. व्यवस्थापन समिती ठराव क्रमांक:-** मा.व्य.समिती दि.२७.०३.२०१७ रोजीची सभा निर्णय क्र. २६२.

**प्रास्ताविक–** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम सकुल विभागाकडे ज्यु. केजी. ते १० वी पर्यंत शिक्षण घेणारे अंदाजे एकूण २६४७ विद्यार्थी यांना संस्थानचे वतीने मध्यान्ह भोजन देणेबाबत दि. २७.०३.२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत आयत्या वेळेचा विषय ठेवण्यात आला होता.मध्यान्ह भोजनात विद्यार्थ्यांना सोमवार मसाले भात व शिरा, मंगळवार डाळ खिचडी व बुंदी, बुधवार उपमा व बुंदी लाडू, गुरुवार मटकी हुसळ व बुंदी, शुक्रवार फळे व शिरा, शनिवार पोहा व लापशी असे विविध पदार्थ देणेबाबत प्रस्ताव ठेवण्यात आला होता. निर्णय क्र. २६२ अन्वये " यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी मधील शालेय विद्यार्थ्यांना संस्थानमार्फत मोफत मध्यान्ह भोजन देणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली ".

**मागणी:-** दि.०९.०६.२०१७ रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांनी पोषण आहार सुरु करणेकामी आढावा बैठक घेतली त्यात मा.उपकार्यकारी अधिकारी, सर्व प्रशासकीय अधिकारी, प्रसादालय विभागप्रमुख, सर्व प्राचार्य/ मुख्याध्यापक (शैक्षणिक संकुल) यांचे उपस्थित झालेल्या चर्चेनुसार, प्राचार्य/मुख्यध्यापक (शैक्षणिक संकुल) यांनी श्री साईप्रसादालयात दररोज साईभक्तांना प्रसाद भोजनात दोन भाज्या, डाळ, भात, चपाती व गोड पदार्थ म्हणून शिरा/ बुंदी/ बर्फी/ शेवई असे पदार्थ असतात. मा.व्य.समितीने निश्चित केलेले पदार्थ हे नाष्टा सदृष्य असून यामध्ये चपातीचा समावेश नसल्याने, चपाती द्यावयाची झालेस भाजी द्यावी लागेल. मुले जेवणाचा डबा आणणार नसल्याने त्यांना भुक लागली तर भोजनाची मोठी अडचण निर्माण होईल. करीता विद्यार्थ्यांना नास्त्याऐवजी साईभक्तांसारखे परिपूर्ण भोजन दिले तर सदरची अडचण होणार नाही. तसेच विदयार्थ्यांना वैद्यकिय दृष्टया आवश्यक असलेला परिपुर्ण आहाराची पुर्तता होईल. तसेच प्रसादालयाकडे असलेले अपुरे मनुष्यबळ तसेच या विविध पदार्थांसाठी/ विविध फळांसाठी दैंनदिन येणारा वाढीवचा स्वतंत्र खर्च विचारात घेता श्री साई प्रसादालयात दैनंदिन तयार होणारे प्रसाद भोजन विद्यार्थ्यांना देण्यात आल्यास वाढीव कामगार, आचारी, तसेच जादाचा खर्च होणार नाही असे नम्र मत प्र.अधीक्षक, प्रसादालय विभाग व प्रशासकीय अधिकारी यांनीही व्यक्त केले आहे. सदर प्रसाद भोजनाची संस्थान वाहनातून ने आण करणे व प्रत्येक माळयावर पोहचकरणे, आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना भोजन वाढणे हे काम प्रसादालया विभागाकडील कर्मचा-यांवर सोपविण्यात यावे तसेच मदतीसाठी शाळेकडील कंत्राटी मदतनिस कर्मचारी घेण्यात यावेत. तसेच आवश्यक असलेले प्रसादभोजन पदार्थ वाहतुक करणेकामी प्राचार्य/ मुख्याध्यापक (शैक्षणिक संकुल) यांनी वाहन विभाग यांना विद्यार्थ्यांचे जेवणाच्या वेळा विचारात घेवून प्रसादालयाकडे वाहन पाठविणेबाबत सुचित करणेत यावे. मुलांचे डब्बे शाळेत आणणे ऐवजी प्रसादालय विभागमार्फत ३००० नग स्टे.स्टिल ताटे शाळेकडे ठेवणेत येऊन शाळेकडील स्त्री मदतनिस यांचेमार्फत ताटे धुण्याचे व साफ करण्याचे काम करणेत यावे असे चर्चेअंती ठरले आहे.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी करुन अनुमान:-** शालेय प्रशासनाचा भाग म्हणून गरजेचे आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** दि.२७.०३.२०१७ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्रं.२६२ मध्ये " श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी मधील शालेय विद्यार्थ्यांना संस्थानमार्फत मोफत मध्यान्ह भोजन देणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या अन्न पदार्थाऐवजी प्रसादभोजन व्यवस्थेतील दररोजचे प्रसादभोजन देणेबाबत बदल करुन मिळणेकामी निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.५१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी मधील शालेय विद्यार्थ्यांना संस्थानमार्फत मोफत मध्यान्ह भोजन देणेकामी उपरोक्त प्रस्तावीत अन्न पदार्थाऐवजी प्रसादभोजन व्यवस्थेतील दररोजचे प्रसादभोजन देणेत यावे. यामध्ये बुंदी/ बर्फी गोड पदार्थ देण्यात यावा. तसेच प्रत्येक शनिवारी अर्धा दिवसच शाळा असल्यामुळे शनिवारी पोषण आहार देण्यात येऊ नये, असे ठरले.**

(कार्यवाही- प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८,२८२/१,२८४ व २८८ मधील देगणी मिळालेल्या इमारत "बी" व "डी" मध्ये आय.ए.एस. अकॅडमी सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे मा.व्यवस्थापन समिती दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेत, श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, ता.वसई-विरार (पूर्व) जिल्हा ठाणे यांची मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८, २८२/१, २८४ व २८८ मधील भुखंड क्रमांक १ इमारत बी व डी विनामोबदला संस्थानला देणगी स्वरुपात हस्तांतरण करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समिती दि.२३-२४/०५/२०१७ चे सभेमध्ये निर्णय क्र.४४८ खालीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

"या देणगी मिळालेल्या इमारतींमध्ये उपेक्षित, वंचित, आदिवाशी तसेच खेडोपाडयामधील शेतक-यांच्या मुलांसाठी आयए.एस.ॲकॅडमी सुरू करणेचा निर्णय घेण्यात आला. यावेळी मा.अध्यक्ष महोदय यांनी सभेस माहिती दिली की, सेवानिवृत्त जेष्ठ सनदी अधिकारी, श्री.सुधीर ठाकरे यांनी विनामोबदला या ॲकॅडमीच्या गव्हर्निंग कौन्सीलचे अध्यक्षपद स्विकारणेस संमती दिलेली आहे. श्री.सुधीर ठाकरे हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे ३ वर्ष अध्यक्ष होते. दि.०१ ऑक्टोबर, २०१७ पासून श्रींचे समाधी शताब्दी महोत्सवास प्रारंभ होत असून, त्याच दिवशी सदरहू आय.ए.एस.ॲकॅडमी सुरू करण्यात यावी. यासाठी श्री.सुधीर ठाकरे यांना याकामी नेमणूक पत्र देणेकामी व गव्हर्निंग कौन्सीलसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी. तसेच आय.ए.एस.ॲकॅडमीसाठी सविस्तर नियमावली तयार करणेत येऊन, ती समिती सभेसमोर सादर करणेत यावी, असे ठरले."

वरील मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कार्यवाही करणेकामी महाराष्ट्रातील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई (S.I.A.C.), द युनिक ॲकॅडमी, पुणे व दिपस्तंभ ॲकॅडमी, जळगाव यांचेशी संपर्क करुन माहिती घेण्यात आलेली आहे. याकामी दि.०६/०६/२०१७ रोजी मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात सकाळी ११.३० वाजता बैठकीचे आयोजन करणेत आलेले होते. सदर बैठकीच्या वेळी मा.श्री.नागेश गव्हाणे, द युनिक ॲकॅडमी, पुणे हे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया, प्रशासकीय कामाचा आकृतीबंध, कोर्सचा कालावधी, ग्रंथालय, प्रशिक्षण हॉल, प्रशिक्षक, निवासव्यवस्था व इतर विषयांवर चर्चा करणेत आलेली आहे. त्यास अनुसरून संस्थानमार्फत आय.ए.एस.ॲकॅडमी सुरू करणेकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

१) देणगी मिळालेल्या भुखंड क्रमांक.१ मधील इमारत **"डी"** चे तळमजला व त्यावरील ४ मजले एकूण क्षेत्रफळ २६३३.७६ चौमी मध्ये प्रशासकीय कार्यालय, फर्निचर, प्रशिक्षण हॉल, रिडींग रुम, ग्रंथालय व इतर अत्याधुनिक सेवा – सुविधा निर्माण कराव्या लागतील.

२) देणगी मिळालेल्या भुखंड क्रमांक.१ मधील इमारत **"बी"** चे तळमजला व त्यावरील ६ मजले याचे एकूण क्षेत्रफळ ७१४८.६८ चौमी मध्ये १०० विद्यार्थ्यांसाठी (मुला व मुलींसाठी स्वतंत्र) निवासव्यवस्था, टी.व्ही.हॉल, कॅन्टीन व इतर अनुषंगीक सुविधा निर्माण कराव्या लागतील.

३) यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये आय.ए.एस.ॲकॅडमी सुरू करण्यासाठी गव्हर्नर कौन्सिलच्या अध्यक्षपदी, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष, श्री.सुधीर ठाकरे यांची नेमणूक करणेत आलेली आहे. त्यांचेप्रमाणे इतर सदस्यांची नेमणूक करावी लागेल.

४) राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई या नामांकित ॲकॅडमी यांचेकडे प्रशासकीय कामकाजासाठी खालीलप्रमाणे कर्मचारी आकृतीबंध आहे.

| अ.नं. | पदनाम | वेतनबॅण्ड | पदसंख्या |
|---|---|---|---|
| ०१ | संचालक | रु.३७४००-६७००० + ग्रेड पे १०,००० | ०१ |
| ०२ | अधिक्षक | रु.९३००-३४८०० + ग्रेड पे ४४०० | ०१ |
| ०३ | वसतिगृह अधिक्षक | रु.९३००-३४८०० + ग्रेड पे ४३०० | ०२ |
| ०४ | लघुलेखक | रु.९३००-३४८०० + ग्रेड पे ४२०० | ०१ |
| ०५ | उप लेखापाल | रु.९३००-३४८०० + ग्रेड पे ४२०० | ०१ |
| ०६ | ग्रंथपाल | रु.९३००-३४८०० + ग्रेड पे २८०० | ०१ |
| ०७ | वरिष्ठ लिपीक | रु.५२००-२०२०० + ग्रेड पे २४०० | ०१ |
| ०८ | लिपीक-टंकलेखक | रु.५२००-२०२०० + ग्रेड पे १९०० | ०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०९ | झेरॉक्स मशिन चालक | रु.४४४०-७४४० + ग्रेड पे १३०० | ०१ |
| १० | शिपाई | रु.४४४०-७४४० + ग्रेड पे १३०० | ०३ |
| ११ | माळी | रु.४४४०-७४४० + ग्रेड पे १३०० | ०१ |
| १२ | सुरक्षा रक्षक | रु.४४४०-७४४० + ग्रेड पे १३०० | ०३ |
| १३ | मदतनीस | रु.४४४०-७४४० + ग्रेड पे १३०० | ०१ |
| | | **एकूणः-** | **१८** |

संस्थानमार्फत आय.ए.एस. ॲकॅडमी सुरू करणेकामी वरीलप्रमाणे नव्याने आकृतीबंध तयार करुन त्यास शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घ्यावी लागेल.

५) १०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणकामी प्रशिक्षकांची नेमणूक करावी लागेल. याकामी देशभरातील नामांकित संस्थामार्फत विहीत पध्दतीचा वापर करुन तज्ञ प्रशिक्षक उपलब्ध करुन घेता येईल.

६) १०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणेसाठी अभ्यासक्रम निश्चित करणे व प्रशिक्षण साहित्य उपलब्ध होणेकामी देशभरातील प्रशिक्षण संस्थांकडून प्रस्ताव मागवावे लागतील, त्यासाठी वर्तमान पत्रात जाहीरात द्यावी लागेल.

७) तसेच विविध ठिकाणच्या प्रशिक्षण संस्थांच्या कार्यपध्दतीचा, तेथील पायाभुत सुविधांचा अभ्यास करणेसाठी त्यांना भेटी द्याव्या लागतील.

८) शिर्डी येथे प्रशिक्षण संस्था सुरू करणेसाठी विविध प्रशिक्षण संस्थांमधील तज्ञ व्यक्तींना शिर्डी येथे मार्गदर्शनासाठी बोलवावे लागेल व त्यासाठी त्यांना प्रवास शुल्क द्यावे लागेल.

उपरोक्त अ.नं.०१ ते ०८ मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निघोज, ता.राहाता येथील देगणी मिळालेल्या "बी" व "डी" इमारतीमध्ये आय.ए.एस. अकॅडमी सुरु करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच या अकॅडमीच्या गव्हर्नर कौन्सिलमध्ये सदस्य म्हणून मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष यांचेबरोबरच मा.ॲड्मोहन जयकर, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.श्री.प्रताप भोसले या समिती सदस्यांचा समावेश करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **डॉक्टर्स डे कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय आणि इंडियन मेडीकल असोसिएशन शाखा, शिर्डी व राहाता यांचे संयुक्त विद्यमाने दि.०१ जुलै २०१७ रोजी "डॉक्टर्स डे" निमित्त कार्यक्रम आयोजित करण्याचा मानस आहे. सदर कार्यक्रमात ज्येष्ठ समाजसेवक डॉ. विकास आमटे यांना आमंत्रित करुन त्यांचे व्याख्यान आयोजीत करुन त्यानंतर स्नेह भोजनाचे आयोजन करता येईल. डॉ. विकास आमटे यांचे प्रतिनिधींशी प्राथमिक स्वरूपात संपर्क केला असता डॉ. आमटे यांनी कार्यक्रमाला येण्यास होकार दर्शविला असल्याचे त्यांनी कळविले आहे. सदर कार्यक्रमासाठी डॉ.विकास आमटे व त्यांचे एक प्रतिनिधी यांचे दोन्ही बाजूचे विमान प्रवासाचा खर्च इंडियन मेडीकल असोसिएशन करण्यास तयार आहे.

श्री साईबाबा संस्थान मार्फत डॉ.विकास आमटे व त्यांचे प्रतिनिधी यांचेकरीता मुंबई विमानतळ ते शिर्डी व शिर्डी ते पुणे विमानतळापर्यंत गाडीची व्यवस्था व त्यांचे शिर्डी येथील निवास, दर्शन, जेवनाची व्यवस्था करता येईल. तसेच कार्यक्रमास उपस्थित डॉक्टर व निमंत्रीत मान्यवरांकरीता संस्थान प्रसादालयात व्ही.आय.पी. कक्षात जेवनाची व्यवस्था करता येईल.

तरी सदर कार्यक्रम घेणेकामी व उपरोक्त व्यवस्था संस्थान मार्फत करणेकामी मान्यता मिळणेस सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉक्टर्स डे कार्यक्रम साजरा करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षीका)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी काम करणारे ठेकेदारास मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयात ताशी 20000 क्षमतेचे चपाती मशिन असल्यामुळे चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी ई-निविदा मागवून मा.व्यवस्थापन समिती दि.19.5.2016 रोजीचे सभेतील निर्णय क्र.307(9) नुसार जा.नं.एसएसएस/वशी/1141/2016 दि.09.06.2016 अन्वये दि. यशोधरा महिला सह.उत्पादक संस्था, नाशिक यांना दि.16 जून 2016 ते दि.15 जून 2017 अखेर एक वर्ष या कालावधी करीता प्रति क्विंटल कोरडा आटा + मैदयास रु.323.90 पै (अक्षरी रु.तीनशे तेवीस पैसे नव्वद मात्र) सर्व करांसह या प्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेला आहे. सदरची मुदत दि.15.06.2017 अखेर संपूष्टात येत आहे.

त्यामुळे पुढील एक वर्ष कालावधी साठी मशिनवर चपाती तयार करणेकामी ई-निविदा मागविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. तथापी मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.155 अन्वये श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर चपाती तयार करणेचे काम विभागांअतंर्गत करुन घेण्यात यावे, तसेच आवश्यकता भासल्यास कर्मचा-यांना सदरहू मशिन चालविणेचे प्रशिक्षण देण्यात यावे. असा झालेला आहे.

सदर मशिनवर काम करणेसाठी आवश्यक असलेला एका शिफटला 16 याप्रमाणे दोन शिफ्टसाठी 32 कर्मचारी वर्ग प्रसादालयाकडे उपलब्ध नाही त्यामुळे सदरचे कामे करणेस व भक्तांना प्रसादभोजन पुरविणेस फार मोठया प्रमाणात अडचणी येत आहे.

त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि.25/02/2017 रोजीचे निर्णय क्रं.155 बाबत फेरविचार होणेकामी प्रस्ताव सादर करावा लागेल. त्यास मान्यता असावी.

तुर्त कामाची निकड लक्षात घेता, आहे त्याच निविदाधारकाला यापुर्वी देण्यात आलेल्या अटी/शर्तीचे अधीन राहुन एक महिना मुदतवाढ द्यावी लागेल असे नम्र मत आहे.

तरी सदर ठेकेदाराला एक महिना मुदतवाढ देणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३** **कार्यकर्ता अभ्यासवर्ग आयोजनाकरीता सहयोग मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमातील विनियम २१ (१) (ख) मध्ये भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविक:-** दि. २५/०६/२०१७ ते २६/०६/२०१७ या दोन दिवस स्वदेशी जागरण मंच कार्यकर्ता अभ्यासवर्ग आयोजन केलेले आहे.

सदरच्या पत्रात स्वदेशी जागरण मंच गेल्या २५ वर्षाकरीता आर्थिक क्षेत्रात प्रबोधन आणि समाज जागरणाचे काम करीत आहे. कार्यकर्ता प्रशिक्षणाकरीता अभ्यासवर्ग आयोजित केले जातात, देशात पूर्व भाग, पश्चिम व मध्यभाग, उत्तर भाग आणि दक्षिण भाग असे एकुण चार अभ्यासवर्ग घेतले जातात. यंदा आपल्या पश्चिम आणि मध्य क्षेत्राच्या अभ्यासवर्ग शिर्डी येथील आपल्या देवस्थानच्या परिसरात व्हावा अशी कार्यकर्त्यांची इच्छा आहे. सर्व शक्तीमान श्री साईचा आशिर्वाद या निमित्ताने कार्यकर्त्यांना मिळावा हा हेतू आहे, असे म्हटले आहे.

तसेच सहभागी होणा-या अंदाजे २५० ते ३०० कार्यकर्त्याकरिता निवास व चहा, अल्पाहार, भोजन व्यवस्था, सत्रांकरिता खूर्च्या व ध्वनिवर्धकासह सभागृह व अन्य आवश्यक व्यवस्था कमीत कमी शुल्क आकरुन उपलब्ध देवून आम्हास उपकृत करावे अशी विनंती त्यांनी पत्रात केलेली आहे.

सदरचे पत्रावर मा. विश्वस्त श्री प्रतापराव भोसले यांनी please Arrange असा शेरा दिलेला आहे.

**मागणी:-** साई धर्मशाळा विभागामधील आर इमारतीचे वरील बाजुस असलेल्या प्रसादालयामध्ये स्वदेशी जागरण मंच कार्यकर्ता अभ्यासवर्ग कार्यक्रम करण्यास परवानगी मिळणेस व निवासव्यवस्था करणे बाबत.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** यापुर्वी खाजगी कामासाठी/ शिबीरासाठी परवांनगी देण्यात आलेली नाही. मा. विश्वस्त यांचे निर्देशानुसार दि.१४/१२/२०१६ ते १६/१२/२०१६ या तीन दिवसासाठी अनुलोम आध्यात्मीक अभ्यासवर्गाचे शासकीय कार्यक्रमासाठी निवासव्यवस्था व आर इमारतीचे वरील बाजुस असलेल्या प्रसादालयामध्ये रु.११००/- मात्र देणगी स्वरुपात घेवुन परवानगी देण्यात आलेली होती. संबंधीतांनी इतर कोणतीही मागणी पत्रात केलेली नव्हती. त्यांना फक्त हॉल व निवासव्यवस्था करण्यात आलेली होती.

मा. श्री. प्रतापराव भोसले, विश्वस्त यांचे सुचनेनुसार तसेच साईभक्तांना त्रास होणार नाही या अटीवर साईधर्मशाळा येथे अभ्यासवर्गाचे आयोजन प्रसादालयाचे हॉलमध्ये दि. २५/०६/२०१७ ते २६/०६/२०१७ या दोन दिवसासाठी स्वदेशी जागरण मंच कार्यकर्ता अभ्यासवर्ग घेण्यास व निवासव्यवस्था करणेस परवानगीदेता येईल, असे नम्र मत आहे. संस्थान नियमानुसार संबंधिताकडुन सेवाआकार आकारुन निवास व्यवस्था करता येईल. प्रसादालयावरील हॉलचे नाममात्र शुल्क रु.११००/- मात्र देणगी स्वरुपात रक्कम स्विकारुन स्वदेशी कार्यकर्ता अभ्यासवर्ग कार्यक्रमास परवानगी देता येईल.तसेच आयोजकांनी कार्यक्रमासाठी ३०० नग खुर्ची व ध्वनिक्षेपणाची व्यवस्था करणेबाबत मागणी केली होती. परंतु अशा प्रकारची व्यवस्था संस्थान मार्फत यापुर्वी करण्यात आलेली नाही. आयोजकांना सदरची व्यवस्था करणेबाबत कळविता येईल. आयोजकाच्या मागणीनुसार दररोज ३०० कपचहा व ३०० अल्पाहार नियमानुसार शुल्क आकारुन कॅन्टीन विभागामार्फत देता येईल, तसेच त्यांची भोजनव्यवस्था प्रसादालय विभागामार्फत साईप्रसादालयामध्ये करता येईल.

तरी स्वदेशी जागरण मंच यांचे मागणीनुसार उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, स्वदेशी जागरण मंच कार्यकर्ता अभ्यासवर्ग आयोजन करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेतस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२४** **आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये संस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**निर्णय क्र.५१५** व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय झाल्यानंतर, त्याची अंमलबजावणी सुरु असताना, समिती सदस्यांनी हस्तक्षेप करु नये, समिती सदस्यांचे त्याबाबत काही म्हणणे असल्यास, त्यांनी पुढील व्यवस्थापन समिती सभेमध्ये मांडावे, असे ठरले. (कार्यवाही- कार्यकारी अधिकारी कक्ष)

---

**निर्णय क्र.५१६** श्रींचे समाधी शताब्दी वर्षाचे निमित्ताने शिर्डीकडे येणाऱ्या सर्व रस्ते/ महामार्गांवर आकर्षक महाद्वारांची उभारणी करणेत यावी. यासाठी शासनाचे सार्वजनिक बांधकाम खात्यास विचारणा करण्यात यावी. ते महाद्वार उभारणी करुन देण्यास तयार असतील तर त्यासाठीचा खर्च सार्वजनिक बांधकाम खात्यास देण्यात यावा अथवा त्यांचेकडून NOC घेऊन, संस्थानमार्फत महाद्वारांची उभारणी करणेत यावे, असे ठरले.

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख/ बांधकाम विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.५१७** आजचे सभेमध्ये साईबाबा पालखी सोहळा, शिर्डीचे अध्यक्ष व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांनी श्री क्षेत्र शिर्डी ते श्री क्षेत्र पंढरपुर पायी दिंडीमध्ये शिर्डी व शिर्डी परिसरामधील जवळपास १००० भाविक असतात व या दिंडीकरीता संस्थानकडून वस्तुरुपाने कोरडा शिधा, पाणी टॅंकर, मेडीकल सेवा उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी विनंती सभेस केली.

यावर श्रीक्षेत्र शिर्डी ते पंढरपूर पायी दिंडीसाठी अन्नदान, पाणी टॅंकर, मेडीकल सेवा व इतर सुविधा संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्याची पध्दत सुरु केल्यास शिर्डी परिसरातील गावागावातील पंढरपूर पायी दिंडी, पालखी, रथ सोहळा आयोजित करणारे, सदर सोहळ्यासाठी अन्नदान, पाणी टॅंकर, मेडीकल सेवा, निवासी मंडप व इतर सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत संस्थानकडे अर्जाव्दारे मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरची पध्दत सुरु करु नये, असे मत कार्यकारी अधिकारी यांनी प्रदर्शित केले.

परंतु सदरहू पायी दिंडी शिर्डी गावातून प्रतिवर्षी निघते व शिर्डी आणि शिर्डी परिसरातील ग्रामस्थांचा त्यामध्ये मोठया प्रमाणावर सहभाग असतो. तसेच या पायी दिंडीची ठिक-ठिकाणी स्थानिक दानशुर ग्रामस्थ भोजन व्यवस्था करीत असतात. याकरीता एक विशेष बाब म्हणून श्रीक्षेत्र शिर्डी ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्यासाठी अंदाजे १००० वारकऱ्यांना पाच दिवसाच्या अन्नदानासाठी कोरडा शिधा देण्यात यावा, असे समिती सदस्यांचे मत झाले, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**निर्णय क्र.५१८** Dnyanada Institute of Flow Piping Technology, Pune या संस्थेचे प्रतिनिधी सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत संस्थानचे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नळ कारागीर (प्लंबर) हा अभ्यासक्रम सुरु करावा, अशी विनंती केली व या अभ्यासक्रमाचे सभेसमोर सादरीकरण दाखविले. हा

अभ्यासक्रम त्यांच्या देखरेखीखाली सुरु करावा व यासाठी त्यांना रॉयल्टी स्वरुपात वार्षिक रु.९,००,०००/- मात्र व त्यांचे प्रतिनिधींच्या प्रत्येक भेटीस रु.७,५००/- मात्र रकमेची मागणी केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत संस्थानचे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नळ कारागीर हा अभ्यासक्रम Dnyanada Institute of Flow Piping Technology, Pune यांचे देखरेखीखाली सुरु करणेत यावा व या संस्थेस रॉयल्टी देणेऐवजी, सदरहू अभ्यासक्रमास शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान त्यांना देण्यात यावे, याबाबतचा मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- प्राचार्य, आय.टी.आय.)

---

**निर्णय क्र.५१९** श्रींचे समाधी शताब्दी वर्षानिमित्ताने साईभक्तांसाठी मोठ-मोठया कलाकारांचे कार्यक्रम साईआश्रम भक्तनिवास येथे आयोजित करावयाचे आहेत, यासाठी त्या ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांकरीता डोम स्वरुपाचा मंडप संस्थानमार्फत खरेदी करुन अथवा भाडोत्री पध्दतीने उभारणीबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.५२०** दि.२५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६५ अन्वये ठरलेनुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना उर्वरीत रु५ कोटी मात्र अनुदान देणेकामी चर्चा करणेसाठी, श्री.धीरेन भोसले, शिर्डी एअरपोर्ट डायरेक्टर हे आजचे सभेसमोर उपस्थित होते. समिती सभेने त्यांचेबरोबर आजतागायत विमानतळाच्या झालेल्या कामाबाबत चर्चा केली. तसेच सदरहू विमानतळावर संस्थानसाठी २००० चौ.फुट जागेची मागणी केली असता, सध्याचे टर्मिनंन्समध्ये संस्थानसाठी १००० चौ.फुट जागेची तरतूद केलेली असून उर्वरित १००० चौ.फुट जागा पुढील टप्प्यामध्ये राखीव ठेवण्यात येईल व संस्थान विश्वस्त/ मान्यवरांसाठी व्ही.आय.पी. लॉन्चमध्ये स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. याप्रमाणे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडून लेखी स्वरुपात घेण्यात यावे व त्यांना उर्वरित रु५ कोटी मात्र रक्कम देण्यात यावी. त्याचबरोबर अग्निशमन, रुग्णवाहिका व श्री साईबाबा रुग्णालयामध्ये राखीव कॉटस् ठेवणेसाठी आवश्यक बाबींची पुर्तता करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.५२१** दानशुर साईभक्त श्रीमती गिरमगौनि श्रवणी सुधीर, रा. पठाणचेरु यांनी दि.०९.०६.२०१७ रोजीचे अर्जान्वये, त्यांचे कुटुंबीय व श्री.रमेशभाई संहेता, मुंबई यांचे वतीने, दि.१४ जुन, २०१७ रोजी शिर्डी येथे होणाऱ्या साईसेवक संमेलनाकरीताचे अन्नदानाचा पुर्ण खर्च देणगी स्वरुपात करणेची इच्छा प्रदर्शित केलेली होती. त्यास समितीने मान्यता दिली व संस्थानमार्फत त्यांना आभारपत्र देण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.४५८ ते ५२१ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०५.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी